रामपर्व

विजय इंदूकेशव पवार

रामपर्व
Ramparva

पहिली आवृत्ती : मे २०२६

© विजय इंदूकेशव पवार

श्री महालक्ष्मी अपार्टमेंट,
ए-४०३, भारतीय जनता पार्टी कार्यालयाजवळ, पनवेल, ४१० २०६
E-mail : vijaypawar.pawar@gmail.com

प्रकाशक :
सौ. नम्रता मुळे,
डिम्पल प्रकाशन,
मुंबई कार्यालय :
४/१, कल्याण बिल्डिंग, खाडिलकर रोड, मुंबई ४०० ००४
मोबाईल :९८२०७४८०८१

१०४, वायाकिकी अपार्टमेंट,
आनंद नगर, नवघर, वसई रोड (पश्चिम),
जि. पालघर ४०१ २०२

मांडणी व सजावट : मीडियानेक्स्ट इन्फोप्रोसेसर्स प्रा. लि. पुणे
मुखपृष्ठ : मुकुंद बहुलेकर

निर्मितिव्यवस्था : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ

मुद्रणस्थळ :
गिरीश राव
आकृती प्रिंट सोल्यूशन्स प्रा. लि.
३१/बी/ पर्वती इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे-सातारा रोड, पुणे ४११ ००९

मूल्य : रु. २००/-

या पुस्तकातील सर्व मजकुराचे आणि आशयाचे कॉपीराईट स्वाधीन आहेत. त्यातील कशाचीही छायांकित प्रत काढणे, त्याचे पुनर्मुद्रण करणे, किंवा अन्य कोणत्याही माध्यमांत रूपांतर करणे, हा कॉपीराईट कायद्याचा भंग ठरेल. तसे केल्याचे आढळल्यास कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल.



सासरे
स्व. जनार्दन भगतसाहेब



वडील
स्व. चांगू काना ठाकूर



आई
स्व. भागूबाई चांगू ठाकूर

गरिबीतही ज्यांनी जगण्याचे बळ दिले ते
माझे सासरे जनार्दन भगतसाहेब, आई भागूबाई आणि
वडील चांगू काना ठाकूर यांच्या पवित्र स्मृतीस
हा जीवनप्रवास मी अर्पण करीत आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर

शुभेच्छा संदेश





देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

जा.क्र/मु.मं.स/ज.क./३९०/२०२६
दि. ०५ मे, २०२६

शुभेच्छा

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या बहुआयामी, संघर्षमय आणि लोकसेवेला समर्पित आयुष्याचा धांडोळा घेणारा, त्यातील प्रेरणादायी पट उलगडणारा 'रामपर्व' हा ग्रंथ, प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला.

ज्येष्ठ नेते श्री ठाकूर यांचा अथक परिश्रमातून, दूरदृष्टीतून आणि लोकाभिमुख कार्यातून उभा राहिलेला आदर्श 'रामपर्व'च्या प्रत्येक पानातून प्रकर्षाने जाणवतो. हा ग्रंथ एका थोर व्यक्तिमत्वाच्या संघर्षगाथेचा महत्वाचा दस्तावेज आहे. सामान्य माणसाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याचा ध्यास, समाजकारणातील निष्ठा, शिक्षण आणि जनकल्याणासाठी केलेले अविरत प्रयत्न या सर्व पैलूंना या ग्रंथात अत्यंत नेमकेपणाने आणि प्रभावीपणे शब्दबद्ध करण्यात आले आहे. त्यामुळे 'रामपर्व' हा केवळ वाचन आनंद देणारा ग्रंथ नसून विचारांना चालना, प्रेरणा देणारा आणि सामाजिक जाणीवा अधिक दृढ करणारा साहित्यिक ठेवा देखील आहे.

आजच्या पिढीसाठी नेतृत्व, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांचे जिवंत उदाहरण म्हणून हा ग्रंथ निश्चितच मार्गदर्शक ठरेल. प्रत्येक वाचकाला स्वतःमध्ये काहीतरी सकारात्मक बदल घडवण्याची प्रेरणा देण्याची ताकद या ग्रंथातून मिळेल. अशा या ग्रंथ निर्मितीसाठी लेखक, संपादक आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन!

'रामपर्व' या ग्रंथाच्या माध्यमातून ज्येष्ठ नेते रामशेठ ठाकूर यांची जीवनगाथा घराघरापर्यंत पोहचेल हा विश्वास आहे. त्यातून हा ग्रंथ तरूण पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल, याची खात्री आहे.

ज्येष्ठ नेते रामशेठ ठाकूर यांना निरामय आणि उदंड आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. तसेच 'रामपर्व' या चरित्रग्रंथाच्या प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in

नितिन गडकरी
NITIN GADKARI

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

शुभेच्छा

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways
Government of India

माजी खासदार श्री रामशेठ ठाकूर यांना अमृत महोत्सवी वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. श्री रामशेठ ठाकूर यांच्या आयुष्याचा प्रवास 'रामपर्व' या पुस्तकाच्या माध्यमातून पुढे येत आहे, याचा मनस्वी आनंद आहे. अत्यंत गरीब कुटुंबात जन्म घेऊन त्यांनी समाजकारण, राजकारण व व्यवसायात प्रचंड मेहनतीने उत्तुंग यश प्राप्त केलं. समाजकारणात, राजकारणात माणसं कशी जोडावीत याची शिकवण सर्वांना दिली. दोन वेळा संसदेत प्रतिनिधित्व करताना त्यांनी कितीतरी प्रश्नांचे पालकत्व घेऊन ते मार्गी लावलेत व जनसामान्यांना न्याय देण्यासाठी सदैव तत्पर राहिले. रामशेठ ठाकूर हे गोरगरिबांसाठी आधारवड म्हणून कायम त्यांच्या पाठीशी उभे राहिले. दानधर्माच्या माध्यमातून आपल्या कमाईचा काही भाग गरिबांसाठी राखून ठेवला. त्यांचा दानशूर स्वभाव, त्यांच्यातील दातृत्व आणि पालकत्व हे राजकारणातील नव्या पिढीला मार्गदर्शक आहे. पदाचा वापर जनसामान्यांच्या उद्धारासाठी त्यांनी केला. कोरोनाकाळात लॉकडाऊनमध्ये हातावर पोट असलेल्या अनेकांपुढे उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा, रामशेठ ठाकूर त्यांच्यासाठी धावून गेले. निराशेच्या गर्तेत सापडलेल्या अनेक कुटुंबांचा आधारवड झाले. त्यांच्या या कार्याची दखल महाराष्ट्राच्या तत्कालीन राज्यपालांनी देखील घेतली होती. पद असो वा नसो सातत्याने स्थानिकांच्या, शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिले व त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला. 'रामपर्व' या पुस्तकाच्या माध्यमातून रामशेठ ठाकूर यांच्या आयुष्याचे अनेक पैलू उलगडणार आहेत, याचा आनंद आहे. त्यातून नक्कीच नव्या पिढीला प्रेरणा मिळणार आहे.

श्री रामशेठ ठाकूर यांना परमेश्वराने दीर्घायुरारोग्य प्रदान करावे, अशी प्रार्थना करतो.

आपला
नितीन गडकरी
(नितीन गडकरी)

Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F)
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in

'रामपर्व' लिहिताना...

मला खूप कमी माणसं भेटली आयुष्यात, ज्यांनी मला जगण्याचं बळ दिलं. त्या उतुंग व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे 'रामशेठ ठाकूर सर' त्यांना कुणी पैशानं मोठा म्हणतं, कुणी दातृत्वानं मोठा म्हणतं, कुणी मनानं मोठा म्हणतं, कुणी माणूस म्हणून मोठा म्हणतं. रामशेठ यांनी ज्यांच्या आयुष्याला स्पर्श केला, त्याचं आयुष्य मात्र सोन्यासारखं झालं. अशी अनेक आयुष्यं त्यांनी उभी केली. त्यातली काही त्यांच्या सोबत कायम सावलीसारखी राहिली. काही आपापल्या वाटेनं निघून गेली. त्यांनी जाणाऱ्याला अडवलं नाही, की सोबत राहणाऱ्यांना दूर केलं नाही. कुणाच्या दंभाला उत्तरही दिलं नाही. म्हणूनच रामशेठ यांच्या व्यक्तिमत्त्वाला मोठेपणाच्या सुगंधी फुलांची झालर आहे.

हे पुस्तक लिहिताना त्यांच्या आयुष्यातल्या अनेक घटना ऐकून मी विस्मयचकित झालो. रामशेठ यशस्वी का आणि कसे झाले, हे अवलोकन करताना अनेक गोष्टी उलगडत गेल्या. त्यांच्या यशामागची अनेक रहस्यं इतरांना यशस्वी होण्यास मार्गदर्शक ठरतील, कारण रामशेठ ठाकूर सरांसारखी माणसं आपल्या आचारानं, विचारानं, मेहनतीनं समाजाचं नेतृत्व करून सामाजिक विचारांना तेजोमय करत असतात. त्यांच्या तेजाचे दीपस्तंभ अनेकांना प्रकाशवाटा दाखवतात, म्हणून 'रामशेठ' यांचं आयुष्य लिहायला हवं, ते सगळ्यांनी वाचायला हवं. आपण लिहूया का, असा विचार करून एका सकाळी बंगल्यावर गेलो. मी म्हटलं, "सर, मला तुमचं चरित्र लिहायचं आहे." त्यांनी स्मितहास्य करून नकार दिला. "अरे,काय लिहायचं आपण स्वतःविषयी! आणि लिहायचं झालंच, तर चांगल्या लेखकाला लिहायला सांगू." मी माझ्यातल्या लेखकाला शोधत घरी आलो. पण त्यांच्याकडून निघताना त्यांना म्हणालो, "तुम्हाला लिहायला हवंच." या गोष्टीला जवळजवळ दोन वर्षं सरली असतील. माझ्या मनात आपण लिहायला हवं, असं सतत वाटत होतं. पण परत विचारण्याचं धैर्य झालं नाही. सन २०२० मध्ये कोरोना काळात त्यांनी पत्रकारांना केलेल्या मदतीच्या अनुषंगानं मी लिहिलेला लेख त्यांच्या वाचनात आला. मी त्यांच्याविषयीचं लेखन करण्यासाठी केलेली मागणी तेव्हा त्यांना आठवली असावी. मी कामानिमित त्यांना भेटायला गेलो, तेव्हा त्यांनी लेखनाचा विषय स्वतः काढला व म्हणाले, "मला माझ्याविषयी काही लिहिणं पटत नाही. पण अनेकांच्या आग्रहाखातर लिहायला सांगतोय. घटस्थापनेनंतर आपण सुरुवात करू." त्यांच्या या वाक्यानं माझा आनंद द्विगुणित झाला. इथूनच सुरुवात झाली माझ्या

'रामपर्व'च्या लेखनप्रवासाला. वास्तव स्वीकारत आपल्या जगण्याची सावधपणे दिशा निश्चित करणारे रामशेठ ठाकूर सर मला कलेकलेनं उमलणाऱ्या फुलासारखे लेखनाच्या प्रवासात उलगडत गेले.

बालपणापासून आज ७५ वर्षांचा त्यांचा जीवन प्रवास हा संयम आणि निर्धाराचा उच्चांक गाठणारा दिसून येतो. प्रचंड 'ध्येयासक्ती' हा त्यांच्या स्वभावातला एक महत्त्वाचा गुण असला, तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून उलगडत जाणारे अनेक गुणविशेष जेव्हा समोर येतात, तेव्हा रामशेठ यशस्वी का झाले, याचा प्रत्यय येत जातो. त्यांचं आयुष्य त्यांना नेमकं काय देत आहे हे माहीत असलं, तरी ते काय देणार आहे याचा अंदाज त्यांना सुरुवातीच्या काळात नक्कीच नसावा. ते व्यावसायिक झाले, पण एवढे मोठे व्यावसायिक होतील, हे त्यांना सुरुवातीला कळलं नसेल कदाचित, पण व्यवसायातली 'सचोटी','प्रामाणिकपणा'नं केलेली 'सातत्यपूर्ण मेहनत', 'कामावरची निष्ठा' आणि एकदा हातात घेतलेलं काम पूर्ण आणि मनासारखं होईपर्यंत स्वस्थ न बसण्याचा त्यांचा स्वभावधर्म यांनी त्यांना यशाचा मार्ग सोपा करत पुढे नेलं. व्यवसायात त्यांनी कुणाशी कधीच स्पर्धा केली नाही, की कुणाचा मत्सर केला नाही. जे वाट्याला आलं त्या प्रत्येक कामाशी ते प्रामाणिक राहिले. त्यांनी आभाळाची संवेदनशीलता आणि पक्ष्यांच्या पंखातलं बळ घेऊनच यशाच्या शिखराला हात लावला. मात्र उंच जाताना त्यांनी मातीशी नातं तोडलं नाही. माणसांशी प्रतारणा केली नाही. ध्येय गाठताना कुणाला दुखावलं नाही. 'निर्णयक्षमता' ही त्यांना अंगभूत मिळालेली ईश्वरी देणगी म्हणावी लागेल. शालेय जीवनापासून पुढे व्यावसायिक, राजकारणी, समाजकारणी म्हणून आपण रामशेठ यांच्या यशाचा चढता आलेख जेव्हा पाहतो, तेव्हा त्यांच्या यशात त्यांनी योग्य वेळी घेतलेल्या योग्य निर्णयांचा फार मोठा वाटा आहे.

सन १९९८ मध्ये रामशेठ पहिल्यांदाच लोकसभेत खासदार म्हणून निवडून गेले. आयुष्यात कधी ग्रामपंचायत निवडणूक न लढलेले रामशेठ खासदारकीची निवडणूक 'जायंट किलर' होऊन विजयी झाले, तेही बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांच्यासारख्या दिग्गज नेत्याला चीतपट करून. परंतु १३ महिन्यांतच सरकार अल्पमतात आले होते. विरोधी पक्षाने अविश्वास ठराव दाखल केला आणि तो २७० विरुद्ध २७१ मतांनी पारित झाला. सरकारला रामशेठ यांच्या एका मतानं पायऊतार व्हावं लागलं होतं. हे एक मत म्हणजे कोट्यवधी रुपयांची लॉटरी ठरली असती. परंतु एकदा घेतलेला निर्णय हा अखेरचाच होता, ते कधीच ढळले नाहीत. मग त्याचा परिणाम काय होईल, याची त्यांनी पर्वा केली नाही.

शेतकरी कामगार पक्ष त्यांनी तडकाफडकी सोडला नव्हता. यामागची कारणं त्यांनी आपल्या वरिष्ठ नेत्यांना आणि सहकाऱ्यांना दिली होती. पक्ष सोडतानाही त्यांनी कुणाला आपल्यासोबत येण्याची जबरदस्ती केली नाही. काँग्रेस सोडण्याच्या भूमिकेलाही विरोधकांनी व्यावसायिक गणिताशी जोडण्याचा

प्रयत्न केला, पण त्यालाही त्यांनी उत्तर दिलं नाही. काँग्रेस सोडणं हा रामशेठ यांच्या तत्त्वांचा, निष्ठेचा स्वाभिमानाचा निर्णय होता.

'माझे निर्णय आयुष्यात सहजासहजी कधी चुकले नाहीत,' असं जेव्हा ते सांगतात, तेव्हा त्या निर्णयाच्या मागच्या आणि पुढच्या परिणामांचा त्यांनी केलेला अभ्यास असतो. ते म्हणतात, "मी पुढच्या दहा वर्षांचा विचार वर्तमानात करतो. पुढच्या दहा वर्षांची सामाजिक, राजकीय, आर्थिक गणितं काय असू शकतील, याचा मला बरोबर अंदाज आलेला असतो." ही 'दूरदृष्टी' कुणाला सहज मिळत नाही, ती जन्मतःच प्राप्त झाली असावी, असं मला वाटतं.

रामशेठ ठाकूर यांच्या यशात अजून एक महत्त्वाचा पैलू सापडतो, तो म्हणजे त्यांच्या ठायी असलेली 'माणसं वाचण्याची कला'. आपल्या समोर जी व्यक्ती उभी आहे, अथवा बोलत आहे, तिच्या ओठांत काय आहे आणि पोटात काय आहे, याचा अंदाज ते लगेच घेतात. पक्ष बांधताना, निवडणुकीची उमेदवारी देताना, अनेक कार्यकर्त्यांच्या गोतावळ्यात रामशेठ ठाकूर असतात, तेव्हा ते माणसाचा, त्याच्या वैचारिक पात्रतेचा अंदाज घेऊन त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणे जे योग्य ते देत आलेले आहेत. व्यवसायात, राजकारणात आणि समाजकारणातही कायम ते सावध राहिले. 'सावधानता' हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला विशेष भाव आहे. योग्य वेळी योग्य माणसं त्यांनी आपल्या सोबत ठेवली. अयोग्य माणसं न दुखावता बाजूला केली. जेव्हा योग्य माणसंसुद्धा अयोग्य वागायला लागली, तेव्हा त्यांनी त्यांची जागाही दाखवून दिली. माणसं दुखावून त्यांना दूर करण्यापेक्षा न पटलेल्या माणसांपासून स्वतः दूर राहणं सोयीचं, हे तत्त्व त्यांनी अंगीकारलेलं दिसून येतं. शेकाप आणि काँग्रेस सोडताना त्यांनी नेमकं हेच केलं होतं. म्हणूनच आज विरोधी पक्षातले लोकदेखील त्यांचा आदर करतात. त्यांच्याकडे मदत मागण्यासाठी आलेली व्यक्ती, ती कोणत्या पक्षाची, धर्माची, पंथाची आहे हे न पाहता जो समोर आला आहे, त्याची गरज ओळखून त्यांनी प्रत्येकाला भरभरून दान दिलं. कधीच कुणाला रिकाम्या हातानं परत पाठवलं नाही, त्यामुळेच आज रामशेठ 'दानशूर' म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचयाचे आहेत.

शेतकरी कामगार पक्ष सोडल्यानंतर पनवेल, उरण काँग्रेसमय का झालं? काँग्रेसमध्ये गेल्यानंतर पनवेलमध्ये काँग्रेसचा आमदार निवडून आणून इतिहास कुणी घडवला? पनवेल नगरपालिकेवर काँग्रेसची सत्ता कुणामुळे आली? काँग्रेस सोडल्यानंतर पनवेल, उरणच नव्हे, तर संपूर्ण रायगडमधून काँग्रेस पक्ष हद्दपार का झाला? रायगड जिल्ह्यात जिथे भारतीय जनता पार्टी केवळ नावाला होती, मात्र रामशेठ ठाकूर यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्यानंतर पनवेल, उरण भाजपामय कसं झालं? रामशेठ आज सक्रिय राजकारणापासून वेगळे असले, तरी राजकारण त्यांच्यापासून वेगळं होऊ शकलं नाही.

लेखन करत असताना संदर्भीय माहिती घेण्यासाठी मला त्यांच्यासोबत साताऱ्याला जाण्याचा योग आला. छत्रपती शिवाजी महाविद्यालयात रामशेठ ठाकूर यांनी आपलं चार वर्षांचं महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलं होतं. महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या भोवती जमलेले प्राचार्य, प्राध्यापक, धावून आलेले इतर कर्मचारी सगळ्यांची रामशेठ आदरानं चौकशी करत होते. "ठाकूरसाहेब आल्यावर नवचैतन्य येतं. त्यांचा कसला बडेजाव नसतो. सगळ्यांची आस्थेनं चौकशी करणार, आम्ही त्यांच्या येण्याची नेहमी वाट पाहत असतो," महाविद्यालयातले कर्मचारी रामशेठ ठाकूर सरांविषयी भरभरून बोलत होते.

सर्वसामान्यपणे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी डिग्रीचं प्रमाणपत्र घेऊन बाहेर पडतो. महाविद्यालयाची वास्तू एक आठवणीतली शाळा म्हणून स्मरणयात्रेचा भाग होते. ती कधीतरी कॉलेजचं जीवन आठवण्यासाठीच शिल्लक राहते. परंतु रामशेठ याला अपवाद म्हणावे लागतील. 'छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा'चे माजी विद्यार्थी असलेले रामशेठ आज रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल कमिटीचे सदस्य आणि संस्थेचे आधारस्तंभ झालेले आहेत. रामशेठ यांनी आपलं आयुष्य रयत शिक्षण संस्था आणि कर्मवीर अण्णांच्या विचारांना जोडलं. स्वत:ची 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था' ही शिक्षण संस्था असूनही 'रयत'च्या शाळांचं त्यांनी पालकत्व स्वीकारलं, त्यांना आर्थिक पाठबळ देऊन त्यांच्या इमारती अत्याधुनिक करण्यासाठी स्वत: धावू लागले. 'रयत'च्या अनेक शाळांना त्यांनी नवं रूप देण्यासाठी आर्थिक मदत केली. पालघर जिल्ह्यातल्या मोखाडासारख्या आदिवासी भागात त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शिक्षण मिळावं म्हणून उभी केलेली महाविद्यालयाची भव्य इमारत हा रामशेठ यांच्या नि:स्वार्थ भावनेचा परिपाक आहे.

'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'च्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्याला उच्च पातळीवर नेऊन ठेवलं आहे. 'रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स' हे त्यांनी पाहिलेलं एक स्वप्न हे क्रीडासंकुल उभं करून पूर्ण केलं. प्रगतीचं, कौशल्याचं, विकासाचं, अध्यात्माचं, ज्ञानाचं असं कोणतंच क्षेत्र नाही, ज्याला रामशेठ यांनी स्पर्श केला नाही. महाराष्ट्रातली सगळ्यात मोठी आणि सगळ्यात मोठ्या बक्षिसाची असलेली 'राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा' व 'अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा' हे रामशेठ यांचं वैचारिक वैभव आहे. दिवाळी अंक 'जगले' आणि 'तगले' पाहिजेत, त्यासाठी संपादकांच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहिलं पाहिजे. कला जगली पाहिजे, कलाकार जगला पाहिजे, त्यासाठी कलाकरांच्या पाठीशी उभं राहिलं पाहिजे. खेळांना मोठं करण्यासाठी खेळाडू जगला पाहिजे, तो मोठा व्हायला हवा. त्याचं भरणपोषण करायला हवं. त्यासाठी त्याच्या पाठीशी उभं राहायला

हवं. इतका मोठा विचार करून त्यांना पाठबळ देणारा रामशेठ यांच्यासारखा एक 'जाणता राजा'च असू शकतो. साहित्य, कला, क्रीडा, आरोग्य, शिक्षण आणि संस्कृतीचं जतन करणारी व त्यांना प्रोत्साहित करणारी किती माणसं आज समाजात आहेत? ही संवेदनशीलता आज किती पैसेवाल्यांकडे आहे? रामशेठ हे आयुष्यभर समाज उभा करणाऱ्या प्रत्येक घटकाचा साकल्यानं विचार करत आले आहेत. म्हणून रामशेठ हे केवळ पैशानं नाही, तर माणूस म्हणून मोठे आहेत.

लेखनाचा प्रवास जवळजवळ 'सहा वर्षं' इतका दीर्घ काळाचा झाला. या सहा वर्षांत रामशेठ यांच्या सहवासात खूप काही शिकता आलं. रामशेठ यांच्या कार्यकर्तृत्वाच्या प्रत्येक क्षेत्रात डोकावलं, तर त्यांच्या संपन्न गुणवत्तेचे पुस्तकरूपानं अनेक भाग होतील. या एका पुस्तकात सामवून घेणं सोपं काम नव्हतं. प्रत्येक प्रकारणावर खूप चर्चा करून पुस्तकाला आकार देण्याचा प्रयत्न केलाय. जेवढं वेचता येईल तेवढं वेचून शब्दबद्ध केलंय. सरांनी 'तू लिही' हे सांगणंच माझ्यासाठी खूप मोठं होतं. माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. दीपक म्हात्रे, देवदास मटाले, मकरंद मराठे, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, नितीन कोळी, हरेश साठे यांचं वेळोवेळी सहकार्य लाभलं. सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे सरांनी प्रत्येक प्रकरण वाचून अत्यंत मोलाचं मार्गदर्शन केलं. माझ्या कुटुंबाचं सहकार्यदेखील तितकंच मोलाचं आहे. या सर्वांचाच मी ऋणी आहे.

– विजय इंदूकेशव पवार

मोबाईल : ९२२२१ २७४५६

अनुक्रमणिका

१ न्हावा खाडीचा राम (बालपण) १३
२ प्रवास साताऱ्याचा २४
३ अवघाची संसार ३४
४ रामचा रामशेठ होताना ४३
५ आंदोलनातील रामशेठ ५१
६ नांदी राजकारणाची ७८
७ पुन्हा एकदा लोकसभा ९६
८ शेतकरी कामगार पक्ष सोडताना १०४
९ रायगड काँग्रेसला नवसंजीवनी १११
१० काँग्रेसला टोलनाका भोवला १२५
११ पनवेलमध्ये कमळ फुलले १३३
१२ भाजपाचा झंझावात १३६
१३ शिक्षण क्षेत्रातील गगनभरारी १५५
१४ 'रयत'चा राम १६७
१५ रामशेठ आणि सामाजिक विकास मंडळ १८०
१६ न्हावा खाडी...रामबाग आणि रामशेठ २००
१७ पुरस्कारसमृद्ध रामशेठ २०९
१८ विश्वभ्रमंतीचे सुवर्णक्षण २२०

१

न्हावा खाडीचा राम (बालपण)

पनवेलमधील मिडलक्लास सोसायटी हा उच्चभ्रू म्हणून समजला जाणारा लोकवस्तीचा परिसर. शांत, सुटसुटीत आणि स्वच्छ असलेल्या याच परिसरात एका चार मजली बंगल्याच्या खाली रोज जमणारी गर्दी, गरीब-दीनदुबळ्यांपासून ते अगदी महत्त्वाच्या वेळी पनवेल, उरणबरोबरच अगदी मुंबईतून रायगडच्या राजकारणावर चर्चा करण्यासाठी आलेले मंत्री, आमदार, खासदार, नगरसेवक सगळ्यांची बडदास्त ठेवली जाते. येथे कोणी राजकीय गणिते सोडविण्यासाठी आला आहे, तर कोणी शाळा-कॉलेज प्रवेशासाठी आला आहे. कोणाला उच्च शिक्षणासाठी मदत हवी आहे, तर कोणाला आजारपणातील उपचारांसाठी मदत हवी आहे. प्रत्येक जण आला आहे काहीतरी घेऊन जाण्यासाठी, कारण त्या प्रत्येकाला माहीत आहे, 'मी येथून रिकाम्या हाताने कधीच परत जाणार नाही.' पांढरी पँट, पांढरा शर्ट अशा साध्या वेषात कायम वावरणारा, सुटाबुटाचा कधी मोह नसलेला आणि कर्मवीर भाऊरावांच्या विचारांची कास धरलेला हा मसिहा आपल्या घराच्या पायऱ्या उतरून खाली येतो, प्रत्येकाची आस्थेने चौकशी करतो. प्रत्येकाचे शांतपणे ऐकून घेतो. समोरच्या व्यक्तीच्या गरजेनुसार आपल्या पी.ए.ला निर्देश करून त्याला त्याच्या गरजेनुसार कधी धनराशी, तर कधी एखाद्या चेकवर सही करून तो त्याचे आयुष्य सावरण्याचा प्रयत्न करतो. काहींना मोलाचा सल्ला देतो. भेटायला आलेल्या प्रत्येकाला काही ना काही देऊन तो त्याची ठिकठिकाणी वाट पाहत असलेल्या अनेकांना भेटायला घराच्या बाहेर पडतो. परत घरी कधी येणार आहोत, ते त्यालाही माहीत नसते. प्रत्येकाच्या समस्येचे समाधान करूनच घरी परतणाऱ्या त्या दातृवाचे... नेतृत्वाचे नाव आहे रामशेठ चांगू ठाकूर... बालपणी तो राम होता. पुढे ते आपल्या कार्यकर्तृत्वाने रामशेठ झाले. त्यांच्या दातृवाने जनतेनेच त्यांचा लोकनेता म्हणून गौरव केला, ते लोकनेते रामशेठ ठाकूर...

रामशेठ आपले जन्मगाव असलेल्या न्हावा खाडी गावातील आपल्या बंगल्याच्या सज्जात उभे राहून समोर पसरलेल्या समुद्राच्या अथांगतेकडे पाहत होते. मावळतीला गेलेल्या सूर्याच्या सोनेरी प्रकाशकिरणांनी त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज अधिक उठून दिसत होते.


किनाऱ्याला स्पर्श करण्यासाठी धावणारी लाट. पुन्हा तिचा परतीचा प्रवास. पुन्हा नवी उमंग घेऊन किनाऱ्याकडे तिची धाव.. आयुष्य हे असच लाटेसारखं.. सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर हेलकावे खाणारे. आयुष्यात आलेल्या प्रत्येक सुखदुःखाच्या लाटेवर आत्मविश्वासाने आरूढ झालेल्या रामशेठचा प्रवास राम



● **वडील - चांगू काना ठाकूर व आई - भागूबाई चांगू ठाकूर**

म्हणून याच न्हावा खाडीतून सुरू झाला. न्हावा खाडीच्या चिखलमातीत रामची पावले लहानाची मोठी झाली. या प्रवासाला ७५ वर्षे पूर्ण झाली. आयुष्याचा ७५ वर्षांचा कालखंड त्याच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. गतकाळाच्या चांगल्या-वाईट दिवसांच्या स्मृतीत रामशेठ हरवून गेले होते.

आजचा रायगड जिल्हा तेव्हा कुलाबा जिल्हा या नावाने ओळखला जात होता. कुलाबा जिल्हा कर्जत ते श्रीवर्धनपासून पोलादपूर ते मुंबईला लागून असलेल्या पनवेल तालुक्यापर्यंत विस्तारलेला. पनवेल तालुक्याच्या पश्चिमेला समुद्राच्या कुशीत शिरून विसावलेले आगरी-कोळी समाजाचे न्हावा खाडी गाव. कायम समुद्राच्या भरती-ओहटीच्या लाटांच्या कक्षेत येणाऱ्या या गावातील कुटुंबे समुद्र आणि शेतीवर आपली गुजराण करणारी. न्हावा खाडीच्या उत्तर पाड्यात राहणाऱ्या चांगू काना ठाकूर व भागूबाई (भागीरथी) यांचे पहिले अपत्य असलेला राम दि. २ जून १९५१ रोजी जन्माला आला. रामची ही रूढ जन्मतारीख गुरुजींनी शालेय दप्तरात नोंदविलेली असली, तरी रामच्या आईच्या म्हणण्यानुसार रामचा जन्म शनिवारी ऋषिपंचमीच्या दिवशी झाला. या तिथीचा मागोवा घेता समजले, की रामचा जन्म भाद्रपद शुक्ल पंचमी, शनिवार १६ सप्टेंबर १९५० या दिवशी झाला, हा दिवस ऋषिपंचमीचा होता. उत्तरपाडा, मधला पाडा, मोठा पाडा (दक्षिण पाडा) हे न्हावा खाडीचे तीन पाडे, रामची आई भागीरथी न्हावा खाडीच्या मधल्या पाड्यातील, अत्यंत शांत स्वभावाची, त्यापेक्षा वडील जास्त रागीट आणि कडक शिस्तीचे, स्वच्छता, टापटीप यावर त्यांचा खूप कटाक्ष असायचा. त्यांना वावगे काही आवडायचे नाही. देवावर त्यांची नितांत श्रद्धा. बाळकृष्ण महाराज, गिरी मंगेश महाराज यांच्या 'देव सागर साधक समाजा'चे ते उपासक. कल्याणची जरीमरी यात्रा, जोगेश्वरीची यात्रा, गाणगापूर, चारधाम यात्रा असो की पंढरपूर, आळंदीची यात्रा, कधी चुकली नाही. या सगळ्या यात्रांना राम वडिलांसोबत जायचा. यात्रा, देवधर्मातून त्याच्यावर आध्यात्मिक



● रामशेठ ठाकूर आपल्या न्हावा खाडीतील घराच्या आठवणींना डोळ्यांत साठवून घेताना



● रामशेठ ठाकूर यांचे न्हावा खाडीतील घर

संस्कार होत गेले. चांगू ठाकूर यांच्या आईला उतारवयात चालता येत नव्हते, पण आईलाही देवदर्शन झाले पाहिजे म्हणून आपल्या पाठीवर उचलून नेणारे आपले वडील रामने लहानपणापासून पाहिले. रामनेही आपल्या आई-वडिलांना कायम देवत्वाने पुजले. रामला नऊ भावंडे, सगळ्यात मोठा राम, त्यानंतर श्रीधर, गणनाथ (वारले), अनसूया, राधा, कृष्णा, भरत, चंद्रभागा, रत्नप्रभा अशा आपल्या नऊ मुलांना भागीरथी आईने खूप काबाडकष्ट करून वाढविले. राम लहानणापासूनच हुशार, सालस, नम्र. त्याच्यावर खरेतर आई-वडील, चुलते सगळ्यांचाच जीव होता. वडिलांची परिस्थिती तशी बेताचीच, म्हणजे खाऊनपिऊन सुखी होते. चांगू ठाकूर यांचा शेती हा मूळ व्यवसाय. त्याच्या जोडीला खाडीतून रेती काढणे हा जोडधंदा. न्हावाखाडीत तीन-चार एकरची शेतजमीन त्यातून राताभात पिकायचा, हा भात चिखल करून न लावता त्याची आवटनी केली जायची. अगदी खाडीला लागून असलेली हीच काय ती वडिलोपार्जित शेतजमीन. भरतीचे पाणी शेतजमिनीत शिरू नये म्हणून गावकऱ्यानी संपूर्ण खाडीलगत बंधारा बांधला होता. या बंधाऱ्याची देखभाल करण्याचे काम गावकऱ्यांमध्ये वाटून दिले होते.

सन १९५६-५७ मध्ये रामचे नाव न्हावा खाडीच्या प्राथमिक शाळेत पहिलीच्या वर्गात दाखल करण्यात आले. त्या वेळी राम पाच वर्षांचा होता. तेव्हा आतासारखी पूर्व प्राथमिक वर्गाची संकल्पना नव्हती. पाच वर्षे पूर्ण झाली, की पहिल्या इयत्तेत नाव घातले जायचे. अगदी आनंदाने शाळेची पहिल्यांदा पायरी चढलेला



● रामशेठ ठाकूर यांची न्हावा खाडीतील प्राथमिक शाळा

राम शिकायला मिळणार म्हणून खूप खूष होता. पहिलीचे वर्ष संपले आणि राम दुसरीत गेला. या कालावधीत न्हावा खाडी गावात समुद्राचे पाणी येऊ नये म्हणून बांधलेला बंधारा फुटायला सुरुवात झाली. या मातीच्या बंधाऱ्याच्या आत जवळजवळ बाराशे एकर शेतजमीन होती. हा मातीचा बंधारा (खांड) दोन्ही बाजूंनी फुटायला सुरुवात झाली. गावकरी बंधारा बंदिस्त करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. एका बाजूला पाणी बंद केले, की दुसऱ्या बाजूने आत शिरायचे. उधाण असले, की पाणी बंधाऱ्याला जुमानायचे नाही, उडी घेऊन आत शिरण्याचा प्रयत्न करायचे. हा सिलसिला अनेक वर्षे सुरू होता.

राम आणि त्याची मित्रमंडळी बंधाऱ्याच्या आतील शेतजमिनीत हुतुतू खेळायचे, आट्यापाट्याचा डाव रंगायचा. वरच्या शेतातून खालच्या शेतात जाण्यासाठी जो पऱ्हा असतो त्या पऱ्ह्यात ही पोरे मासे पकडायची, भरलेल्या पेन्दुरल्या, चिंबोऱ्या मिळायच्या. ओहोटी झाली, की पाण्याखालच्या मोकळ्या झालेल्या चिखलात निवट्या पकडण्याचा कार्यक्रम सुरू व्हायचा. या निवट्यांची गंमत अशी, की चिखलावर दगड मारला, की जसे पक्षी समूहाने आभाळात विहरत जातात, तशाच चिखलातील निवट्या समूहाने पुढे पुढे जाताना दिसायच्या. त्यातच काचण्या मिळाल्या, की या पोरांना जग जिंकल्यासारखे वाटायचे. मासे झोलून पकडणे रामला खूप आवडायचे. फग टाकणे, गरवण टाकणे त्याचबरोबर पाणी उपसून मासे पकडण्याचा मनमुराद आनंद राम घ्यायचा, पावसाळा सुरू झाला की चिवण्यांची वलगण यायची. कांट्या आणि चिवणी माशांचा घाणा यायचा. खुबे वेचण्याचा आनंदही मिळायचा.

बंधाऱ्याच्या आतील शेतीची पिकती जमीन म्हणजे न्हावा खाडीवासीयांची रोजीरोटी होती. मात्र १९५६ नंतर बंधारा जास्तीच फुटायला सुरुवात झाल्यांनतर त्याची डागडुजी करणे जिकिरीचे व्हायला लागले. समुद्राचे पाणी आतमध्ये वेगाने मुसंडी मारायला लागले होते. गावातील परिस्थितीचा अंदाज घेऊन रामच्या वडिलांनी तो दुसरी पास झाल्यानंतर माणगावला त्याचा मामेभाऊ दशरथ पाटील, जे शिक्षक म्हणून आत्ताच्या तळा तालुक्यातील दगडधूम (गणेशनगर) शाळेत कार्यरत होते, त्याच्याकडे तिसरीसाठी पाठविले, जेणेकरून रामच्या शिक्षणात व्यत्यय नको. एक वर्ष म्हणजे रामची तिसरी दगडधूमच्या शाळेत झाल्यानंतर दशरथ पाटील यांची बदली माणगाव तालुक्यातील उणेगावाच्या शाळेत झाली. उणेगावला असताना अनेक मित्र रामला भेटले. सहदेव शिंदे, काशिनाथ शिंदे हे आजही दोस्ती टिकवून आहेत. चौथीच्या वर्गासाठी राम मामेभावाबरोबर उणेगावच्या शाळेत गेला. यादरम्यान न्हावा खाडीचा बंधारा पूर्ण ढासळला होता. आता पाणी थोपवून धरणे गावकऱ्यांच्या आवाक्याबाहेर गेले होते. उधाणाला पाणी घराच्या दारापर्यंत येऊन पोहोचत असे, तरीही लोक गावातच राहत होते. गावातील गोड्या पाण्याचे स्त्रोत खारे झाले. पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला. पाण्यामुळेच पाण्यासाठी व्याकूळ झालेले गाव फुटलेल्या बंधाऱ्यावरून डोक्यावर हंडे घेऊन न्हावा गावात वडाच्या बावीवर दीड-दोन किलोमीटर अंतर पार करून जात होते. शेती खाऱ्या पाण्याखाली बुडाली होती. उत्पन्नाचे साधनच बुडाले. गरिबी वाढायला लागली. यादरम्यान मुलाला आपल्यापासून किती दिवस दूर ठेवणार, या विचाराने रामला वडिलांनी परत न्हावा खाडीला आपल्याजवळ आणले. न्हावा खाडीच्या प्राथमिक शाळेत परत रामचे नाव पाचवीच्या वर्गात दाखल केले. पाचवी, सहावी जेमतेम ही दोन वर्षे राम न्हावा खाडीच्या शाळेत शिकला. पण आता गावात राहणे जिकिरीचे होऊ लागले. शेवटी गावकऱ्यांनी गाव सोडण्याचा निर्णय घेतला. तीन पाड्यांतील चाळीस ते पन्नास टक्के लोक गाव सोडून निघाले. चांगू ठाकूर आपल्या कुटुंबाला घेऊन गव्हाणला आले. कोपर गावच्या पश्चिमेला असलेल्या माळरानावर 'शिवाजीनगर' या नावाने नवीन वसाहत तयार झाली. कोपर गावाला लागून उत्तरेकडे तळ्याचा पाडा, न्हावा खाडीच्या मोठ्या पाड्यातील बरीच कुटुंबे गव्हाणला राहायला आली आणि न्हावा खाडीचे पूर्णपणे विकेंद्रीकरण झाले. शिवाजीनगरला आल्यावर राम गव्हाणच्या शाळेत सातवीच्या वर्गात जाऊ लागला. कुटुंबाचा शेतीचा व्यवसाय पाण्याखाली बुडाला होता. आता जोडधंदा असलेला रेतीचा व्यवसाय कामाला आला. जो गव्हाण गावातील शेतीसोबत सुरू होता. शेती बुडाल्यामुळे चांगू ठाकूर यांनी पूर्ण लक्ष रेतीच्या व्यवसायाकडे द्यायचे ठरवले. अगोदरपासूनचे रेती व्यवसायासाठीचे 'मांजर' आणि 'टांगा' हे दोन मचवे (पडाव) होतेच. भावकीतील गुलाब ठाकूर यांच्याकडे मोठा मचवा होता. हे मचवे दशमी-एकादशीला उधाण आले, की रेती काढण्यासाठी समुद्रात जायचे आणि पंचमी-षष्ठीला भांगाच्या भरतीला घराकडे परत फिरायचे. बारा ते सोळा रुपये ब्रास भावाने रेती विकली जायची. चांगू ठाकूर यांना एका फेरीचे तीस-बत्तीस रुपये मिळायचे. राम मचव्यावर जात नसे. त्या वेळी मचवे कधी परत येतात याची वाट पाहत असे. रामच्या

घराच्या माडीवरून दूरवर अगदी घारापुरीपर्यंत समुद्राचे विहंगम दृश्य दिसायचे. रेती काढायला गेलेले मचवे त्याच मार्गाने येत असल्यामुळे रामसह सगळी बच्चेकंपनी घराच्या माडीवर जाऊन उभी राहायची. मचवे कोठपर्यंत आले आहेत, हे बघायचे. त्यात आपला मचवा कोणता, हे ओळखण्याची शर्यत लागायची. मचवे आले की खाजा, लाडू खायला मिळायचे. रामच्या काकांचं नाव हरी. त्यांना 'हरी नाखवा' म्हणायचे. रामच्या बाबांना चांगू नाखवा, मचवे दोन ठिकाणी रेती काढायला जायचे. एक ठिकाण होते ठाणा खाडी. येथून काढलेली रेती काळी असायची, ती बांधकामाला वापरली जायची. दुसरे ठिकाण होते ते बुचर आयलंडशेजारी, जेथे रामदास बोट बुडाली होती. त्या परिसरात शिंपल्यांची पांढरी रेती मिळायची. राम जसा मोठा होत गेला, तशी त्याला जबाबदारीची जाणीव होत गेली. आपल्या घरासाठी आपल्याला काहीतरी करायला पाहिजे, याची समज त्याला आली आणि तोही मग शाळेच्या सुटीच्या कालावधीत वडिलांसोबत मचव्यावर जाऊ लागला. सगळ्यांनी काम केले पाहिजे, हा वडिलांचा शिरस्ता होता. घरातील सगळी छोटीमोठी माणसे कामे करायची. रामसुद्धा त्याच विचाराने मचव्यावर जायला लागला. समुद्रात डुबकी मारून रेती कशी काढायची, हे वडिलांनी शिकविले. हे काम पण तो आवडीने करायला लागला. कष्टातून मिळालेल्या भाकरीचे मोल खूप मोठे असते. कष्टाने कमाविलेले काहीही असो, वाया जाऊ द्यायचे नाही, असे बाबा सांगायचे. पाटी फुटली तर पाठीवर धपाटे आणि पेन्सिल हरवली तर वेळप्रसंगी लाथसुद्धा मिळायची. समुद्रातून काढलेल्या रेतीने जगण्याची परिभाषा शिकविली आणि तरंगणाऱ्या मचव्यातील रेती मचव्यातून खाली करताना जीवनाचा मचवा आयुष्यात येणाऱ्या वादळात कसा खंभीरपणे तरंगत ठेवायचा, हे समोर आलेल्या प्रत्येक परिस्थितीतून राम शिकला. त्याला त्याच्या भावी आयुष्याची खोली याच समुद्राच्या खोलीत सापडली होती. ज्या क्षेत्रात उभे राहायचे, तेथे नांगर टाकून कसे उभे राहायचे, हे त्याने आत्मसात केले. खरेतर न्हावा खाडी सोडून शिवाजीनगरला राहायला गेल्यानंतर न्हावा खाडीचा अंक संपला होता. आता फक्त तेथील आठवणीच शिल्लक राहिल्या होत्या. गव्हाण कोपरला वडिलांचे दीड एकर शेत आणि बारा-पंधरा गुंठ्यांची लांब दांडी होती, हीच काय ती वडील आणि चुलत्यांची शिल्लक राहिलेली जमीन होती. त्यात दीड-दोन खंडी भात पिकायचे. तो खाडीवरच्या शाळेतील आठवणी सोबत घेऊन गव्हाणच्या शाळेत सातवीला दाखल झाला होता. आता या शाळेने देखील आठवणींचे खिसे भरायला सुरुवात केली.

रामच्या शिवाजीनगरच्या घराच्या मागे मोठे माळरान होते. शाळा सुटली, की सगळे सवंगडी येथे जमायचे. स्वयंपाक करून खाण्याचा बेत हा बऱ्याच वेळा ठरलेला असायचा. मग त्यासाठी कुणी तेल, कुणी मसाला, तर कुणी लाकडं आणायचे, काही जण मासे पकडून आणायचे. चुला पेटविला जायचा आणि कालवण शिजायचं. जेवणावर मस्त ताव मारला जायचा आणि हात पुसत ही मंडळी घराकडे निघायची. गव्हाण आणि बेलपाड्याच्या मधे 'आक्सा' गाव आहे, तेथे देशमुखांची काजूची खूप झाडे होती. झाडाला काजू लागून पिकायला लागले, की या पोरांना पहिला वास यायचा. मग काजूतोड मोहीम आखली जायची. कोणत्याही

परिस्थितीत काजू काढायचेच या उद्देशाने तयारी केली जायची. काजू पाडण्यासाठी झाड झोडपले जायचे, त्यामुळे छोटे-मोठे काजू पडायचे. कधीकधी काजू मोहीम फत्ते व्हायची, तर कधी मार पडायचा. एकदा राम वाय. टी. देशमुखांना काजूच्या बागेत भेटायला गेला. वाय.टी.च्या काकांना वाटले, काजू पाडायला आला आहे. त्यांनी रामचा कान पकडला व घरी घेऊन गेले. कळवळलेला राम त्यांना सांगत होता, "अहो... मी वाय.टी.ला भेटायला आलो आहे." रामशेठ ही आठवण वाय.टीं.च्या आईला मोठेपणी अनेक वेळा बोलून दाखवायचे. 'रांजणं' हा रानमेवा तर शाळेतून येता-जाता तोंडात पडायचाच.

रामला झाडावर बसून अभ्यास करायाल खूप आवडायचे. शिवाजीनगरच्या घराजवळच एक करंजाचे झाड होतं. राम त्या करंजाच्या झाडावर चढून फांदीवर बसून पुस्तक वाचत बसायचा. खाडीच्या पाण्यामुळे शिवाजीनगर गाठले खरे, पण खाऱ्या पाण्याने न्हावा खाडी सोडायला भाग पाडले होते. माळरानावर वसलेल्या शिवाजीनगरला पाण्याचा प्रश्न भेडसावत होता. पिण्याच्या पाण्याचा कोणताच स्रोत नव्हता. येथे विहीर, तलाव काहीच नव्हते. त्यासाठी कोपरच्या तळ्यावर कपडे धुण्यासाठी, तर शेलघर कोशिवण्याला पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत होती. उन्हाळा सुरू झाला, की टिपलून असह्य व्हायची. पाण्यासाठी बावीवर (विहीर) नंबर लावायला लागायचे. रात्रीबेरात्री कधी नंबर येईल तेव्हा बावीच्या तळाशी असलेल्या झऱ्याच्या साठलेल्या डबकाभर पाण्याला खरवडून हंडा भरायचा. तो भरायला किती वेळ लागेल, याचा अंदाज नसायचा. भरलेला हंडा पाण्याचा एकही थेंब न सांडता बावीच्या पायऱ्या चढून वर आणायचा. हंड्यात पाण्याचे थेंब साठविताना डोळ्यांतील पाणी मात्र पापण्यांचे बांध ओलांडून खाली वाहायचे. दोन-तीन महिन्यांची ही टिपलून 'पाणी हेच जीवन आहे' हे शिकवीत होती. पाण्याबरोबर येथे सरपणाचा प्रश्नही होता. माळरानावर लाकूडफाटा कोठून मिळणार, त्यासाठी थेट गव्हाण फाट्यावरच्या जंगलात दोन-चार किलोमीटर चालत जावे लागत होते. चार लाकडे जास्त येतील म्हणून राम आईसोबत जायचा. आपल्या ताकदीप्रमाणे मोळी बांधून घेऊन यायचा. म्हणूनच तो शाळेला सुटी असली, की पनवेल-उरण रेल्वेच्या कामावर मजुरी करायला जायचा. त्या वेळी राम साधारण दहावीत असेल. तापलेल्या खडीवर उभा राहून मुकादम सांगेल ते काम दिवसभर करायचे. संध्याकाळी काम संपल्यावर हातावर पडणारा एक रुपया स्वर्गीय आनंद द्यायचा. तो रुपया बाबांच्या हातावर ठेवताना रामची भावमुद्रा आनंदाने भरून जायची.

राम समुद्रात पडावावर स्वयंपाक करून द्यायला गेल्यावर त्याचे त्याला आठ आणे मिळायचे. भाकरीसाठी कष्ट आणि कष्टाचे खाणे म्हणजे काय असते, याचे जीवनातील महत्त्व रामला समजले होते. ते त्याने जीवनभर जपले. रामच्या जीवनाला या भाकरीने खूप काही शिकविले. याच भाकरीसाठी चांगू ठाकूर आपल्या लेकाला घेऊन समुद्रात सांडलेला गहू काढायला जायचे. रेती बंदर, दारूखाना बंदरावर अमेरिकेहून मका आणि गहू भरलेली जहाजे यायची. जहाजातून गहू बार्जमध्ये भरला जायचा आणि बार्ज मग गोदीत येऊन तो गहू उतरवायची. हा गहू आणि मका माणसांनाच खाण्यासाठी आणला जायचा, पण तो गरिबांसाठी नव्हता.

तो खाण्यासाठी गरिबाला चिखल काढावा लागत होता. या बार्जमध्ये पोती भरून आणलेला गहू ती पोती उतरवताना बराच गहू बार्जमध्ये सांडला जायचा, हे चांगू नाखवा, हरी नाखवा यांना माहीत असायचं. मग ही मंडळी बार्ज येण्याच्या वेळी तेथे आपले मचवे घेऊन जायचे. अशा वेळी राम सोबत असायचाच. नाखवा मचवे घेऊन आलेले पाहून बार्जवरचे कर्मचारी शिव्या देऊन हाकलायचे. थोडे बाजूला जाऊन सगळे जण बार्ज कधी निघून जातोय, याची वाट पाहत थांबायचे. जाताना बार्ज साफ करून पोत्यातून पडलेला गहू बार्जमधील कर्मचारी तसाच चिखलात लोटून निघून जायचे. बार्ज निघून गेल्यावर नाखवा त्या जागेवर मचवे लावून पाण्यात डुबकी मारून जशी रेती काढायचे, तसाच चिखलात पडलेला गहू चिखलासह बाहेर काढायचे. तो चिखल धुऊन भिजलेला गहू घरी आणला जायचा व तो सुकवला जायचा. सुकल्यानंतर दळून त्याच्या चपात्या खाण्यासाठी केल्या जायच्या.

रामच्या शिक्षणाचा प्रवास सुरू होता. न्हावा खाडी, माणगाव परत न्हावा खाडी ते गव्हाण, गव्हाणची शाळा कौलारू चाळीसारखी लांब इंग्रजी 'एल' अक्षरासारखी, शाळेसमोर मोठे मैदान... वि. चा. म्हात्रे गुरुजी, सोलकर गुरुजी सगळे शिक्षक मुलांकडून खूप मेहनत करून घ्यायचे. दिवसाच्या शाळेबरोबर रात्रीची शाळाही भरायची. मात्र रात्रीचा वर्ग अभ्यासासाठी असायचा. त्या वेळी विजेचे दिवे नसल्याने रॉकेलचा टेंभा लावून अभ्यास करावा लागत असे. शिक्षक समोर बसून अभ्यास करून घ्यायचे. शाळेतच झोपायचे,



• गव्हाण येथील छत्रपती शिवाजी विद्यालय ही पत्र्याची शेड असलेली जुनी शाळा. शाळेच्या समोरील प्रांगणात वडाच्या झाडाखाली बसलेले विद्यार्थी

सकाळी उठून एक किलोमीटर चालत शिवाजीनगरला यायचे. रात्रीची शिळी भाकरी आणि गूळ आईने शेकवून ठेवलेला असायचा. शाळा पुन्हा अकरा वाजताची असल्यामुळे परत चालत शाळेकडे जायचे, दोन वाजता जेवणाची सुटी व्हायची, परत शिवाजीनगरला यायचे. संध्याकाळी शाळा सुटली, की आगगाडीचा झुकऽऽ झुकऽऽ आवाज करीत परत घराकडे धावत सुटायचे. सोबत दोस्तमंडळी असायचीच. वाय. टी. देशमुख, मजीद सोलकर हे वर्गातील हुशार विद्यार्थी, सोलकरचा पहिला नंबर असायचा. राम आणि वाय. टी. दुसऱ्या-तिसऱ्या नंबरवर वर-खाली असायचे. गव्हाण शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम करून घेतला. १९६० मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांची 'रयत शिक्षण संस्था' आली. जनार्दन भगत, दत्तूशेठ पाटील, दि. बा. पाटील यांच्या पुढाकाराने उरण-पनवेल विभागातील पहिली शाळा जासईमध्ये स्थापन झाली. त्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या शाखा पनवेल, उरण विभागात वाढत गेल्या. गव्हाणला सन १९६३-६४ मध्ये 'छत्रपती शिवाजी विद्यालय, गव्हाण' या नावाने शाळा स्थापन झाली. शाळेचे वर्ग धर्मा ठाकूर यांच्या घरात सुरू झाले. धर्मा ठाकूर यांच्या घराच्या माडीवर ३५ विद्यार्थ्यांचा आठवीचा वर्ग भरायचा. राम गव्हाणच्या प्राथमिक शाळेत सातवीत शिकत होता. राम गव्हाण हायस्कूलला गेला. शाळेत आठवीला गेला, तेव्हा नववीचा वर्ग सुरू झाला होता, पण विद्यार्थ्यांना बसायला जागा नव्हती. धर्मा ठाकूर यांच्या घरात जेथे गुरांचा गोठा होता, त्याच्या बाजूला असणाऱ्या पडवीत नववीचा वर्ग भरायला सुरुवात झाली. गुरांच्या शेणामुताचा वास घेत मुले शिकत होती. पुढे हे वर्ग वाढत दहावीपर्यंत गेले. पुन्हा बसण्याच्या जागेची अडचण होतीच. विद्यार्थ्यांच्या बसण्याच्या जागेची अडचण लक्षात घेऊन लक्ष्मीबाई देशमुख, सदुभाऊ देशमुख यांनी आपल्या मालकीची एक एकर जमीन शाळेसाठी दिली. ओबडधोबड असलेल्या या जागेचे सपाटीकरण करण्यासाठी जनार्दन भगतसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी श्रमदान करून खोदाई केली. विटा, सिमेंट, रेती डोक्यावर वाहून आणली. निवडुंगाचे कुंपण घातले गेले. दहावी, अकरावीच्या वर्गांसाठी पत्र्याची शेड असलेल्या चार खोल्या तयार झाल्या. राम या शाळेत शिकायला आला, तेव्हापासूनच शाळेला आयुष्यभर जोडला गेला. प्राथमिक शाळेतील मित्र वाय. टी. देशमुख, हरिभाऊ देशमुख, गोपीनाथ कोळी, मजीद सोलकर, रमण घरत, बंदू कोळी, के. के. ठाकूर, महादेव कोळी, राम कोळी आणि इतर अशी ३६ मुले व लता खरे नावाची एकमेव मुलगी होती. राम आपल्या मित्रांच्या आठवणीत आजही रममाण होतो. अशाच काही गमतीदार आठवणी आजही रामाच्या लक्षात आहेत.

हिवाळ्याचे दिवस होते. सकाळची शाळा असायची. बोचऱ्या थंडीतून विद्यार्थी शाळेत यायचे. त्या दिवशी सरांनी वडाच्या झाडाखाली उन्हात विद्यार्थ्यांना बसविले आणि शिकवायला सुरुवात केली. सरांचे अध्यापन अगदी रंगात आले होते. त्याच वेळी झाडाखाली असलेल्या बिळातून 'कांडर' जातीचा साप बाहेर आला आणि बसलेल्या मुलांमध्ये घुसला. मुलांनी साप बघून एकच गलका केला, सगळ्यांची पळापळ सुरू झाली. रामा कोळी वर्गात सगळ्यात जाडजूड असल्यामुळे त्याला उठता येईना. उठता उठता साप त्याच्या

पायाखाली आला आणि त्याला साप चावला. खरेतर रामाला दंश करताना सापाला पण आपले विषाचे दात त्याच्या शरीरात पूर्ण घुसविता आले नव्हते. पण साप चावला म्हटल्यावर शिक्षक, विद्यार्थी सगळेच घाबरले. आता रामा कोळ्याचे काय होणार! रामाला तातडीने दवाखान्यात नेण्यात आले. त्या वेळी असा समज होता, की कांडर चावल्यावर सूर्योदय किंवा सूर्यास्त झाल्यावर साप चावलेला रुग्ण दगावतो. म्हणून रामा कोळ्याची सगळ्यांना काळजी वाटत होती. पण दोनच दिवसांनी रामा कोळी शाळेत आला आणि त्याला बघून सगळ्यांना आनंद झाला. या घटनेमुळे झाडाखाली भरणारी शाळा मात्र बंद झाली.

असाच टोपी आंदोलनाचा मजेशीर प्रंसग... उरण, पनवेल भागात आंदोलन हा शब्द कोणाला नवीन नव्हता, तो परवलीचा झाला होता.अन्याय झाला म्हटल्यावर आंदोलन करायचे, हे आजूबाजूला घडणाऱ्या घटनांमुळे विद्यार्थ्यांना माहीत झाले होते. म्हणून राम आणि त्याच्या मित्रांनी 'टोपी हटाव' आंदोलन केले. खाकी पँट, पांढरा शर्ट आणि डोक्यावर गांधी टोपी हा रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाळांचा गणवेश असल्यामुळे सगळ्यांना तो घालावाच लागे. टोपी घातल्यामुळे इतर मुले घाटी म्हणून चिडवायची. ते चिडवणे कोणाला आवडत नसे. शेवटी टोपी न घालून येण्याचा विद्यार्थ्यांनी निर्णय घेतला. सगळे विद्यार्थी बोडक्या डोक्याने शाळेत आले. मुख्याध्यापक मोरे सरांच्या कानांवर ही घटना गेली. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना याबाबत विचारले, तेव्हा विद्यार्थी टोपी न घालण्यावर ठाम होते. त्यांनी भगतसाहेबांना निरोप पाठवला. भगतसाहेब शाळेत आले, विद्यार्थ्यांशी बोलले, मात्र विद्यार्थी ऐकायला तयार नव्हते. शेवटी त्यांनी निवडक पालकांना शाळेत बोलावून घेतले. विद्यार्थ्यांनी आपली बाजू मांडली, पण भगतसाहेबांनी विद्यार्थ्यांचे हे टोपी पुराण अगदी प्रेमाने संपविले. रामसारखा नेता येथेच या संस्कारात घडला... वाढला... नेतृवगुणांनी तयार झाला.

आठवी-नववीला असताना खापे (जाधव) सर मुख्याध्यापक होते. दहावी-अकरावीला असताना एस. बी. पाटील सर, येवले सर, गांजाळे सर, माळवदे सर, जगताप सर, मोरे सर, कुलकर्णी सर असे तज्ज्ञ शिक्षक विद्यार्थ्यांवर प्रचंड मेहनत घेत असत. शिक्षकांना पगार मिळायचा नाही, तरीही त्यांनी शिकविण्यात आणि विद्यार्थी घडविण्यात कधी हयगय केली नाही. भगतसाहेबांनी गावातील वाण्याकडे त्यांना उधारी लावून दिली होती. रामच्या आयुष्यावर जेवढे आई-वडिलांनी संस्कार केले, तेवढेच शिक्षकांनी केले. या संस्कारांनी तो समृद्ध झाला. म्हणूनच आजही तो आपल्या शिक्षकांना विसरलेला नाही. राम अकरावीला असताना एस. बी. पाटील सर मुख्याध्यापक होते. रामच्या अभ्यासू वृत्तीचे इतर शिक्षकांप्रमाणेच त्यांनाही खूप कौतुक होते. रामवर त्यांचे बारीक लक्ष होते. त्या वेळी अकरावीची (मॅट्रिक) फायनल म्हणजे बोर्डाची परीक्षा असायची. राम अकरावीत उत्तम गुणांनी पास झाला. गणितात त्याला १०० पैकी ७२ गुण मिळाले होते. रामच्या घरी आनंद साजरा झाला. आई-वडिलांचे स्वप्न राम पूर्ण करीत होता. आपल्या विद्यार्थ्यांसाठी मेहनत करणाऱ्या हुशार शिक्षकांकडे पाहून रामनेसुद्धा शिक्षक होण्याचे ठरविले. सगळेच सवंगडी पास झाले होते.

आता वेळ आली होती त्या शाळेचा निरोप घेऊन पुढच्या ध्येयाकडे झेप घेण्याची. आता पुढचे शिक्षण


कसे घ्यायचे, हा विचार करीत असतानाच मुख्याध्यापक एस. बी. पाटील सर आपल्या विद्यार्थ्यांसाठी धावून आले. राम आणि त्याच्या वडिलांना त्यांनी साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेच्या कॉलेजची माहिती दिली. रामला सरांनी साताऱ्याला येण्याचा सल्ला दिला. रामने साताऱ्याला जाण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्याच्या जीवनात एखादा आदर्श शिक्षक केवळ पुस्तकी ज्ञानच देत नसतो, तर विद्यार्थ्याला त्याच्या कुवतीप्रमाणे त्याचे जीवन सुखकर करणारे मार्गदर्शन करून त्याचा भविष्यकाळ उज्ज्वल करीत असतो. शिक्षक विद्यार्थांना केवळ वर्गखोल्यांमध्येच शिकवीत नसतात, तर त्यापलीकडच्या जगाचे चित्र त्यांच्या आयुष्यात रेखाटत असतात. नव्या जगाची ओळख करून देण्यासाठी विद्यार्थांना नवी दृष्टी देत राहतात. एस. बी. पाटील सरांसोबत नवे विश्व पाहण्यासाठी राम साताऱ्याला जाण्याच्या तयारीला लागला.

२

प्रवास साताऱ्याचा

आज पनवेल जरी नवी मुंबई शहराला लागून असले, तरी ही रायगड जिल्ह्याची आर्थिक राजधानी म्हणून विकसित होत आहे. पनवेल मुंबईपासून ३६.८ कि.मी. अंतरावर आहे. रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठे, विकसित व महत्त्वाचे शहर अशी पनवेलची ओळख आहे. पनवेल हा रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी, ५६४ गावे असलेला सर्वात मोठा तालुका आहे. आता मात्र पनवेल तालुका हा नवी मुंबईचाच एक भाग झाला आहे. मुंबई-गोवा व मुंबई-पुणे हे दोन द्रुतगती मार्ग पनवेल येथून सुरू होतात. सिडकोने नवीन पनवेल हे एक सुंदर शहर वसविले आहे. पनवेलपर्यंत आलेल्या हार्बर रेल्वेलाईनमुळे गावखेडे असलेले हे कोकणचे प्रवेशद्वार आता नवी मुंबई विमानतळामुळे नावारूपाला येत आहे. पनवेल या लहानशा शहराचे महानगरात रूपांतर झाले आहे. आज पनवेल शहरात पूर्वप्राथमिक शिक्षणापासून शिक्षणातील विविध शाखांमधील उच्च शिक्षणाच्या सर्व सोयी उपलब्ध झाल्या आहेत. राम जेव्हा मॅट्रिक पास झाला, तेव्हा पनवेलमध्ये उच्च शिक्षणाची कोणतीच सोय नव्हती. आपल्या हाती आयुष्यासाठी ज्ञानात्मक काहीतरी लागावे व लाभावे म्हणून त्याने साताऱ्याला जाण्याचा निर्णय घेतला. तेथे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी (अण्णा) गोरगरिबांसाठी शिक्षणाचा वटवृक्ष लावला होता.

साताऱ्याला जाण्यासाठी राम सामानाची बांधाबांध करीत होता. तो साताऱ्याच्या भावविश्वात हरवला होता. सातारा काय, साधे अलिबाग पण आपण कधी पाहिले नाही. लहान असताना मोठ्या मामेभावाकडे माणगावला शिकायला गेलो होतो, तोच एक केलेला लांबचा प्रवास, आपण एका अनोळखी शहरात राहायला जाणार आहोत. तेथील कॉलेज, परिसर, माणसे, सोबत शिकणारे विद्यार्थी सगळेच नवीन असणार होते. पोराला एका अशा शहरात पाठवायचे आहे जेथे आपले कोणीच नाही. आई-बाबांनाही काळजी लागली होती. आईच्या डोळ्यांतील अश्रू थांबत नव्हते, पण बाबांपुढे ती मुकी झाली होती. बाबांपुढे ती फार व्यक्त व्हायची नाही. कडक शिस्तीच्या नवऱ्यासमोर व्यक्त होताना तिची दमछाक व्हायची. तिचा लेक तिच्यापासून दूर चालला होता. रामला आईच्या मनात काय चालले आहे कळायचे, त्यामुळे मनातील अनेक द्वंद्वे रामजवळ व्यक्त करायची. तिच्यासाठी तो फार मोठा आधार होता. वडीलही रामसाठी फार हळवे असायचे. 'लेकरू एका नव्या जगाला आपल्या कवेत घेण्यासाठी चालले आहे, त्याला भावनेत बांधून जमणार नाही. त्याचे हे नवे अवकाश त्याला सापडले पाहिजे. आपण आयुष्यभर खस्ता खाल्ल्या, संसाराचा गाडा हाकताना देहाची राख होण्याची



● तारुण्यातील राम ठाकूर

वेळ आली. पोराचे भले होत असेल, तर मनावर आणि भावनांवर दगड ठेवलाच पाहिजे. यशाची शिखरे गाठायची असतील, तर चढावाचा खडतर प्रवास करायलाच हवा.' बाबांचा आतला आवाज त्यांना सांगत होता. आईचे मूक रुदन सुरूच होते. तिला रामच्या राहाण्याखाण्याची काळजी लागली होती. रामला काय आवडते, काय आवडत नाही, हे तिला चांगले माहीत होते. तिचे काळीज आतून काळजी आणि प्रेमाने भरले होतं. त्याची ती साताऱ्याला निघण्याची लगबग आई न्याहाळत होती. तिच्या छोट्या-मोठ्या सूचना देणे सुरूच होते. राम शिकायला साताऱ्याला जाणार म्हणून हरीकाका जरी आनंदी असला, तरी राम आपल्यापासून खूप दूर जाणार म्हणून नाराजही होता. हरीकाकाला रामच्या शिक्षणाचे खूप कौतुक होते. रामला चार काका, मोठा काका हरी ठाकूर, रामचे बाबा दोन नंबरचे, तिसरा नामदेवकाका- त्यांना सगळे 'नाना' म्हणायचे आणि शेवटचा बाळारामकाका, जो रामच्या बाबांचा सावत्र भाऊ होता. मात्र हरीकाकाचा रामवर खूप जीव होता. एस. बी. पाटील सरांनी, 'रामची काळजी करू नका, तेथे सगळी चांगली व्यवस्था लावून देतो,' म्हणून सांगितले होते, त्यामुळे सगळेच निश्चिंत होते.

अखेर साताऱ्याला जाण्याचा दिवस उजाडला. रामला रात्रभर झोप लागली नव्हती. सकाळी लवकर उठून त्याने निघण्याची तयारी केली. सातारा गाडी सकाळी आठ वाजता पनवेल बसस्थानकातून सुटणार होती. रामचे विश्व न्हावा खाडी, गव्हाण, कोपर या गावापुरतेच मर्यादित होते. आज वयाच्या सतराव्या वर्षी एका मोठ्या शहरात चालला होता, जे त्याने पुस्तकात वाचले होते, मात्र कधीच पाहिले नव्हते. शाळेतून तो साताऱ्याला कोयनानगर सहलीला गेला होता, त्या प्रवासाच्या आणि सहलीच्या स्मृती मन:पटलावर थोड्याफार कोरल्या गेल्या होत्या. पण हा प्रवास त्यापेक्षा वेगळा होता. निघायची वेळ झाली. त्याने आपली सामानाने भरलेली पत्र्याची पेटी उचलली. सगळे निरोप देण्यासाठी अंगणात जमले होते. रामने सगळ्यांना नमस्कार केला. हरीकाका न्हावा खाडीतून शिवाजीनगरला आला होता. हरीकाकाने रामच्या मुठीत दहा रुपये सरकवले आणि भरल्या डोळ्यांनीच 'खूप शिक' म्हणून आशीर्वाद दिला. आईचा डोक्यावरून फिरत आलेला हात गालावर येऊन थांबला. गालावरची बोटे तिने आपल्या ओठांवर टेकवली. डोळ्यांतील अश्रू तिच्या गालांवरून खाली कधी ओघळले तिलाही कळले नव्हते.

शाळेतील काही मित्रांनी मात्र सोबत सोडली नव्हती. मजीद सोलकर, हरिभाऊ देशमुख, गोपीनाथ कोळी हे सवंगडीही त्याच्या सोबत साताऱ्याला शिकायला निघाले होते. ते गव्हाणच्या बसथांब्यावर येऊन वाट पाहत थांबले होते. एस. बी. पाटील सर आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञानाची कवाडे उघडी करण्यासाठी कर्मभूमीत घेऊन चालले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी महाविद्यालय, जेथे अण्णांनी गोरगरिबांच्या, दीनदलितांच्या शिक्षणासाठी पहिले महाविद्यालय सुरू केले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेत न्हावा खाडीचा राम कर्मवीरांच्या कर्मभूमीत आपल्या कर्माच्या रेषा बळकट करण्यासाठी निघाला होता.

गाडी पनवेल डेपोमधून निघाली. तसे घरही गाडीच्या वेगाबरोबर मागे पडायला लागले. मनाने मात्र तो साताऱ्यात कधीच पोहोचला होता. कधीही न पाहिलेले सातारा मनात रेंगाळत होते. रात्रीचे मनात आलेले अनेक प्रश्न पिंगा घालत होते. गाडीचा वेगही आता वाढला होता. पुढे पळणाऱ्या गाडीबरोबर मागे पळणारी झाडे राम आपल्या मित्रांसोबत खिडकीतून कुतूहलाने पाहत होता. गाडी प्रवाशांची चढउतार करीत पुढे चालली होती. समोर बसलेला गाडीच्या चालकाच्या (ड्रायव्हर) हातातील ती गोलाकार रिंग (स्टिअरिंग) आणि त्याच्या बाजूला असणारा तो दांडा (गिअर) नेमके कसे काम करतो? ड्रायव्हर तो मागे-पुढे कधी आणि कसा करतो? दांडा मागे-पुढे करताना हातातील स्टिअरिंग कसे वळवितो? गाडी चालविणाऱ्या चालकाच्या प्रत्येक हालचालीचे राम किती तरी वेळ निरीक्षण करीत होता. गाडीच्या कमी झालेल्या वेगाने त्याच्या विचारांचा वेगही कमी झाला. चालकाने ब्रेक दाबला आणि गाडी जोराचा गचका देऊन थांबली. ती नागोठणे बस थांब्यावर काही क्षण विसावली. कंडक्टरने 'नागोठणे आले. चलाऽऽऽ नागोठण्याच्या प्रवाशांनी उतरून घ्या,' असा आवाज दिला. गाडी थांबल्याबरोबर सावलीच्या आडोशाला बसलेले फेरीवाले घाईघाईने आपल्या खाद्यपदार्थांच्या टोपल्या सावरत खिडकीजवळ आले. प्रवाशांची चढउतार झाली. कंडक्टरचा पुन्हा एकदा गाडी सुटत असल्याचा त्याच लयीतील आवाज गाडीभर घुमला. त्याने हाताच्या वर लटकलेली दोरी ओढली 'टिंगऽऽऽ टिंगऽऽऽ' आवाज झाला आणि गाडी महाडच्या दिशेने मार्गस्थ झाली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी काळेकभिन्न उभे कातळ अंगावर लपेटून सुकेळी खिंडीतील उंच डोंगरकडे पाहून सगळ्यांचेच डोळे विस्फारले. मजल दरमजल करीत सह्याद्रीच्या गिरिशिखरांना खुणावत एसटी पुढे जात होती. सावित्री नदीच्या भव्य पात्राच्या बाजूने सोनगडला वळसा देत गाडी महाड स्थानकात शिरली, प्रवाशांना घेऊन चांभारगडला सलामी देत पोलादपूरकडे निघाली. गाडीने पोलादपूरचे बसस्थानक सोडले आणि आंबेनळी घाटाला लागली. रायगड आणि सातारा जिल्ह्याला जोडणारा २,१०० फूट उंच आणि ४० कि.मी. असा महाराष्ट्रातील सर्वात लांब असलेला हा आंबेनळी घाट. आभाळ कवेत घेण्यासाठी एकमेकांशी शर्यत करणारे उंच डोंगर खिडकीतून दिसू लागले. गच्च झाडी पांघरलेले उंच डोंगर. त्या डोंगरात विसावलेली, दुरून चिमुकली दिसणारी गावे गच्च रानाच्या कुशीत लपलेली दिसत होती. आभाळाच्या दिशेने उंच गेलेले मंदिराचे कळस गावांचे अस्तित्व अधोरेखित करीत होते. गाडीचा वेग

आणि वळणाबरोबर अंगाला झोंबणारा वाराही गाडीसोबत घरघर करीत होता. गाडीसोबत आपण ढगातून चालतोय, असे वाटत होते. समुद्राच्या सान्निध्यात वाढलेल्या रामला आणि त्याच्या मित्रांना तसे हे डोंगरकडे नवीनच होते. वळणांवरून गिरक्या घेणाऱ्या गाडीमुळे पोटात गुदगुल्या होत होत्या. हळूहळू पुस्तकातील चित्रात पाहिलेला प्रतापगडचा डोंगर नजरेच्या टप्प्यात आला आणि सगळ्यांनी एकच गलका केला, "ए, तो बघा प्रतापगड..." शिवरायांच्या पराक्रमाचा साक्षीदार असलेला तो रेखीव किल्ला सगळे डोळ्यांत भरून घेत होते. सरांनी विद्यार्थ्यांना प्रतापगडची जी माहिती शाळेत सांगितली होती, त्याचा अनुभव ते प्रत्यक्ष घेत होते. रामने हा प्रवास फक्त डोळ्यांतच नाही, तर आपल्या स्मृतीत साठवून ठेवला होता.

गाडी साताऱ्याच्या बसस्थानकात संध्याकाळी चारच्या सुमारास पोहोचली. सगळ्यांनी आपापल्या सामानाच्या पेट्या डोक्यावर घेतल्या आणि चालत चालत छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या दिशेने मार्गस्थ झाले. प्रवासाचा थकवा सगळ्यांना आलेला होता. सूर्य मावळतीला झुकला होता. सरांनी मुलांची वसतिगृहात राहण्याची व्यवस्था केली.

राम चांगल्या गुणांनी मॅट्रिक पास झाला, इतके चांगले गुण असताना त्याने विज्ञान किंवा वाणिज्य (कॉमर्स) शाखेकडे जावे, असे अनेक जण सल्ला देत होते. पण रामला शिक्षकच व्हायचे होते, म्हणून त्याने कला शाखेत प्रवेश घेतला. उच्च शिक्षणाचा प्रवास साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सुरू झाला. मराठी, इतिहास विषयात त्याला अधिक रुची होती. नवे अध्यापक, नवे विषय, नवे वातावरण सगळेच नवे होते. इंग्रजी विषयात पारंगत असलेले प्राध्यापक कणसे, मराठी विषयासाठी प्राध्यापक मा. के. यादव, इतिहास विषयासाठी प्रा. आर. डी. गायकवाड सर, प्रत्येक जण एक संस्कारशाळा होती. आर. डी. गायकवाड सरांनी इतिहास



● साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाविद्यालय

नुसता शिकविला नाही, तर तो व्यक्तिमत्त्वात उतरविला. सगळ्याच शिक्षकांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे होते. हे विद्यार्थी आणि शिक्षकांचे नाते राम पदवीधर झाल्यानंतरही संपले नाही, तर ते पुढे दृढ होत गेले.

अध्ययन-अध्यापन वर्ग सुरू झाले होते. महाविद्यालयातील अध्यापन पद्धतीचा अंदाज यायला या नवीन विद्यार्थ्यांना वेळ लागणार होता. महाविद्यालय सुरू होऊन दोन-तीन दिवस झाले होते. सगळे विद्यार्थी वर्गात प्राध्यापक येण्याची वाट पाहत बसले होते. एक गृहस्थ अगदी सुटाबुटात वर्गात आले. त्यांच्या सोबत काही विद्यार्थी होते ते बाहेर उभे राहिले. विद्यार्थ्यांना वाटले प्राध्यापक आले म्हणून सगळे उठून उभे राहिले. प्राध्यापकांनी इंग्रजीत बोलायला सुरुवात केली. विद्यार्थ्यांना ओळख करून द्यायला सांगितले. सगळ्या विद्यार्थ्यांनी उभे राहून सरांना आपली ओळख करून दिली. नंतर सर म्हणाले, "ओके... गुड... ठीक आहे. आता प्राध्यापक कणसे यायची वेळ झाली आहे मी निघतो. मी सीनिअरचा विद्यार्थी आहे." महाशय आले तसे निघून गेले. एका सीनिअर विद्यार्थ्याने सर म्हणून आपली फिरकी घेतली. सगळे आवाक् झाले आणि एकच हशा पिकला.

रयत शिक्षण संस्थेची स्थापना कर्मवीर अण्णांनी सन १९१९ मध्ये कराडमधील 'काले' या गावात केली. सन १९२४ मध्ये रयत शिक्षण संस्थेचे सातारा जिल्ह्याच्या ठिकाणी स्थलांतर करून तेथे सर्व जाती-धर्माच्या



• छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा येथील रामशेठ ठाकूर यांचे कॉलेजचे मित्र. (बसलेले डावीकडून) बी. टी. टोणपे, एम. व्ही. सोनावले, अशोक एस. कांबळे, गोपीनाथ एल. कांबळे, एस. आय. बल्लाळ, के. एस. खांडेकर, (उभे डावीकडून) राम ठाकूर, एस. बी. शिंदे ऊर्फ मेजर, वामन जी. पाटोळे, एस. बी. ऊर्फ मामा सावंत

विद्यार्थ्यांसाठी एक मिश्र वसतिगृह सुरू केले. सन १९२७ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी साताऱ्याला आले होते, तेव्हा 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस'मध्ये राहणारे सगळ्या जाती-धर्माचे विद्यार्थी बघून अण्णांच्या कार्याचे कौतुक करताना महात्मा गांधी म्हणाले, "भाऊराव, साबरमती आश्रमात जे मला जमले नाही ते तुम्ही येथे यशस्वी करून दाखविले. तुमच्या कार्यास माझे आशीर्वाद आहेत." होस्टेलमध्ये सर्व जाती-धर्माचे विद्यार्थी असल्याने एकत्र जेवताना, एकत्र शिकताना जात हा शब्द मनातच नसायचा. कर्मवीर अण्णांना अपेक्षित असलेले माणूसपणाचे संस्कार आपोआप होत गेले. कारण अण्णांनी बांधलेले वसतिगृह सगळ्या जाती-धर्मासाठी होते. तेथे धर्म, जात राहत नव्हती, फक्त माणूसपण राहत होते. अशोक कांबळे, एस. बी. शिंदे (मेजर), के. एस. खांडेकर, वामन पाटोळे, एम. व्ही. सोनावले, ए. बी. सावंत (मामा), बी. टी. टोणपे, एस. आय. बल्लाळ, दिनकर झिमरे असे बरेच मित्र वेगवेगळ्या जातीतले; पण रामला ही जातीची बंधने कधीच आडवी आली नाहीत. 'रयत'च्या गव्हाणच्या शाळेतच ही जातीची बंधने उसवली गेली होती. साताऱ्याला आल्यावर ती पूर्ण मोकळी झाली. जात हा माणूसपणाला माणसानेच दिलेला शाप आहे. त्यात माणूसपण संपून जाते. माणसाचा धर्म हा माणूस उभा करणारा असायला हवा. जातीपातीच्या सीमा संपवून जेव्हा मनुष्यप्राणी माणसावर प्रेम करील, तेव्हा आपण खऱ्या अर्थाने माणूस होऊ, ही भावना रामच्या मनात दृढ झाली. म्हणूनच त्याने आपल्या आयुष्यात फक्त मानवतेला स्थान दिले व मोठे केले. कॉलेजच्या मित्रांना सुटीत आपल्या शिवाजीनगरच्या घरी घेऊन यायचा. जेव्हा हे सगळे मित्र त्यांच्या घरी जायचे, तेव्हा येते वेळी सोबत काही ना काही खायला घेऊन यायचेच, त्यात शेंगदाण्याची चटणी खास असायची. तिच्यावर तेल ओतून ताव मारला जायचा. रामला जातीयता कधीच पटली नाही. आई-वडील कर्मकांड करणारे होते, पण राम कर्मकांडात कधी अडकला नाही. प्राथमिक शाळेतील गुरुजींनी, माध्यमिक शाळेतील सरांनी व नंतर कर्मवीरांच्या विचारांनी दाखविलेले माणूसपणाचे मोकळे आभाळ ते हेच होते. साताऱ्यातील संस्कारांनी मनाला व्यापकता आणली. प्राचार्य एस. के. उनउने सर- त्यांना सगळे 'बापू' म्हणायचे, उनउने सर प्राचार्यपदावर असले, तरी ते प्रचार्यांपेक्षा विद्यार्थ्यांचे पालक अधिक असायचे. प्रत्येक विद्यार्थ्याचे दु:ख ते समजून घेत त्याला आधार द्यायचे. कोणत्याही विद्यार्थ्याला काही कमी पडले, तर प्राचार्य स्वतः पैसे खर्च करून आणून द्यायचे. राम हे सगळे पाहत होता. प्राचार्यांचा हा दयाळू स्वभाव रामच्या मनावर कोरला गेला .

साताऱ्यात गेल्यावर ही सगळी मंडळी सुरुवातीला वसतिगृहात राहायला लागली. माशांचे कालवण खाणाऱ्या रामला सुरुवातीला वसतिगृहातील जेवण जाईनासे झाले, पण उपाशी राहणे तर शक्य नव्हते. आपण 'जेवणासाठी नव्हे, तर शिक्षणासाठी एवढ्या लांब आलोय,' याची जाणीव व्हायला वेळ लागला नाही आणि समोर ताटात जे पडेल ते त्याला गोड लागायला लागले. जेवणाची वेळ झाली, की थाळी वाजायची. ताट-वाटी उचलून जेवणाच्या जागेवर जाऊन बसायचे. ताटात बाजरीची भाकरी आणि वरण वाढले जायचे. ज्वारीची भाकरी कधीतरी मिळायची. रविवारी मात्र चपाती असायची. भाकरी किंवा मिळालेली चपाती वरणात कुस्करून

खायची. सरफेज (तरी) मिळावी म्हणून वाढप्याला मस्का लावायला लागायचा.

'कमवा आणि शिका' या योजनेतून स्वावलंबी व्हा, हा मंत्र अण्णांनी दिला. त्यातून अनेक पिढ्या उभ्या केल्या. साताऱ्याला जाताना लेबर स्कीम (कमवा आणि शिका) या योजनेत राहण्याचा विचार करूनच राम गेला होता. तेथे गेल्यानंतर त्या स्कीममध्ये प्रवेश घेतला. सुरुवातीचे दोन-चार महिनेच राम या योजनेत राहिला. नंतर वडिलांनी वसतिगृहात राहण्याची सोय करून वेगळी खाणावळ लावण्यास सांगितले. 'कमवा आणि शिका' या योजनेतील चार महिन्यांनी स्वावलंबन म्हणजे काय, हे शिकविले होते. रामला शिक्षणासाठी वडील पैसे देत होते. हरीकाका न चुकता रामला महिन्याला १५ रुपयांची मनीऑर्डर पाठवायचे. खाणावळीतील जेवणासाठी महिन्याला ३५ ते ४० रुपये द्यावे लागायचे. वसतिगृहातील एका खोलीत दहा ते बारा विद्यार्थी राहायचे. पुढे रामने वसतिगृह सोडले. आपल्या मित्रांसोबत काही काळ गोडोलीत, सदर बाजार येथे राहायला गेला. गोडोलीत सेवागिरी महाराज हॉटेल बरोबरच 'डांगरे मामीची खाणावळ' होती. तेथील जेवण स्वस्त असायचे. ही मित्रमंडळी तिथे काही महिने जेवली. महिन्याला ३५ रुपये खाणावळीसाठी खर्च व्हायचे. कॉलेजच्या कँटीनमध्ये १० पैशांचा चहा आणि चार आण्यांची भजी मिळायची. रात्री अभ्यासासाठी अभ्यासिकेत गेल्यावर मित्रांसोबत या दहा पैशाला मिळणाऱ्या चहाची पार्टी व्हायची. गुलमोहर हॉटेलच्या खाली पानपट्टी होती, तेथे दर बुधवारी रेडिओवर लागणारी बिनाका गीतमाला ऐकता यावी म्हणून गुलमोहर हॉटेलजवळ जाऊन उभे राहायचे. प्रिन्स हॉटेल, रजताद्री हॉटेल ही त्या काळची साताऱ्यातील मोठी हॉटेल्स. आपल्याला या हॉटेलमध्ये जेवायला मिळायला हवे म्हणून खूप इच्छा व्हायची. पुढे राम आणि हरिभाऊ देशमुख असे दोघे एका खोलीत भाड्याने राहून स्वत: स्वयंपाक करायला लागले.

ही सगळी मित्रमंडळी साताऱ्यातील रस्ते भटकंती करीत पालथे घालायची. मात्र राजवाड्याच्या रस्त्यावर फिरताना कायम चुकायला व्हायचे. तरीही राजवाड्याच्या रस्त्यावर फिरणे रामला खूप आवडायचे.अजिंक्यतारा, सज्जनगडावरची भटकंती मनाला उभारी द्यायची. त्या वेळचा चॉकलेट हिरो जितेंद्र ज्याप्रमाणे खांद्यावर स्वेटर टाकून स्टाईलमध्ये चित्रपटांत फिरताना दिसायचा, त्याचप्रमाणे राम स्टाईल मारत फिरत आपल्या मित्रमंडळींचा बॉस बनून वावरत असायचा. पण 'चाहुंगा मै तुझे सांज सवेरे' म्हणण्यासाठी कोणीतरी असायला हवी, असे मात्र सगळ्यांना वाटायचे. आशा अर्ध्याअधुऱ्या प्रेम कहाण्यांचा प्रवास या मित्रमंडळींनी सुद्धा केला खरा, पण आपल्या मर्यादा आणि भान कधी हरवू दिले नाही. त्यांना मर्यादा आणि भान याचे शिक्षण एन.सी.सी. परेडच्या वेळी मिळत होते. सावधान-विश्राममध्ये थोडी जरी चूक झाली, तरी शिव्या आणि शिक्षा मिळायची. परेडच्या वेळी मिळणाऱ्या ग्लुकोजच्या बिस्किटांनी तोंड गोड व्हायचे, शिव्या आणि शिक्षेचा शीण निघून जायचा. कॉलेज्याजीवनाच्या मस्तीसोबतच रामच्या मनावर राष्ट्रप्रेमाचे संस्कार घडत होते. कॉलेजबरोबरच साताऱ्यात ठिकठिकाणी होणारी विचारवंतांची व्याख्याने ऐकण्यास मित्रांसोबत राम आवर्जून हजेरी लावत असे. ही मित्रमंडळी प्रा. शिवाजीराव भोसले यांची व्याख्याने ऐकण्यासाठी थेट कराड, फलटण ते अगदी कोल्हापूरपर्यंत

मिळेल त्या वाहनाने प्रवास करायची. अगदी उसाचा ट्रक मिळाला तरी त्यांना चालायचे. कॉलेजमध्ये होणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये राम हिरीरीने भाग घेत असे. त्या वेळी कॉलेजच्या वार्षिक अंकातून 'प्रतापगडच्या वाटेवर' हे प्रवासवर्णन आणि 'भीड भिकेची बहीण' हा लेख त्याने लिहिला होता.

राम रयत शिक्षण संस्थेचा एक अविभाज्य घटक झाला होता. कर्मवीरांच्या विचारांचा प्रभाव त्याच्या मनावर पडायला लागला. आपले भाग्य म्हणूनच आपल्याला कर्मवीरांच्या विचारांच्या सान्निध्यात शिकायला मिळतेय, असे त्याला कायम वाटत राहिले म्हणून रामने आयुष्यभर त्या विचारांची उपासना केली. ती 'निष्ठा' ती 'भक्ती' कायम जोपासली... फुलविली...वाढविली. कर्मवीरांनी लावलेल्या शैक्षणिक विचारांच्या वटवृक्षाची पारंबी होऊन तोही एक 'रयत'चा आधारवड झाला. रयतचे आणि त्याचे नाते वृद्धिंगत झाले.

बी.ए.च्या शेवटच्या वर्षाची परीक्षा झाली. आता परतीच्या प्रवासाची वेळ आली होती. घराकडे निघण्याचा आनंद असला, तरी येथून निघण्याचे दु:खही होतेच. एक डोळ्यात हसू आणि एका डोळ्यात अश्रू या म्हणीची यथार्थता जाणवत होती. चार वर्षांत साताऱ्याशी निर्माण झालेले ऋणानुबंध आयुष्यभर सोबत राहणार होते. या महाविद्यालयाने आणि साताऱ्याने आपल्याला खूप काही दिले. तारुण्याच्या चढावाकडे घेऊन जाणारा शारीरिक प्रवासही होता. तारुण्य येथे प्रत्येक वर्षाच्या अभ्यासासोबत फुलत गेले होते. 'स्वत्वा'च्या जाणिवांचा साक्षात्कार आणि परिपोष येथेच झाला. आयुष्यातील ही चार वर्षे म्हणजे उजाडून मावळलेले दिवस नव्हते. सोन्याच्या लाकाकीने ध्येयासक्त स्वप्नांना प्रकाशाचे कवडसे दाखवीत तारुण्याच्या झुल्यावर झोके देणारे सोनेरी दिवस होते. येथे वेचलेला प्रत्येक क्षण जगण्याचे प्रशिक्षण देणारा होता. रामच्या मनात विचारांची आंदोलने सुरू होती. खूप भावनावश होऊन राम सामान त्याच पत्र्याच्या पेटीत ठेवत होता, जी शिवाजीनगरपासून त्याला सोबत करीत आली होती. त्या पेटीनेही आपला स्वतःचा प्रवास रामसोबत केला होता. राम आपल्या मित्रांसह पनवेलकडे निघण्यासाठी सातारा बसस्थानकात येऊन एसटीत बसला. येताना तो सामानाची पेटी घेऊन आला होता, जाताना मात्र सामानाच्या पेटीबरोबरच अण्णांच्या शिक्षण समृद्धीने बुद्धीला दिलेला ज्ञानाचा पेटारा सोबत घेऊन चालला होता.

चार वर्षे... या वर्षांतील प्रत्येक दिवसाने रामच्या भावी आयुष्याची उज्ज्वल पायाभरणी केली. नव्या आशा, नव्या दिशा आणि आकांक्षाना नवे पंख लाभले होते. पनवेलचे तिकीट काढून त्याने आपली मान मागे सीटवर टेकली आणि डोळे बंद केले. गाडीने सातारा सोडले... वेग पकडला. शिवाजीनगरमधून साताऱ्याला निघतानाचा तो दिवस आणि झोप न आलेली निघण्याअगोदरची ती रात्र त्याला आठवली. साताऱ्याला येण्याअगोदर किती प्रश्नांचे मनात काहूर माजले होते. साताऱ्याकडे येतानाचा तो प्रवास... कर्नाळा अभयारण्यातील गर्द झाडी, सुकेळी खिंडीतील तप्त उन्हाच्या झळा अंगावर घेऊन ध्यानस्थ बसलेले ते उंच कातळकडे. त्यांच्या माथ्यावर कोसळणारे दुग्धधारांचे जलप्रपात येता-जाता डोळ्यांत साठविता आले. उन्हाळ्यात, पावसाळ्यात आणि हिवाळ्यातील आंबेनळी घाटाची विविध रूपं न्याहाळता आली. या सगळ्या प्रवासाबरोबर साताऱ्यातील ती

अविस्मरणीय चार वर्षे... कर्मवीर अण्णांचे माणूस उभा करणारे विचार... साताऱ्यातील मित्र त्यांचा दोस्ताना... त्यांच्या घरून आलेल्या शिदोऱ्या... ते रस्ते, त्या गल्ल्या, होस्टेल आणि खाणावळी... ती पानाच्या टपरीवर वाजणारी बिनाका गीतमाला... सगळेच मागे सोडून ज्ञानाची शिदोरी बांधून तो परतीच्या प्रवासाला निघाला होता. साताऱ्यातील या चार वर्षांच्या कलावधीत रामच्या आयुष्याला खूप काही मिळाले होते. त्याच्या आठवणींच्या गर्दीत जग सोडून गेलेल्या त्याच्या हरीकाकाचीही आठवण प्रकर्षाने झाली. त्याला हरीकाका सोडून गेल्याचा तो दिवस आठवला.

हरीकाकाविषयी रामच्या मनात अपार प्रेम. एकदा कॉलेजला सुटी असल्याने राम शिवाजीनगरला घरी आला होता. हरीकाका आजारी होते. राम हरीकाकाला भेटायला न्हावा खाडीच्या घरी गेला, तेव्हा रामला पाहून हरीकाकाला खूप आनंद झाला. राम हरीकाकाला भेटून घरी आला आणि पहाटे साधारण तीन-चारच्या सुमारास हरीकाका गेल्याचा निरोप आला. रामने निरोप ऐकला, तेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर त्याचा हरीकाका दिसत होता. त्याच्यावर लेकरासारखे प्रेम करणारा... त्याच्यासाठी हळवा होणारा हरीकाका. शिवाजीनगरपासून न्हावा खाडीचे अंतर त्याने कधी आणि कसे पार केले होते, हे त्याला कळलेच नव्हते. राम न्हावा खाडीच्या घरी गेला, तेव्हा हरीकाका निपचित पडलेला पाहून त्याने टाहो फोडला. त्याला आधार देणारा, त्याच्यावर जिवापाड प्रेम करणारा त्याचा हरीकाका आता कायमचा हे जग सोडून गेला होता. तो दिवस होता २८ फेब्रुवारी १९७०. रामच्या शिक्षणाचे त्यांना खूप कौतुक होते. साताऱ्यात दर महिन्याला हरीकाका रामसाठी १५ रुपयांची मनीऑर्डर करायचा. हरीकाकाचे जाणे रामच्या आयुष्यात पोकळी निर्माण करून गेले.

ही आठवणींची मालिका एखाद्या चित्रपटासारखी झरझर पुढे सरकत असतानाच गाडी प्रतापगडला वळसा घेऊन आंबेनळी घाट उतरायला लागली. चार वर्षांत अनेक वेळा सातारा ते पनवेल प्रवास झाला, पण आजचा प्रवास निर्वाणीचा नसला, तरी साताऱ्याला दुरावणारा होता. स्वप्न साकार करण्यासाठी पुढच्या प्रवासाला निघावेच लागणार होते. मजीद सोलकर, हरिभाऊ देशमुख सोबत होते. गाडी पनवेल बस स्थानकात येऊन थांबली आणि सगळ्यांची तंद्री भंग झाली. कंडक्टरने आवाज दिला, 'चला पनवेल... पनवेल... उतरून घ्या...' पनवेलला चढउतार करणाऱ्या प्रवाशांची लगबग सुरू झाली. गाडीतून उतरून राम आणि मित्रमंडळी गव्हाणकडे जाणाऱ्या गाडीच्या थांब्यावर येऊन थांबले.

आयुष्य आपल्याला पुढे घेऊन जात असते. कधी वळणवाटा, कधी पायवाटा, कधी ढोरवाटा, तर कधी चकचकीत गुळगुळीत रस्त्यावरून चालावेच लागते... आपल्या वाट्याला कोणती वाट येईल, हे आपल्या कर्मफळाचे संचित असते. सुखदुःखाचे पदलालित्य सुरू असतेच प्रत्येकाच्या आयुष्यात, मात्र कोणाला थांबता येत नाही. तथापि, कोठे थांबावे, कधी निघावे, हे आपण आपल्या क्षमतेने निर्णय घ्यायचे असतात. योग्य वेळी योग्य निर्णय घेणारेच मळलेल्या वाटांवरून न जाता स्वतःच्या वाटा तयार करतात. राम असाच एक वाटसरू होता. योग्य वेळी योग्य निर्णय घेणे हे राममध्ये स्वभावतःच होते. म्हणून शिक्षक होण्याचा निर्णय त्याने खूप

अगोदरच घेतला होता, फक्त वाट पाहत होता बी.ए.च्या निकालाची.

सन १९७२ ला राम बी.ए. पास झाला. न्हावा खाडीतील चांगू ठाकूरचा पोरगा हा गावातील पहिला पदवीधर तरुण असल्याने त्याचे कौतुक सगळ्यांना होतेच, पण रामच्या बाबांची छाती अभिमानाने आणि गर्वाने भरून आली होती. रामला शिक्षक व्हायचे असल्याने बी.ए.नंतर राम पनवेलला आला. पनवेलच्या बी.एड. कॉलेजमध्ये त्याने शिक्षणशास्त्र (बी.एड.) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. साताऱ्यातील शिक्षण संपले असले, तरी साताऱ्याचे ऋणानुबंध 'रयत'च्या आणि आण्णाच्या विचारांच्या रूपाने आयुष्याभरासाठी जोडले गेले ते आजपर्यंत तसेच आहेत. शिक्षण सुटले, पण सातारा आजही सुटले नाही, ते रस्ते... त्या गल्ल्या... त्या खाणावळी आजही मनात गुंजन करीत आहेत. साद घालत आहेत. म्हणून राम आजही त्या वाटांना प्रेमाने कुरवाळतोय.



• छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा येथील रामशेठ ठाकूर यांचे तेच कॉलेजचे मित्र आजही जेव्हा पुन्हा भेटतात, त्या वेळेला ते जुन्या आठवणींना उजाळा देतात

३

अवघाची संसार

रामला शिक्षक व्हायचे असल्याने बी.ए.नंतर बी.एड. पदवी घ्यायची होती. पनवेलमधील बी.एड. कॉलेजला प्रवेश घ्यायचा होता. बी.ए.च्या निकालाचा दिवस उजाडला आणि निकालाची हुरहुर संपली. बी.ए.चा निकाल अपेक्षेप्रमाणेच लागला. आता 'बी.ए. (ऑनर्स)' ही पदवी नावापुढे लागणार होती. मागील चार वर्षे केलेल्या मेहनतीचे फळ पदरात पडले होते. निकाल जाहीर झाल्यावर घरात सगळ्यांना आनंद झाला. पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी कोल्हापूरला जावे लागणार होते. युनिव्हर्सिटीत जाऊन पदवी प्रमाणपत्र घेतानाचा आनंद गगनात मावत नव्हता. पदवीदान समारंभानंतर फोटो स्टुडिओमध्ये अंगावरील झग्यासह टिपलेले छायाचित्र पाहून आजही मन सुखावून जाते. गव्हाण भागात तसे शिक्षणाचे प्रमाण कमीच असल्याने या भागातील रामसारखे तरुण इतरांसाठी दीपस्तंभ झाले होते. रामने बी.एड.चा फॉर्म भरला आणि काही दिवसांतच प्रवेश मिळाल्याची यादी नोटीस बोर्डावर लागली.



• रामशेठ यांनी बी.ए. (ऑनर्स) पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर टिपलेला एक आनंदी क्षण

राम आणि हरिभाऊ देशमुख यांनी बी.एड.ला प्रवेश घेतला. मजीद सोलकर बी.ए. झाल्यानंतर पनवेलच्या व्ही. के. हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरीस लागले. काही कालावधीतच कॉलेज सुरू झाले. बी.एड. कॉलेजच्या परिसराचा बाहेरून तितकासा अंदाज येत नसला, तरी आत शिरल्यावर दिसणाऱ्या विस्तीर्ण परिसरात मनाला सुखावणारी शांतता अनुभवता येते. कित्येक पिढ्या उभ्या असलेल्या वृक्षांच्या आत लपलेल्या शैक्षणिक संकुलाच्या इमारती झाडांच्या गर्द सावलीत आजही तशाच विसावल्या आहेत. गोंगाट, गर्दीपासून दूर असलेल्या या शांत-सुंदर परिसरात भावी शिक्षक घडविणारे बी.एड.चे वर्ग सुरू झाले. शिवाजीनगर ते पनवेलचा रोजचा एसटीचा प्रवास करून कॉलेजमध्ये यावे लागत होते.

पण शिवाजीनगरला जाण्या-येण्यात फार वेळ जात



● रामशेठ ठाकूर यांनी पनवेल येथील या शासकीय अध्यापक महाविद्यालयात बी.एड. पदवी संपादन केली

असल्याने अभ्यासाला वेळ देता येत नव्हता. शेवटी आयुष्यात कधीकधी अशा काही घटना अनाकलनीय घडतात, ज्या आपल्या विचारांच्या पलीकडच्या असतात. बऱ्याच वेळा आपण म्हणतो आणि मानतोही, की 'जे होणार आहे ते होणारच, त्याला आपण थांबवू शकत नाही की टाळू शकत नाही.' असेच रामच्या आयुष्यात घडले. राम बी.एड. करीत असतानाच त्याच्यावर संसाराची जबाबदारी अनपेक्षितपणेच आली.

बी.एड.चे (Bachelor of Education) प्रशिक्षण सुरू झाले. बी.एड.चा कालावधी एका वर्षाचा. या एक वर्षानंतर रामला शिक्षक म्हणून पदवी मिळणार होती. जनार्दन भगतसाहेबांना आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाला बघतच राम लहानाचा मोठा झाला होता. भगत साहेबांविषयी रामच्या मनात आदराची भावना होती. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्यप्रणालीने राम प्रभावित झाला होता. भगतसाहेबही रामला लहानपणापासून पाहत होते. त्यांची पारखी नजर आणि माणूस ओळखण्याची हातोटी त्यांना कधीच धोका देऊ शकणार नसल्यामुळे त्यांनी चांगू ठाकूर यांच्या पोरातील गुण हेरले होते. रामची शिक्षणाविषयीची तळमळ त्यांना भावली होती. बी.एड. झाल्यानंतर रामला आपला जावई करून घेण्याचे त्यांनी मनोमन ठरविले होते. रामचे वडील चांगू ठाकूर हे शेकापचे कार्यकर्ते. भगतसाहेबांवर त्यांची प्रचंड निष्ठा होती. भगतसाहेब कुलाबा जिल्हा परिषदेत चार वेळा सदस्य म्हणून निवडून आलेले नेते होते. पनवेल पंचायत समितीवर उपसभापती म्हणून त्यांनी काही काळ काम पाहिले होते,.त्यांचा जनसंपर्क दांडगा होता. भगतसाहेबांनी काही सांगावे आणि चांगू ठाकूर यांनी ते अगदी

निष्ठापूर्वक ऐकावे एवढी त्यांची दिलजमाई होती. पण जेव्हा आपल्या मुलीच्या लग्नाचा विषय आला, तेव्हा भगतसाहेब मात्र चांगू ठाकूर यांना रामबद्दल विचारायला धजले नाहीत. त्यांनी स्वतः विचारले असते तरी चांगू ठाकूर यांनी आनंदाने होकार दिला असता. तसे न करता त्यांनी 'छत्रपती शिवाजी विद्यालय, गव्हाण' या शाळेतील जाधव सरांना मध्यस्थी केले. चांगू ठाकूर यांना शकुंतला आणि राम यांच्या लग्नाविषयी विचारायला सांगितले. जाधव सरांनी त्यांची भूमिका चोख बजावली होती. चांगू ठाकूर यांना भेटून भगतसाहेबांचा निरोप सांगितला. आपल्या मुलासाठी एवढ्या मोठ्या घरची सोयरिक आली म्हटल्यावर चांगू ठाकूर यांचा आनंद गगनात मावेना. त्यांनी रामच्या कानांवर ही गोष्ट लगेचच घातली. खरेतर रामला निदान बी.एड. होऊन नोकरी लागेपर्यंत लग्न करू नये, असे वाटत होते. पण बाबांचा आनंदी चेहरा पाहून त्यांना नकार देण्याची हिंमत त्याला झाली नाही. त्यानेही लग्नासाठी आपली संमती दर्शविली.

शकुंतला तशी रामसाठी अनोळखी नव्हती. गव्हाणच्या शाळेत राम अकरावीला होता, तेव्हा ती नववीला होती. शाळेत एकमेकांना पाहत होते, पण भावी आयुष्यात आपण पती-पत्नी असू, असा विचार दोघांनीही कधी केला नव्हता. शकुंतला म्हणजे एक अजब समीकरण होते. इतर मुलींसारखी तारुण्यातील चंचलता तिच्यात नव्हतीच. कोणाशी ती फारशी बोलायची नाही. तोंडातून एकही शब्द न काढणे, हा तिचा विशेष स्थायीभाव होता. सगळ्या शाळेला हे माहीत असल्यामुळे रामला जेव्हा भगतसाहेबांची मुलगी 'शकुंतला' हिचा भावी पत्नी म्हणून उल्लेख झाला, तेव्हा त्याच्या समोर शकुंतलाची छबी उभी रहिली.

२४ फेब्रुवारी १९७३ रोजी राम आणि शकुंतला यांचे सनईचौघडे वाजले. विवाह सोहळा अत्यंत थाटात पार पडला. राम नऊ भावंडांत सगळ्यात मोठा होता. पण शिक्षण घेत असल्याने त्याचा छोटा भाऊ श्रीधरचे रामच्या अगोदर लग्न झाले. श्रीधरचा मोठा मुलगा विशाल रामच्या लग्नात एक वर्षाचा होता.

शकुंतलाबाई फारच लाजाळू. इतर मुलींच्या तुलनेत आपली बायको एवढी लाजाळू आणि अबोल कशी काय, याचे रामला आश्चर्य वाटत होते. एक दिवस रामने शकुंतलाबाईंना पनवेलच्या आदर्श हॉटेलमध्ये लस्सी प्यायला आणले. बायकोची हौसमौज करू म्हणून रामसुद्धा आनंदाने बायकोला खूष ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. रामने लस्सीची ऑर्डर दिली. वेटरने लस्सी आणून टेबलावर ठेवली. समोर ठेवलेल्या लस्सीच्या ग्लासला त्या हात लावायला तयार होईनात. रामने विचारले "शकुंतला, तू लस्सी का पीत नाहीस?" ''अहो, सगळ्यांसमोर लस्सी कशी प्यायची!" आपल्या बायकोचे हे बोलणे ऐकून रामने डोक्याला हात लावला. त्यांचा स्वभाव पुढे तसाच होता, आजही तसाच आहे. कोणाच्या अध्यातमध्यात न पडता समोरच्या व्यक्तीशी जेवढे चांगले वागता-बोलता कसे येईल त्याचा विचार करणारी, कोणाला दुखवायचे नाही. त्यामुळे सासरची माणसेही त्यांनी आपलीशी केली. आपल्या नवऱ्याच्या प्रत्येक परिस्थितीत त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या.

शकुंतलाबाईनी चांगले वाईट दिवस या सगळ्याचा अनुभव घेतला. आपल्या वडिलांची सामाजिक जाणीव त्या लहानपणापासून अवलोकन करीत होत्या. शेतकरी कामगार पक्षाचा एक मातब्बर नेता असलेल्या



● **श्री. रामशेठ ठाकूर व सौ. शकुंतला ठाकूर**

भगतसाहेबांच्या घरात रात्रंदिवस माणसांचा राबता असायचा. आज गावचा सरपंचसुद्धा कोटी रुपयांच्या गाड्या घेऊन फिरताना दिसतो. आज राजकारण, समाजकारण सगळेच कालानुरूप बदलत गेले. भगतसाहेबांसारखा अनेक पदे भूषविलेला नेता सामान्य दिसत असला, तरी त्यांचे असामान्यत्व त्यांच्या वर्तनातून दिसायचे. ते नेहमी एसटीने प्रवास करायचे. त्यांच्या स्वभावात कसला अभिनिवेश नसायचा. साधेपणा हा त्यांचा स्वभाव होता आणि तोच भाव त्यांच्या मुलीत पुरेपूर उतरला होता. रामशेठ जेव्हा व्यवसाय करायला लागले ती परिस्थिती, नंतर पक्षकार्यात गुंतले ती परिस्थिती, पुढे सक्रिय राजकारणात उतरले, खासदार झाले, तेव्हाची परिस्थिती हाताळताना त्यांच्यावर झालेल्या सामाजिक संस्कारांनी त्यांना कोणताही संयम न ढळू देता योग्य दिशा दाखविली. त्यांनी नवऱ्याची गरिबी पाहिली, आज श्रीमंतीचा कळसही पाहिला, पण त्यांनी स्वत:ला आणि स्वभावाला ढळू दिलं नाही. तोच साधेपणा आजही दिसून येतो. लग्न होण्यापूर्वी जसे वडिलांना समाजासाठी धावताना पाहिले होते. आता लग्न झाल्यानंतर पतीला त्याच कार्यासाठी धावताना त्या पाहत होत्या. त्यामुळे आपल्या नवऱ्याच्या सामजिक कार्यात त्यांनी कधी आपल्या सांसारिक कुरबुरी आडव्या आणल्या नाहीत. आज त्यांच्याकडे पाहिले, तर त्यांच्या चेहऱ्यावर श्रीमंतीचा कसलाच बडेजाव दिसत नाही. आपल्या साधेपणातच त्या अधिक उठून दिसतात. कधी कोणाला दुखावणे नाही. कोणाला उलट बोलणे नाही. आपला नवरा मोठा माणूस आहे, हीच भावना त्यांच्यासाठी

खऱ्या श्रीमंतीची आहे. ''माझे नशीब खूप चांगले म्हणून मला असा नवरा मिळाला. लग्न झाल्यापासून आजपर्यंत त्यांनी माझी खूप काळजी घेतली. काही कमी पडू दिले नाही. ते खूप ध्येयवादी आहेत. आयुष्यात जे काही त्यांनी मिळविले ते त्यांनी केलेल्या प्रचंड मेहनतीचे फळ आहे. कधीच कोणाला दुखावले नाही. आपल्या भावंडांवर खूप प्रेम केले. नीटनेटकेपणा, कामावरची श्रद्धा आणि शिस्त हा त्यांचा स्वभावधर्म, आजही कोठे प्रवासाला निघाले, तरी स्वतःचे कपडे स्वतः भरणार, सकाळी उठल्यावर अंगावरचे पांघरून स्वतः घडी घालून ठेवणार, साताऱ्यात लागलेली आणि वडिलांकडून मिळालेली शिस्त आजही तशीच आहे. या शिस्तीने आणि मेहनतीने त्यांना मोठे केले, याचा मला खूप अभिमान आहे,'' असे पतीविषयी त्या भरभरून बोलतात.

प्रत्येक माणूस एक असे स्वप्न घेऊनच जगत असतो, जे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याची धडपड सुरू असते. स्वप्नांची ध्येये करून त्याला परिश्रमाची जोड दिली, की आकाशाची चादर पांघरायला वेळ लागत नाही. श्रद्धा, संयम आणि परिश्रम आपल्याला जे हवे ते भरभरून देतात. रामच्या आजवरच्या आयुष्याचा प्रवास याच त्रिसूत्रीने सुरू होता. शिक्षक व्हायचे, हे त्यांनी शाळेत असताना पाहिलेले स्वप्न होते. ते साध्य करण्यासाठी त्याने नंतरची पाच वर्षे अभ्यासात घालविली होती. मानवाच्या आयुष्यातील दु:खाचे मूळ कारण आहे 'अविद्या' (अज्ञान). अविद्या म्हणजे विद्येचा अभाव. रामने स्वत:ला या अविद्येतून बाहेर काढण्याचा नेटाने प्रयत्न केला, त्याची फलश्रुती त्याला मिळाली होती.

अजून बी.एड.ची परीक्षा व्हायची होती. शिवाजीनगरला येऊन-जाऊन कॉलेज ते घर असा रोजचा प्रवास सुरू होता. पण शिवाजीनगरला जाण्या-येण्यात फार वेळ जात असल्याने अभ्यासाला वेळ देता येत नव्हता.घरच्यांनी पनवेलमध्ये खोली घेऊन राहण्याचा सल्ला दिला. शोधाशोध करून त्यांनी पनवेलमधील मिडलक्लास सोसायटीत डॉ. जोशी यांच्या बंगल्याच्या टेरेसवर खोली भाड्याने घेतली. तेथे बाथरूमची सोय नव्हती, म्हणून चटया आणि बांबूच्या काठ्या बांधून आडोसा तयार करून त्याचा वापर अंघोळीसाठी केला. शौचविधीसाठी सार्वजनिक शौचालयात जावे लागायचे. याच कालावधीत बी.एड.ची पदवी घेऊन व्ही. के. हायस्कूलमध्ये नोकरी लागली होती. काही कालावधीनंतर डॉ. जोशींच्या टेरेसवरची खोली सोडली आणि तक्क्यावर खोली घेतली. खोलीच्या मालकाचे आणि त्यांच्या भावाचे भांडण होते. या भाऊबंदकीमुळे घेतलेल्या खोलीत प्रवेश करण्यासाठी मुख्य रस्ताच नव्हता. पत्र्याखालून वाकून यावे लागायचे. त्यात पाणीही कमी मिळायचे. पाण्यासाठी पेट्रोल पंपावर यावे लागत होते. भरलेले हंडे पत्र्याखाली वाकून आत घ्यायला लागायचे. काही दिवसांनी शेवटी तीही खोली सोडली. रामचे साडू लाईन आळीत मारुती मंदिराजवळ राहत होते. तेथेच घोड्याची पागा होती. साडूच्या ओळखीने त्या घोड्याच्या पागेच्या वरती माडीवर फळ्या टाकलेली खोली भाड्याने मिळाली. फळ्यांची अवस्था बिकटच होती, पण काही इलाज नव्हता. तेथे काही दिवस काढले. एका वर्षात तीन खोल्या बदलल्या. **अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक ।।** म्हणत रामचा सुखी संसाराचा आनंद अनेक अडचणींवर मात करीत सुरू होता. एकाच वेळी बी.एड.चे शिक्षण आणि संसार असा प्रवास सुरू झाला. बघता बघता बी.एड.चे

वर्ष सरत आले. परीक्षा पार पडली आणि बी.एड. पदवी मिळाली.

पनवेलमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव अधिक होता. दि. बा. पाटीलसाहेब, जनार्दन भगत साहेब, दत्तूशेठ पाटीलसाहेब यांच्यासारखी शेकापक्षाची नेते मंडळी येथे पक्षाचे नेतृत्व करीत होते. अलिबागमधील 'कोकण एज्युकेशन सोसायटी'चे पनवेलमध्ये 'विठोबा खंडाप्पा हायस्कूल' (व्ही .के. हायस्कूल) ही पनवेलमधील फक्त मुलांसाठी असणारी एकमेव मोठी शाळा. हजारो विद्यार्थी येथे शिकून गेले होते. या शाळेचे संचालक मंडळ जरी शेतकरी कामगार पक्षाचे असले, तरी राम ठाकूर सरांकडे मुळातच गुणवत्ता होती, त्यामुळे नोकरीसाठी वशिल्याची गरज नव्हतीच. ते आपल्या गुणवत्तेवर व्ही. के. हायस्कूलमध्ये बी.ए.,बी.एड. शिक्षक म्हणून रुजू झाले. त्या वेळी पगार होता ३४२ रुपये. सरकारी नोकरी मिळाल्यामुळे ठाकूर सर अतिशय आनंदात होते.

व्ही. के. हायस्कूलचा खूप मोठा पसारा आणि विद्यार्थिसंख्या जास्त असल्यामुळे वर्गात 'अ'पासून 'फ'पर्यंतच्या तुकड्या होत्या. 'अ','ब' तुकडीतील विद्यार्थी हुशार, 'क' व 'ड' तुकडीत फार हुशार नसले, तरी पास होणारे विद्यार्थी होते. 'इ व फ' म्हणजे सगळ्या टारगटपोरांचा भरणा... अशी एकंदरीत अलिखित वर्गवारी ठरलेली असायची. 'फ' तुकडीत एका वर्गात चार-चार वर्षे काढलेले विद्यार्थी असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांनाही आपण विशेष पदवी घेऊन वर्गात स्थिरस्थावर झाल्याचा अभिमान असल्यासारखे वाटायचे. म्हणजे असाच समज करूनच ते वर्गात वावरायचे. ही वर्गावळ म्हणजे आपण शाळेत काहीही वळवळ करू शकतो, या भ्रामक कल्पनेत



● राम ठाकूरसर बी. एड. झाल्यानंतर पनवेलच्या वि. के. हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले

असलेली. राम ठाकूर सर हे इतिहास, मराठीचे शिक्षक, पण मुख्याध्यापिका जठारबाईंनी ठाकूर सरांना ९ वी 'अ' आणि १० वी 'क'च्या मराठीबरोबरच १० वी 'फ'च्या तुकडीला 'इंग्रजी' शिकवा, असे सांगितले. हे आव्हान सोपे नव्हते, मात्र ठाकूर सरांनी ते स्वीकारले. तशी लहानपणापासून त्यांना आव्हाने पेलण्याची सवय होतीच. त्यामुळे समोरच्या अवघड परिस्थितीला कसे भिडायचे, हे त्यांना चांगलेच अवगत होते. 'शिक्षक झालोय ते विद्यार्थी घडविण्यासाठी, बघू काय होते ते," विचार करून ठाकूर सर इयता १० वी 'फ'च्या वर्गात शिरले. विद्यार्थ्यांनी सरांचे उभे राहून स्वागत केले. म्हणजे काही उठून उभे राहिले, तर काहींनी दुर्लक्ष करून आपले बूड टेकूनच ठेवले होते. सरांनी वर्गातील सगळ्या विद्यार्थ्यांवर एक नजर फिरविली. स्वत:ची ओळख करून दिली आणि विद्यार्थ्यांची ओळख द्यायला सांगितले, तेव्हा सरांच्या लक्षात आले, की काही विद्यार्थी आपल्यापेक्षा वयाने मोठे दिसत आहेत. एका वर्गात बरीच वर्षे मुक्काम असल्यामुळे त्यांच्या विद्यार्थिदशेमध्येच वैचारिक दिशा चुकायला लागली होती. समोरच्या विद्यार्थ्यांना पाहून सरांना साताऱ्यातील कॉलेजमधील तो पहिल्या दिवसाचा प्रसंग आठवला, जेव्हा सीनिअरचा विद्यार्थी सुटाबुटात येऊन वर्गात शिरला होता. जवळजवळ त्याच्याच वयाचे विद्यार्थी समोर बसले होते. ठाकूर सरांनी स्वत:ला सावरले. शिकविण्यासाठी फळ्याकडे वळले आणि मागून कागदाचे बाण त्यांच्या अंगावर येऊन आदळले. दोन-तीन वह्या टेबलावर येऊन पडल्या. मागे वळून सरांनी वह्या हातात घेतल्या आणि काहीही न बोलता वह्या खिडकीतून बाहेर फेकून दिल्या, वह्या फेकणारे विद्यार्थी सरांनाच दम द्यायला लागले, "सर, वह्या बाहेर का फेकल्या, सर वह्या का फेकल्या? आणून द्या!" सरांनी त्या विद्यार्थ्यांना शांतपणे विचीरले, ''वह्या येथे चालत आल्या का? ज्याच्या आहेत त्याने स्वत: जाऊन घेऊन यायच्या." एवढे बोलून सर पुन्हा फळ्याकडे वळले. पुन्हा विद्यार्थ्यांनी वेगवेगळे आवाज काढायला सुरुवात केली. सर धीरगंभीर भावमुद्रेने मागे फिरले. त्यांनी विद्यार्थ्यांकडे पाहिले आवाज काढणाऱ्या आणि वह्या फेकणाऱ्या विद्यार्थ्यांचा अंदाज त्यांनी अगोदरच घेतला होता. चालत चालत त्यांच्याजवळ गेले आणि पाठीवर असे काही रपाटे दिले, की 'ओंयेऽऽऽओंये' असा कळवळल्याचा आवाज आला. त्याच धीरगंभीर आवाजात म्हणाले, "मी पण याच गावचा आहे. वर्गात विद्यार्थी म्हणून आला आहात ना, विद्यार्थ्यासारखे शिस्तीने राहायचे." एव्हाना बाकीच्या पोरांना कळले होते, की हे थोडे वेगळे पाणी आहे. पुन्हा सरांना त्रास देण्याचे धाडस कोणा विद्यार्थ्याने केले नाही.

ठाकूर सरांच्या मनाला विद्यार्थ्यांच्या या वर्तनामुळे मात्र वेदना झाल्या. विद्यार्थ्यांनी नेहमी ध्येयासक्त असले पाहिजे. नेहमी आदर्श होण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे त्यांना वाटत होते. काही विद्यार्थ्यांनी वाईट अनुभव दिले असले, तरी आता पनवेलमधील सध्या नामांकित असलेले डॉ. गिरीश गुणे, देशमुख वकील यांच्यासारख्या अनेक गुणवंत विद्यार्थांचा कायम अभिमान बाळगावा, असे विद्यार्थीही त्यांना येथेच भेटले. जेमतेम एक वर्ष सरांनी व्ही. के. हायस्कूलमध्ये नोकरी केली आणि त्या नोकरीचा राजीनामा दिला.

पनवेलमध्ये नोकरी करीत असतानाच सन १९७४-७५ मध्ये सिडकोच्या (City and Industrial Development Corporation) वाशी येथील 'दी फर्स्ट न्यू बॉम्बे स्कूल, वाशी' या नवी मुंबईतील पहिल्या



● 'दी फर्स्ट बॉम्बे स्कूल वाशी' या नवी मुंबई येथील शाळेत राम ठाकूर सरांनी ज्ञानदानाचे काम केले

शाळेची शिक्षक भरतीची जाहिरात निघाली. हा कालवधी नवी मुंबईची संकल्पना राबविणाऱ्या सिडकोच्या विस्ताराचा होता. उरण, पनवेलच्या सगळ्या भागात सिडकोने हातपाय पसरायला सुरुवात केली होती. सिडकोला पनवेल, उरण भागातील जमिनी ताब्यात घेऊन त्या ठिकणी वसाहती उभ्या करायच्या होत्या. नवीन शहरे आणि कंपन्या तयार करून मुंबईच्या लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी सरकारने सिडकोची स्थापना केली होती. सिडकोचे अधिकारी गावागावांत जमिनी ताब्यात घेण्यासाठी येऊ लागले. गव्हाण, कोपर, जासई या भागात गेल्यावर त्यांना गावकरी विरोध करू लागले. ठाकूर सर गव्हाण भागात राहणारे, त्यामुळे त्यांनी सिडकोच्या शाळेत नोकरी मिळविण्यासाठी याच गोष्टीचा फायदा घ्यायचे ठरविले आणि सिडकोचे अधिकारी कुलकर्णी यांना सांगितले, "मी प्रकल्पग्रस्त आहे, मला नोकरी मिळाली पाहिजे." नाहीतरी सिडकोने जमिनी मिळाव्यात म्हणून गावागावांत जाऊन दहावी पास, तसेच पदवीधर असलेल्या तरुणांना नोकरी देण्याची आमिषे दाखवून नोकऱ्या देण्याचे धोरण अवलंबिलेले होतेच, म्हणून ठाकूर सरांनी शिक्षक म्हणून नोकरीचा आग्रह धरला होता. या नोकरीतून पनवेलच्या नोकरीपेक्षा शंभर रुपये जास्त मिळणार होते. पनवेलच्या शाळेचा पगार ३४२ रुपये, सिडकोच्या शाळेचा पगार ४४० रुपये आणि सिडकोकडून राहायला घर मिळणार होते. कुलकर्णीसाहेबांनी ठाकूर सरांच्या अर्जाचा विचार करून त्यांना नियुक्तीचे पत्र दिले व ते सिडकोच्या शाळेत सन १९७४-७५ मध्ये रुजू झाले.

वाशीमधील सेक्टर १ मध्ये 'ई४/०१' टाईपमध्ये सरांना सिडकोने राहायला जागा दिली. ३७५ स्क्वेअर फुटांचे हे घर त्या वेळी आलिशान राजमहाल वाटायला लागला होता. सिडकोच्या इमारती तेथे तयार झाल्या होत्या. वाशीनगरची लोकसंख्या त्या वेळी एकंदरीत पाच हजारसुद्धा नसेल. विरळ लोकवस्ती, जवळ बाजारपेठ नव्हती, अगदी काडेपेटीसाठी किंवा दळणासाठी कॉलनीतून वाशी गावात जायला लागायचे. मात्र शाळेतील दिवस फार आनंदात जात होते. विद्यार्थी अभ्यासू होते. शाळेबरोबर सरांचा संसारही सुखाने चालला होता. याच कालावधीत सिडकोने हायरपर्चेस स्कीममध्ये राहायला दिलेले घर विकण्यासाठी प्रस्ताव काढले, त्या स्कीममधून ठाकूर सरांनी आपले राहते घर त्या वेळी एकूण २२,००० रुपयांना हप्त्यावर विकत घेतले. त्यासाठी त्या वेळी ४ हजार रुपये रोख भरले व १८ हजार रुपये कर्ज घेतले होते. आज रामशेठ अनेक बंगल्यांचे मालक असले,

तरी शिक्षक असताना आपल्या पहिल्या कमाईतून घेतलेल्या या वाशीच्या घराची ओढ त्यांना खूप जास्त आहे. कोट्यवधीचे ते मालक असले, तरी २२ हजार रुपयांना घेतलेले हे घर त्यांनी आजही जपून ठेवले आहे.

वाशीतील शाळेत नोकरी करीत असतानाच ती सोडून पूर्णवेळ व्यवसाय करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. व्यवसायात जम बसू लागल्यानंतर पनेवलमध्ये पंचरत्न हॉटेलजवळ सुखसागर इमारतीमध्ये भाड्याने घर घेतले. त्यानंतर नवीन पनवेलमध्ये सिडकोची वसाहत असलेल्या E-10 या इमारतीत स्वत:चे घर घेतले. अवघाची संसार पनवेल ते वाशी, वाशी ते पनवेल असा प्रवास करीत अखेर नवीन पनवेलमध्ये विसावला. वाशीत असतानाच ५ ऑगस्ट १९७४ रोजी राम ठाकूर सरांच्या परिवारात 'प्रशांत राम ठाकूर' ही ओळख घेऊन नवीन सदस्याने पदार्पण केले. त्यानंतर १८ मे १९७८ ला परेश या दुसऱ्या मुलाचा जन्म झाला. सुसंस्कारित आणि उच्चशिक्षित असलेले प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वडिलांचा व्यवसाय यशस्वीरीत्या सांभाळला असून, प्रगल्भ राजकीय नेता म्हणून आज विधानसभेमध्ये आमदार म्हणून लोकांनी त्यांना चौथ्यांदा निवडून दिले आहे. त्यांचे अमोघ आणि अपूर्व हे दोन मुलगे शिक्षण घेत आहेत. अमोघ लंडनमध्ये बी.बी.ए. करून मँचेस्टरमध्ये कन्स्ट्रक्शन मास्टर कोर्स पूर्ण करीत आहे. अपूर्व अकरावीत शिकतोय. परेश ठाकूर यांनी पनवेल महापालिकेचे नगरसेवक आणि सभागृह नेते म्हणून काम केले. त्यांचे आदेश आणि आदित्य हे दोन मुलगे शिक्षण घेत आहेत. आदेश लंडनमध्ये बी.बी.ए.चे शिक्षण घेत हे. राम ठाकूर सरांचा संसार आता बहरला आहे.



• रामशेठ ठाकूर आणि सौ. शकुंतला ठाकूर आपला मुलगा आमदार प्रशांत ठाकूर व सून सौ. वर्षा ठाकूर, मा. सभागृह नेता तथा नगरसेवक परेश ठाकूर व सून सौ. अर्चना ठाकूर, नातवंडे अमोघ, अपूर्व, आदेश, आदित्य या त्यांच्या बहरलेल्या परिवारासह

४

रामचा रामशेठ होताना...

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात संधी दार ठोठावत असते. फक्त तिचा कानोसा घेऊन तिच्यावर आरूढ व्हावे लागते. त्यासाठी अचूक निर्णयक्षमता, धैर्य, त्याचबरोबर प्रचंड ध्येयासक्ती असावी लागते. ज्यांच्याकडे ती ध्येयशक्ती असते, तेच या संधीचे सोने करतात. ती घेण्यासाठी पहिल्यांदा स्वतःची स्वतःला ओळख व्हावी लागते. ज्यांनी स्वतःला ओळखले ते आयुष्यात आलेली संधी कधीच गमावत नाहीत. तिच्यावर आरूढ होऊन ते आपल्या ध्येयाकडे वाटचाल करीत असतात. हाच अनुभव रामशेठ ठाकूर यांनी त्या वेळी घेतला, ज्या वेळेला व्यावसायिक होण्याची संधी त्यांच्याकडे चालून आली होती. त्यांनी काळाची पावले ओळखली नसती, तर आज ते रामचा रामशेठ होऊ शकले नसते. ही संधी त्यांना चालून आली ती वाशीमधील 'द फर्स्ट न्यू बॉम्बे स्कूल, वाशी' या सिडकोच्या शाळेमध्ये नोकरी करीत असताना.

त्या वेळी उलवा विभागात नवीन वसाहती उभ्या करण्यासाठी सिडको या भागात शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्याचा प्रयत्न करीत होती. आपल्या पिकत्या जमिनी सिडको कवडीमोल किमतीत घेणार म्हणून येथील शेतकरी सिडकोविरुद्ध आक्रमक झाले होते. दि. बा. पाटीलसाहेब, दत्तूशेठ पाटीलसाहेब, जनार्दन भगतसाहेब व इतर नेतेमंडळींनी सिडकोच्या विरोधात जन आंदोलन उभे करण्यासाठी शेतकरी परिषद घेतली. त्या परिषदेला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. सिडको अधिकारी या भागात जमिनी घ्यायला येऊ नये म्हणून शेतकऱ्यांची आक्रमकता इतकी होती, की त्यांनी मांडवाला कुऱ्हाडी, कोयते बांधून ठेवले होते. त्यामुळे सिडकोच्या कोणत्याही अधिकाऱ्याची गावात येण्याची हिंमत होत नव्हती. अधिकाऱ्यांना जमीन संपादनाचे आपले काम करायचे होते, पण काही मार्ग सापडत नव्हता. गावापर्यंत कसे पोहोचता येईल, शेतकऱ्यांशी कसे बोलता येईल, याचा विचार करीत असताना त्यांना जनार्दन भगत साहेबांचे जावई आपल्याच सिडकोच्या शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असल्याचे समजले. ठाकूर सरांना जर आपण सोबत घेऊन गेलो, तर आपल्याला शेतकऱ्यांशी बोलता येऊ शकेल, असा त्यांनी अंदाज बांधला. एक दिवस सिडकोचे अधिकारी लेलेसाहेब राम ठाकूर सरांना शाळेत शोधत आले. आपल्याला सिडकोचे अधिकारी शोधत आहेत, याचे सरांनाही आश्चर्य वाटले. जेव्हा लेलेसाहेब सरांना भेटले, तेव्हा त्यांनी, 'आम्हाला तुमच्या गावाला जायचे आहे, तुम्ही आमच्यासोबत चला,' असे सांगितले. ठाकूर सरांना सिडकोच्या जीपमध्ये बसवून लेलेसाहेब सिडकोच्या इतर अधिकाऱ्यांना सोबत घेऊन गव्हाणकडे निघाले.

सिडकोने या भागातील सुशिक्षित तरुणांना नोकरी देण्याचे धोरण अवलंबिलेले होते. ठाकूर सरांनी प्रकल्पग्रस्त म्हणूनच आपला नोकरीवर हक्क सांगून सिडकोच्या शाळेत नोकरी मिळविली होती. शाळेची सरकारी नोकरी त्यातून मिळणारा पगार आणि आपले कुटुंब यापलीकडे त्यांनी आपल्या आयुष्याचा विचार केला नव्हता. 'रावाचा रंक आणि रंकाचा राव' कोणाला करील, हे कधी सांगू शकत नाही.

जीपमध्ये बसल्यानंर लेलेसाहेबांनी ठाकूर सरांना न्हावा खाडीचा बंधारा बांधण्याचे काम सुरू करायचे असल्याचे सांगितले आणि यातील काही काम तुम्ही करणार असाल, तर आम्ही तुम्हाला देतो, असा प्रस्ताव ठेवला. ठाकूर सरांनी क्षणाचाही विलंब न करता प्रस्ताव स्वीकारला. बंधारा कसा बांधला जातो, खांड कशी बुजवितात, हे ठाकूर सर लहानपणापासून पाहत आले होते. न्हावा खाडीचा बंधारा बांधण्याचे १०,००० रुपयांचे काम त्यांना त्या वेळी मिळाले. सगळ्या गोष्टींची जुळवाजुळव करायची म्हणजे पैसे लागणार होते. सिडको काम झाल्यावर पैसे देणार होती. कामासाठी पैसे हवे होते. जेवढे लागणार होते, तेवढे पैसे जवळ नव्हते. त्यांनी आईची बोरमाळ, गंठण, सोन्याच्या बांगड्या, वडिलांची चेन, अंगठ्या, पनवेलच्या रतनशेठ बांठिया पेढीवर गहाण ठेवून ५,००० रुपये कर्ज घेतले व कामाला सुरुवात केली.

न्हावा खाडीचा बंधारा बांधण्याचे मिळालेले पहिलेच काम खूप काही देऊन गेले. एका महिन्यात पूर्ण केलेल्या या कामातून अडीच हजार रुपये नफा झाला. शाळेचा एक महिन्याचा पगार ४४० रुपये होता. पहिल्या कामातून एका महिन्यात सहा महिन्यांचा पगार मिळाला. बंधाऱ्याच्या झालेल्या कामाचा दर्जा बघून सिडकोने १२,००० रुपयांचे अजून एक काम दिले. तेही काम अत्यंत दर्जेदार आणि वेळेत पूर्ण केले. याच वेळी गव्हाण कोपरचे जे. एम. म्हात्रे व धुतूमचे ब्ल्यू स्टार कंपनीचे पी. जी. ठाकूर यांनाही बंधारा बांधण्याचे काम दिले.

सिडकोने न्हावा बाजूने मुरमाचा रस्ता बनविण्याच्या कामाला सुरुवात केली होती. त्या कामातील ५३,००० रुपयांचे काम ठाकूर सरांना दिले. काम तर मिळाले होते, पण तेथे गाडी जाणे शक्य नव्हते. माती वाहून न्यायची ही फार मोठी अडचण होती. स्वतःजवळ ना बैलगाडी होती ना ट्रक होता. शिवाय, पडावातून गाडी पलीकडे नेणे शक्य नव्हते. काही साधनच नसल्याने मातीच्या भरावाचे काम करावे कसे? विचार करीत असतानाच त्यांच्या डोळ्यांसमोर गाढवे उभी राहिली. हे काम फक्त गाढवेच करू शकतात, हे त्यांच्या व्यावसायिक बुद्धीने जाणले. त्यांनी गाढवांचा शोध घेतला व सत्तर गाढवे भाड्याने घेतली. गाढवांना खाडीतून पलीकडे न्यावे लागणार होते. त्यासाठी त्यांना पडावात (मचवा) टाकून पलीकडे न्हावा डोंगरावर नेण्यात आले. कामाला सुरुवात केली. या गाढवांच्या पाठीवर मातीच्या भरावाच्या टोपल्या रचून गाढवे माती वाहून नेऊ लागली. गाढवांच्या मदतीने २०० मीटर लांबीचा बंधारा तीन महिन्यांत पूर्ण केला.

यानंतर उरणमधील विंधणे ते बोरखार रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेले १ लाख ५० हजार रुपयांचे काम त्यांनी पूर्ण केले. आता या कामांचा अंदाज यायला लागला होता. आत्मविश्वास दुणावला होता. आपली कामे दर्जेदार असली पाहिजेत, तरच आपल्या कामाचे मूल्य वाढेल, हे त्यांनी ओळखले.



● **'टीआयपीएल' कंपनीच्या नवीन मशिनरीचे पूजन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर**

एक व्यावसायिक म्हणून वाटचाल सुरू केली असली, तरी शिक्षक म्हणून नोकरी सुरू होतीच. एका बाजूला व्यवसाय वाढत चालला होता, त्यामुळे त्याला वेळ देणे महत्त्वाचे होते. नोकरी असल्यामुळे तिथेही वेळ द्यावाच लागत होता. दोन्ही आघाड्या सांभाळण्यासाठी प्रचंड धावपळ आणि दगदगीचा प्रवास सुरू होता. कोठेतरी एकाच ठिकाणी लक्ष देणे गरजेचे होते, त्यामुळे त्यांनी सन १९७७ मध्ये शाळेत एक वर्षाची बिनपगारी रजा टाकली व पूर्णवेळ व्यवसायावर लक्ष केंद्रित केले.

व्यवसाय वाढत असल्याने स्वत:ची कंपनी रजिस्टर करणे गरजेचे होते. मात्र शाळेची नोकरी सरकारी असल्यामुळे त्यांना त्यांच्या नावाने कंपनी सुरू करणे कायदेशीर अडचणीचे होते. त्यांनी धाकटा भाऊ श्रीधर याच्या नावाने सन १९७६ मध्ये 'एस. सी. ठाकूर' नावाने काम सुरू केले. कंपनीचे सगळे व्यवहार श्रीधरच्या नावाने होऊ लागले. कंपनी रजिस्टर तर झाली, मात्र त्यासाठी स्वत:ची जागा नव्हती आणि स्वत:ची जागा घेण्याची परिस्थिती नसल्यामुळे त्या वेळेला पनवेलमधील 'तक्का' येथे प्रवीण हॉटेलजवळ जब्बारभाईचे गॅरेज होते. तेथे गाड्यादुरुस्तीचे काम चालायचे, तेथेच शेडमध्ये पत्र्याच्या पेटीवर बसून कंपनीचा कारभार सुरू केला. काही वेळा उरण नाक्यावर सुंदर मंडप डेकोरेटरच्या कार्यालयात बसून व्यावसायिक कामकाज केले. कंपनीचे व्यवहार श्रीधरच्या सहीने सुरू होते. पण व्यवसायातील गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी कंपनीचे नाव १ एप्रिल १९७८ रोजी 'मेसर्स एस. सी. ठाकूर अँड ब्रदर्स' असे बदलले. हे करीत असताना त्यांनी

श्रीधरला वेगळा व्यवसाय सुरू करून दिला.

रोहिंजन ते तुर्भे रस्त्याचे पी.डब्ल्यू.डी.चे दोन लाखांचे काम मिळाले. तेही सचोटीने पूर्ण झाले. सन १९७९ मध्ये गव्हाण-जासई रस्त्याचे काम हाती आले. मात्र या कामात त्यांना तोटा सहन करावा लागला. आता व्यवसाय म्हटले, की कधीतरी तोट्याची सहनशीलता ही ठेवलीच पाहिजे. हे चढउताराचे टप्पे तर येणारच, हे त्यांनी स्वीकारले होते.

गव्हाण, कोपर, जासई विभागात त्या वेळी सिडकोचे कार्यालय नव्हते, ते बेलापूरला होते. सिडकोचे अधिकारी त्यासाठी जागेच्या शोधात होते. लेलेसाहेबांनी ठाकूर सरांना सांगितले, की एखादी जागा ऑफिससाठी मिळाली तर बघा. ठाकूर सरांनी त्यांच्या शिवाजीनगरच्या घरामध्ये एक खोली सिडको कार्यालयासाठी भाडेतत्त्वावर दिली. येथील लोकांची सिडकोच्या विरोधात भूमिका असूनही राम ठाकूरने आपल्या घरात ऑफिसला जागा दिली. याबद्दल लोकांनी नाराजी व्यक्त करून दहा-बारा तरुण रामशेठ ठाकूर यांच्या सिडको ऑफिसमध्ये आले. १५ ऑगस्टचा दिवस होता. ऑफिसवर मोर्चा आणला. या मोर्चाचे नेतृत्व वाय. टी. देशमुख, पांडूमामा घरत, वामनशेठ म्हात्रे करीत होते. 'स्थनिक तरुणांना नोकरी द्या, नाहीतर ऑफिस बंद करा,' अशी मागणी मोर्चा घेऊन आलेल्या तरुणांनी केली. इंजिनीअर लेलेसाहेबांनी त्या वेळी दहा तरुणांना 'मेट'मध्ये भरती करण्याचे आश्वासन दिले.

शिवाजीनगर ते न्हावा रस्त्याच्या १ कोटी २० लाखांपेक्षा जास्त किमतीच्या कामाचे टेंडर सिडकोने काढले. हे काम मोठे असल्यामुळे 'हे काम तुम्हाला जमणार नाही,' असे राम ठाकूर सरांना सिडकोकडून सांगण्यात आले. त्या वेळी त्यांच्यातील व्यावसायिक दुखावला गेला. जगामध्ये अशक्य काहीच नाही, यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. हे काम आपण कोणत्याही परिस्थितीत घ्यायचेच, असा निर्धार करून त्यांनी सिडकोविरुद्ध एल्गार पुकारला. दि. बा. पाटीलसाहेब, जनार्दन भगतसाहेब यांची अन्यायाविरुद्धची आंदोलने त्यांनी जवळून पाहिली व अनुभवली होती. त्याच मुशीत ते लहानपणापासून तयार झालेले होते. ते संस्कार त्यांना गप्प बसू देईनात. खरेतर येथेच त्यांच्यातील नेता आणि नेतृत्व जन्माला आले. त्यांनी प्रकल्पग्रस्तांना सोबत घेऊन सिडकोविरुद्ध मोर्चा काढला. सिडकोवर आलेला मोर्चा बघून सिडकोच्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले. राम ठाकूर सरांनी सिडको अधिकाऱ्यांना प्रतिवाद केला, की 'एवढे मोठे काम मी एकटा करू शकत नसेन, तर या कामाची दहा ग्रुपमध्ये वाटणी करून द्या. आम्ही सहकाराच्या तत्त्वावर हे काम करायला तयार आहोत.' त्या वेळी प्रत्येक गावचा एक ग्रुप करून सहकार तत्त्वावरती काम करण्याची कल्पना ठाकूर सरांनी पुढे आणली. ती सगळ्यांनी उचलून धरली. एका ग्रुपमध्ये २० ते ३० कंत्राटदार एकत्र येऊन काम करायला तयार झाले. सिडकोने निमूटपणे हे काम दहा ग्रुपमध्ये वाटून दिले, त्यात राम ठाकूर सरांनाही काम मिळाले.

पुढे व्यवसायातील यशाचा चढता आलेख पाहता, त्यांना आपल्याला नोकरीचा राजीनामा देणे गरजेचे वाटू लागले. नोकरी करून व्यवसाय सांभाळणे शक्य नव्हते. 'शिक्षक म्हणून नोकरीत राहिलो, तर निवृत्तीपर्यंत

जास्तीत जास्त मुख्याध्यापक होऊ शकेन, पण व्यावसायिक म्हणून आता जी स्वत:ची ओळख झाली आहे, तिचे काय? आपल्याला शिक्षक व्हायचे होते, ते ध्येय आपण पूर्ण केलेय. विद्यार्थ्यांशी एक ज्ञानात्मक आत्मतत्त्वाचे नाते निर्माण झाले आहे. मग व्यावसायिक नफ्यातून शिक्षणासाठी आपण त्याच्यापलीकडे काही तरी नक्की करू शकतो. एका ज्ञानात्मक प्रणालीशी आपण जोडले गेलो आहोत, ती आस सहज तुटणारी आणि सुटणारी नाही. पण आता माझी गरज व्यवसायाला आहे,' असा विचार करून त्यांनी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. पण तो घरच्यांना कसा समजावणार? एवढा मोठा निर्णय घेणे त्यांना जरी आता सोपे वाटले, तरी घरच्यांसाठी तो अवघड होते. त्यांना एक कल्पना सुचली, पण ती सत्यात उतरेल याची शाश्वती देता येणार नव्हती. प्रयत्न करून बघूया, म्हणून तसे वातावरण निर्माण करायला सुरुवात केली.

गावची माणसे देवदेवस्कीवर विश्वास ठेवणारी असल्यामुळे त्यांना अशा मार्गाने समजावता येईल का, असा त्यांनी विचार केला. त्यांच्या आईच्या अंगात देवीचे (बायांचे) वारे यायचे. बाया अंगात आल्यावर त्यांना आपल्या समस्या सांगायच्या, त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग विचारायचा. त्या जे सांगतील त्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्याची अंमलबजावणी करायची. एक दिवस आईच्या अंगामध्ये बायांचे वारे आले. 'रामने नोकरी सोडून व्यवसाय केला तर चालेल का?' असे बायांना विचारण्यात आले. बायांनी 'हुंकार' देऊन होकारार्थी मान हलवली आणि राम ठाकूर सरांच्या राजीनाम्याचा मार्ग मोकळा झाला. त्यांनी शाळेच्या नोकरीचा राजीनामा देऊन पूर्णवेळ व्यवसायावर लक्ष केंद्रित केलं. खरेतर त्यांनी व्यावसायिकच व्हावे, हे नियतीलाच मंजूर होते. ती त्यांना त्या दिशेने घेऊन चालली होती.

ठाकूर सरांवर कामाच्या बाबतीत त्यांच्या वडिलांचा खूप प्रभाव होता. कामावर कसे नीट लक्ष द्यायचे हे त्यांच्याकडून ते शिकले होते. आपल्या कामाबद्दलची शिस्त आणि निष्ठा आपल्याला यशस्वी बनविते, असे वडील सांगायचे. कामाकडे दुर्लक्ष व चुकारपणा त्यांना आवडत नसे. तोच आदर्श रामशेठ यांनी आयुष्यभर जपला. वाढत्या व्यवसायाबरोबरच कामगारांची संख्या वाढत होती. कामावर लक्ष ठेवण्यासाठी ते रात्री अपरात्री कधीही साईटवर जायचे. मालक कधीही येऊ शकतात म्हटल्यावर कामगारही कामचुकारपणा न करता आपापले काम प्रामाणिकपणे करायचे, त्यामुळे काम आणि कामाचा दर्जा वाढला. सचोटी आणि परिश्रमाच्या बळावर व्यवसाय नावारूपाला आला होता.

त्या वेळच्या 'न्हावाशेवा इंटरनॅशनल कंटेनर टर्मिनल' (NSICT) चे काम त्यांना १९९७ मध्ये मिळाले आणि हे काम त्यांच्या व्यवसायातील सगळ्यात मोठे काम होते. कोट्यवधी रुपयांच्या कामामुळे त्यांची प्रचंड भरभराट झाली. एक उद्योजक म्हणून त्यांचा नावलौकिक वाढला होता. त्यांना प्रगतीकडे नेणारा हा फार महत्त्वाचा टप्पा ठरला. याअगोदर ते महिन्याला २० लाखांचं काम पूर्ण करीत होते. या कामाने दिवसाला कोटीच्या घरात काम करण्याची संधी त्यांना दिली. हे काम त्यांच्या प्रामाणिक वृत्तीमुळे त्यांच्याकडे चालत आलेले होते. हे काम मिळण्याअगोदर ते आपल्या मित्रांसोबत युरोप टूरवर गेले होते. एक दिवस त्यांचा मुलगा



● व्यवसायातील उंची कशी गाठावी, हे आपल्या नातवंडांना सोबत घेऊन सांगताना रामशेठ ठाकूर

प्रशांत ठाकूर यांचा त्यांना फोन आला. प्रशांत यांनी फोनवर सांगितले, की गणेश नाईकसाहेबांचा मुलगा संजीव नाईक यांचा एका मोठ्या कामासंदर्भात फोन आला होता.' ठाकूर सरांनी परदेशातून नाईकसाहेबांना फोन करून याबाबत पूर्ण माहिती जाणून घेतली. तेव्हा कळले, की पराग शहा नावाचे एका मोठे कंत्राटदार आहेत, त्यांच्या 'पाठारे ग्रुप' या कंपनीला एन.एस.आय.सी. टी. (P&O) न्हावा शेवा टर्मिनसचे मोठे काम मिळाले आहे. बाहेरच्या माणसांना उरणमध्ये काम करणे शक्य नव्हते. गुणवत्तापूर्वक काम करण्यासाठी चांगला व स्थानिक सबकंत्राटदार हवा होता. गणेश नाईकसाहेब आणि पराग शहा चांगले मित्र असल्यामुळे शहा यांनी याबाबत गणेश नाईकसाहेबांना सांगितले होते. हे काम इमानेइतबारे फक्त रामशेठच करू शकतात, याची खात्री नाईकसाहेबांना असल्यामुळे त्यांनी आपला मुलगा संजीव नाईक यांना रामशेठ यांना फोन करायला सांगितले होते, पण ते युरोपमध्ये असल्याने संपर्क झाला नव्हता. हे काम राम ठाकूर सरांना मिळाले. या कामाचा भूमिपूजन समारंभ १२ ऑक्टोबर १९९७ रोजी झाला. त्या वेळी पराग शहा, संजीव नाईक, स्वत: गणेश नाईकसाहेब उपस्थित होते. काम दिलेल्या मुदतीत पूर्ण झाल्यांनतर पोर्टच्या उद्घाटन समारंभाला एन.एस.आय.सी.टी.(P&O) चे मॅनेजिंग डायरेक्टर जिम्मीसाहेब हजर होते. या कामाने त्यांना खऱ्या अर्थाने रामचे रामशेठ बनविले.

व्यवसायाची सुरुवात केली, तेव्हा आत्मविश्वासाशिवाय हातात काहीच नव्हते. वाशी ते न्हावा खाडी रोजचा प्रवास कधी एसटीने, तर कधी पायवाट चालावी लागत होती. एक वेळ अशीही आली, की माती वाहून

नेण्यासाठी गाढवांची मदत घ्यावी लागली. चांगू ठाकूर यांच्या अनेक पिढ्या पोटाची खळगी भरण्यासाठी काबाडकष्ट करीत होत्या. कधी खाडीने सोबत केली, कधी थोड्याफार शेतीवर उपजीविका करता आली. गाड्या-घोडे यांचा विचार कधीच न केलेल्या चांगू ठाकूर यांच्या घरात रामने पहिली गाडी घेतली. तो व्यवसायासाठी आवश्यक असलेला ट्रक होता. सन १९७८ मध्ये त्यांनी एक जुना ट्रक ३५,००० रुपयांना विकत घेतला. या ट्रकचा नंबर होता एम.एच.टी. ०३-९७५०. रामशेठ यांचा हा लकी नंबर ठरला. तो ट्रक आजही त्यांनी जपून ठेवला आहे. सन १९७९ मध्ये त्यांनी ९६३० नंबर असलेली एस. डी. कंपनीची पहिली मोटारसायकल विकत घेतली. आपला मित्र चंदरशेठ यांना चालवायला सांगून ते स्वत: मागे बसायचे. कामावर देखरेख करण्यासाठी या गाडीचा उपयोग झाला. ही मोटार सायकल त्यांनी खूप वर्षे जपून ठेवली होती. व्यवसायासाठी भटकंती वाढत असल्याने स्वत:साठी जुनी जीप विकत घेतली. पुढे जुनी ८११६ नंबर असलेली फियाट गाडी, त्यानंतर 'मारुती ८००' घेतली. 'मारुती झेन' आली. आज व्यवसायाच्या वृद्धीबरोबर शेकडो गाड्या आल्या. त्यांची काळजी घेण्यासाठी आणि त्या चालविण्यासाठी हजारो कर्मचारी काम करीत आहेत. १२० इंजिनीअर्स, दोन हजारपेक्षा जास्त कर्मचारी काम करीत आहेत. व्यवसायासाठी १८२ डंपर,११० चार चाकी, ७० दुचाकी गाड्या आहेत. बंगल्यासमोर कोटीच्या घरातील गाड्या उभ्या आहेत. आजपर्यंत जगातील सर्व प्रकारच्या गाड्या त्यांनी विकत घेतल्या.

जन्म कोणी, कोठे, कधी घ्यावा आणि मृत्यू कोणाला, कसा, कधी यावा, हे फक्त विधात्याच्या हातात असते. त्याचा सर्वस्वी नियंता परमेश्वर आहे. पण जो ज्या कर्मासाठी जन्माला आलाय, ते कर्म पूर्ण झाल्याशिवाय येथून कोणाला जाता येत नाही. आपल्या कर्मफळाचे चांगले-वाईट संचित घेऊन प्रत्येक जीव माणसाचा देह धारण करून सोबत घेऊन येतो. रामशेठ यांच्याहातून चांगले कार्य घडावे, हे त्यांच्या कर्माचे संचित असल्यामुळे एका मोठ्या अपघातातून ते बचावले. ते आपल्या कामानिमित जासईकडे आपल्या मारुती कारने निघाले होते. ते मागच्या सीटवर डाव्या बाजूला बसले होते. गाडी पागोटे गावाजवळ आली असता, समोरून सुसाट वेगाने आलेल्या डंपरने (टिप्पर) मारुती कारला समोरून धडक दिली. धडक इतकी जोरात होती, की कारचे बोनेट डंपरखाली अडकले. डंपरचे पुढचे टायर गाडीच्या बोनेटवर चढले होते. रामशेठ मागच्या सीटवरून पुढच्या सीटवर कधी आले, हे त्यांना कळलेच नव्हते. रस्त्यावरील लोकांनी ड्रायव्हर आणि रामशेठना महत्प्रयासाने गाडीतून बाहेर काढले. त्यांचा उजवा पाय व डाव्या हाताच्या खांद्याला फॅक्चर झाले. त्यांना ट्रकमधून पनवेलच्या पुरोहित हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले. पनवेल-उरणमध्ये अपघाताची बातमी वाऱ्याच्या वेगाने पसरली. पुरोहित हॉस्पिटलसमोर गर्दी वाढू लागली. डॉक्टरांच्या लक्षात परिस्थितीचे गांभीर्य यायला लागल्यानंतर त्यांनी रामशेठ यांना मुंबईला हलवायला सांगितले. येथे ठेवले तर भेटायला येणाऱ्या लोकांमुळे त्यांना त्रास झाला असता. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना हिंदुजा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. वाय. टी. देशमुख कायमस्वरूपी त्यांच्याजवळ होते. एवढा मोठा अपघात होऊनही

रामशेठ यांची आंतरिक ऊर्जा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. आजारपणातही ते दुखापत झालेल्या हाताने चेक व महत्त्वाच्या कागदपत्रांवर सह्या करून त्याचे कामकाज करीत होते.

व्यवसायाच्या कार्यकाळात सिडको, एम.आय.डी.सी., जे.एन.पी.टी., सेंट्रल रेल्वे, नॅशनल ॲथॉरिटी ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, नवी मुंबई महापालिका, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, लार्सन आणि टुब्रो लिमिटेड, टाटा प्रोजेक्ट, जे. डब्ल्यू. आर. लॉजिस्टिक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन अशा अनेक सरकारी, निमसरकारी आणि मोठ्या कंपन्यांची कामे त्यांना करता आली. शून्यातून उभ्या केलेल्या या व्यवसातील यशाचा चढता आलेख कायम राहिला. १९७६ मध्ये बांधकाम व्यवसायाला १० हजाह रुपयांच्या कामाने सुरुवात केली, तर सन १९९०-९१ चा वार्षिक ताळेबंद २ कोटी ५० लाखांवर गेला. सन २०१९-२० ला या वार्षिक ताळेबंदाने ४२९ कोटी २१ लाखांची उंची गाठली होती. एक सामान्य माणूस आपल्या मेहनतीने असामान्य कसा होऊ शकतो, याचे उदाहरण म्हणजे रामशेठ ठाकूर होय.

५

आंदोलनातील रामशेठ

रामशेठ आणि आंदोलने हा शब्द आता परवलीचा झाला आहे. आंदोलन म्हणजे काय, हे ते लहानपणापासून पाहत आणि अनुभवत आले होते. सन १९८१ आणि १९८४ मधील शेतकऱ्यांचे आंदोलन हे रामशेठ यांच्या आयुष्यातील धगधगते अग्निकुंड होते. १९८१ चे आंदोलन त्यांनी सोसले आणि १९८४ चे आंदोलन त्यांनी त्या अग्निकुंडात उडी टाकून अनुभवले. प्रकल्पग्रस्त व आंदोलनातील दुसऱ्या फळीतील नेते, १९८१ च्या आंदोलनाचे नेतृत्व म्हणून रामशेठ समजून घेताना या आंदोलनातील घटनाक्रम टाळून पुढे जाताच येणार नाही.

मुंबई हे पैसे कमाविण्याचे शहर म्हणून परप्रांतीयांचे लोंढे मुंबईच्या दिशेने वाहू लागले. प्रचंड प्रमाणात वाढत असलेल्या लोकसंख्येचा भार मुंबईच्या क्षेत्रफळावर अधिक व्हायला लागला. त्याचा परिणाम नागरी सुविधांवर होऊ लागला. मुंबईबाहेरून येणारे हे लोकांचे लोंढे थोपविणे अशक्यच होते. त्यामुळे मुंबईला पर्याय म्हणून जुळ्या मुंबईचा विचार महाराष्ट्र सरकार करू लागले. सात बेटांनी जोडलेले मुंबई शहर हे चिंचोळे आणि समुद्राने वेढलेले असल्यामुळे त्याच्या क्षेत्रफळाच्या कक्षा रुंदावणे अशक्य होते. सन १९५८ मध्ये महाराष्ट्र सरकारने पी.डब्ल्यू.डी. खात्याचे सचिव स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक सर्वेक्षण समिती स्थापन केली होती. मुंबईतील समस्यांबाबत विचारविनिमय करण्याचे काम त्यांना दिले. या समितीने १९५९ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यात कलकत्त्यातील हावडा ब्रिजच्या धर्तीवर ठाणे खाडीवर पूल बांधून पलीकडे असलेल्या गावांचा विकास करून तेथे उद्योगधंदे व निवासी वसाहती उभ्या केल्यास मुंबईचा भार कमी होण्यास मदत होईल, अशा सूचना केल्या. त्यामुळे उरण-पनवेल–वाशी-बेलापूर परिसरला सरकारने भविष्यातील जुळी मुंबई म्हणून घोषित केले.

सुरुवातीला जुळी मुंबई म्हणून नामकरण होत असतानाच हा प्रकल्प मुंबईला सलग जोडून होणार नसल्याने या प्रकल्पाचे जुळी मुंबईऐवजी 'नवी मुंबई' असे नामकरण करण्यात आले. या भागातील जमिनी संपादन करण्यासाठी १७ मार्च १९७० रोजी 'शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ' (City and Industrial Development Corporation Of Maharashtra) म्हणजेच 'सिडको' महामंडळाची स्थापना केली. 'सिडको' ही महाराष्ट्र शासनाच्या मालकीची कंपनी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार 'नवीन शहर विकास प्राधिकरण' म्हणून नेमण्यात आले. १९७० मध्ये नवी मुंबईसाठी

उरण, पनवेल, बेलापूर पट्ट्यातील ९५ गावांतील ५५ हजार एकर जमीन संपादन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जाहीरनामा काढला आणि जमीनमालक, शेतकऱ्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. आता आपले पोटापाण्यासाठी असलेले एकमेव साधन जाणार, आपण रस्त्यावर येणार, अशी भावना शेतकऱ्यांमध्ये बळावली आणि प्रचंड संतापाची लाट उसळली. गावागावांत चर्चा सुरू झाल्या. गावकुसावर सुरू असलेल्या या चर्चा हळूहळू गाव बैठकांवर पोहोचल्या आणि पुढे त्यांचे रूपांतर सभांमध्ये झाले. शेतकऱ्यांचे नेते आमदार दि. बा. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ७ मार्च १९७० रोजी 'जमीन बचाव संयुक्त लढा समिती'ची स्थापना करण्यात आली. या समितीचे उपाध्यक्ष तु. ह. वाजेकर व सरचिटणीस जनार्दन आत्माराम भगत होते. या सर्व मंडळींनी शेतकऱ्यांना एकत्र केले. सरकारच्या जमीन संपादनाविरोधात उभे राहिले. जमीन संपादन धोरणाविरोधात शेतकऱ्यांच्या मनात असंतोष खदखदत होता. पिढ्यान् पिढ्या भातशेती करीत असलेला येथील आगरी-कोळी समाज आपली जमीन जाणार म्हणून हवालदिल झाला.

'जमीन बचाव संयुक्त लढा समिती'ने १९७१ मध्ये जासई येथे पहिली ऐतिहासिक परिषद घेतली. सिडकोच्या विरुद्ध उभ्या राहिलेल्या या पहिल्या ऐतिहासिक परिषदेत सिडको जुळ्या मुंबईसाठी करीत असलेल्या जमीन संपादनाविरोधाचा ठराव मांडण्यात आला. या परिषदेतून सिडकोला इशारा देण्यात आला होता, 'जीव गेला तरी बेहत्तर, पण एक इंचदेखील जमीन आम्ही देणार नाही.' परिषदेसाठी भव्य मंडप उभारण्यात आला होता. या मंडपाच्या प्रत्येक खांबाला भाले, कोयत्या, विळे, कुऱ्हाडी ही शेतकऱ्यांची शेतीची आयुधे बांधलेली होती. शेतकरी, शेतमजूर, मिठागर कामगारांनी आंदोलनाचे रणशिंग फुकले. काही शेतकऱ्यांनी विरोधकांच्या भूलथापांना बळी पडून व पैशांच्या लालसेने आपल्या जमिनी मागचा पुढचा विचार न करताच विकूनही टाकल्या. सिडकोने कवडीमोल भावाने घेतलेल्या शेतकऱ्यांच्या पिकाऊ जमिनी जेव्हा सिडको जास्त भाव घेऊन विकू लागली, तेव्हा सिडकोच्या या नफेखोर व्यवहाराबाबत चीड निर्माण झाली.

'सिडको जर आमच्या जमिनी कमी किमतीत विकत घेऊन अधिक भावाने विकत असेल, तर शेतकऱ्यांनासुद्धा त्यांचा योग्य आणि जास्त मोबदला मिळायलाच हवा. नाहीतर सरकार विरुद्ध आंदोलन करू,' असा सज्जड इशारा या समितीने सिडकोला दिला. त्या वेळी म्हणजे सन १९७८ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेले शरद पवार यांच्याशी समितीने वाटाघाटी करून प्रति एकर १५,००० रुपये देण्याचे मान्य केले, परंतु रामशेठ ठाकूर यांचे गाव असलेल्या न्हावाशेवा खाडीतील जमिनीला चिखल असल्याचे सांगून १५,०००रुपये भाव देण्यास सरकारने नकार दिला व या जमिनीला एकरी फक्त ५,००० रुपये भाव देण्याचे जाहीर केले. ज्या जमिनीला चिखल म्हणून सरकारने भाव देण्यास नकार दिला, त्या जमिनीत शेती पिकत होती. १९५६ ते १९७० पर्यंतच्या कालखंडात सरकारने व त्यांनी स्थापन केलेल्या खार लँड बोर्डाने समुद्राचे पाणी शेतजमिनीत शिरू नये म्हणून बंधारा बांधण्याच्या कामाकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे समुद्राचे पाणी शेतजमिनीत शिरून ती नापीक झाली. पर्यायाने त्यात चिखल झाला. रामशेठ ठाकूर जेव्हा प्राथमिक शाळेत

शिकत होते तेंव्हा याच जमिनीत आपल्या मित्रांसोबत हुतूतू, खो-खो, विटीदांडू हे खेळ खेळत होते. याच न्हावा खाडीच्या १,२०० एकर जागेत मोठ्या प्रमाणात भातपिकाची लागवड होत होती. १९८१ सालच्या दरम्यान सरकारने न्हावा खाडीच्या टेकडीवर केंद्र सरकारच्या ओएनजीसी या प्रकल्पाच्या कामासाठी ईसार कंपनीला ठेका दिला. तेल विहिरीतून निघणारे तेल जहाजात भरण्यासाठी या ठिकाणी प्लॅटफॉर्म तयार करण्याचे काम केले जात होते. माझगाव डॉकमध्ये जहाज बांधणीच्या कामासाठी प्लॅटफॉर्म तयार केले जात होते. तशाच प्रकारचे काम माझगाव डॉक कंपनीने न्हावा येथे सुरू केले. सरकार मोठमोठे प्रोजेक्ट उभे करून बाहेरच्या लोकांना कामधंदा देत होते, मात्र न्हावा खाडी टेकडीच्या बाजूला असलेल्या शेतजमिनीत समुद्राचे पाणी शिरत असताना, येथील स्थानिक शेतकरी उद्ध्वस्त होतोय, त्याकडे मात्र सरकार दुर्लक्ष करीत होते. या शेतजमिनीत समुद्राचे पाणी शिरून चिखल झाला, हे सरकारचेच पाप असूनही या जमिनीला भाव देण्यास सरकारने नाकारले, त्यामुळे येथील भूमिपुत्राची तळपायाची आग मस्तकात गेली. माथी भडकली. पुन्हा एकदा आंदोलनाचे वारे वाहू लागले.

१९ जून १९८१ चा काळा दिवस... जासई नाक्यावर शेतकरी आंदोलनाला बसले. गव्हाण, कोपर भागातून जनार्दन भगत यांच्या नेतृत्वाखाली रामशेठ ठाकूर, जे. एम. म्हात्रे, श्रावण अंबाजी कोळी, अविनाश पाटील व पंचक्रोशीतील असंख्य नागरिक या आंदोलनात सहभागी झाले होते. त्या वेळी अंतुले सरकारने न्हावा-शेवा, जासई परिसरात पोलिस, एस.आर.पी.च्या गाड्या पाठविल्या. शेतकरी आंदोलक रस्त्यावर ठाण मांडून बसले होते. आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना अप्रत्यक्षपणे दिला जाणारा जणू हा इशाराच होता. मात्र शेतकरीसुद्धा निर्धाराने बाहेर पडले होते. 'आपली मागणी रास्त आहे आणि आमचा हक्क घेण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरणार, हा एकमेव विचार करून आंदोलक आले होते. सरकारने कबूल केलेली प्रति एकर १५,००० रुपये भरपाई आम्हाला मिळाली पाहिजे,' एवढीच मागणी होती. शेतकऱ्यांना त्यांचा हक्क हवा होता, हिंसा नको होती. पण सरकारच्या मनात काही वेगळेच होते, हे त्यांच्या एकंदरीत तयारीवरून दिसत होते. एस.आर.पी.च्या जवानांची मोठ्या फौजफाट्यासह रस्त्यावर गस्त सुरू होती. तेथे अगदी छोट्याशा कारणावरून एस.आर.पी. चे जवान आणि आंदोलक तरुणांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. दोन्ही बाजूंनी एकमेकांचे आवाज वाढायला लागले. पोलिसांचा पारा चढला, त्यांनी लाठीमार सुरू केला. लाठ्यांचे अंगाखांद्यावर मार पडूनही आंदोलक जागेचे हलायला तयार नव्हते. शेवटी राज्य राखीव पोलिस दलाने गोळीबाराला सुरुवात केली. एकीकडून लाठीहल्ला, तर दुसरीकडून गोळीबार, जासई नाक्यावर रक्ताचे पाट वाहू लागले. बायका, मुले, तरुण, वृद्ध जखमी झाले. पोलिसी अत्याचाराचा कहर झाला होता.

प्रभाकर मुंबईकर या आंदोलकाला जवानांच्या लाठीचा जोरदार तडाखा बसल्यामुळे ते जखमी होऊन खाली कोसळले. बाजूलाच उभे असलेले दि. बा. पाटील मुंबईकर यांना उचलण्यासाठी खाली वाकले आणि एस.आर.पी.च्या जवानांनी दि. बा. पाटील यांच्या डोक्यावर लाठीने प्रहार केला. त्यांचे डोके फुटले

डोक्यातून घळाघळा रक्त वाहू लागले. दि. बा.ना मारहाण झाल्याची बातमी वाऱ्यासारखी गावागावांत पसरली. घराघरोतून क्रोधाग्नी पेटला. हातात मिळेल तो दगड उचलून सगळे जण जासई नाक्याकडे धावत सुटले. एस.आर.पी.च्या जवानांवर दगडांचा वर्षाव होऊ लागला. दगडाच्या प्रहाराने एस.आर.पी. जवान अधिक बिथरले. त्यांनी आंदोलकांवर गोळीबार करायला सुरुवात केली. एकीकडे दगडांचा मारा आणि दुसरीकडे पोलिसांचा गोळीबार असा संघर्ष सुरू झाला. आंदोलकांच्या हातातील दगड संपू नयेत म्हणून गोळीबार सुरू असतानाच आपल्याला गोळी लागेल, याची भीती न बाळगता जासईच्या सखूबाई म्हात्रे यांच्या सोबतीने अनेक शूर महिला शेतात दगड आणण्यासाठी उतरल्या. पोलिसांनी सखूबाईच्या दिशेने गोळीबार करायला सुरुवात केली. त्यात सखूबाई जखमी झाल्या. शेतकऱ्यांचे नेते दि. बा. पाटील, पनवेलचे तत्कालीन सभापती जी. आर. पाटील, नेते जनार्दन भगत, जनार्दन मोरू म्हात्रे (जे. एम. म्हात्रे), श्रावण अंबाजी कोळी, प्रभाकर रामभाऊ मुंबईकर हे जखमी होऊन रक्तबंबाळ झाले. प्रचंड मारहाण झाली असतानाही दि. बा. पाटील आंदोलकांना धीर देत होते. त्यांचे सार्वांग रक्ताने न्हाऊन निघाले होते. दि. बा. पाटील यांच्यासह ४८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

सरकारने गोळीबार करून येथील भूमिपुत्रांना इंग्रजी राजवटीची आठवण करून दिली. मात्र आंदोलन दडपण्यासाठी केलेल्या प्रयत्नाला शेतकऱ्यांनी जुमानले नाही. उलट संतापाची धग अधिक तीव्र होत गेली. आपण केलेल्या गोळीबाराच्या कृतीचा पश्चात्ताप करण्याऐवजी पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल करायला सुरुवात केली. खरेतर ही अत्याचाराची परिसीमा होती. राज्यघटनेने भारतीय नागरिकाला आपल्या न्याय्य हक्कांसाठी सनदशीर मार्गाने मागणी करण्याच्या दिलेल्या अधिकाराची ही पायमल्ली होती. या घटनेचे पडसाद संपूर्ण भारतभर उमटले. हे आंदोलन पोलिसांना थांबविणे शक्य झाले नव्हते, एवढी त्याची प्रखरता होती. गोळीबार करूनही आंदोलकांनी आपली मागणी सोडली नव्हती. त्यामुळे प्रशासनाचा आंदोलन दडपण्याचा प्रयत्न फसला होता. 'जर शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत आणि जमिनीचा ताबा घेण्याचा पुन्हा प्रयत्न केला, तर यापुढे आंदोलन अधिक व्यापक करण्यात येईल,' असा इशारा जमीन बचाव समितीने सिडकोला दिला.

१९८१ च्या आंदोलनामुळे न्हावाशेवा बंदराचे काम थांबले. प्रकल्प राष्ट्रीय असल्यामुळे तो जास्त वेळ थांबवून ठेवणे महाराष्ट्र सरकारला कमीपणाचे होते. काम थांबल्यामुळे खर्चही वाढणार होता, यातून मार्ग काढण्यासाठी सरकारने सिडकोच्या माध्यमातून 'जमीन बचाव समिती'शी चर्चा करण्याची भूमिका घेतली असतानाच दुसऱ्या बाजूला जे. एन. पी. टी. बंदरासाठी महालन विभागातील तीन हजार एकर जमीन घेण्यास सुरुवात केली, त्यामुळे शेतकरी अधिक बिथरले. 'जमीन बचाव समिती'ने १९७८ पासून १९८१ पर्यंत शेतकऱ्यांना एकरी १५,००० रुपये देण्याची मागणी करून बराच काळ म्हणजे जवळजवळ सहा वर्षे लोटली होती. या सहा वर्षांत जमिनीचे भाव अजून वाढले होते, त्यामुळे 'जमीन बचाव समिती'ने सरकारने एकरी

१५,००० रुपये देण्याऐवजी आता एकरी ४०,००० रुपये द्यावेत, अशी मागणी लावून धरली. १९८२ मध्ये राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी 'जमीन बचाव लढा समिती'चे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी व सिडकोचे प्रतिनिधी असे सर्वांनी एकत्र बसून जमिनीच्या किमतीबाबत तोडगा काढण्यास सांगितल्याने ७ सप्टेंबर १९८२ ते ९ सप्टेंबर १९८२ या कालावधीत 'जमीन बचाव लढा समिती', लोकप्रतिनिधी, सिडकोचे चेअरमन राम महाडिक, मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सोहनी, सिडकोचे अधिकारी यांनी चर्चा करून डिसेंबर १९८२ हा काल पायाभूत धरून जमिनीला एकरी ४०,००० रुपये किमान भाव व त्यानंतर जमीन घेतल्यास द.सा.द.शे. आठ रुपये चक्रवाढ व्याज देण्याचा व घेण्याचा अंतिम निर्णय झाला. निर्णयाच्या अनुषंगाने सिडकोने डायरेक्टर बोर्डासाठी नोट्सही तयार केली. परंतु डायरेक्टर बोर्डात याबाबत निर्णय होण्यापूर्वीच बाबासाहेब भोसले यांना मुख्यमंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागले आणि वंसतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. न्हावा-शेवा बंदरासाठी आवश्यक असणाऱ्या ३,००० एकर जमिनीला ठरवलेला भाव देण्याचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी अमान्य करून कोणतीही चर्चा न करताच एकरी २७,००० रुपये भाव देण्याचे परस्पर जाहीर करून 'जमीन बचाव समिती'च्या निर्णयाला केराची टोपली दाखविली. 'जमीन बचाव समिती'ला सरकारचा हा परस्पर घेतलेला निर्णय आणि जमिनीला एकरी देण्यात येणारी किंमत अजिबात मान्य नव्हती. समितीने १२ नोव्हेंबर १९८३ ला उरण तहसिल कचेरीवर प्रचंड मोर्चा काढला. सरकार मात्र आपल्या भूमिकेवर ठाम होते ते बदलायला तयार नव्हते.

८ जानेवारी १९८४ रोजी दुपारी १ वाजता जासई येथे दि. बा. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची परिषद बोलावली. या परिषदेला शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस मंडळाचे सर्व सभासद व पुरोगामी युवक संघटनेची नेतेमंडळी हजर होती. अण्णासाहेब गव्हाणे, भाई बंदरकर, दत्ता पाटील यांनी परिषदेला मार्गदर्शन केले. परिषदेत सरकारने शेतकऱ्यांना प्रति एकर ४०,००० रुपये द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. आपल्या मागण्यांसाठी शेतकरी एकत्र येणार, याची खात्री सरकारला होतीच म्हणून ३ जानेवारीपासून २७ जानेवारीपर्यंत सरकारने जमावबंदीचा आदेश लागू केला. जमावबंदी आदेश असूनही शेतकरी निर्धाराने जासई येथे सभेला मोठ्या संख्येने जमले. सभेत १६ जानेवारी १९८४ ला पुन्हा आंदोलन करण्याचा एकमुखाने ठराव संमत करण्यात आला. 'सरकारने देऊ केलेले एकरी २७,००० रुपये आम्हाला नको, आम्हाला एकरी ४०,००० रुपयेच किंमत हवीच. त्याशिवाय आम्ही एक इंचही जमीन देणार नाही,' असा निर्धार करून शेतकरी १६ जानेवारीच्या तयारीसाठी घरी परतले होते. दुसऱ्या बाजूला सरकार आंदोलन चिरडण्याच्या निर्णयावर ठाम होते. हे आंदोलन चिरडून जमिनी संपादन करायच्याच, असा निर्धार शासनाने केला होता. त्यासाठी शासकीय यंत्रणा १३ जानेवारीपासूनच तयारीला लागली होती. शेतकरी किती प्रतिकार करण्याच्या तयारीत आहेत, याचा अंदाज पोलिसांना घ्यायचा होता म्हणून जमीन संपादनासाठी अधिकारी, पोलिस आणि एस.आर.पी.चा बंदोबस्त घेऊन ते शेवा गावात शिरले. मात्र गावातील शेतकऱ्यांनी त्यांना

विरोध करताच लाठीमार सुरू केला. गोळीबाराच्या फैरी हवेत झाडल्या आणि रिकाम्या हाताने पोलिस परत गेले. शेतकऱ्यांनी जमिनीचा ताबा दिलाच नाही.

१६ जानेवारी १९८४ हा दिवस सरकार आणि शेतकरी यांच्यातील प्रचंड संघर्षाचा ठरला. या दिवशी 'जमीन बचाव समिती'ने आंदोलन करण्याचा ठराव केला होता. त्या ठरावाप्रमाणे आंदोलनाची दिशा आणि नियोजन पक्के झाले होते. याच दिवशी सिडकोने जमिनी संपादन करायचा निर्धार केला होता, त्याच उद्देशाने त्यांनी आपला फौजफाटा पाठविला होता. पोलिस आणि एस.आर.पी.चे हजारो जवान दास्तान फाट्यावर जमा झाले होते. या सरकारी फौजफाट्याला १९८१ च्या लढ्याची आठवण मनात असल्यामुळे ते संपूर्ण तयारीनिशी आले होते. आंदोलन दडपण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करणार हे 'जमीन बचाव लढा समिती'ला माहीत होते. १९८४ च्या आंदोलनाची ठिणगी १२ जानेवारी १९८४ पासून पडायला सुरुवात झाली. या दिवशी सिडकोचे अधिकारी जमीन संपादनासाठी धुतूम गावात गेले असता तेथील ग्रामस्थांनी त्यांना हुसकावून लावले. १३ जानेवारीलाच शेवा गावात मानसिंग पवार हे मुख्य पोलिस अधिकारी मोठा फौजफाटा घेऊन जमिनीचा ताबा घेण्यासाठी आले होते. त्या वेळी गावातील महिला त्यांना प्रतिकार करण्यासाठी समोर गेल्या. समोर महिला असूनदेखील कोणतीही लाज-शरम न बाळगता अश्रुधूर किंवा इशाऱ्यासाठी हवेत गोळीबार न करताच सरळ त्यांनी महिलांवर गोळीबार करायला सुरुवात केली. त्या वेळी रेखा भोईर यांच्या पोटात गोळी घुसली. दुसरी गोळी सौ. पदमूबाई वामन भोईर यांच्या नाकावर लागली. रक्ताच्या धारा त्यांच्या शरीरातून वाहत होत्या. एवढा गोळीबार होऊनही त्या मागे हटल्या नव्हत्या. त्यामुळे पोलिसांनी घाबरून पलायन केले. दोघी जखमी अवस्थेत तशाच विव्हळत होत्या. त्या वेळी वाहतुकीची सोय नसल्याने ग्रामस्थांनी शेवा गावाजवळ असणाऱ्या वायुदलाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला त्यांना परिस्थिती सांगितल्यावर जखमी महिलांना सायन येथे लोकमान्य टिळक हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.

शेवा गावात महिलांवर झालेल्या गोळीबाराची विचारपूस करण्यासाठी गावांमध्ये आलेले आमदार दि. बा. पाटील यांना पोलिसांनी अटक करून एवढी मारहाण केली, की ते बेशुद्ध पडले. क्रिमिनल प्रोसिजरच्या कलम १५१(३) नुसार दि. बा.ना अटक केल्यानंतर त्यांच्यावर हिंसाचार घडवून आणण्याचा आरोप ठेवण्यात आला. परंतु ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट यांनी देशातील नागरिकांना शांततेच्या मार्गाने न्याय्य मागण्यांसाठी लढण्याचा हक्क आहे, असा निकाल देऊन दि. बा.ना आरोपमुक्त केले. मुक्त करूनही पोलिसांनी त्यांना मोकळे सोडले नव्हते. दि. बा.ना न्यायालयाने मुक्त केल्यानंतर ते घरी जाण्यासाठी आपल्या गाडीकडे वळले, त्याच वेळी पोलिसांनी त्यांना गराडा घातला, जबरदस्तीने ओढत नेऊन जीपमध्ये ढकलून दिले. त्यात त्यांची पुन्हा शुद्ध हरपली. त्यांना मुंबईतील सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले.

१६ जानेवारीच्या आंदोलनाची तयारी छुप्या मार्गाने सुरू होती. १३ जानेवारीच्या संध्याकाळी दि. बा. पाटील यांना अटक झाली म्हणून आंदोलक अधिक जोमाने तयारीला लागले होते. आंदोलकांचा पवित्रा पाहून

पोलिसांनी पुन्हा अटकसत्र सुरू केले. दत्तूशेठ पाटील, जनार्दन भगत या पहिल्या फळीतील नेत्यांना अटक करून नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात डांबले. आता आंदोलन होणार नाही, अशा आनंदात पोलिस होते, मात्र हॉस्पिटलमध्ये असलेल्या दि. बा.ना आंदोलनाच्या तयारीची माहिती गुपचूप मिळतच होती. दत्तूशेठ पाटील, जनार्दन भगत व इतरांना अटक झाल्याचे त्यांना समजले या अटकसत्रानंतर या आंदोलनाची धुरा पुढे कोण घेऊन जाऊ शकतो, हे दि. बां.ना चांगले माहीत होते. त्यांना पोलिसांपासून वाचवले पाहिजे, हे त्यांच्या लक्षात आले म्हणून दि. बा.नी त्यांना भूमिगत होण्यासाठी रामशेठ ठाकूर यांच्यासह काही ठरावीक लोकांना निरोप पाठविला. त्या रात्री दि.बां.चे चिरंजीव अतुल पाटील हे तातडीने रामशेठ यांच्या घरी आले व रामशेठ यांना दि.बां.चा निरोप देऊन 'भूमिगत' होण्यास सांगितले. निरोप मिळाल्यानंतर आता जबाबदारी आपल्यावरच आहे, हे रामशेठ यांच्या लक्षात आले. आंदोलन थांबू द्यायचे नाहीच, या ध्येयाने हे सगळे 'भूमिगत' झाले. पोलिसांनी त्यांना शोधण्यासाठी आटापिटा केला. रामशेठ यांच्या पनवेल व शिवाजीनगरच्या घरावर छापे टाकले, पण रामशेठ ठाकूर कधीच घराबाहेर पडले होते. सगळे वेश्वीच्या डोंगरात लपून बसले आणि आंदोलनाच्या तयारीची आखणी करू लागले. डोंगरातून आंदोलनाची सूत्रे हलायला लागली. अंगावर घोंगडी घेऊन हे सर्व जण रात्रभर गावागावांत जाऊन आंदोलनाच्या नियोजनाची माहिती देत होते. गावातील कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांना धीर देत होते. रामशेठ ठाकूर, बी. के. ठाकूर, दशरथ ठाकूर हे पूर्व विभागात व गव्हाण, जासई परिसरावर लक्ष ठेवून होते. काळू खारपाटील, तुकाराम घरत हे महत्त्वाचे संदेश पागोटे नवघर भागात पोहोचविण्याचे काम करीत होते. या सगळ्यांनी दोन रात्री दोन दिवस जंगलात लपून गावागावांत सतत संपर्क ठेवून आंदोलकांना जागे ठेवले. आंदोलनाची धग कमी होऊ दिली नाही. सतत लोकांशी संपर्क ठेवून आंदोलकांना विश्वास आणि धीर दिला. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. १६ जानेवारीला दास्तान फाटा आंदोलकांनी फुलून गेला.

आंदोलन १७ तारखेला करण्याचे नक्की करण्यात आले होते. कारण १७ तारखेला जमीन संपादन करण्यासाठी अधिकारी येणार होते. मात्र सरकारने आंदोलकांशी गनिमी कावा खेळण्याचे ठरवून अचानक १७ ऐवजी १६ तारखेलाच जमिनीचा ताबा घेण्याचे जाहीर केले. पण जंगलात लपलेले नेते सरकारी बाबूंच्या पुढचे कावेबाज निघाले. एवढा बंदोबस्त असूनही त्यांनी सरकारचे डावपेच आंदोलकांपर्यंत संदेश देऊन पोहोचविले. तशा सूचना प्रत्येक गावात पोहोचल्यानंतर आंदोलक शेतकरी १७ ऐवजी १६ तारखेच्या तयारीला लागले होते.

रातोरात गावागावांत पोहोचलेल्या संदेशाने १६ तारखेला सकाळी नऊ वाजेपर्यंत दास्तान फाट्यावर सामसूम होती. त्यामुळे पोलिसांना वाटले आता आपण जिंकलो आहोत, मात्र सकाळी नऊनंतर अचानक वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्यात, तसे भराभर गावागावांतून डोंगरदऱ्यांतून आंदोलक बाहेर पडायला सुरुवात झाली. रामशेठ ठाकूर यांच्या नेतृवाखाली गव्हाण विभागातील गव्हाण, कोपर, शेलघर, न्हावा, न्हावा खाडी, शिवाजीनगर, बामणडोंगरी, मोरावे, उलवे, वहाळ, जावळे, तरघर, मोहा, कोंबडभुजे, उरण गणेशपुरी या

गावातील हजारोंच्या संख्येने बाहेर पडलेले शेतकरी घोषणा देत गव्हाण आक्सा बेलपाडामार्गे दास्तान फाट्यावर आंदोलनाच्या ठिकाणी पोहोचले. या वेळी आंदोलनाच्या नेतृत्वाची धुरा रामशेठ ठाकूर, दशरथशेठ ठाकूर, भारती पोवार यांच्याकडे होती. एवढ्या संख्येने अचानक आलेल्या आंदोलकांना पाहून पोलिस यंत्रणा चक्रावली. महिला, पुरुष, तसेच वृद्धांबरोबर आपल्या आई-वडिलांचे बोट धरून लहान मुलेदेखील मोठ्या संख्यने आंदोलनात सहभागी झाली होती. यात महिलांची संख्या अधिक होती.

उरण आणि पनवेलकडून दास्तान फाट्याकडे येणारा हजारो आंदोलकांचा ताफा दिसत होता. एस.आर.पी.चे जवान हल्ल्याच्या तयारीतच आले होते. आंदोलकांची एवढी मोठी संख्या बघून एस.आर.पी.च्या जवानांची पाचावर धारण बसली. आंदोलक प्रचंड आक्रमक झालेले होते. 'आम्ही चुकीच्या पद्धतीने सरकारला एक इंचदेखील जमीन देणार नाही,' असे आंदोलकांनी सरकारला ठणकावून सांगितले होते. आंदोलकांचा पवित्रा पाहून एस.आर.पी.ने अश्रुधुराच्या नळकांड्या फोडायला सुरुवात केली. त्या धुरामुळे आंदोलकांना पुढचे काहीच दिसेना. डोळे चुरचुरायला लागले. पोलिस आता गोळीबार करणार, हे आंदोलकांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. एका बाजूला आंदोलक प्रचंड आक्रमक झाले होते. दुसऱ्या बाजूला एस.आर.पी.चे जवान व पोलिस आंदोलन चिरडण्यासाठी, आंदोलकांना पांगविण्यासाठी आक्रमक झाले होते. अश्रुधुरामुळे संपूर्ण परिसरात धुराचे लोट दिसत होते. घोषणांमुळे परिसर दणाणून गेला होता. पोलिसांना वाटले, आश्रुधुरामुळे आंदोलक घाबरतील व पांगतील. पण झाले उलटेच, लोक अधिकच आक्रमक झाले. पोलिसांनी फेकलेल्या अश्रुधुराच्या नळकांड्या उचलून आंदोलकांनी पोलिसांवर फेकायला सुरुवात केली, त्यामुळे पोलिसही भांबावले. आंदोलकांची वाढलेली आक्रमकता बघून त्यांनी गोळीबार करायला सुरुवात केली. हाहाकार उडाला. घोषणांच्या आवाजात आता किंकाळ्यांचा आवाजही ऐकू येऊ लागला. कित्येक आंदोलक जखमी झाले. नामदेव शंकर घरत (चिर्ले), रघुनाथ अर्जुन ठाकूर (धुतूम) या दोघांचा पोलिसांच्या गोळीने वेध घेतला, ते धारातीर्थी पडले. पोलिसांच्या अमानुष अत्याचाराची खबर संपूर्ण देशभर वाऱ्यासारखी पसरली होती. गोळीबार करूनही महाराष्ट्र शासनाची यंत्रणा योद्ध्याच्या भूमिकेत वावरत होती. हा शासनाचा निर्लज्जपणाचा आणि अमानवीय कृतीचा कळस होता.

दुसऱ्या दिवशी १७ जानेवारीला नवघर फाटा येथे पुन्हा कालच्यापेक्षा अधिक संख्येने आंदोलक घराबाहेर पडले. कालच्या आंदोलनात दोघा भूमिपुत्रांना वीरमरण आले. सरकारच्या १६ जानेवारीच्या भूमिकेवर लोकांचा संताप अधिक वाढला होता. आंदोलनाविषयीची पोलिसांची कालची कृती निंदनीय व असंवेदनशील होती. १६ जानेवारीच्या आक्रमकतेची धार आज १७ जानेवारीला अधिकच तीव्र झाली होती. आजही पोलिस आंदोलन चिरडण्याच्याच तयारीत आले होते. या वेळी नवघर फाटा घोषणांनी भरून गेला होता. आंदोलकांची आक्रमकता पाहून आज पुन्हा पोलिसांनी गोळीबार करायला सुरुवात केली. पुन्हा कालच्यासारखे आक्रोश... किंकाळ्या, तीच धावाधाव सुरू झाली. पोलिसांनी अत्याचाराची परिसीमा गाठली होती. कालच्या गोळीबारात

दोन आंदोलक हुतात्मा झाले. आजच्या गोळीबारात कमलाकर कृष्णा तांडेल (पागोटे), महादेव हिरा पाटील, त्यांचा मुलगा केशव महादेव पाटील (पागोटे) हे बापलेक असे तिघे धारातीर्थी पडून हुतात्मा झाले. पोलिसांच्या बंदुकीने त्यांच्या छातीचा वेध घेतला होता. अनेक जण गंभीर जखमी झाले. आंदोलनाच्या ठिकाणी क्रांतीचा रक्ताभिषेक झाला होता.

हुतात्मा झालेल्यांच्या बायकापोरांचे आक्रोश आणि जखमी झालेल्या अनेक जिवांच्या वेदना या महाराष्ट्रातच नव्हे, तर साऱ्या भारतभूमीवर अनंत काळापर्यंत प्रतिध्वनी होऊन उमटत राहतील.या अमानुष घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटले. वसंतदादा सरकारच्या निषेधासाठी 'महाराष्ट्र बंद'ची हाक देण्यात आली, त्याला संपूर्ण महाराष्ट्राने उस्फूर्त प्रतिसाद दिला. उरणच्या शेतकऱ्यांचा हा लढा इतिहासाच्या पानावर सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवला गेला आहे. या लढ्याला अनेक दिग्गज नेत्यांसोबत रामशेठ ठाकूर, दशरथ ठाकूर, भारती पोवार आणि त्यांच्या सोबत्यांनी आपले योगदान देऊन लढा जिवंत ठेवला होता. पनवेल, उरण, बेलापूर पट्ट्यातील 'जमीन बचाव संयुक्त लढा समिती' १९७० पासून जवळजवळ १४ वर्षे हा लढा देत होती. १४ वर्षांत अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. या लढ्यात अनेकांनी आपल्या आहुत्या दिल्या. जखमांचे व्रण अलंकारासारखे अंगावर घेऊन अनेक जण त्या लढ्याचा इतिहास आजही सांगत आहेत. या लढ्यात सक्रिय असलेले रामशेठ ठाकूर लढ्याविषयी बोलताना भावूक होतात. त्यांनी ऐकलेले, अनुभवलेले, पाहिलेले ते क्षण, ते आक्रोश त्यांना आजही स्वस्थ बसू देत नाहीत. येथील भूमीवर होणाऱ्या प्रत्येक अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी ते आजही त्याच ताकदीने उभे राहत आहेत.

मार्च १९९८ ला रामशेठ खासदार झाल्यानंतर त्यांना जनहिताची कामे करण्यासाठी मोठी ताकद मिळाली. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न हा रामशेठ यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. १९८१ व १९८४ चे आंदोलन त्यांनी 'याची देही याची डोळा' अनुभवले होते. या आंदोलनात ते स्वतः सक्रिय असल्यामुळे या आंदोलनाची धग आणि प्रकल्पग्रस्तांच्या भावना, समस्या नेमक्या काय आहेत, हे त्यांना ठाऊक होते. न्हावा खाडी, गव्हाणसारख्या खेड्यात ते लहानाचे मोठे झाले असल्यामुळे तेथील शेतकरी कसा जगतोय, हे त्यांनी पाहिले होते. प्रकल्पग्रस्तांची घुसमट आणि सरकारची अरेरावी त्यांनी पाहिली होती. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सुटले पाहिजेत म्हणून त्यांनी या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लोकसभेत प्रश्न विचारून लक्ष वेधून घेतले. जे.एन.पी.टी., बी.पी.सी.एल., आय.पी.सी.एल., एन.एस.आय.सी.टी. (पी अँड ओ), आय.ओ.टी. या कंपन्यांच्या व्यवस्थापनाशी वेळोवेळी चर्चा करून प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याचा त्यांनी प्रामुख्याने प्रयत्न केला. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन (बी.पी.सी.एल.) कंपनीने प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांना प्राधान्यक्रम देऊन त्यांना नोकरीत सामावून घ्यावे म्हणून २४ सप्टेंबर रोजी आमदार विवेक पाटील, आमदार मीनाक्षी पाटील, माजी आमदार दत्तूशेठ पाटील यांना बरोबर घेऊन रामशेठ यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. मोर्चाचे स्वरूप बघून कंपनी प्रशासन खडबडून जागे झाले आणि पंधरा दिवसांत १९० प्रकल्पग्रस्तांची भरती करण्याचे त्यांनी मान्य केले.



● **आंदोलन हा रामशेठ यांचा श्वास! वंचितांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने उभी केली. अशाच एका आंदोलनातील हा क्षण**

'प्रकल्पग्रस्त कृती समिती'तर्फे भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, भेंडखळ, उरण येथील कंपनीत नोकरभरती व इतर नागरी सुविधांबाबत माननीय जिल्हाधिकारी रायगड यांनी १७ सप्टेंबर १९९८ रोजी कंपनी प्रशासनाची बैठक घेतली, त्यानंतर कंपनीने नोकरभरतीसाठी कारवाई सुरू केली. खासदार रामशेठ ठाकूर यांनी १७ ऑक्टोबर १९९८ ला जिल्हाधिकाऱ्यांशी पुन्हा बैठक घेतली व त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाला, तर आपण गप्प बसणार नाही, असे ठणकावून सांगितले. कोणत्याही परिस्थितीत स्थानिक प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य दिले गेलेच पाहिजे, असा आग्रह धरला. १६ जुलै १९९० रोजी माननीय मुख्यमंत्री यांच्यासमोर आमदार दत्तूशेठ पाटील, आमदार दत्ता पाटील, आमदार प्रभाकर संझगिरी यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनुसार - १) मान्य केलेल्या १९० कामगारांची भरती करणे, २) प्रकल्पातील लोडिंग-अन्लोडिंग कायमस्वरूपी कामात ठेकेदारी बंद करून सहा कामगारांना कार्पोरेशनतर्फे कामावर घेणे, ३) प्रकल्पातील विविध स्वरूपांतील २५ लाखांपर्यंतची लहान-मोठी कॉन्ट्रॅक्ट स्थानिकांना देणे, ४) प्रकल्पामध्ये फिटर, प्रोसेस ऑपरेटर्स, सुरक्षारक्षक, क्लर्क, टायपिस्ट, शिपाई, ड्रायव्हर या पदोवर फक्त स्थानिकांची भरती करणे, ५) प्रकल्पग्रस्त महिला व अपंगांना नोकरीत प्राधान्य देणे, ६) प्रकल्पग्रस्तांसाठी तांत्रिक शिक्षणाची सोय करणे या मागण्या त्वरित पूर्ण कराव्यात म्हणून आग्रह धरला.



● **'कोण म्हणतो येणार नाय, घेतल्याशिवाय राहणार नाय!' रामशेठ यांनी आंदोलनाचे नेतृत्व करून अनेकांना त्यांचे हक्क मिळवून दिले**

जे.एन.पी.टी. बंदराच्या उभारणीसाठी उरण तालुक्यातील १८ गावे, ३,०१६ शेतकऱ्यांची जमीन संपादित केली गेली. हे काम सुरू असताना या प्रकल्पाशेजारील शेवा, शेवा कोळीवाडा ही दोन गावे स्थलांतरित करून उरण शहरानजीक वसविली. तसेच बंदराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सन १९८५-८६ मध्ये मौजे सोनारी, करळ, जसखार व सोनखार या चार गावांना संरक्षण भिंती घालण्यात आल्या. त्यामुळे या चार गावांच्या दैनंदिन व्यवहारावर अनेक बंधने आली. या संरक्षण भिंत घातलेल्या गावांना संरक्षक भिंतीच्या आतमध्ये गावठाण वाढवून द्यावे व संरक्षक भिंती सरळ रेषेत बांधाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

विस्थापित केलेल्या १८ गावांसाठी अनेक प्रकारच्या सोयी-सुविधा पुरविण्यास जे.एन.पी.टी. प्रशासनाने चालढकल केली होती. जे.एन.पी.टी. बंदरामुळे निराधार झालेल्या ग्रामपंचायतीसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणारे वार्षिक उत्पन्न तुटपुंजे असल्यामुळे व्यवहाराचा गाडा चालविणे त्यांना कठीण झाले होते. अशा आर्थिकदृष्ट्या मागास ग्रामपंचायतींनी, जे.एन.पी.टी.ने वार्षिक अनुदानाची तरतूद करून ताबडतोब त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली. जे.एन.पी.टी. प्रकल्पामध्ये ८८८ प्रकल्पग्रस्तांना, तसेच बंदराच्या अनुषंगाने आलेल्या कारखान्यांमध्ये ५०० प्रकल्पग्रस्तांना जरी नोकरीमध्ये सामावून घेतले होते, तरी उरलेल्या कमीत कमी १,६२८ प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीचा प्रश्न प्रलंबित होता. तेव्हा त्यांना लवकरात

लवकर रोजगार द्यावा किंवा प्रकल्पात नोकरी मिळावी म्हणून रामशेठ यांनी आग्रही मागणी केली.

मिठागर कामगारांचा प्रश्न हासुद्धा तितकाच जिव्हाळ्याचा होता. मिठागराच्या शेतीच्या नुकसानभरपाईचा निम्मा हिस्सा शेतकऱ्यांना मिळणे गरजेचे आहे. तसेच जी मिठागरे आता पिकवू शकतो, त्या मिठागरांच्या जमिनी भाडेतत्त्वावर करारनामा करून संबंधित कामगारांना देऊन बेरोजगारीचा प्रश्न सोडवावा, असे जे.एन.पी.टी.स ठणकावून सांगितले. गव्हाण गावातील कोळी बांधवांची झालेली हानी भरून काढण्यासाठी प्रकल्पामध्ये समाविष्ट करून त्यांना नोकरीधंद्यात प्राधान्य द्यावे व खाडीमधील प्रवाह खोली वाढवून सुरळीत करावा, हनुमान कोळीवाडा व नवीन शेवा या वाळवीग्रस्त गावांची वाळवीच्या संकटातून मुक्तता करण्यासाठी कायमस्वरूपी योजना आखून ती लवकरात लवकर अमलात आणावी, अशा अनेक मागण्या रामशेठ ठाकूर यांनी जे.एन.पी.टी.कडे सातत्याने केल्या. या मागण्यांबरोबरच १) प्रकल्पग्रस्त कुटुंबातील कमीत कमी एका माणसाला नोकरी दिलीच पाहिजे, २) प्रत्येक गावात लहान मुलांसाठी स्वतंत्र दफनभूमी आणि अद्ययावत स्मशानभूमी बांधून द्यावी, ३) प्रकल्पग्रस्त गावात सुसज्ज मैदान तयार करून द्यावे, ४) प्रत्येक गावात पाणीपुरवठ्यासह सुलभ शौचालये बांधून द्यावीत, ५) प्रकल्पग्रस्त गावातील प्रकल्पग्रस्तांना सनद व नकाशे द्यावेत, ६) प्रत्येक गावातील प्रत्येक शेतमजुराच्या कुटुंबास कमीत कमी दीड गुंठा जमीन द्यावी, ७) प्रत्येक गावात पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी व सुसज्ज तलाव बांधून द्यावेत, ८) गावात ड्रेनेजसाठी बंद गटारे बांधावीत, ९) प्रत्येक गावांना प्राथमिक शाळा व अंगणवाडीचे बांधकाम करून शैक्षणिक साहित्य पुरवावे, १०) प्रकल्पग्रस्त ग्रामपंचायतींना वार्षिक अनुदान देण्यात यावे, ११) प्रत्येक गावापर्यंत पोहोचणारा रस्ता तयार करून त्याचे डांबरीकरण करण्यात यावे. गावांतील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण करावे व रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करावी, १२) प्रत्येक प्रकल्पग्रस्त गावांना सुसज्ज व अद्ययावत वाचनालय आणि व्यायामशाळा तयार करून द्यावी, १३) प्रत्येक गावात प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करावे, १४) प्रत्येक गावासाठी एक समाज मंदिर बांधून द्यावे, अशा मागण्याही त्यांनी जे.एन.पी.टी कडे केल्या.

शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करताना शेतकऱ्यांना १२.५ टक्के जमीन विकसित करून परत करण्याचा निर्णय होऊनही सरकार अनेक वर्षे चालढकल करीत होते. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये दिवसेंदिवस असंतोष वाढत होता. त्याचाच परिणाम म्हणून पनवेल, ठाणे तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांची दिनांक १६ फेब्रुवारी १९९९ रोजी पनवेल येथे सर्वपक्षीय बैठक बोलाविण्यात आली. खासदार रामशेठ ठाकूर यांच्यासोबत आमदार दत्तूशेठ पाटील, आमदार विवेक पाटील उपस्थित होते. या बैठकीत सिडकोने विकसित प्लॉटची सोडत काढली होती, त्यावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेण्यात आला. कारण प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे होते, की १) प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १२.५ टक्क्यांनी जी जमीन सिडको देऊ इच्छिते, ती प्रथम विकसित करून घ्यावी. अविकसित जमीन घेण्यास प्रकल्पग्रस्तांचा विरोध राहील. २) ज्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोने ताब्यात घेतल्या आहेत, त्या प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या सर्व जमिनीच्या सर्व्हे नंबरच्या नोटिसा

एकत्र याव्यात, जेणेकरून त्याला आपली कोणत्या कोणत्या सर्व्हे नंबरची किती जमीन गेलेली आहे हे कळू शकेल व त्या मोबदल्यात आपल्याला साडेबारा टक्क्यांचे किती प्लॉट मिळणार आहेत हे समजेल. तसेच एका गावात काही शेतकऱ्यांनाच नोटिसा येतात, तसे न होता त्या गावातील सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सर्वसाधारण एकाच वेळेला नोटिसा येणे गरजेचे आहे. म्हणजे सर्व गावकऱ्यांना सोडतीत भाग घेऊन आपल्या निवडीचा प्लॉट घेता येईल. अशा मागण्यांसाठी खासदार रामशेठ ठाकूर यांनी प्रकल्पग्रस्तांच्या या भावना २५ जानेवारी १९९९ रोजी एका पत्राद्वारे सिडकोच्या चेअरमनना कळविल्या व चर्चेची मागणी केली. त्यानुसार ९ फेब्रुवारी १९९९ रोजी सिडको प्रशासनाची साडेबारा टक्क्यांच्या प्लॉटविषयी प्राथमिक स्वरूपाची चर्चा करून पुन्हा १९ फेब्रुवारी १९९९ रोजी सिडको भवनमध्ये सिडकोचे चेअरमन, जॉईंट एमडी, मुख्य भूसंपादन अधिकारी यांच्याशी रामशेठ ठाकूर यांनी बैठक घेऊन चर्चा केली. त्या वेळी माजी आमदार दत्तूशेठ पाटील, आमदार विवेक पाटील, आमदार मीनाक्षीताई पाटील व प्रकल्पग्रस्तांचे शिष्टमंडळ उपस्थित होते. प्रशासनाने प्रकल्पग्रस्तांच्या भावनेचा आणि खासदार रामशेठ ठाकूर व शिष्टमंडळाच्या दबावाचा आदर करून १२.५ टक्क्यातील प्लॉट वाटप सोडतीला स्थगिती दिली. साडेबारा टक्केची मिळणारी जमीन विकसित करून देऊ, एकाच वेळेला सर्वांना एकत्र नोटिसा देऊ व पाणीदर कमी करू, या मागण्या सिडकोने मान्य केल्या. याच बैठकीत खासदार रामशेठ ठाकूर यांनी गावठाणाचा प्रश्न प्रामुख्याने उपस्थित केला. १९७० ते १९९९ पर्यंत प्रकल्पग्रस्तांनी आपल्या गरजेनुसार गावठाण व गावाच्या सभोवताली जी घरे बांधली आहेत, ती सिडको प्रशासनाने अनधिकृत न समजता अधिकृत समजावीत. तसे घडल्यास सिडकोच्या सर्वेक्षणाला गावकरी योग्य ते सहकार्य करतील, अशी आग्रही भूमिका घेतली. वाशी, तुर्भे स्टोअर भागातील झोपडपट्टीवासीयांसाठी सिडकोने गावठाण विस्तार संबंधी जो निर्णय घेतला आहे, तोच न्याय पनवेल-उरण विभागातील सिडकोच्या हद्दीतील गावांना द्यावा, तक्का येथील गावठाणाच्या सभोवतालची जागा सिडकोने संपादित केली, मात्र सार्वजनिक विकासाकरिता जागा न ठेवल्याने त्यांनी संताप व्यक्त केला.

प्रकल्पग्रस्त दगडखाण मालकांचा प्रश्नही सिडकोने तसाच प्रलंबित ठेवला होता. ओवळे, कुंडेवाहाल, बंबावीपाडा येथे जवळ जवळ १५० दगड खाणी सुरू होत्या, या दगडखाणींपैकी ५ टक्के खाणींना सिडकोने प्रमाणपत्र दिल्याने त्या अधिकृत मानल्या जात होत्या. बाकीच्या दगडखाणी सुरू असूनही अनधिकृत म्हणून त्यांची गणना केली जात होती. त्यांचे मालक बहुतांश प्रकल्पग्रस्तच होते. जिल्हाधिकारी या खाणी बंद करण्याची नोटीस पाठवीत होते. प्रकल्पग्रस्तांचा हा व्यवसाय बंद होऊ नये म्हणून त्यांना सिडकोने 'ना हरकत' प्रमाणपत्र द्यावे व त्यांना रीतसर व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी. खाणमालकांपैकी ज्यांच्या जमिनी सिडकोने संपादन केल्या आहेत, त्या प्रकल्पग्रस्त खाणधारकांना प्राधान्याने परवानगी द्यावी. खाणींसाठी जागा देताना ज्यांच्याकडे क्रशर आहेत, त्यांना तीन एकर जागा द्यावी. दंडात्मक कारवाई करण्याची पद्धत सुटसुटीत करून ती होईपर्यंत कोणतीही दंडात्मक कारवाई करू नये, अशा सूचना रामशेठ ठाकूर यांनी

सिडकोला दिल्या. सिडकोने, या सगळ्या सूचनांचा सकारात्मक विचार करून अंमलबजावणी करू, असे आश्वासन दिले.

जे.एन.पी.टी.मधील एन.एस.आय.सी.टी.(पी. अँड ओ.) हे भारतातील पहिले खासगी बंदर. यामध्ये व्यवस्थापनाने ५०० कामगारांची नेमणूक केली. डॉ. शांती पटेल व एस. आर. कुलकर्णी यांच्या युनियनचे हे कामगार सदस्य होते. युनियनने त्यांचे प्रश्न न सोडविल्यामुळे या कामगारांनी रामशेठ ठाकूर यांच्याशी संपर्क साधला आणि रायगड जनरल युनियन अंतर्गत श्री. महेंद्र घरत यांच्या अध्यक्षतेखाली एन.एस.आय.सी. टी.बंदर कामगार युनियन स्थापन झाली. या युनियनने कंपनी व्यवस्थापनावर दबाव आणून कामगारांची कामाची वेळ बारा तासांवरून आठ तासांवर आणली, मात्र तसा करार करण्यास कंपनी तयार नव्हती. रामशेठ ठाकूर यांनी युनियनच्या माध्यमातून कंपनीला इशारा देताच त्यांनी रामशेठ ठाकूर यांच्याशी वाटाघाटी करून आठ तास ड्युटी ठेवण्याचे मान्य केले.

पाहिलेल्या... केलेल्या... जगलेल्या आंदोलनांमुळे रामशेठ नावाच्या नेतृत्वाचे वादळ आता घोंघावायला लागले होते. आंदोलनांच्या धारेतून नेतृत्वाची धार अणकुचीदार व्हायला लागली होती. जनतेचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक आणि विश्वासार्ह झाला होता. त्यांच्या नेतृत्वावर जनतेने अधिकार आणि हक्काची प्रेममय चादर पांघरली. त्यात त्यांनी आपल्या दानशूर वृत्तीचा साज चढविला. प्रकल्पग्रस्तांच्या व स्थानिकांच्या प्रश्नांसाठी ते आपल्या पायाला भिंगरी लावून फिरत होते. त्यांनी शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी आणि ते सोडविण्यासाठी रायगड जिल्हा पिंजून काढला. फक्त पनवेल-उरणच नव्हे, तर संपूर्ण रायगड जिल्ह्याने त्यांच्यावर भरभरून प्रेम केले, आजदेखील ते तसूभरही कमी झालेले नाही. रायगड जिल्ह्यातील आपल्या माणसांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी आपल्या जिवाचे रान केले. त्यामुळे ते सर्वांच्या मनातील खासदार झाले होते. आपल्या हक्काचा खासदार कसा असावा, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या आदर्शवत नेतृत्वगुणांनी त्यांच्या राजकारणाची नांदी झाली होती.

रामशेठ यांनी सक्रिय राजकारणातून संन्यास घेतला असला, तरी आजही त्यांच्यातील लढवय्या नेता सामाजिक जाणिवांना कधीच दूर करू शकलेला नाही. ते सक्रिय राजकारणात नसतानासुद्धा आंदोलनाचे नेतृत्व करीत होते. खासदार असताना त्यांच्या सामाजिक विकासाला अधिक बळ मिळाले, त्यामुळे प्रत्येक सामाजिक प्रश्नाला भिडून त्यांनी अनेकांना न्याय दिला. आज सक्रिय राजकारणात नसले, तरी त्यांच्यातील नेता त्याच तेजाने तळपतो आहे. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी ते आजही लढतच आहेत. त्याहीपलीकडे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव देण्यासाठी दशरथदादा पाटील व रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली उभा राहिलेला हा लढा हा तितकाच महत्वाचा आहे, कारण हा येथील भूमिपुत्राचा लढा आहे.

केंद्र सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची पहिली घोषणा नोव्हेंबर १९९७ मध्ये केली.



● **नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनसमयी आंदोलकांना मार्गदर्शन करताना रामशेठ ठाकूर**

या विमानतळाला २००७ मध्ये केंद्र सरकारने अंतिम मंजुरी दिली. महाराष्ट्र सरकारने जुलै २००८ मध्ये विमानतळाच्या बांधकामाला हिरवा कंदील दाखविला. १८ फेब्रुवारी २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विमानतळाचा पायाभरणी समारंभ पार पडला आणि ऑगस्ट २०२१ मध्ये या विमानतळाच्या प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाली. हा झाला विमानतळाच्या निर्मितीचा घटनाक्रम.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विचार सरकारने सुरू केल्यानंतर येथील भूमिपुत्रांच्या शेकडो एकर जमिनी ताब्यात घ्यायला सुरुवात झाली. मुळात नव्याने वसविण्यात येत असलेले नवी मुंबई शहर व जे.एन.पी.टी बंदराच्या उभारणीसाठी उरण-पनवेलमधील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोच्या माध्यमातून सरकारने ताब्यात घेतल्याने येथील शेतकरी भूमिहीन झाला. जमिनीला सरकारने योग्य मोबदला द्यावा म्हणून शेतकऱ्यांचे नेते दि. बा. पाटीलसाहेबांच्या नेतृत्वाखाली १९८१ व १९८४ मध्ये झालेल्या शेतकऱ्यांचे आंदोलन चिरडण्यासाठी शेतकरी आंदोलकांवर गोळ्या झाडण्यात आल्या. त्यात पाच जण धारतीर्थी पडले. अनेक जण जखमी झाले. सरकारच्या या कृतीने संपूर्ण देश हादरला होता. या आंदोलनात रामशेठ ठाकूर, बी. के. ठाकूर, दशरथ ठाकूर, काळूशेठ खारपाटील, तुकाराम घरत अशा अनेक तरुणांनी सक्रिय सहभाग घेऊन दि. बा. पाटीलसाहेबांच्या खांद्याला खांदा लावून आंदोलनात स्वत:ला झोकून दिले होते. दि. बा. पाटीलसाहेबांनी आपले आयुष्य शेतकरी, कष्टकऱ्यांच्या हक्कासाठी घालविले. अनेक लढे, आंदोलने

केली.येथील भूमिपुत्राला संघर्ष केल्याशिवाय सहज काहीच मिळालेले नाही. संघर्ष हा येथील शेतकऱ्यांचा स्थायीभाव झाला आहे. आजही तो संघर्ष संपलेला नाही. नवी मुंबई विमानतळ येथील भूमिपुत्राने आपल्या वडिलोपार्जित जमिनी दिल्याने आज प्रत्यक्षात आला आहे. या विमानतळाला दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव द्यावे, अशी मागणी प्रकल्पग्रस्तांनी करायला सुरुवात केली.

२००८ पासून अनेक सामाजिक संस्था, भूमिपुत्र संस्था, तसेच राजकीय नेते, कार्यकर्ते दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला देण्यात यावे म्हणून आपापल्या परीने स्वतंत्र मागण्या करीत होते. 'पनवेल-उरण आगरी समाज मंडळ' व 'अखिल आगरी समाज परिषदे'च्या माध्यमातून २ जानेवारी २०१५ रोजी सिद्धगड येथे राज्याचे तत्कालीन सार्वजनिक बांधकाममंत्री एकनाथ शिंदे व खासदार कपिल पाटील यांच्याकडे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव द्यावे म्हणून पहिले निवेदन देण्यात आले. त्यानंतर खासदार कपिल पाटील यांनी नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी लोकसभेत केली. त्यासंबंधीचे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले होते.

एका बाजूला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे ही येथील भूमिपुत्रांची मागणी होती. याच कालावाधीत महायुतीत असलेल्या शिवसेनेने महायुती सोडून सन २०१९ मध्ये महाविकास आघाडीशी गठबंधन केले व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी शपथ घेतली. रायगड, नवी मुंबई, मुंबई, पालघर, ठाणे या पाचही जिल्ह्यांतून दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला देण्यासाठी काही प्रमाणात निदर्शने व निवेदनांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत, हे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना माहीत असूनही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला आपल्या वडिलांचे म्हणजेच आदरणीय बाळासाहेबांचे नाव देण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. त्यांनी सन २०२१ मध्ये सिडकोला आदेश देऊन विमानतळाला 'बाळासाहेब ठाकरे' यांचे नाव देण्यासाठी सिडकोला ठराव करून घेऊन तो प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यास सांगितले. याचा अर्थ असा होतो, की या विमानतळाला दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव न देता ते बाळासाहेबांचे द्यावे, अशी इच्छा सरकारची म्हणजे उद्धव ठाकरे यांचीच होती. शासनाकडून सिडकोला आलेल्या सूचनांनुसार सिडकोने असा ठराव करून शासनाकडे पाठविलेला आहे. अशा बातम्या आल्यानंतर येथील्य भूमिपुत्रांच्या मनात चलबिचल सुरू झाली. यासंदर्भात 'आरटीआय'मार्फत सिडकोकडे माहिती मागविली असता, असा कोणताच ठराव शासनाकडे पाठविला नसल्याचे सिडकोकडून लेखी कळविण्यात आले. यावरून उद्धव ठाकरे सरकार दि. बा. पाटीलसाहेबांच्या नावाला विरोध करीत असल्याचे एकंदरीत दिसून येत होते.

यानंतर सन २०२१ मध्ये या नामकरणाच्या चळवळीला खरा वेग आला. या वेळी जासई येथील विनोद म्हात्रे आणि मेघनाथ म्हात्रे यांनी यासाठी पुढाकार घेतला. पाचही सागरी जिल्ह्यांमध्ये दि. बां.च्या नावाने नामकरण व्हावे यासाठी विविध मार्गाने प्रयत्न सुरू झाले. दि. बां.चे जन्मगाव असलेल्या जासई गावातूनही

या मागणीला सुरुवात व्हायला पाहिजे म्हणून त्यांनी जासई ग्रामस्थ मंडळाची सभा बोलावून त्या सभेत याबाबतचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव मांडत असतानाच जी मंडळी दि. बा. पाटीलसाहेबांच्या नावासाठी प्रयत्न करीत आहेत, त्या सर्वांना एकाच व्यासपीठावर आणून एकसंघ आंदोलन उभारता येईल, असेही सुचविण्यात आले. जासई ग्रामपंचायतीने याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन सर्वपक्षीय नेते व संस्थांना एकत्र करण्याची जबाबदारी विनोद म्हात्रे व मेघनाथ म्हात्रे यांच्यावर सोपविली.

याच दरम्यान उलवे नोड येथे कोविड हॉस्पिटलचे उद्घाटन असल्याने या ठिकाणी लोकनेते रामशेठ ठाकूर व इतर नेतेमंडळी उपस्थित राहणार असल्याचे समजले, म्हणून जासईतील मंडळींनी या ठिकाणी जाऊन रामशेठ ठाकूर यांच्याशी चर्चा केली. त्या वेळी दशरथदादा पाटील, उरणचे आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, दीपक म्हात्रे, जे. डी. तांडेल हेही उपस्थित होते. सगळ्यांच्या कानांवर हा विषय गेल्यानंतर रामशेठ ठाकूर यांनी हा विषय उचलून धरला आणि आपण सर्वपक्षीय एकसंघ लढा उभा करू, असे त्यांनी सांगितले. ''त्यासाठी सर्व पक्षांतील नेत्यांना एकत्र करणे गरजेचे असल्याने त्यांना भेटून एका व्यासपीठावर बोलावू. मी तुमच्यासोबत आहे,'' असे सांगितले. या वेळी कोविड हॉस्पिटलच्या उद्घाटनासाठी तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस येणार असल्याने, आमदार महेश बालदी यांनी 'देवेंद्र फडणवीससाहेबांना याबाबतचे निवेदन देऊया,' असे सुचविले आणि जागेवरच निवेदन तयार करून फडणवीससाहेबांना देण्यात आले. देवेंद्र फडणवीस यांनी, ''आम्ही शंभर टक्के तुमच्यासोबत आहोत, या विमानतळाला दि.बां.चेच नाव लागले पाहिजे आणि त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू,'' असे आश्वासन दिले.



● नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देताना सर्वपक्षीय कृती समितीचे पदाधिकारी

विनोद म्हात्रे, मेघनाथ म्हात्रे यांनी सर्वपक्षीय नेत्यांची भेट घेतली. नवी मुंबईतील नेते गणेश नाईक, संजीव नाईक यांनीही याबाबत सकारात्मकता दर्शविली. २८ एप्रिल २०२१ रोजी एका व्यासपीठावर सगळे नेते एकत्र आले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रशांत पाटील, शेकापचे बाळाराम पाटील, जे. एम. म्हात्रे, शिवसेनेचे मनोहर भोईर, बबनदादा पाटील असे सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते उपस्थित झाल्याने या लढ्याचे रणशिंग फुंकले गेले.

'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' या नावासाठी एकवटलेल्या सर्व नेत्यांनी सर्वपक्षीय कृती समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला व या समितीचे अध्यक्षस्थान लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूषवावे, असा प्रस्ताव मांडण्यात आला. याला रामशेठ यांनी मोठ्या मनाने नकार देऊन कृती समितीचे अध्यक्षपद 'अखिल आगरी समाज परिषदे'चे अध्यक्ष असलेले नेते दशरथदादा पाटील यांनी भूषवावे, असा स्वतः प्रस्ताव मांडला, त्याला सर्वांनी मान्यता दिली व 'सर्वपक्षीय कृती समिती' गठित करण्यात आली. या समितीचे उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, शिवसेनेचे बबनदादा पाटील, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, बाळाराम पाटील, सरचिटणीस कामगार नेते महेंद्र घरत, भूषण पाटील, सहचिटणीस दीपक म्हात्रे, सुरेश पाटील, कार्यकारणी सदस्य म्हणून उरणचे आमदार महेश बालदी, शेकापचे माजी आमदार विवेक पाटील, मनोहर भोईर, अतुल भगत, अतुल दि. पाटील, दशरथ भगत, जे. डी. तांडेल, तत्कालीन पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, के. के. म्हात्रे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून हा लढा कशा पद्धतीने पुढे न्यायचा, याबाबत नियोजन करीत असतानाच महाविकास आघाडीच्या हायकमांडमधून आदेश आल्याने दि. बा. पाटीलसाहेबांच्या नावासाठी एकाच व्यासपीठावर आलेल्या मआविच्या नेत्यांनी काढता पाय घ्यायला सुरुवात केली. नेते बाजूला गेले असले, तरी दि. बा. पाटीलसाहेबांना मानणारे कार्यकर्ते मात्र या चळवळीपासून दूर न जाता चळवळीत कायम राहले. समितीने लढा उभा करण्यासाठी सर्वतोपरी कंबर कसली. 'कोण म्हणतो देणार नाय, घेतल्याशिवाय राहणार नाय', तसेच 'येतील त्यांच्यासोबत न येतील त्यांच्याशिवाय', असा निर्धार करून हा बहुजनांचा लढा सुरू झाला. हाय कमांडचा आदेश असूनसुद्धा आम्ही 'दिबां'चे आहोत, असे सांगून अनेक लढवय्ये कार्यकर्ते एकदिलाने लढण्यास सज्ज झाले होते.

शुक्रवार, १४ मे २०२१ रोजी सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून पत्रकार परिषद घेऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची आग्रही भूमिका मांडली. गेले काही दिवस विमानतळाच्या नावाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, उलटसुलट चर्चा सुरू आहेत. त्यानिमित्त सर्व पक्ष नेते एकत्र येऊन त्यांनी या चर्चांचा पत्रकार परिषदेमध्ये समाचार घेतला. या पत्रकार परिषदेला कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस कामगार नेते महेंद्र घरत, भूषण पाटील, सरचिटणीस दीपक म्हात्रे, सुरेश पाटील, कार्यकारणी सदस्य आमदार



● **नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या सर्वपक्षीय कृती समितीच्या बैठकीतील क्षण**

महेश बालदी,अतुल भगत,अतुल दि.पाटील, दशरथ भगत, जे. डी. तांडेल, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, के. के. म्हात्रे उपस्थित होते. या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, अशी मागणी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त शेतकरी, कष्टकरी जनता सुरुवातीपासून करीत आहे. त्याबाबतचा पत्रव्यवहार राज्य व केंद्र सरकारकडे करण्यात आला आहे. असे असताना अचानकपणे १७ एप्रिल रोजी सिडकोच्या संचालक मंडळाने लोकभावनेचा विचार न करता शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव सरकार पुढे आणत असल्याने सर्व जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकरी कष्टकरी जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला होता, असे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी या वेळी उपस्थितांना सांगितले. माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल येथील जनतेच्या मनात नितांत आदर असून, त्यांचे व्यक्तिमत्त्वही उत्तुंग आहे. त्यांचे नाव महाराष्ट्रातील इतर मोठ्या प्रकल्पांना देता येईल. मुंबईत शिवाजी पार्क येथे करोडो रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक उभे राहत आहे, त्याचे भूमिपूजन अलीकडेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले आहे. पण नवी मुंबईच्या निर्मितीसाठी व महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्तांसाठी दि. बा. पाटील यांचे योगदान तितकेच महत्त्वाचे आहे, म्हणून येथील विमानतळाला त्यांचेच नाव द्यावे, अशी मागणी या पत्रकार परिषदेत सर्वपक्षीय नेत्यांनी केली. या मागणीला पाठबळ मिळावे म्हणून सर्व पक्षीय समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील,

उपाध्यक्ष माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली समितीच्या शिष्टमंडळाने काँग्रेसचे नाना पाटोले यांची भेट घेऊन त्यांना याबाबत पत्र दिले.

उरण टाऊनशिप येथील भागूबाई चांगू ठाकूर स्कूलच्या सभागृहात शुक्रवारी, २९ मे २०२१ ला सर्वपक्षीय सभा घेण्यात आली. कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील व उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीस विविध पक्षांतील अनेक नेत्यांबरोबर मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना रामशेठ यांनी, सर्वांनी राजकीय चपला बाजूला ठेवून प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारे दवंगत नेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे, या मागणीच्या लढ्यासाठी सज्ज राहण्यास सांगतानाच संघर्षाचा आवाज मुंबई महाराष्ट्रसह दिल्लीपर्यंत पोहोचवून विमानतळाला दि. बा. पाटलांच्या नावाला मान्यता मिळविण्यासाठी साऱ्यांनी एकसंघ होऊ. या आंदोलनाच्या तयारीसाठी उरण तालुक्यातील गावोगावी व पंचायत समिती गणनिहाय बैठकांचे आयोजन करा. त्यासाठी कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करतील. आंदोलनास आगरी, कोळी, कराडी, एससी, एसटी समाजासह मारवाडी समाजही पाठिंबा देत आहे, त्यामुळे निश्चितपणे हे आंदोलन तडीस जाईल, असा ठाम विश्वास या वेळी व्यक्त केला. कृती समितीच्या पनवेल येथील १० जून २०१९ च्या सभेमध्ये पाचही जिल्ह्यांमध्ये मानवी साखळी व २४ जून २०१९ रोजी सिडकोविरुद्ध सिडकोजवळ मोठे आंदोलन घेण्याचे ठरविले. या आंदोलनासाठी कमिटीचे सर्व पदाधिकारी, तसेच कार्यकारणी सदस्य हे एकजुटीने कामाला लागले. प्रत्येक दिवशी जवळपास आठ ते दहा गावनिहाय, विभागनिहाय जनजागृतीसाठी बैठका घेतल्या गेल्या. सरकारी आदेशाने कृती समितीच्या कार्यशील पदाधिकाऱ्यांवर पोलिस केसेस नोंदविण्यास सुरुवात झाली. दररोज पोलिसांचे रिपोर्ट सरकारदरबारी पोहोचत होते. शेवटी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मध्यस्थांमार्फत ८ जूनच्या बैठकीसाठी निरोप आला. अध्यक्ष दशरथ पाटील व उपाध्यक्ष रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वात कृती समितीचे पदाधिकारी, कार्याध्यक्ष प्रशांत ठाकूर, संजीव नाईक, जगन्नाथ पाटील, आमदार महेश बालदी, आमदार राजूदादा पाटील, आमदार गणपतराव गायकवाड, भूषण पाटील, जगदीश गायकवाड, विनोद म्हात्रे, मेघनाथ म्हात्रे, संतोष रामचंद्र घरत, दशरथ भगत, दीपक म्हात्रे, दीपक पाटील, जे. डी. तांडेल आणि काही कार्यकर्ते असे साधारण २० ते २५ लोकांची टीम बैठकीसाठी मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी दाखल झाली. दालनात गेल्यानंतर मुख्यमंत्र्यांसोबत उरण -पनवेलचे महाविकास आघाडीचे बहुतांश नेतेमंडळी हजर होती, याचे आश्चर्य वाटले. बैठकीमध्ये मुख्यमंत्री महोदय बाळासाहेबांच्याच नावासाठी आग्रही होते. कृती समिती दि. बा. पाटील यांच्या नावासाठी ठाम होती. बैठकीदरम्यान महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून विमानतळाच्या एका टर्मिनलला दि. बा. पाटील यांचे नाव घ्या, किंवा शिवडी ब्रिजच्या नावासाठी मागणी करा, असा बिनडोक प्रस्ताव समोर आला. समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव अमान्य करून मुख्यमंत्री महोदय, तसेच उरण-पनवेलच्या

महाविकास आघाडीच्या नेत्यांना ठणकावून सांगितले, की दि. बा. पाटील यांच्या नावाव्यतिरिक्त कोणतेही नाव आम्ही मान्य करणार नाही. बैठक अयशस्वी झाली, त्यामुळे १० जून रोजी पाचही जिल्ह्यांत आंदोलकांनी लांबच लांब मानवी साखळी तयार करून सरकारचा निषेध नोंदविला व कृती समिती दि. बा. पाटील यांच्याच नावावर ठाम आहे, हा सरकारला संदेश दिला. सर्वपक्षीय कमिटीचे पदाधिकारी, तसेच कार्यकारणी सदस्य अथक मेहनतीने ११ तारखेपासून २४ जूनच्या सिडकोच्या घेराव आंदोलनाची जनजागृती करीत होते. पाचही जिल्ह्यांमध्ये कार्यकर्त्यांनी सर्व गावे पिंजून काढली. पोलिसांनी मध्यस्थी करून कोविडचे कारण दाखवीत आंदोलन न करण्याची विनंती केली. मात्र कोणताच नेता ऐकायला तयार नाही. शेवटी पोलिसांनी सांगितले, की आम्ही मुख्यमंत्र्यासोबत पुन्हा एक बैठक लावतो. सर्वांनी त्यालाही मान्यता दिली. बैठकीद्वारे मागणी मान्य होत असेल, तर आंदोलन करायचेच नाही, असे ठरविण्यात आले. २० जून रोजी बैठक ठरली. पुन्हा कृती समितीचे पदाधिकारी बैठकीसाठी वर्षा बंगल्यावर उपस्थित राहिले . बैठकीत पुन्हा बाळासाहेबांच्याच नावाचा विषय मुख्यमंत्र्यांनी लावून धरला. मुख्यमंत्री आपला हट्ट सोडत नव्हते. सर्वांनी मुख्यमंत्र्यांच्या मागणीला नकार दिला. मुख्यमंत्री म्हणाले, ''तुम्ही जर सेटलमेंट करायला आलेले नाहीत, तर मग कशाला आलात? इथे मला काही दुसरी कामे नाहीत का?'' आमदार गणपतराव गायकवाड यांचा पारा चढला. त्यांनी सांगितले, की दि.बां.चे विमानतळाला नाव दिले नाही, तर याच कॉन्फरन्स हॉलमध्ये पेटवून घेईन. महेश बालदी यांनीसुद्धा तेवढ्याच आक्रमकतेने आपले म्हणणे मांडले. कृती समितीचे लोक ऐकत नाहीत, हे बघून, 'मला तुमच्याशी चर्चा करायला वेळ नाही,' असं सांगून मुख्यमंत्री बैठकीतून उठून निघून गेले. बैठकीत उपस्थित असलेले मंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला सबुरीने घेण्याची विनंती करून मुख्यमंत्र्यांना पुन्हा घेऊन येतो, आपण काहीतरी तोडगा काढू, असे सांगितले. एकनाथ शिंदे यांनी पुन्हा मुख्यमंत्री यांना बैठकीत आणले. परंतु निष्पन्न काहीही झाले नाही, ते बाळासाहेबांच्या नावावर ठाम होते.

इकडे पोलिस आम्हाला आंदोलन करण्यासाठी मज्जाव करण्यास सुरुवात करायला लागले. पोलिस आंदोलनासाठी जागा उपलब्ध करून देण्यासा मुद्दाम दिरंगाई करीत होते. पण आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोलिसांसोबत वाद घातले. शेवटी पाम बीच हायवेची जागा मिळाली.२३ तारखेच्या आंदोलनाची सर्व तयारी झाली. आंदोलनाची जागा, पोलिसांसोबत वाटाघाटीमध्ये वेळ भरपूर गेला होता, त्यामुळे सभेसाठी भर रस्त्यावर तातडीने मंडप बनविणे अवघड होते, म्हणून तातडीच्या मंडपासाठी जेएनपीटीमधून दोन ट्रेलर आणले आणि त्यावर तातडीचे मंडप बनवायला सुरुवात करण्यात आली. २४ जूनची सकाळ उजाडली. आंदोलक रस्त्याच्या मार्गाने मंडपाजवळ दाखल होऊ लागले. पनवेल, उरण, ठाणे, नवी मुंबई, वाशी, मुंबईकडून येणारे रस्ते आंदोलकांनी फुलून गेले. रस्त्याबरोबरच सागरी मार्गानेही आंदोलक येऊ लागले. बघता बघता मंडपासमोर मागील बाजूस संपूर्ण पाम बीच हायवे भरून गेला.

समितीने दिल्ली दरबारी जाऊन केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या सहकार्याने देवेंद्र फडणवीस यांच्या

मध्यस्थीने केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंदिया यांची भेट घेतली. भाजपा या आंदोलनात संपूर्ण ताकदीनिशी उतरल्याने केंद्राकडून सर्व सकारात्मक सहकार्याची ग्वाही मिळाली. त्यामुळे या आंदोलनाला अधिक ऊर्जा मिळाली. जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत निदर्शने, मोर्चे, आंदोलने सुरूच ठेवण्याचा निर्धार समितीने केला.

पनवेल, तसेच इतर सर्व जिल्ह्यांतील शेकडो ग्रामपंचायतींचे ग्रामसभा ठराव एकत्र करून मुख्यमंत्री कार्यालयात जमा करण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व आमदारांना पत्रव्यवहाराद्वारे 'दिबां'च्या नावाला पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले. नाना पटोले, अजितदादा पवार या महत्त्वाच्या नेत्यांनी सकारात्मक प्रतिसादही दिला, मात्र त्यांच्या पक्षातील स्थानिक नेते व काही कार्यकर्ते विरोधात बसले होते.

सर्वपक्षीय कृती समिती या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करीत होती. ९ ऑगस्ट या क्रांतिदिनी दि. बा. पाटीलसाहेबांचे जन्मगाव असलेल्या जासईमध्ये 'मशाल मोर्चा' काढण्याचा निर्णय घेण्यात आला. बेलापूर येथे सिडकोविरोधात अतिभव्य असा जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नाव देण्यासाठी आपण आग्रही राहावे, अशी विनंती लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना नवी दिल्ली येथे नवीन संसद भवनात जाऊन करण्यात आली. या वेळी कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार संजीव नाईक, तसेच समितीचे कार्यकारिणी सदस्य आमदार महेश बालदी, दि. बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील उपस्थित होते. या सर्वांनी कृती समितीचे एक निवेदन केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांना दिले. राज्यमंत्री मोहोळ यांनी या वेळी सकारात्मक प्रतिसाद दिला. यासंदर्भात आपण निश्चित पुढाकार घेऊ, तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत थोड्याच दिवसांत माझ्या खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांसोबत बैठक घेऊन त्यांच्याशी नक्कीच सकारात्मक चर्चा करू, असे ही केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी सांगितले. यापूर्वी तत्कालीन नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंदिया यांच्या नवी दिल्लीतील कार्यालयात भेट घेतली, असता त्यांनीही नामकरणासाठी पूर्ण पाठिंबा आणि मदतीची ग्वाही दिली होती, याचा उल्लेखही या निवेदनात केला होता.

अध्यक्ष दशरथदादा पाटील व उपाध्यक्ष रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणखी एक निषेधात्मक कार्यक्रम घेण्याचे ठरविले. १३ जानेवारी २०२२ रोजी भूमिपुत्र परिषद घेण्याचे नियोजन करण्यात आले. पुन्हा एकदा या आंदोलनाची माहिती कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पायाला भिंगऱ्या लावून संपूर्ण पाचही जिल्ह्यांत पोहोचविली. नेहमीप्रमाणे पोलिस आंदोलन दडपण्यासाठी सज्ज झाले होते. पोलिसांनी आंदोलन नका घेऊ... येथे नका घेऊ... तेथे नका घेऊ, अशी चालबाजी सुरू केली. कृती समिती आंदोलनावर ठाम असल्याने पोलिसांनी विमानतळ क्षेत्रातील कोली कोपर गावालगतचे मैदान भूमिपुत्र परिषदेसाठी दिले. त्या



● **नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, यासाठी दास्तान फाटा येथे 'काळा दिवस' पाळून 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. या वेळी मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर**

परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय राज्यमंत्री माननीय रामदासजी आठवलेसाहेब यांची उपस्थिती लाभली व त्यांनी परिषदेमध्ये दि. बा. पाटील साहेबांचे नाव दिले गेलेच पाहिजे, अशी ठाम भूमिका मांडली. सदर परिषदेमध्ये अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार संजीव नाईक, आमदार महेश बालदी, आमदार गणपतराव गायकवाड यांनी ज्वलंत विचारांनी दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला दिल्याशिवाय भूमिपुत्र गप्प बसणार नसल्याचे सांगितले.

१७ मार्च हा सिडकोचा स्थापना दिवस असल्याने १७ मार्च २०२२ या दिवशी दास्तान फाटा येथे 'काळा दिवस' पाळून 'रास्ता रोको' आंदोलन करण्याचे नियोजन करण्यात आले. आंदोलनाची माहिती पाचही जिल्ह्यांत पोहोचविली गेली. पुन्हा एकदा पोलिसांची अडवणूक सुरू झाली. पोलिसांनी आंदोलनासाठी मंडप नका बांधू... येथे नको.. तेथे नको... आंदोलन होऊच नये म्हणून प्रयत्न सुरू केले. मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. हजारोंच्या संख्येने आंदोलक जमा झाले. दास्तान फाटा येथे सरकारविरोधात जोरदार निदर्शने करून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. पोलिसांनी खूप मोठा फौजफाटा बंदोबस्तासाठी पाठवला होता. पोलिसांच्या गाड्या आल्या आणि त्यांनी आंदोलकांना अटक करायला सुरुवात केली. २९ नेते व आंदोलक अशा २९ जणांना अटक करून त्यांच्यावर खटले दाखल केले.

दास्तान फाटा येथील आंदोलनानंतर कृती समितीने लगेच २४ जून २०२२ रोजी म्हणजेच दि. बा. पाटीलसाहेबांच्या स्मृतिदिनाच्या दिवशी 'सिडको घेराव' असे आंदोलन जाहीर केले. सर्व नेत्यांनी कार्यकर्त्यांनी



● **नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, यासाठी २४ जून २०२१ दास्तान फाटा येथे 'काळा दिवस' पाळून 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. या वेळी मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर**

पुन्हा एकदा जनतेपर्यंत पोहोचून या 'सिडको घेराव' आंदोलनाची माहिती दिली. ठरल्याप्रमाणे पाचही जिल्ह्यांतील जवळपास ३० हजार आंदोलक बेलापूर किल्ला येथे जमा झाले. अध्यक्ष दशरथदादा पाटील व उपाध्यक्ष रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली बेलापूर किल्ल्यापासून 'सिडको भवन'च्या दिशेने घोषणा देत चालू लागले, पुढे जाता जाता येणाऱ्या मोठ्या जनसमुदायाला अडवण्यासाठी प्रचंड मोठा पोलिसांचा ताफा आडवा आला आणि बेलापूर स्टेशनजवळचा ब्रिज चढायच्या अगोदरच पोलिसांनी सर्व आंदोलकांना अडवले आणि नेते आणि पोलिसांमध्ये प्रचंड शाब्दिक चकमकी झाल्या, नंतर तेथेच बेलापूरच्या रेल्वे स्टेशनच्या ओव्हर ब्रिजवरती आणि सभोवतालच्या परिसरामध्ये त्या आंदोलनाचे मोठ्या सभेमध्ये रूपांतर झाले, नेत्यांनी व काही प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणातून सरकारचा तीव्र निषेध व्यक्त केला आणि पुन्हा एकदा आग्रही भूमिका स्पष्ट केली, की विमानतळाला नाव फक्त आणि फक्त दि. बा. पाटील यांचेच मान्य असेल, त्यांच्या ऐवजी दुसऱ्या कोणाचे नाव आम्हा भूमिपुत्रांना मान्य नसेल. त्यासाठी वेळ आली तर प्राण गेले तरी बेहत्तर, असा इशारा देण्यात आला.

यादरम्यान पुन्हा एकदा महाराष्ट्र सरकारमध्ये उलथापालथ झाली. उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदावरून पायउतार होण्याची वेळ आली. आता मात्र उद्धव ठाकरे यांना कळले होते, की आदरणीय बाळासाहेब ठाकरेंच्या नावाचा अट्टहास करण्यात काही अर्थ नसल्याने जाता जाता का होईना, माघार घेऊन दि. बा.

पाटीलसाहेबांच्या नावाला पाठिंबा जाहीर केला. आपल्या कृतीने जो काही प्रकल्पग्रस्तांचा रोष ओढवून घेतला आहे तो कमी करावा, या भावनेने त्यांनी शेवटच्या कॅबिनेट बैठकीत 'लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नामकरण मंजूर केले.

३० जून २०२२ ला एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. एनडीएचे सरकार स्थापन झाले. या नवीन सरकारने आपल्या कॅबिनेट बैठकीत 'लोकनेते दि. बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' या नामकरणाला मंजुरी दिली. २५ ऑगस्ट २०२२ रोजी विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहांमध्ये 'लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नवी मुंबई विमानतळाचे नामकरण मंजूर करून घेतले व पुढे केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले.

९ ऑक्टोबर २०२४ ला समितीच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांसह दिल्लीमध्ये केंद्रीय विमान वाहतूक मंत्री नायडू व मुरलीधर मोहोळ यांच्यासोबत मंत्रालयात बैठक झाली. सदर बैठकीमध्ये मंत्री महोदयांनी कळविले, की त्यांच्या मंत्रालयात फक्त दि. बा. पाटीलसाहेबांच्या नावासंदर्भातच प्रस्ताव असून, त्यावर योग्य ती प्रक्रिया सुरू आहे, इतर कोणत्याही नावाबद्दल चर्चा नाही. त्यामुळे सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर नवी मुंबई विमानतळ 'लोकनेते दि. बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' म्हणून नामकरण होईल. पण सरकारने प्रक्रिया पूर्ण करण्याअगोदरच येथील भूमिपुत्रांनी ठिकठिकाणी 'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे फलक लावून नामकरण करून टाकले.

विमानतळ नामकरणासाठीच्या आंदोलनातून समर्थ आगरी समाजाची दि. बा. पाटील यांच्याविषयीची अस्मिता दिसून आली.

सिडकोने जेव्हा नवीन शहर वसविण्यासाठी गव्हाण भागातील जमिनी अधिग्रहित केल्या, तेव्हा प्रकल्पग्रस्तांना त्या मोबदल्यात गावात पक्के रस्ते, गटारे, अधिकृत स्मशानभूमी, अधिकृत क्रिकेटचे मैदान, नियमित पाणीपुरवठा, अधिकृत शाळा, रुग्णालय, लहान मुलांसाठी उद्याने अशा सर्व नागरी सुविधा पुरविल्या जातील, असे आश्वासन दिले होते. सिडकोने शहरीकरण केले. मोठमोठ्या इमारती उभ्या राहू लागल्या. येथील गावे जी मैल-दोन मैल अंतराने विखुरलेली होती, ती जवळ आली. विखुरलेली ही गावे सिडकोच्या शहरीकरणाने एकमेकांना जोडली गेल्याने पर्यायाने गावाबाहेर असलेल्या परंपरागत स्मशानभूमी शहरातील भरवस्तीत आल्या. यावर सिडकोची मालकी नव्हती, मात्र तरीही हे भूखंड सिडकोला गिळंकृत करायचे असल्याने सिडको विविध मार्गांनी प्रयत्न करू लागली. खारकोपरची परंपरागत स्मशानभूमी हलवण्यासाठी असेच सिडकोने केलेले प्रयत्न रामशेठ ठाकूर यांनी हाणून पाडले.

खारकोपर गावची ही स्मशानभूमी गावची धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोप्याचे प्रतीक आणि गावचा सांस्कृतिक वारसा आहे. खारकोपर गावकऱ्यांनी सिडकोकडे सन २००७ मध्ये केलेल्या मागणीनंतर या स्मशानभूमीच्या संरक्षणासाठी सिडकोने ३,०५,९७३ रुपयांचा निधी मंजूर केला होता. या कामाची प्रशासकीय मान्यता २६

नोव्हेंबर २००७ रोजी देण्यात आली होती. ३ डिसेंबर २००७ रोजी सरपंचांना संरक्षण भिंतीबाबतचे अधिकृत पत्र देण्यात आले व १७ जून २००८ रोजी स्मशानभूमीला संरक्षण भिंत बांधून देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. स्मशानभूमीच्या अवतीभवती इमारती उभ्या राहिल्या. शहरात असलेल्या या स्मशानभूमीच्या भूखंडावर बिल्डरांच्या नजरा वळायला लागल्या. सिडकोशी संगनमत करून स्मशानभूमीची जागा बळकावण्याचे प्रयत्न सुरू झाले. स्मशानभूमीच्या आजूबाजूला असलेल्या इमारतींतील रहिवाशांनी ही स्मशानभूमी हलवावी म्हणून सिडकोकडे तक्रार दाखल केली होती. खरेतर ही तक्रार बिल्डर लॉबीचीच होती का? येथे संशयाला निश्चित जागा आहे, कारण स्मशानभूमीच्या आजूबाजूला उंच इमारती उभ्या करून ठेवल्या होत्या, मात्र त्यातील सदनिका विकल्या जात नव्हत्या. स्मशानभूमी हलवली तर आपले उखळ पांढरे होईल, याची खात्री विकसकांना असल्यामुळे त्यांनी सिडकोला हाताशी धरून स्मशानभूमीचा निकाल लावण्याचे काम सुरू केले असावे. शेतकरी कामगार पक्षाच्या काही नेत्यांनीसुद्धा पाठिंबा दिल्याने सिडकोला एकंदरीत चांगले पाठबळ मिळाले. दुसऱ्या बाजूला सिडकोला स्मशानभूमीचे सुशोभीकरण करण्यासाठी केलेले विनंती अर्ज सिडकोकडे पडून होते, त्यावर सिडको कोणतीही अंमलबजावणी करीत नाही, हे बघून ग्रामपंचायतीने सुशोभीकरण करण्याचे काम हाती घेऊन काम सुरू केले. सिडकोला हे कळल्यानंतर सिडकोच्या अधिकाऱ्यांनी हे बांधकाम पाडण्यासाठी पहाटेची वेळ निवडली, जेणेकरून पहाटेच्या वेळी विरोध करायला कोणी नसेल, मात्र सिडको अधिकारी स्मशानभूमीचे पाडकाम करण्यासाठी पहाटे येणार असल्याची खबर गावकऱ्यांना लागली. त्यांनी ही बाब रामशेठ यांच्या कानांवर घातली. सिडको अधिकारी कसे येतात आणि बांधकाम कसे पाडतात ते बघूच, असा रामशेठ ठाकूर यांनी निर्धार केला आणि गावकऱ्यांसह ते पहाटे स्मशानभूमीत उपस्थित झाले. त्या वेळी त्यांच्यासोबत ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूरही होते. याच दिवशी गाव कमिटीचे अध्यक्ष असलेले वसंत पाटील यांच्या पत्नी यमुना यांचे निधन झाले आणि सकाळी त्यांच्या पार्थिवावर त्याच स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होते. गावावर शोककळा पसरली असताना सिडकोचे अधिकारी भरत ठाकूर पथक घेऊन या स्मशानभूमीच्या तोड कारवाईसाठी पहाटेच आले होते, त्यामुळे सिडकोने निर्लज्जपणाचा कळस करीत मग्रुरी करण्याचा प्रयत्न केला होता. लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह ग्रामस्थांनी स्मशानभूमीत ठिय्या मांडला. एका बाजूला पार्थिवावर अंत्यसंस्कार होत होते, तर दुसरीकडे सिडकोबद्दल तीव्र संताप व्यक्त होत होता. स्मशानभूमीत पार्थिव जळत असताना सिडकोचे अधिकारी स्मशानभूमी पाडण्यासाठी येतात, या सिडकोच्या कारभाराबद्दल रामशेठ यांनी तीव्र संताप व्यक्त करीत निषेध केला. आजचा हा आवाज इशारा आहे, पुन्हा कारवाई करायला याल, तर दोन्ही तालुक्यातील लोकांना सोबत घेऊन जनआंदोलन करू, असा सज्जड दम सिडकोला दिला. ग्रामस्थांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसाठी कसलीही पर्वा करणार नसल्याचे त्यांनी सांगितले. सिडकोने न्यायालयाची दिशाभूल केली म्हणून ही वेळ आली आहे. एखादी कारवाई करायची असेल, तर नोटीस द्यावी लागते. कोर्टाने अशी कोणतीही मुदत दिली नाही. परंपरागत स्मशानभूमी आहे, जी

सिडकोच्या जन्माआधीपासून आहे. त्यामुळे मूळची व्यवस्था तशीच राहिली पाहिजे. कॉलनीवाल्यांना त्रास होऊ नये याची जबाबदारी सिडकोने घ्यायची आहे. हे सगळे न करता आपल्याला उखडून टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. आज स्मशानभूमीच्या जागेवर डोळा असून, उद्या म्हणतील गावातील इतर सार्वजनिक सुविधादेखील हटवाव्यात, तेथे स्विमिंग पूल किंवा इतर प्रकल्प उभे करावेत, मात्र ही सिडकोची मनमानी आणि जनतेविरोधी भूमिका खपवून घेतली जाणार नाही. पनवेल तालुक्यातील अनेक रहदारीच्या ठिकाणी स्मशानभूमी आहेत, त्यांचा त्रास कोणालाही होत नाही, मात्र कोपर गावातील स्मशानभूमीचा त्रास सिडकोला होतोय. सर्वांनी यासाठी जागरूक राहा, हे युद्ध आहे. आपल्याला आता आरपारची लढाई करायची आहे. जे सिडकोचे अधिकारी जाणीवपूर्वक ग्रामस्थ आणि कॉलनीमधील रहिवाश्यामंध्ये सभ्रम निर्माण करून वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांना आपल्याला लवकरच जाब विचारायचा आहे. त्यामुळे येत्या काळात दोन्ही तालुक्यांतील नागरिकांना एकत्र घेऊन जसे दि. बा. पाटीलसाहेबांनी आंदोलन पेटविले होते, तसेच आंदोलन आपल्याला करावे लागेल. केंद्र आणि राज्य सरकार हे जनतेच्या हिताचे काम करीत आहेत, पण हे सिडकोचे अधिकारी दिखावेगिरी करण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे आमचा लढा कायम राहणार आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिडकोला ठणकावून सांगितले. ७५ वर्षांच्या अथक प्रवासात रामशेठ प्रत्येक आंदोलन जगले. त्यांनी कायम लोकांच्या समस्यांना आपल मानले. जेथे सामान्य माणूस सत्तासामर्थ्याच्या खाली चिरडला गेल्याचे त्यांना दिसले, तेथे ते धावून गेले.

६

नांदी राजकारणाची

रामशेठ यांच्या व्यवसायाची दिवसेंदिवस प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू होती. १०,००० रुपयांपासून सुरू झालेला हा व्यावसायिक प्रवास आता कोटींच्या घरात पोहोचला होता. व्यवसाय ज्या वेगाने वाढत होता, तेवढीच रामशेठ यांच्या दानधर्माची कक्षाही वाढत होती. अल्पावधीतच एक दानशूर व्यक्ती म्हणून त्यांची ख्याती सर्वदूर पसरायला लागली. 'मी येथे काहीच घेऊन आलो नव्हतो, ज्याचे आहे त्याला त्याचे परत करतोय.'

'फोडिलें भांडार, धन्याचा तो माल ।
मी तव हमाल, भारवाही ।।'

हेच जीवनाचे खरे आणि वास्तविक तत्त्वज्ञान घेऊन रामशेठ जगत आहेत. त्यांच्याकडे मदतीसाठी आलेल्या कोणाला कधी ते रिकाम्या हाताने परत पाठवीत नव्हते. त्यांच्या 'शेठ'पणात सुद्धा 'राम' पूर्ण विसावला होता. समाजकारणाच्या ध्यासानेच शेतकरी कामगार पक्षाच्या प्रत्येक कार्यात ते हिरिरीने भाग घेत असले, तरी त्यांनी पहिले प्राधान्य आपल्या व्यवसायाला दिले. शेतकरी कामगार पक्षाला ऊर्जितावस्थेत ठेवण्यासाठी कायम आर्थिक ऊर्जास्रोत म्हणून त्यांनी नेहमी आपला हात पुढे केला. सन १९७५-७७ ला इंदिरा गांधींनी देशाची राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात असल्याचे कारण सांगून देशव्यापी आणीबाणी जाहीर केली. राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी संविधानातील कलम ३५२(१) खाली २५ जून १९७५ पासून आणीबाणी लागू केली. याद्वारे इंदिरा गांधींनी लोकशाही स्थगित करून भारताच्या प्रशासनाचे सर्वाधिकार आपल्या हाती घेतले व निवडणुका अमर्यादित काळाकरिता पुढे ढकलल्या. भारतीय जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आली. त्यामुळे जनतेमध्ये प्रचंड असंतोष निमार्ण झाला. इंदिरा गांधींनी जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, जॉर्ज फर्नांडिस आदी अनेक राजकीय विरोधकांना तुरुंगात डांबले. तसेच प्रसारमाध्यमांचे अधिकार काढून घेण्यात आले. रा. स्व. संघ व इतर काही संघटनांवर बंदी आणली गेली. मात्र जनता आणीबाणीच्या विरोधात ठामपणे संघर्षासाठी उभी राहिली. समाजवादी पक्षाच्याअनेक कार्यकर्त्यांनी आणीबाणीविरोधात तीव्र लढा दिला. या लढ्यात मृणाल गोरे, पन्नालाल सुराणा, प्रभूभाई संघवी यांच्याबरोबरच शेकापचे दि. बा.पाटील, जनार्दन भगत, दत्तूशेठ पाटील यांनीही आपले योगदान दिले. या लढ्यातूनच पुढे जयप्रकाश नारायण यांच्या नेतृवाचा उदय झाला आणि जनता पक्षाची निर्मिती झाली. हा संघर्ष इतका टोकाला गेला होता,

की मार्च १९७७ मध्ये देशात झालेल्या लोकसभा निवडणुकीत श्रीमती इंदिरा गांधी यांच्या काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला. याच वेळी कुलाबा (रायगड) मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाचे दि. बा. पाटील लोकसभेवर निवडून गेले.

लहानपणापासून शेकापच्या राजकीय व सामाजिक विचारसरणीचा रामशेठ ठाकूर यांच्यावर प्रभाव असला, तरी १९७७ मध्ये उदयास आलेल्या जनता पक्षाची व्यापक विचारसरणी त्यांना भावली होती. पण सन १९७८ मध्ये ते समाजवादी विचारसरणीकडे झुकले होते. पेणमध्ये झालेल्या जनता पक्षाच्या सभांनाही त्यांनी डॉ. गांधी आणि ॲड. सुरेश ठाकूर यांच्यासोबत हजेरी लावली. घरात रुजलेला शेतकरी कामगार पक्ष आणि त्या पक्षाचे नेते असलेले रामशेठ यांचे सासरे जनार्दन भगतसाहेब यांना रामशेठ यांनी सांगितले, की 'मी जनता पक्षात जातोय.' रामशेठ जनता पक्षाचा विचार करीत आहेत, हे भगतसाहेबांना पटले नाही. ते सरळ म्हणाले, ''नाही जायचं. दुसऱ्या कोणत्या पक्षात जायची गरज नाही. शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निवडणुकीला उभे राहा, माझ्याऐवजी तुम्ही उभे राहा, पण जनता पक्षात जाऊ नका.'' तसा आग्रह भगतसाहेबांनी धरला. रामशेठ आपल्या भूमिकेवर ठाम राहण्याचा प्रयत्न करीत होते. सन १९७९ ला जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झाल्या, तेव्हा ते आपल्या सासऱ्यांना म्हणाले, ''तुम्ही पंचायत समितीला उभे राहणार असाल, तर मी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी जनता पक्षातून उभा राहतो. जर तुम्ही जिल्हा परिषदेसाठी उभे राहणार असाल, तर मी पंचायत समितीसाठी उभा राहतो.'' भगतसाहेब ऐकायलाच तयार नव्हते. ते म्हणाले, ''निवडणूक लढवणार असाल, तर शेतकरी कामगार पक्षातून लढवा, अन्यथा तुम्ही जर माझे ऐकणार नसाल, तर जेथे तुम्ही उभे राहाल, तेथेच मीही निवडणुकीसाठी उभा राहीन.'' आपल्या सासऱ्याच्या हट्टाखातर शेवटी त्यांना नाईलाजास्तव निवडणुकीतून माघार घ्यावी लागली. जनार्दन भगतसाहेबांनीच १९७९ ला रामशेठ यांच्या डोक्यातून जनता पक्षाचे खूळ मुळासकट काढून टाकले.

१९७९ मध्ये झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर रामशेठनी खऱ्या अर्थाने शेतकरी कामगार पक्षाच्या सक्रिय राजकारणात प्रवेश केला. याअगोदर ते फक्त व्यासपीठावर यायचे आणि आपली भूमिका मांडायचे व निघून जायचे. निवडणूक कोणतीही असो, रामशेठ यांनी शेकापला सढळ हस्ते आर्थिक मदत केली होती. पक्षाला लागेल ती आर्थिक मदत करेन, मात्र प्रत्यक्ष राजकारण नको, ही त्यांची भूमिका होती.

शेकापचे मा. दि. बा. पाटील (१९८९), मा. दत्ता पाटील (१९९१/१९९६) असे तीन वेळा कुलाबा मतदारसंघातून निवडणुकीला उभे राहिले, मात्र तिन्ही वेळा त्यांना पराभव पत्करावा लागला. बॅ. ए. आर. अंतुले यांनी काँग्रेस पक्षाला या तिन्ही वेळेला विजयाची हॅट्ट्रिक साधून दिली होती. शेतकरी कामगार पक्षाच्या सलग तीन वेळच्या पराभवामुळे शेकापचे राजकीय अस्तित्व संपते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. १९९८ च्या लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या. निवडणुकीसाठी शेतकरी कामगार पक्षासमोर आता अंतुलेना टक्कर देईल असा एकही नेता नव्हता. या परिस्थितीमध्ये रामशेठ हाच एकमेव नेता शेकापला

नवसंजीवनी देऊ शकेल, यावर शेकापच्या सर्व नेत्यांचे एकमत झाले. रामशेठ व्यवसायाबरोबर दानधर्माने माणसेही वेचीत होते. मग तो कोणत्या पक्षाचा आहे, धर्माचा आहे अथवा पंथाचा आहे, हे त्यांच्यासाठी महत्त्वाचे नव्हते. 'माणूस उभा राहिला पाहिजे आणि त्यासाठी आपण सक्षम आहोत म्हणून त्यांच्या मागे आपण उभे राहिले पाहिजे,' असा विचार करणारे रामशेठ हेच शेकापला तारू शकतात, याची खात्री नेत्यांसह पक्ष कार्यकर्त्यांना होती.त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाला आता रामशेठ ठाकूर हा एकमेव पर्याय उरला होता.

आपल्या व्यवसायाच्या व्यग्र वेळेतून रामशेठ आपले अनेक सहकारी व मित्रमंडळींसोबत नेहमी वर्षातून एकदा परदेशाची वारी करीत. अशाच एका परदेशदौऱ्यादरम्यान शेकापचे सरचिटणीस भाई जयंत पाटील व इतर नेते सोबत होते. रामशेठ शिक्षक असल्याने त्यांचे मराठीबरोबरच हिंदी व इंग्रजीवरही प्रभुत्व होते. त्यांच्या या भाषा प्रभुत्वाचा अनुभव त्यांनी अनेक वेळा घेतलेला होता. रामशेठसारखा उच्चशिक्षित उमेदवार शेतकरी कामगार पक्षासाठी लोकसभेत गेल्यास त्याचा फायदा पक्षाला होईल, असा विचार त्यांच्या मनात आला. सर्व नेत्यांनी शेकापचा लोकसभेतील उमेदवार मनोमन पक्का केला. व्यावसायिक आणि सामाजिक वाटचालीत रामशेठ यांचे आगरी समाजामध्ये मोठे स्थान निर्माण झाले होते, हेही सगळ्यांना माहिती होते. जयंतभाई पाटील यांनी रामशेठ यांना याबाबत विचारणा केली, पण रामशेठ यांनी त्यांना नकार दिला होता. पण शेकापकडे आता पर्यायच उरला नव्हता, त्यामुळे शेकाप नेत्यांच्या मीटिंगमध्ये आपण रामशेठ यांना लोकसभेसाठी उभे करू असा प्रस्ताव मांडण्यात आला. सगळ्यांनी या प्रस्तावाला एकमुखाने होकार देऊन रामशेठ यांची उमेदवारी अधिकृतपणे जाहीर केली. मात्र रामशेठ या निवडणुकीत उभे राहण्यास तयार नव्हते. "राजकारण माझे काम नाही. तुम्ही लढा, मी निवडणुकीसाठी मदत करायला तयार आहे. कृपया, मला या फंदात पाडू नका," असे त्यांनी स्पष्ट सांगितले. शेकापच्या नेत्यांनी मिनतवाऱ्या केल्या, तेव्हा नाईलाजाने ते तयार झाले. राजकारणात उतरण्याची त्यांची अजिबात इच्छा नव्हती. आजपर्यंत ते शेतकरी कामगार पक्षात 'किंगमेकरची' भूमिका बजावीत होते. मार्केट यार्ड, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुका, विवेक पाटील आणि दत्तूशेठ पाटील यांच्या विधानसभेच्या निवडणुका यामध्ये आपली महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी निभावली होती. सरपंच, सभापती यांच्या नियुक्त्या करण्यात त्यांचा सहभाग असायचा, पण प्रत्यक्ष राजकारणात सक्रिय सहभाग कधीच नव्हता. रामशेठ ठाकूर यांनी रायगडच्या सामाजिक, राजकीय जीवनामध्ये आपली एक वेगळी प्रतिमा निर्माण केली होती. शेतकरी कामगार पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी आपले कौशल्य पणाला लावले होते.

सन १९९८ च्या लोकसभेसाठी मात्र नेत्यांबरोबरच कार्यकर्तेही रामशेठ यांच्या नावासाठी आग्रह धरू लागले. रामशेठ ठाकूर व्यावसायिक वाटचालीत जवळ जवळ २३ वर्षे रेती, दगड, माती, सिमेंट यांच्यात रंगून गेले होते. व्यवसाय आणि समाजकारण याच्यापलीकडे जाऊन सक्रिय राजकारणाचा विचार त्यांनी फारसा कधी केला नव्हता. मात्र पक्षनेते आणि कार्यकर्ते यांच्या आग्रहाखातर ते खासदारकीची निवडणूक

लढविण्यास राजी झाले. त्यांनी सगळ्यांच्या आग्रहाखातर सक्रिय राजकारणात उडी घेतली.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले व शिवसेना नेते व ठाण्याचे महापौर अनंत तरे यांच्याविरुद्ध लढाई होती. रायगड जिल्ह्यातील सर्व बहुजन समाज, शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, पक्षातील कार्यकर्ते तहानभूक विसरून रामशेठ यांच्या प्रचाराच्या कामाला लागले. ही लढाई मोठी आणि दिग्गजांशी होती. इंदिरा गांधींचे जवळचे सहकारी असलेले, महाराष्ट्राच्या राजकारणात आपली पक्की पकड असलेले माजी मुख्यमंत्री, देशाचे आरोग्यमंत्री, काँग्रेसचे एक मात्तब्बर नेते, ज्यांना नुसते बघण्यासाठी त्यांच्या सभांना लोक जमत होते. दुसऱ्या बाजूला शिवसेनेचे एक वजनदार नेते आणि आगरी कोळी समाजाचे श्रद्धास्थान, एकविरा देवस्थानचे अध्यक्ष, त्याचबरोबर ठाण्याचे महापौर अनंत तरे यांच्याशी लढाई होती.

रामशेठ यांना स्वतःच्या क्षमता माहीत होत्या. आजपर्यंत प्रचंड आत्मविश्वासामुळे त्यांनी आपल्या शैक्षणिक, व्यावसायिक यशाची कमान उभी केली होती. त्यामुळे राजकारणाचा सारीपाट त्यांना अवघड नव्हताच. त्यांनी आपल्या प्रचाराची नेमकी दिशा निश्चित केली. त्यांच्यासमोर फक्त पनवेल, उरणचे राजकारण नव्हते. त्यांना संपूर्ण रायगड जिल्हा समजून घ्यायचा होता. कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, रोहा, माणगाव, अलिबाग, श्रीवर्धन, म्हसळा, मुरूड या तालुक्यांतील गावे, वस्त्या, पाडे यांच्या डोंगरकपारीमध्ये वसलेली खेडी, आदिवासी पाडी पालथी घालून त्यांच्यापर्यंत पोहोचायचं होतं. आपल्या प्रचाराची रणनीती आखायला त्यांनी सुरुवात केली. आपल्याला प्रचारात वेगळे काय करता येईल, याचा विचार करू लागले.

जानेवारी महिन्यात आचारसंहिता लागणार होती. साधारण डिसेंबर महिन्यात प्रचाराला सुरुवात झाली. त्यांनी संपूर्ण रायगडभर नववर्षाच्या स्वागताचे बॅनर लावण्यास सांगितले. यामुळे त्यांची छबी गावखेड्यांपर्यंत पोहोचली. लोकांना रामशेठ यांचा चेहरा ओळखीचा झाला. प्रत्यक्ष प्रचाराला पोहोचण्याअगोदर रामशेठ चेहऱ्याने रायगडकरांच्या घराघरांत पोहोचले होते. प्रचाराची सुरुवात एकवीरा आईच्या दर्शनाने करावी म्हणून कार्ल्याला गेले. एकवीरा आईची खणानारळाने ओटी भरली. आईला विजयाचे साकडे घातले. देवीचा कौल मागितला. आईने निवडणुकीत विजयाचा कौल दिला. तिच्या आशीर्वादाने विजयाचा संकल्प करूनच ते पायऱ्या उतरले.

लढाई म्हटली, की शत्रूच्या गोटात काय सुरू आहे, हे जाणून घेणे महत्त्वाचे असते, त्यानुसार आपली रणनीती आखता येते. रामशेठ यांनी हेच केले. समोरच्या उमेदवारांची प्रचारतंत्रे त्यांनी जाणून आपले प्रचारतंत्र ठरवायला सुरुवात केली. उमेदवारी अर्ज भरताना असाच एक प्रसंग घडला. शिवसेनेचे उमेदवार अनंत तरे यांनी रेवदंडा येथील 'श्री समर्थ बैठक' संप्रदायाचे आध्यात्मिक गुरू महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी यांचा आशीर्वाद घेऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. नानासाहेब धर्माधिकारी यांना मानणारा रायगड जिल्ह्यात फार मोठा वर्ग आहे. श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्याच्या निमित्ताने नानासाहेबांचा श्री समर्थ बैठक वर्गाकडून जिल्ह्यातील अनेक गावांत महिला व पुरुष वर्गाच्या बैठका



● कुलाबा मतदारसंघाचे लोकसभेचे उमेदवार रामशेठ ठाकूर यांच्या प्रचारादरम्यानचा क्षण

घेतल्या जातात. या बैठकांना साधकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभतो. श्री सदस्यवर्ग नानासाहेबांच्या शब्दाबाहेर नव्हता. त्यांचा शब्द अंतिम असायचा, त्यामुळे अनंत तरे यांनी आपला उमेदवारी अर्ज त्यांचे आशीर्वाद घेऊन भरल्याने नानासाहेबांचे हे श्री सदस्य अनंत तरे यांना मतदान करण्याची भीती शेकापच्या नेत्यांना वाटणे सहाजिकच होते. रामशेठ ठाकूर यांनी नेमकी परिस्थिती काय हे जाणून घ्यायचे ठरविले. दुसऱ्याच दिवशी रामशेठ ठाकूर यांनीही नानासाहेब धर्माधिकारी यांची रेवदंड्याच्या घरी जाऊन भेट घेतली व त्यांचे आशीर्वाद घेऊन प्रचंड मिरवणुकीने जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी शेकापचे ज्येष्ठ नेते प्रभाकर पाटील, आमदार दत्ता पाटील, आमदार मोहन पाटील, मीनाक्षी पाटील, माजी आमदार दत्तूशेठ पाटील, भाई जयंत पाटील उपस्थित होते.

प्रचाराला सुरुवात झाली, कार्यकर्ते प्रचंड उत्साहात होते. अलिबागला कृषिवलच्या हिरवळीवर पहिला प्रचार मेळावा घेण्यात आला. निवडणूक अटीतटीची होती. प्रचारसभा सुरू झाल्या. पनवेल-उरणमधील कार्यकर्त्यांनी गावागावांत मुक्काम ठोकले. फक्त पुरुष कार्यकर्तेच नव्हे, तर महिला कार्यकर्त्यासुद्धा कुलाबा जिल्ह्याच्या वाड्या-वस्त्यांवर जाऊन पोहोचल्या. निवडणुकीत प्रचाराची अनेक तंत्रे वापरण्यात आली. त्यात विशेष लक्षवेधी ठरले ते तिळगुळाचे वाटप. निवडणुकीच्या या काळात १४ जानेवारी १९९८ रोजी

मकरसंक्रांतीचा सण होता. हा संक्रमणाचा आनंदी दिवस रामशेठ यांनी कुलाबा मतदारसंघातील प्रत्येक घरात तिळगूळ देऊन साजरा करण्याचे ठरविले. मकरसंक्रांतीला गावे, वाड्या, वस्त्यांवर सगळीकडे एकाच दिवशी शुभेच्छाकार्ड व तिळगूळ पोहोचले. गोड तिळगुळाने रामशेठ माणसामाणसांशी जोडले गेले. हे केवळ प्रचारापुरते मर्यादित न ठेवता खासदार म्हणून निवडून आल्यानंतर मतदारांना शुभेच्छा देण्याची ही प्रथा अखंड सुरू ठेवली. निवडणुकीच्या इतिहासात हे असे पहिल्यांदाच घडत होते, त्यामुळे हे अभिनव प्रचारतंत्र सर्वत्र चर्चेचा विषय ठरले होते. दिवाळीच्या दिवशी नागरिकांना काय देता येईल म्हणून विचार करीत असताना सुगंधी उटण्याची कल्पना त्यांना सुचली. सुगंधी उटण्याची अनोखी भेट घराघरापर्यंत पोहोचविल्याने दिवाळी सुगंधित झाली. या सुगंधाचा दरवळ रायगडकरांच्या मनामनांत पोहोचला.

रामशेठ यांनी संपूर्ण जिल्हा ढवळून काढला. म्हसळा, श्रीवर्धन ते अगदी कर्जत, खालापूर ही तालुक्याची ठिकाणे प्रचारादरम्यान एकाच दिवशी गाठणे अशक्यच, त्यामुळे रामशेठ आपली बॅग भरून आपल्या कार्यकर्त्यांसह प्रचारदौऱ्यात पायपीट करीत होते. माणगाव, गोरेगाव, श्रीवर्धन, म्हसळा या ठिकाणी वस्ती केल्याशिवाय पर्याय नसायचा. डोंगरकपारीत वसलेल्या गावांपासून ते अगदी आदिवासी पाड्यांपर्यंत पोहोचण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

कार्यकर्त्यांसह रामशेठ यांचे मोठे चिरंजीव प्रशांत ठाकूर हे आपल्या वडिलांच्या प्रचारकार्याची धुरा पनवेलमधून समर्थपणे सांभाळत होते. पनवेल ऑफिसमधून पूर्ण जिल्ह्यातील कामाचा आढावा घेणे. पूर्ण जिल्ह्याला साहित्य पुरविण्याचे काम ते करीत होते. त्यांच्या कामाचा आवाका बघून विवेक पाटील म्हणायचे, "काय पोरगा आहे! दिवसरात्र काम करतोय, कधी थकत नाही." निवडणुकीचा दिवस जसा जवळ येत होता, तसे रामशेठ यांचे प्रचारदौरे व प्रचारतंत्र पाहून विरोधक धास्तावले. तेथेच रामशेठ ठाकूर यांच्या विजयाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

३ मार्च १९९८ हा दिवस रामशेठ यांच्या आयुष्यातील सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला दिवस ठरला होता. या दिवशी लोकसभा निवडणुकांचा निकाल जाहीर झाला आणि खासदार म्हणून रामशेठ ठाकूर निवडून आले. महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पानावर एक ऐतिहासिक विजय म्हणून रामशेठ ठाकूर यांच्या विजयाची नोंद झाली. महाराष्ट्रातील तमाम वर्तमानपत्रांनी 'जायंट किलर' म्हणून त्यांचा गौरव केला. शेतकरी कामगार पक्षाचा हा विजय अविस्मरणीय होता. दहा हजार मतांची आघाडी घेऊन रामशेठ यांनी शेकापच्या पराभवाची शृंखला खंडित करून शेकापला नवसंजीवनी दिली व आजवरच्या मतदानाचा इतिहासही बदलला. कार्यकर्ते म्हणायला लागले, 'अंतुलेंच्या ढेंगाखालून जाऊन रामशेठ विजयी झाले.' कार्यकर्त्यांचा जल्लोष आणि या विजयाची मिरवणूक अविस्मरणीय होती. बॅ. ए. आर. अंतुले यांच्यासारख्या मागील तीन निवडणुका लागोपाठ जिंकलेल्या मातब्बर नेत्याला पराजित करणे सोपे नव्हते. हे फक्त रामशेठ ही एक व्यक्ती म्हणून साध्य झाले होते. शेकाप नेते, कार्यकर्ते यांनी या विजयासाठी जिवापाड मेहनत घेतली होती. तरीही रामशेठ



● **खासदार म्हणून निवडून आल्यानंतर खासदारकीची शपथ घेताना रामशेठ ठाकूर**

ठाकूर या नावाचा त्यात मोठा करिष्मा होता, हे कोणीच नाकारू शकणार नाही.

राम चांगू ठाकूर यांनी लोकसभेत खासदारपदाची शपथ घेतली आणि देशाच्या सर्वोच्च सभागृहात कामाचा प्रारंभ केला. रामशेठ ठाकूर यांच्यासाठी हे सगळे स्वप्नवत होते. तरीही त्यांनी आपल्या आत्मविश्वासावर खऱ्या अर्थाने घेतलेली ही भरारी होती. हे यश सामान्य नव्हतेच. ते जेव्हा संसदेत शपथविधीसाठी गेले, त्या वेळी त्यांना न्हावा खाडीपासून संसदेपर्यंत प्रवास केलेला राम ठाकूर आठवत होता. खासदार म्हणून शपथ घेताना यांच्या भावना दाटून आल्या. ज्या मतदारांनी त्यांना प्रेम, विश्वास आणि खासदारकीचा सन्मान मिळवून दिला त्या मतदारांविषयी त्यांचे मन कृतज्ञतेने भरून आले होते. 'मला खासदार करून मतदारांनी माझ्यावर फार मोठी जबाबदारी टाकलेली आहे. ही जबाबदारी मी त्यांच्या भल्यासाठीच समर्थपणे पेलण्याचा प्रयत्न करेन,' असा निर्धार त्यांनी केला. रायगडच्या लाल मातीचे दु:ख, प्रकल्पग्रस्तांच्या वेदना, जिल्ह्यातील तरुणांची नोकरीसाठी सुरू असलेली धडफड, मच्छीमार बांधवांच्या समस्या, पाणीटंचाईने ग्रासलेल्या शेकडो गावातील बायाबापड्याची वणवण, शेतकरी, कष्टकऱ्यांची अवहेलना, प्रदूषणाचे प्रश्न या सगळ्यांनाच न्याय देऊन ते सोडवायचे आहेत,' असे त्यांनी मनोमन ठरविले. संसदेतील खासदारकीची शपथ घेत असतानाच त्यांनी स्वत:ची अजून एक शपथ घेतली. 'मी माझ्या रायगडच्या बांधवांसाठी, त्यांच्या सेवेसाठी कायम सजग राहून रात्रंदिवस काम करेन आणि एक नवा रायगड उभा करण्यासाठी प्रयत्न करेन.' ग्रामपंचायत सदस्य किंवा कधीही पंचायत समितीचे कार्यालय न पाहिलेले रामशेठ ठाकूर हे आता देशाच्या सर्वोच्च सभागृहामध्ये

लोकसभेमध्ये सन्माननीय सदस्य म्हणून बसले होते. सभागृह म्हणजे नेमके काय आहे, आपण खासदार म्हणून नेमके काय करायला हवे, येथे कशा पद्धतीने सुरुवात करायची, कशा पद्धतीने वावरायचे, येथील प्रोटोकॉल कसे पाळायचे, त्यांना काहीही माहिती नव्हते. मात्र सकारात्मक निर्णय घेणारा एक शिक्षक, प्रचंड आत्मविश्वास असणारा एक व्यावसायिक त्यांना सतत सांगत होता, 'काळजी करू नको, तुझ्यात ती क्षमता आहे, त्यामुळे तुला येथे काहीच कमी पडणार नाही. चालत राहा... शोधत राहा... पाहत राहा... ऐकत राहा... नक्की सापडेल जे तुला हवे आहे ते... यश तुझ्यासोबत कायमच आहे. अपयशाची भीती बाळगू नकोस,' त्यांच्यातला अभ्यासू शिक्षक, व्यवहारी व्यावसायिक, संयमशील, धीरोदत्त माणूस जागा झाला होता. त्यांनी लोकसभेतील कामकाजाचे अवलोकन करायला सुरुवात केली. लोकसभेत वेगवेगळ्या प्रांतांतून आलेले, वेगवेगळ्या संस्कृतीतून घडलेले, वेगवेगळे भाषिक नेते कशा पद्धतीने आपल्या मतदारसंघातील, जिल्ह्यातील, राज्यातील समस्यांचा आढावा घेत सादरीकरण करीत आहेत, त्यांचे वैचारिक, सामाजिक, राजकीय दृष्टिकोन रामशेठ समजून घेऊ लागले. सत्य काय असते, याचा सारासार विचार करू लागले. लोकसभेत प्रश्न कसे मांडावेत, याचे बारकावे टिपायला त्यांना फार वेळ लागलाच नाही. प्रत्यक्ष संसदीय आयुधांचा वापर करायला ते लगेच शिकले. संसदेत प्रश्नोत्तरे आणि शून्य प्रहरात चर्चेला घेतल्या जाणाऱ्या प्रश्नांमध्ये त्यांनी आपल्या मतदारसंघातील अनेक समस्या सभागृहासमोर ठेवल्या. सभागृहात प्रश्न मांडण्यासाठी अपक्ष खासदारांना फार कमी वेळ मिळत असे. म्हणून आपल्याला मिळणारा वेळ पाहता त्या कमी वेळामध्ये जास्तीत जास्त सूचकपणे प्रश्न कसे मांडता येतील, याचाही ते विचार करू लागले. वेळेचे गणित त्यांना लवकर सोडविता आले. ते स्पष्टपणे आपली मते संसदेत मांडू लागले.

सभागृहात गेल्यानंतर त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक प्रश्नांना हात घातला. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले. त्यात रेल्वे अर्थसंकल्पात लोकसभेत उपस्थित झालेल्या चर्चेत त्यांनी भाग घेतला. रेल्वे अर्थसंकल्पावरील चर्चा प्रदीर्घ काळ चाललेली असताना अधिवेशनातील या चर्चेत भाग घेण्यासाठी त्यांना पहाटे ०१.३५ वाजता बोलण्याची संधी मिळाली. या वेळी बोलताना ते म्हणाले,

'अध्यक्ष महोदय,

आपण मला भल्या पहाटे बोलण्याची परवानगी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. माननीय रेल्वेमंत्र्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावरून असे दिसते, की रेल्वेची संकल्पित कामे पूर्ण करण्यासाठी आणखी कमीत कमी ३५ ते ४० हजार कोटी रुपये लागणार आहेत. ही रक्कम लवकर उपलब्ध झाली, तरच जुनी अर्धवट असलेली कामे पूर्ण होऊ शकतील. गेले तीन दिवस चाललेली ही चर्चा विचारात घेता आणि माझ्या सहकारी खासदारांनी सुचविलेल्या कामांची यादी पाहता, त्यासाठी कमीत कमी एक लाख कोटी रुपयांची गरज भासणार आहे. म्हणून मला वाटते, की रेल्वेमंत्री नितीश कुमार व रेल्वे राज्यमंत्री राम नाईक यांनी हाती घेतलेली कामे त्वरित पूर्ण करावीत. मुंबईतील रेल्वेची परिस्थिती सुधारण्याकरिता अर्थसंकल्पात

योग्य ती तरतूद केल्याबद्दल मंत्रिमहोदयांचा मी आभारी आहे. परंतु मुंबई व नजीकच्या वसई-विरारचे काम होत असता महाराष्ट्राच्या इतर भागाकडे दुर्लक्ष होता कामा नये. नवी मुंबई, रायगड जिल्हा, वसई-विरार, ठाणेलगत असून, तेथेदेखील महत्त्वाच्या कामाकडे लक्ष द्यायला हवे. १९९५-९६ मध्ये ठाणे-नेरूळ-तुर्भे रेल्वे प्रकल्पासाठी १३१.४७ कोटींची तरतूद केली होती. परंतु या प्रकल्पावर अवघ्या तीन कोटींची कामे झाली. पनवेल-बेलापूर रेल्वे मार्ग दुहेरी करण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात काय व्यवस्था व कोणते निर्णय घेतले गेले, याचा पत्ताच लागत नाही. माजी रेल्वे राज्यमंत्री सुरेश कलमाडी व माजी खासदार ए. आर. अंतुले यांनी मोठा गाजावाजा करून कर्जत-पनवेल रेल्वेमार्गाचा मुहूर्त केला, परंतु अंदाजपत्रकात तरतूद केलेल्या रकमेपैकी त्या कामावर आजवर फक्त १६ लाख रुपये खर्च करण्यात आले. चालू वर्षीही पनवेल-कर्जत मार्गाचे काम सुरू होणार आहे. त्या वेळी तरी अंदाजपत्रकात तरतूद केलेली पूर्ण रक्कम या कामावर खर्च करून या कामाला गती द्यावी, जेणेकरून पनवेल-कर्जत रेल्वे लवकर सुरू होईल. ही कर्जत लोकल वाशी-बेलापूर-पनवेल-कर्जत अशी जाणार असल्याने दिवा-कल्याणमार्गे जाणाऱ्या गाडीपेक्षा तिला कमी वेळ लागणार आहे.

अध्यक्ष महोदय,

मी माझ्या रायगड जिल्ह्याच्या प्रश्नासंबंधी बोलू इच्छितो, की या जिल्ह्यात उरणकडे जी मालगाडी सुरू आहे, तेथे ती प्रवासी गाडी त्वरेने सुरू होणे आवश्यक आहे. ही तेथील लोकांची अनेक वर्षांपूर्वीची मागणी आहे. तसेच थळ-वायशेत मार्गावर वीस वर्षे मालवाहतूक सुरू आहे, तेथेही प्रवासी वाहतूक सुरू करावी, अशी माझी मागणी आहे.

मुंबई-ठाण्याजवळच माथेरान हे थंड हवेचे निसर्गरम्य व सुंदर ठिकाण आहे. तेथे नॅरोगेज गाडी सध्या सुरू आहे. या गाडीसाठी आणखी एका नव्या इंजिनची गरज आहे. तेथील लोकांची गेल्या अठरा वर्षांपासून ही मागणी आहे. ती आजपर्यंत पूर्ण होऊ शकली नाही. परिणामी येथील नॅरोगेज गाडीच्या अव्यवस्थेमुळे पर्यटकांना लोणावळा व महाबळेश्वरसारख्या दूरच्या ठिकाणी जावे लागते.

अध्यक्ष महोदय,

संपूर्ण भारतात आमच्या कोकण रेल्वेचे नाव मोठ्या अभिमानाने घेतले जाते. ही कोकण रेल्वे ज्या रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातून जाते त्या जिल्ह्यातील कोलाड, रोहे, माणगाव या स्टेशनांवर ती थांबत नाही. माझी आपल्याकडे आग्रही मागणी आहे, की या सर्व स्टेशनांवर ही गाडी थांबविण्यात यावी. तसेच या रेल्वे स्थानकावर स्थानिक प्रकल्पग्रस्तांना स्टॉल देण्यात यावेत. त्याचबरोबर कोकणवासीयांसाठी मुंबई-सावंतवाडी आणखी एक गाडी सुरू करावी. मंत्रिमहोदयांनी या माझ्या सर्व मागण्या विचारात घेऊन मान्य कराव्यात, अशी विनंती करतो.'

खासदार म्हणून रामशेठ ठाकूर यांचा आवाज पहाटेच्या निरव शांततेत संसदेच्या सभागृहाने पहिल्यांदाच

ऐकला. वाढती महागाई, महिला राखीव धोरण या संबंधीच्या चर्चेत भाग घेऊन त्यांनी आपली आग्रही भूमिका मांडली. आत्तापर्यंत गृह, रेल्वे, भूजल वाहतूक, कृषी, वाणिज्य, संचार, परराष्ट्र, रसायन, खत, नागरी विकास खात्यातील समस्यांबाबत प्रश्न विचारून जिल्हा व महाराष्ट्रातील विविध प्रश्नांना वाचा फोडली. लोकसभेतील कामकाजात पूर्णपणे सहभागी होत असताना जिल्ह्याच्या नागरी विकास कामांकडेही त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले. खासदार निधीतून त्यांनी सुरुवातीच्या काळात जिल्ह्यात २१८ विकास कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले. त्यातील अनेक प्रस्तावांना मंजुरी मिळून कामांना प्रारंभही झाला. रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांची एकूण परिस्थिती पाहता, या सर्व तालुक्यांत कितीतरी नागरी कामे प्राधान्याने करणे आवश्यक होते, याची त्यांना जाणीव होती. त्यासंबंधी त्यांच्या मनात संकल्पनाही तयार होत्या. टप्प्याटप्प्याने त्या पूर्ण करण्याचा त्यांचा मानस होता. यासाठी नुसता खासदार निधी पुरेसा होणार नव्हता म्हणून इतर माध्यमातील निधी या विकास कामांसाठी उपलब्ध करून घेण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. त्यांना खात्री होती, त्यांच्या प्रयत्नांना नजीकच्या काळात यश येऊन जिल्ह्यातील विकास कामे गतिमान नक्की होतील. ती अनेक कामे पूर्णत्वालाही गेली.

बेरोजगारांना स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी बीज भांडवल देणाऱ्या जिल्हा उद्योग केंद्राच्या बैठकींना उपस्थित राहून जास्तीत जास्त बेरोजगारांना बीज भांडवल कसे मिळवून देता येईल म्हणून प्रयत्न केले. जिल्हा उद्योग केंद्राच्या बैठकींना उपस्थित राहून बेरोजगारांना सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी धडपडणारे कुलाबा जिल्ह्यातील ते पहिलेच खासदार होते.

१९९८ मध्ये केंद्र सरकारने आयोडीनयुक्त मिठाची सक्ती करणारा आदेश काढला. या आदेशामुळे मुंबई, ठाणे, रायगडसह कोकणातील किनारपट्टीतील हजारो शिलेंऱ्यावर उपासमारीची वेळ येणार होती. साध्या मिठामुळे गलगंड रोगाची लागण होण्याचा संभव असल्याचे सरकारचे म्हणणे होते. हे प्रमाण हजारात १.२% असल्याचे सरकारच्या आरोग्य खात्याच्या अहवालात म्हटले होते. म्हणजे एक हजारात फक्त दोघांना लागण होण्याची शक्यता होती. मग ९९८ जणांवर होणाऱ्या अन्यायाचे काय? ही तीव्र भावना घेऊन वनमंत्री सुरेश प्रभू, खासदार सतीश प्रधान, खासदार प्रकाश परांजपे यांच्यासह त्यांनी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री - स्वतंत्र प्रभार असलेले दलित एझिलमलाई यांची दिल्लीत शिष्टमंडळासह भेट घेतली. महात्मा गांधींनी मिठाचे महत्त्व ओळखून ब्रिटिशांनी त्यावर लादलेला कर रद्द करण्यासाठी देशभर जनआंदोलन केले. हे सरकार मात्र भांडवलदारांच्या हितासाठी या साध्या मिठावर बंदी घालते, हा अन्याय सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी सुनावले. त्यांच्या या तीव्र भावना स्वास्थ्य कल्याण मंत्री महोदयांनी ऐकून घेतल्या आणि आपल्या आदेशाला तीन महिन्यांची स्थगिती दिली.

७ डिसेंबर १९९८ रोजी लोकसभेत महागाईचा प्रश्न चर्चेला आला. विषय होता जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये होणाऱ्या वाढीविषयी. खासदार रामशेठ ठाकूर यांना या प्रश्नावर बोलण्याची संधी मिळाली.



● **आमदार गणपतराव देशमुख, आमदार दत्तूशेठ पाटील संसदेच्या पहिल्या अधिवेशनानंतर खासदार मा. रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन करताना**

तेव्हा बोलताना ते म्हणाले,

'अध्यक्ष महोदय,

आपण जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत होणाऱ्या वाढीबद्दल सुरू असलेल्या चर्चेमध्ये बोलण्यास परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. प्रत्येक सरकार प्रत्येक अधिवेशनामध्ये या विषयावर सविस्तर चर्चा करीत असते. मला वाटते, मागील अधिवेशनामध्ये सुद्धा याबाबत चर्चा करण्यात आली होती. मी स्वतः नवीन खासदार असल्यामुळे मात्र या चर्चेला विशेष महत्त्व आहे, असे समजतो. मला वाटते, पूर्वी केलेली सर्व चर्चा व्यर्थ ठरलेली आहे. आपणाला ही चर्चा सतत का करावी लागते, याचा विचार करायला पाहिजे. आपण येथे जी चर्चा करीत आहोत, ही गांभीर्याने करायला हवी. अन्यथा मी जे बोलतोय ते फक्त कोठेतरी रेकॉर्डवर यावे, याकरिता बोलतो आहे ,असे असू नये. विद्यमान सरकारने या सर्व परिस्थितीला आपण जबाबदार नाही, तर मागील सरकार जबाबदार आहे आणि त्यांनी काही केले नाही म्हणून आम्ही करणार नाही, हे म्हणणे चुकीचे ठरेल. यावर मी काही नवीन पर्याय सुचवीत आहे, असे देखील नाही. सर्वांनाच वाटते, की भाववाढ होऊ नये. असे असूनसुद्धा यामध्ये परिवर्तन मात्र होत नाही. एका बाजूला आम्ही पक्षविरहित चर्चा करतो असे दाखवून, प्रत्येक जण आपापल्या राज्य सरकारची बाजू घेऊन बोलत असून, ते महागाई कमी असल्याचा आव आणीत आहेत. अशा चर्चेने जनता भाववाढीतून मुक्त होईल, असे वाटत नाही.

सध्याच्या काळात शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारभाव मिळत नाही. कांदे-बटाटे महागले आहेत. आज ३० ते ६० रुपये प्रति किलोने कांदे बाजारात विकले जात आहेत. या भाववाढीचा शेतकऱ्यांना मात्र काडीचाही फायदा होत नाही. बाजारभावापेक्षा कितीतरी प्रमाणात कमी भावाने शेतकरी आपला शेतमाल व्यापाऱ्यांना विकत असतो. तरीदेखील ही महागाई कशी वाढते, यासाठी भांडवलदार व्यापारी व साठे करणाऱ्यांवर छापे टाकले, तर लगेच त्यांचे परिणाम आपल्याला दिसून येतील. मी महाराष्ट्राबद्दल येथे सांगू इच्छितो, की 'मॅफको' नवी मुंबई येथे अशा प्रकारचा छापा टाकून चार ते साडेचार कोटी रुपयांचे कांदे हस्तगत केले. परिणामी ५० रुपयांवरून ३० रुपये एवढे प्रति किलोपर्यंत भाव उतरले. अशा प्रकारची कारवाई सर्वत्र झाली, तर महागाई कमी होईल. महागाई ८.४ टक्क्यांवरून ८.१ टक्क्यांपर्यंत खाली आली, असे म्हटल्याने मानसिक समाधान मिळेल, मात्र सामान्य माणसाला त्यातून काही फायदा मिळणार नाही. काही वस्तूंचा एक ते दोन टक्क्यांनी भाव उतरणे हे ठीक नाही. या भाववाढीमध्ये कांदा बटाट्याचा भाव ३०० ते ४०० टक्क्यांनी वाढतो, शेंगदाण्याचा भाव ३० टक्क्यांनी वाढतो, यामुळे जनतेला जीवन जगणे कठीण होत चालले आहे. याचा परिणाम तीन-चार राज्यांमध्ये अलीकडे झालेल्या निवडणुकीत सरकारला भोगावा लागला आहे. हे सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी मान्य केला आहे. यामध्ये जनतेची काहीच चूक नाही, असे मी मानतो. म्हणून या चर्चेतील विधायक सूचना जास्तीत जास्त अमलात आणण्याबाबत आपण विचार करूया.'

खासदार रामशेठ ठाकूर यांनी दिनांक १६ सप्टेंबर १९९८ रोजी पनवेलमधील प्रस्तावित विमानतळाबाबत सिडकोच्या अध्यक्षांना पत्र लिहून या विमानतळाच्या प्रस्तावामुळे चिंचपाडा, वाघिवली, कोपर, खारघर, उलवे, पारगाव आणि त्या परिसरातील नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाल्याने त्यासंदर्भात वस्तुनिष्ठ भूमिका समजून घेण्याकरिता त्याचबरोबर खाणमालकांच्या समस्यांबाबत चर्चा करण्याकरिता ३० सप्टेंबर १९९८ रोजी नरिमन पॉईंट, मुंबई येथील सिडकोच्या निर्मल भवन कार्यालयात सिडकोचे चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर, मुख्य प्लॅनर या प्रमुख अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

पनवेल परिसरात सिडकोतर्फे येऊ घातलेल्या नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीच्या प्रस्तावामुळे या परिसरातील स्थानिक जनतेच्या मनामध्ये बऱ्याच गोष्टींबाबत शंका निर्माण झाली होती. हा प्रस्ताव नेमका काय आहे? त्याची नेमकी वस्तुस्थिती काय आहे? त्याचबरोबर विमानतळामुळे स्थानिक जनतेला कोणकोणते फायदे, तोटे होतील? हे समजून घेण्याकरिता खासदार या नात्याने व स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून रामशेठ यांनी सिडकोकडे चर्चेची मागणी केली. विमानतळाचा प्रस्ताव स्थानिक लोकांना जर फायदेशीर असेल, तरी या प्रस्तावामधून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होऊ शकेल का, हे त्या परिसरातील जनतेला कळले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. त्यामुळे विमानतळ हे प्रत्यक्ष कार्यान्वित होण्यापूर्वी त्याचा फायदा घेण्याकरिता लोकांची मानसिकता तयार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले.

ज्या भागातील जमिनी सिडको घेणार आहे व या अगोदर इतर प्रकल्पांसाठी घेतलेल्या आहेत, त्या

प्रकल्पग्रस्तांना प्रस्तावित विमानतळ किंवा अन्य प्रकल्पांचा फायदा मिळायला हवा अशी त्यांनी ठाम भूमिका घेतली. विमानतळासाठी लागणारी जमीन भराव टाकून उंची वाढणार असल्याने या परिसरातील कोल्ही, कोपर, डुंगी, पारगाव या गावात भरतीचे व पुराचे पाणी येईल व त्यासाठी पाण्याची पातळी थांबवावी लागेल, त्या दृष्टीने बंधाऱ्याची उपायोजना करावी, अशी मागणी रामशेठ ठाकूर यांनी केली. नवी मुंबईतील प्रस्तावित विमानतळाबाबत रामशेठ ठाकूर यांनी सिडको अधिकाऱ्यांशी नुसती चर्चाच केली नाही, तर यासंबंधीचा एक तारांकित प्रश्न (क्रमांक ३७९ दिनांक) २५ फेब्रुवारी १९९९ लोकसभेत विचारला तो असा.

१) नवी मुंबई विमानतळावर होणाऱ्या गर्दीमुळे मुंबईजवळ पर्यायी विमानतळ उभारण्याचा सरकार विचार करीत आहे काय?

२) असे असेल तर त्या विमानतळाकरिता कोणते ठिकाण निश्चित केले आहे आणि त्यासाठी किती जमीन संपादन करण्याचे ठरविले आहे

रामशेठ ठाकूर यांच्या या प्रश्नांवर तत्कालीन नागरी विमान वाहतूक मंत्री अनंत कुमार यांनी उत्तर दिले, की विमानतळाची आवश्यकता तपासण्याकरिता सरकार एका समितीची स्थापना करून या समितीच्या अहवालानंतर याबाबत विचार करेल.

रामशेठ ठाकूर यांनी सुरुवातीपासूनच नवी मुंबईतील प्रस्तावित विमानतळाचा पाठपुरावा करून लोकांच्या समस्यांचाही विचार सुरू केला होता आणि लोकसभेत आपली दूरदृष्टी दाखवून दिली होती.

१९९८ ची खासदारकीची निवडणूक रामशेठ ठाकूर पहिल्यांदा लढले असले, तरी रायगडकरांसाठी खासदार म्हणून केलेली कामे रायगडकर कधीच विसरणार नाहीत. त्यांनी खासदार निधीतून जिल्ह्यात ४ कोटी ८७ लाखांच्या २१८ विकास कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून मंजूर करून ती कामे पूर्ण करून घेतली .

- अलिबाग, पेण, रसायनी, खोपोली येथे मुंबईहून थेट लोकल दूरध्वनी सेवा सुरू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन योग्य निर्णयासाठी चर्चा करून घेतली.
- पनवेल नगरपालिकेच्या पाणीपट्टी दरवाढीविरोधात खासदार रामशेठ ठाकूर यांनी नगरपालिकेवर प्रचंड मोर्चा काढला व पाणीपट्टीची दरवाढ थांबविण्यासाठी प्रयत्न केले.
- कोकण रेल्वे पेण, कोलाड, रोहे स्थानकात थांबत नव्हती. या गाड्या थेट सावंतवाडी, गोव्याकडे रवाना होत असल्याने या पट्ट्यातील प्रवाशांना कोकणाकडे जाणाऱ्या गाड्यांचा काहीच लाभ मिळत नव्हता, म्हणून लोकसभेत रेल्वेमंत्र्यांकडे त्यांनी पेण, कोलाड, रोहे या स्थानकांत गाडी थांबवावी, अशी विनंती केली.
- पनवेल-बेलापूर मार्ग दुहेरी करणे, पनवेल-कर्जत, पनवेल-उरण अशी प्रवासी वाहतूक सुरू करण्याची आग्रही मागणी त्यांनी आपल्या पहिल्याच अर्थसंकल्पीय भाषणात केली.
- दिनांक ४ नोव्हेंबर १९९८ ला पनवेल, उरण तालुक्यांत झालेल्या वादळामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे म्हणून शासनाकडे पाठपुरावा करून आर्थिक मदत

मिळवून दिली.

• त्यांनी आपल्या खासदार निधीचा मतदारसंघासाठी पुरेपूर वापर करीत असतानाच खासदार निधी व्यतिरिक्त इतर विकास निधीतून कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून जिल्ह्याचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले. आपल्या मतदारसंघासाठी आपला पूर्ण खासदार निधी वापरणारे एकमेव खासदार रामशेठ ठाकूर होते.

• बेलपाडा व अन्य गावांसाठी २९ लाख रुपयांची जे.एन.पी.टी. प्रशासनाकडून पाणीपुरवठा योजना मंजूर करून घेतली.

• आयोडीनयुक्त मिठाची सक्ती करणाऱ्या केंद्राच्या आदेशाविरोधात केंद्रीय स्वास्थ्य व परिवार कल्याण मंत्र्यांची इतर खासदारांसह भेट घेऊन या आदेशास स्थगिती मिळविली, त्यामुळे कोकण, महाराष्ट्रातील मिठागर कामगारांची उपासमार टळू शकली.

• रायगड जिल्ह्यात गॅस सिलेंडर वितरण व्यवस्था सुरळीत व गतिमान होण्यासाठी जिल्ह्यात नवीन २२ ठिकाणी वितरण केंद्रे व केरोसीन वितरण केंद्रे सुरू करावीत, अशी रसायन व खत मंत्र्यांकडे आग्रही मागणी केली.

• कामोठा, नवघर परिसरातील गावांना पाण्याचा प्रश्न भेडसावत होता. सिडको त्यांच्या या समस्येकडे दुर्लक्ष करीत असल्याने खासदारांनी आपले उत्तरदायित्व ओळखून सिडकोकडे या गावांचा पाणीप्रश्न लवकरात लवकर सुटावा म्हणून प्रयत्न केले.

• भेंडखळ - बोकडविरा विद्युत प्रकल्प भरतीमध्ये स्थानिकांना जास्तीत जास्त नोकऱ्या मिळाव्यात म्हणून प्रयत्न करून या ठिकाणी स्थानिकांना नोकऱ्या मिळवून दिल्या व अनेकांचे संसार उभे केले.

• जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न १३ जुलै १९९८ रोजी लोकसभेत उपस्थित करून प्रकल्पग्रस्तांच्या, शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी संसदेत केली.

• दास इंजिनीअर कंपनी स्थानिकांना नोकरीतून डावलण्याचा प्रयत्न करत होती. हे रामशेठ ठाकूर यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी कंपनी व्यवस्थापनाशी चर्चा करून कोणत्याही परिस्थितीत स्थानिकांना नोकर भरतीतून डावलू दिले जाणार नाही, असे सांगून कंपनीला ९० लोकांना नोकऱ्या देण्यास भाग पाडले.

• जवाहरलाल नेहरू बंदर प्रकल्पात गावातील रस्ते, पाणीपुरवठा, खेळाचे मैदान, स्मशानभूमी ही नागरी विकासाची कामे करण्यासाठी बंदर प्रशासनाकडे आग्रह धरून मंजूर करून घेतली.

• नेरळ रेल्वे स्टेशनवर मुंबईकडील टोकाजवळ तिकीट खिडकी उघडण्यास रेल्वे प्रशासनाकडून मंजुरी मिळविली.

• मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यात स्वतंत्र दूरध्वनी केंद्र उभारण्याची मागणी मान्य करून घेण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

• रायगड मधील दूरध्वनीसंबंधीच्या अनेक तक्रारी खासदार म्हणून रामशेठ ठाकूर यांच्याकडे आल्या होत्या. दि. २१ जुलै १९९८ रोजी या तक्रारीसंदर्भात संसदेत प्रश्न विचारून त्या सोडविण्यासाठी संबंधित मंत्र्यांना कळकळीची विनंती केली.

रायगड लोकसभा मतदारसंघातील पनवेल, उरण, कर्जत, खालापूरपासून ते दक्षिणेच्या टोकाला असलेल्या श्रीवर्धन, म्हसळा, मुरूडपर्यंत गावागावांत समाजमंदिरे, व्यायामशाळा, पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, पाईपलाईन अशा सर्व सुविधा लोकांपर्यंत पोहोचविल्या.

रामशेठ ठाकूर यांची पहिलीच खासदारकी. संसदेत गेलेले रामशेठ यांना खासदार म्हणून संसदेच्या कामाची माहिती नसतानाही त्यांनी कमी वेळात ते शिकून घेतले. त्यांच्या कामाचा आवाका अफाट होता.

बघता बघता खासदारकीचा एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला. या कालावधीत त्यांनी रायगडकरांसाठी खूप कामे केली. एक वर्षाच्या खासदारकीच्या कालखंडाचे सिंहावलोकन करताना त्यांनी वर्षभराच्या कामाचा आढावा 'जाणीव' या कार्य अहवालातून मतदारांना करून दिला. या अहवालात शेकापच्या नेत्यांनी त्यांच्या कार्याचा केलेला गौरव तितकाच महत्त्वाचा होता.

या अहवालातून त्यांच्याबद्दल बोलताना ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील म्हणतात, 'खऱ्या अर्थाने रामशेठ ही रायगडला मिळालेली नवसंजीवनीच म्हटली पाहिजे. सामान्य पंचायतीचा सदस्य, जिल्हा परिषद सदस्य अशा क्षेत्राची काडीची माहिती नसलेले रामशेठ ठाकूर खासदार होणे ही घटना खरेतर विरोधकांना अंतर्मुख करणारी आहे. प्रत्यक्ष राजकारणात नसले, तरी त्यांच्या कुटुंबाचा शेतकरी कामगार पक्षाशी वर्षानुवर्षांचा संबंध होता. पक्षाने हाती घेतलेल्या विविध आंदोलनात रामशेठ यांचा प्रत्यक्ष संबंध येत होता. रामशेठ यांचा राजकारणाशी संबंध नसतानाही त्यांना दिल्लीत पाठविण्याची कामगिरी करून रायगडकरांनी वेगळाच इतिहास घडविला आहे. केवळ लोकसंपर्क असून चालत नाही, तर त्यांच्या प्रश्नाला किती जवळ करतो, यावर उमेदवाराचे यशापयश अवलंबून असते. रामशेठ ठाकूर यांनी कोणत्या क्षेत्रात मदत केली नाही, असे क्षेत्र शोधूनही सापडणार नाही. इतका जिव्हाळा रामशेठ यांनी मिळविला आहे. त्यांचे सासरे जनार्दन भगत यांच्या पश्चात त्यांनी हाती घेतलेले कार्य तडीस नेताना शिक्षण क्षेत्राबरोबरच सहकार क्षेत्रालाही रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह वाहून घेतले आहे. एकीकडे हजारो, लाखो रुपये खर्चून शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्या संस्थांपुढे रामशेठ ठाकूर यांनी 'जनार्दन भगत शिक्षण संस्था' उभी करून माध्यमिक, उच्च माध्यमिक, स्टेट बोर्ड व सीबीएसई बोर्डाच्या उच्च दर्जा असलेल्या आदर्श शाळा निर्माण केल्या. चांगू काना ठाकूर महाविद्यालयातून कला, वाणिज्य, विज्ञान शाखेबरोबरच अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांची सोय त्यांनी उपलब्ध करून दिली. त्यांच्या संकल्पनेतून उभे राहिलेले लॉ कॉलेज आज नावारूपाला आले आहे. या महाविद्यालयात शिकलेला विद्यार्थी न्यायाधीश झाला, ही अभिमानस्पद बाब आहे. ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी होणारी परवड खासदार रामशेठ ठाकूर यांच्यामुळे थांबली. त्यांच्यामुळेच

गव्हाणसारख्या गावात प्रचंड मोठे शैक्षणिक संकुल उभे राहू शकले.

शिक्षण देताना श्रमाची लाज वाटू नये, याचा आदर्श वस्तुपाठ म्हणून त्यांच्याकडे पाहावे लागेल. कुटुंबाची स्थिती नसताना ते रयत शिक्षण संस्थेत कष्ट करून शिकले, कष्ट करून घेतलेल्या शिक्षणाचे काय मोल असते ते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनात पाहायला मिळते.'

त्याच कार्य अहवालामध्ये शेकापचे नेते प्रभाकर पाटील यांनी मोजक्या शब्दांतून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत, ते म्हणतात,

'आपला खासदार लोकसभेत जाऊन केवळ वातानुकूलित वास्तूमध्ये झोपा काढत नाही आणि जनसेवेच्या कामाखेरीज त्यांना झोप येत नाही, त्याबद्दल खासदार रामशेठ ठाकूरसाहेबांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच आहेत.'

शेकापचे नेते व माजी आमदार दत्तूशेठ पाटील या अहवालातून व्यक्त होताना म्हणाले, 'खासदार रामशेठ ठाकूर यांच्यामुळे पनवेलप्रमाणेच संपूर्ण रायगड जिल्ह्यात शेकापची ताकद निश्चित वाढली आहे. सर्वसामान्यांशी एकरूप होणारे खासदार आपल्याच कुटुंबातील आहेत, अशीच प्रत्येकाची भावना झाली आहे. शेकापची सर्वसामान्यांशी असलेली बांधिलकी ते जपत आहेत. कदाचित म्हणूनच असेल त्यांच्यामुळे शेकापच्या ताकतीत फरक पडला आहे, हे कोणीही मान्य करेल. खासदार रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने शेतकरी कामगार पक्षाला एक जिल्हा प्रतिनिधी मिळाला आहे. त्यांच्यामुळे खऱ्या अर्थाने शेतकरी कामगार पक्षाला संजीवनी मिळाली. तन-मन-धन अर्पून पक्षाच्या ध्येयधोरणांशी एकरूप झालेले, शेकापच्या मातीत मिसळलेले खासदार रामशेठ ठाकूर विकासकामांबाबत एवढे एकरूप होतात, की ते चालती फिरती संस्था झाले. त्यांच्या कामाचा फायदा रायगडवासीयांना झाल्यामुळे ते त्यांच्या गळ्यातील ताईत झाले.'

'जाणीव' अहवालातून 'कर्तृत्ववान खासदार' म्हणून रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल अलिबागचे भाई जयंत पाटील म्हणतात, 'रायगड जिल्ह्यात १९५२ सालापासून आतापर्यंत जे खासदार झाले त्यात सर्वांशी जनसंपर्क ठेवून अविश्रांत काम करणारे एकमेव खासदार म्हणून रामशेठ ठाकूर यांचेच नाव घ्यावे लागेल. निवडून आल्यानंतर त्यांनी वर्षभरातच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला किमान आठ ते दहा वेळा भेटी देऊन जनसामान्यांचे प्रश्न समजून घेतले व ते सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. लोकसभेत शंभर टक्के उपस्थिती दाखवून शेतकरी व कष्टकऱ्यांचे, तसेच जिल्ह्याचे ज्वलंत प्रश्न त्यांनी लोकसभेत मांडले. पूर्वीच्या काँग्रेसच्या खासदारांना खासदार निधी वापरण्याचे भान नसायचे, पण रामशेठ ठाकूर यांनी आपल्या खासदार निधीचा पुरेपूर वापर करून जिल्ह्यात अनेक नागरी विकासाची कामे सुरू केली आहेत. एवढेच नव्हे, तर विकास कामे गतिमान व्हावीत म्हणून जिल्ह्यातील डी.आर.डी.ए.चा (ग्रामीण विकास संस्थेतर्फे) मिळणारा निधीही दहा कोटींनी वाढवून आणणारे ते पहिले खासदार आहेत. रामशेठ ठाकूर अपेक्षेपेक्षाही कर्तृत्ववान खासदार निघाले, त्याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांच्या खासदारकीच्या विजयाने पक्षात उत्साह निर्माण

झाला आहे. म्हणूनच त्यानंतर झालेल्या जिल्ह्यातील प्रत्येक निवडणुकीत शेकापची ताकद वाढून विजयश्री मिळत गेली. हा खासदारांनी केलेल्या कामांचा परिणाम म्हणावा लागेल. आज ज्या तडफेने ते काम करीत आहेत ते पाहून आमचे विरोधकही जिल्ह्याला कर्तृत्ववान खासदार मिळाला, अशी कबुली देतात. यातच खासदार रामशेठ ठाकूर यांच्या कामाचे यश सामावलेले आहे.'

'सामाजिक बांधिलकी जपणारे खासदार' म्हणून कौतुक करणारे माजी आमदार विवेक पाटील हे रामशेठ ठाकूर यांच्याबद्दल म्हणतात, 'शेतकरी कामगार पक्षाने रायगड जिल्ह्याला दिलेली सर्वात सुंदर देणगी म्हणजे खासदार रामशेठ ठाकूर, असे म्हणावेसे वाटते. खासदार म्हणून रामशेठ ठाकूर यांच्या वर्षभरातील विकासकामांवरून असे म्हणावे लागेल. समाजकार्याच्या ध्येयाने झपाटलेल्या खासदार रामशेठ ठाकूर यांनी आपला व्यवसाय बाजूला ठेवला आणि स्वतःला समाजकार्यासाठी वाहून घेतले. इतकेच नव्हे, तर शेकपच्या मातीशी, गरिबांशी बांधिलकी जपणाऱ्या पक्षाशी एकरूप होऊन त्यांनी खऱ्या अर्थाने समाजकार्याला सुरुवात केली. अहंभाव बाजूला ठेवून मन लावून काम करणारे खासदार म्हणून रामशेठ ठाकूर निश्चितच शेतकरी कामगार पक्षाची शान ठरले आहेत. खासदार रामशेठ ठाकूर यांच्यासारखा पक्षाबरोबरच समाजाशी बांधिलकी जपणारा नेता दिल्लीत आवाज उठवू लागल्याने जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या प्रकल्पात स्थानिकांना, प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याबाबत शेतकरी कामगार पक्षाने चालविलेल्या आंदोलनाला बळकटी आली आहे, हे आनंदाने कबूल करावेसे वाटते. केंद्र शासनाच्या जिल्ह्यातील विविध प्रकल्पांत स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या मिळाव्यात, यासाठी खासदार रामशेठ ठाकूर यांनी विशेष प्रयत्न केले म्हणूनच प्रकल्पग्रस्तांचे आणि स्थानिकांचे अनेक प्रश्न मार्गी लागले ही अभिमानाची गोष्ट आहे. जिल्ह्यातील पूर्वीचे खासदार आपला खासदार निधी जिल्ह्यातील कामांसाठी पुरेशा प्रमाणात वापरत नसत, असा अनुभव आहे. मात्र खासदार रामशेठ ठाकूर यांनी आपला संपूर्ण खासदार निधी नागरी विकास कामांसाठी वापरालाच, शिवाय पूर्वीच्या खासदारांनी न वापरलेला खासदार निधीही त्यांनी मंजूर करून घेतला व विकास कामांसाठी वापरला.'

१९९८ च्या सरकारमध्ये भारतीय जनता पार्टीने २२ पेक्षा अधिक प्रादेशिक पक्षांचा पाठिंबा घेऊन अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले होते. सरकार स्थापन होऊन जेमतेम तेरा महिने झाले. या तेरा महिन्यांच्या कालावधीत सरकारमध्ये अंतर्गत कुरबुरी सुरू झाल्या. जयललिता, ममता बॅनर्जी, मायावती यांनी काही कारणास्तव सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि सरकार अल्पमतात आले. अल्पमतातील सरकारविरोधात विरोधी पक्षाने अविश्वास ठराव दाखल केला. हा ठराव लोकसभेत २७० विरुद्ध २७१ मताने पास झाला. राज्य पातळीवर असणारे स्थानिक पक्ष हे लोकसभेत अपक्ष म्हणून गणले जातात. पण लोकसभेतील अविश्वास ठरावात कधी नव्हे ते या पक्षांना खूप महत्त्व आले. कारण भारतीय जनता पार्टीचे सरकार या पक्षाच्या मतांवर अवलंबून होते. त्यात मोहन रावले, शिबू सोरेन व रामशेठ ठाकूर या खासदारांच्या निर्णयावर सगळ्या

देशाचे लक्ष केंद्रित झाले. मोहन रावले अविश्वास ठरावादरम्यान अनुपस्थित राहिले. शिबू सोरेन यांनी आपण भाजपला मतदान करणार नसल्याची जाहीर भूमिका घेतली. आता एकमेव खासदार रामशेठ ठाकूर यांच्यावर सरकार निर्भर होते. शेकापचे खासदार डाव्या आघाडीच्या पाठिंब्यावर निवडून आले. रामशेठ ठाकूर यांनी भाजपा सरकारच्या विरुद्ध मतदान करावे, असे पक्षाने त्यांना सांगितले. भाजपाच्या बाजूने मतदान केले असते, तर खासदार रामशेठ ठाकूर यांच्या पदरात बरेच काही पडले असते. हस्तेपरहस्ते तसे प्रस्ताव त्यांना आलेही होते. दिल्लीमध्ये अशा परिस्थितीत रामशेठ प्रचंड दबावाखाली होते. कारण प्रसंग अटीतटीचा आणि काँग्रेस व भारतीय जनता पार्टीच्या अस्तित्वाचा होता. त्यामुळे फक्त भाजपाच नव्हे, तर काँग्रेसचे बडे नेतेही खासदार रामशेठ ठाकूर यांच्या भूमिकेकडे लक्ष लावून बसले होते. रामशेठ यांना काँग्रेसचे नेते सोनिया गांधीकडे घेऊन गेले, तेव्हा सोनिया गांधींनी विचारले, "तुमची काय इच्छा आहे?" तेव्हा रामशेठ म्हणाले, ''माझी काहीच इच्छा नाही. मी डाव्या पक्षांच्या पाठिंब्यावर निवडून आलोय, त्यामुळे मी माझ्या मतावर ठाम आहे.'' या काळात खासदार म्हणून त्यांना मिळालेल्या दिल्लीच्या घरात ते झोपत नव्हते. राष्ट्रवादीचे खासदार अशोक मोहोळ व विठ्ठल तुपे यांच्या बंगल्यावर झोपायला जायचे. कधी कोण येईल आणि उचलून घेऊन जाईल, याची खात्री वाटत नव्हती. अशी परिस्थिती निर्माण झाली होती, कारण ते राजकारण होते. सत्ता टिकविण्यासाठी प्रत्येक जण कसोशीने प्रयत्न करणारच. नारायण राणे, विखे पाटील यांनीही त्यांना सांगण्याचे अनेक प्रयत्न केले. गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनी सांगितले, की तुमच्या नेत्यांचे मत आहे, की तुम्ही भाजपाच्या बाजूने मतदान करावे. तेव्हा रामशेठ म्हणाले, "मला आमच्या शेकापच्या नेत्यांचा फोन येऊ देत, मी त्यांच्याशी बोलतो." अगदी एका मताच्या बदल्यात त्यांना मंत्रिपद देण्याचाही विचार करता येईल, असे आश्वासनही देण्यात आले. पण कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता केवळ पक्षाचा आदेश आणि पक्षनिष्ठा म्हणून रामशेठ ठाकूर यांनी भाजपाविरोधी मतदान केले. पक्षनिष्ठा काय असते व ती कशी जपायची असते, हे त्यांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले होते. त्यांच्या एका मताने भाजपाचे सरकार त्या वेळी कोसळले होते. हा त्यांचा भाजपाबद्दलचा द्वेष नव्हता, तर त्यांनी ज्या पक्षातून निवडणूक लढवली होती, त्या पक्षाच्या स्वीकारलेल्या विचारांशी ठेवलेला प्रामाणिकपणा होता. पक्षाशीच काय, त्यांनी आपल्या विचाराशीदेखील कधी गद्दारी केली नाही. गद्दारी करणे त्यांच्या रक्तातच नाही. त्यांच्या या पक्षनिष्ठेबद्दल त्या वेळी कोसळलेल्या भाजपा सरकारातील अनेकांनी कौतुक करून भुवया उंचावल्या होत्या. १९९८ चे सरकार पडल्यानंतर १९९९ ला पुन्हा निवडणूक घोषित झाल्याने रामशेठ पुन्हा खासदारकीच्या तयारीला लागले.

७

पुन्हा एकदा लोकसभा

सन १९९८ च्या निवडणुकीतील यशाने आणि खासदार म्हणून रायगडकरांसाठी केलेल्या कामामुळे आपला खासदार म्हणून रामशेठ यांच्यावर लोक प्रेम करत होते. खासदार म्हणून रामशेठ घराघरांत पोहोचले होते. १९९८ च्या निवडणुका होऊन फक्त १३ महिन्यांत सरकार कोसळले, त्यामुळे लगेच १९९९ ला निवडणुका जाहीर झाल्या.

खरेतर कुलाबा मतदारसंघातील लोकसभेची राजकीय लढत ही काँग्रेस आणि शेतकरी कामगार पक्षातच होती. भारतीय जनता पार्टी रायगडमध्ये फक्त नावालाच होती. भाजपाचा प्रभाव कुलाबा मतदारसंघात एक टक्का पण नव्हता. भाजपाला सोबत घेऊन शिवसेना आपल्या युतीचा उमेदवार देण्याचा जेमतेम प्रयत्न करीत होते. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी त्यांची धडपड सुरू होती. राजकीय लढाईत समोरासमोर दंड थोपटून काँग्रेस-शेकाप हे दोनच पक्ष असायचे. कारण कुलाबा मतदारसंघ म्हणजे अंतुलेच, असे एकंदरीत समीकरण झालेले होते. हे 'अंतुलेंच' राज्य खालसा करण्याची ताकद संपूर्ण रायगड जिल्ह्यात कोणाची नव्हती. ती किमया रामशेठ ठाकूर यांनी १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत करून दाखविली. रामशेठ यांचा हा विजय इतिहासाच्या पानावर सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल.

रामशेठ ठाकूर यांचा लोकसंपर्क व काम करण्याची हातोटी पाहून अंतुलेसाहेब धास्तावले होते. रामशेठ यांच्यापुढे आपला टिकाव लागणे शक्यच नाही हे अंतुलेसाहेबांनी ओळखले होते. ते पुन्हा कुलाबा मतदारसंघातून निवडणूक लढण्यास धजावले नाहीत. उगाच वेळ आणि पैसा फुकट घालविण्यापेक्षा सुरक्षित मतदारसंघ शोधत त्यांनी औरंगाबाद गाठले. काँग्रेसचा कोणीतरी उमेदवार द्यायला हवा, नाहीतर नामुष्की ओढवेल म्हणून खोपोलीमधील सौ. पुष्पलता साबळे या नगरसेविकेला यांनी बळीचा बकरा बनवून त्यांची काँग्रेसने उमेदवारी जाहीर केली. अंतुले मात्र रायगडच्या उमेदवाराला वाऱ्यावर सोडून औरंगाबादला निघून गेले.

कुलाब्यामध्ये आता एक हाती सत्ता रामशेठ ठाकूर यांच्या नावावर होणार म्हणून शेकापचे कार्यकर्ते आनंदी होते. जरी लढत एकतर्फी असली, तरी गाफील राहून चालणार नव्हते, हे रामशेठ ठाकूर यांना ठाऊक असल्यामुळे त्यांनी समोर कोणीही असो, आपण आपला प्रचार प्रामाणिकपणे करायचा, मतदारांना भेटायचे, या विचाराने ते कामाला लागले. शेवटी राजकारण आहे, शेवटच्या क्षणापर्यंत कधी काय होईल हे सांगता



● **लोकसभेच्या १९९९ च्या निवडणुकीमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार म्हणून हजारो कार्यकर्त्यांसह प्रचार करताना रामशेठ ठाकूर**

येणार नाही आणि घडलेही तसेच, राजकारणाने आपल्याच घरात कूस बदलली.

अलिबाग-पनवेलमध्ये माजी खासदार दि. बा. पाटील पक्षातील अंतर्गत वादामुळे एकाकी पडले होते. शेकापच्या लाल बावट्याखाली ज्यांनी आपले आयुष्य घालविले, ज्यांच्या एका हाकेने गावेच्या गावे गोळा होत होती, ते शेकापचे ज्येष्ठ नेते दि. बा. पाटीलसाहेब यांनी शेकापच्या गटबाजीला कंटाळून आपला राजकीय प्रवाहच बदलला. अस्वस्थ असलेले दि. बा. पाटीलसाहेब मातोश्रीवर जाऊन पोहोचले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची भेट घेऊन 'मला शिवसेनेत प्रवेश करायचा आहे,' असे त्यांनी सांगितले. शिवसेना प्रमुखांना दि. बा. पाटील यांची आंदोलने व नेतृत्व परिचयाचे होते. दि.बां.नी अशा अचानक घेतलेल्या निर्णयाने तेही आश्चर्यचकित झाले. पण राजकारणात कधी काहीही होऊ शकते, तेथे कोणीच कोणाचे कायमचे शत्रू अथवा मित्र नसतात. हा सत्तेचा सारीपाट असतो, हे सगळे चालायचेच, असा विचार करून बाळासाहेबांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या कपाळाला शिवसेनेचा टिळा लावला. दि. बा. पाटील

यांच्यासारखा कुलाबा जिल्ह्यातील एक मातब्बर नेता शिवसेनेत, तेही निवडणुकीच्या तोंडावर प्रवेश करतो, ही बाब जेवढी शिवसेनेच्या दृष्टीने महत्त्वाची होती. तेवढीच शेतकरी कामगार पक्षासाठी धक्कादायक होती. दि. बा.म्हणजे शेकापच्या कार्यकर्त्यांचे दैवत होते. पण आता देवळातून देवच गायब झाला होता.

बाळासाहेबांनी दि.बां.ना सांगितलं, की 'उद्धव ठाकरे प्रचारसभेसाठी संध्याकाळी अलिबागच्या दौऱ्यावर जाणार आहेत. पाटीलसाहेब, पनवेलमध्ये उद्धव आले की त्यांचे जोरदार स्वागत करा व अधिकृतपणे शिवसेनेत प्रवेश करा. त्यांच्यासोबत सभेसाठी अलिबागला जा.' बाळासाहेबांच्या सूचनेनुसार दि.बा. ते घाईघाईने पनवेलकडे यायला निघाले. शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख बबन पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांनी उद्धवजींच्या स्वागताची तयारी सुरू केली.

दि. बा. पाटीलसाहेब शिवसेनेत प्रवेश करणार, ही बातमी तोपर्यंत पनवेल-उरण परिसरात वाऱ्यासारखी पसरली खरी, परंतु कोणाला पटण्यासारखी नव्हती. ही केवळ अफवा आहे, असेच लोकांना वाटत होते. 'दि. बा. आणि शिवसेनेत, शक्यच नाही!' कोणाचा विश्वासच बसत नव्हता. उलटसुलट चर्चांना गावागावांतून उधाण आले. नेमके काय घडते आहे, हे पाहण्यासाठी शेकापचे कार्यकर्ते पनवेलकडे धावले, तोपर्यंत उद्धव ठाकरे यांच्या गाड्यांचा ताफा पनवेलपर्यंत पोहोचला. पनवेल एस.टी. स्टँडवर शिवसेना, शेकाप कार्यकर्त्यांनी गर्दी केली. दोन्ही बाजूंनी वाहतूक थांबली. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर गाड्यांच्या रांगा लागल्या. दि.बां.नी उद्धव ठाकरे यांचे स्वागत केले. स्टँडवर एवढी गर्दी झाली, की पोलिसांची धावपळ झाली. वाहतूक कोंडी झाल्याने गोंधळ उडाला. शिवसेना व शेकाप कार्यकर्ते दोन्ही बाजूंनी घोषणा देऊ लागले. घोषणांचा परिणाम पुढे बाचाबाचीमध्ये झाला. हळूहळू गोष्टी हमरीतुमरीवर चालल्या होत्या. पोलिसांना काय घडणार, याची कल्पना आल्यामुळे ते सावध झाले. त्यामुळे पुढचा बिकट प्रसंग टळला.

दि. बा. पाटील शिवसेनेत गेले, ही बातमी महाराष्ट्रभर पसरायला वेळ लागला नाही. दुसऱ्या दिवशी सगळ्या वर्तमानपत्रांनी दि.बां.वर जहरी टीका केली. ज्या माणसाने शिवसेनेला जातिवादी पक्ष म्हणून आयुष्यभर हिणविले, त्याच पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन त्या पक्षाचे ते वारकरी झाले. हे कोणाच्या पचनी पडले नाही. दि.बां.नी फक्त पक्ष प्रवेशच केला नाही, तर शिवसेनाप्रमुखांनी त्यांना लोकसभेची उमेदवारी दिली. निवडणुकीची समीकरणेच बदलली. हा सगळा घटनाक्रम अविश्वसनीय असला, तरी वास्तववादी होता. रायगडमध्ये १९९९ ची खरी लढत दि. बा. पाटील विरुद्ध रामशेठ ठाकूर यांच्यातच होणार, हे नक्की झाले.

रामशेठ यांनी दि. बा. पाटील यांची आंदोलने, पक्षाविषयीची भावना, त्यांचे विचार, शेतकऱ्यांविषयीची तळमळ जवळून पाहिली आणि अनुभवली होती. दि.बां.विषयी त्यांच्या मनात प्रचंड आदर होता. पण ते जेव्हा निवडणुकीच्या रिंगणात विरोधक म्हणून येऊन अचानक उभे राहिले, तेव्हा त्यांच्या मनात चलबिचल झाली. खरेतर हे व्हायलाच नको होते, असे त्यांना वाटत होते. युद्ध कोणतेही असो, ते तलवारीने लढणारे असो अथवा

निवडणुकीच्या रिंगणातील असो, तेथे भावनांना थारा नसतो. अशा वेळेला योद्ध्याने फक्त लढायचे असते.

रामशेठ आता युद्धासाठी सिद्ध झाले होते. समोर कोण योद्धा आहे, याने आता काहीच फरक पडणार नव्हता. त्यांची लढाई एका अशा योद्ध्याशी होती, ज्याच्या हातात तलवार तर होती, पण तिची धार बोथट झाली होती. शेकापच्या कार्यकर्त्यांनी दि.बां.च्या या कृतीचे समर्थन केले नाही. उलट 'कोण होतास तू काय झालास तू...' अशी गाणी गाऊन त्यांच्या विरुद्ध प्रचार सुरू केला.



● संसदेत लक्षवेधी मांडताना खासदार रामशेठ ठाकूर

सगळी परिस्थिती रामशेठ ठाकूर यांच्या बाजूने तयार होऊ लागली. या वेळी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकत्र लागल्यामुळे आमदारकी आणि खासदारकीची ही लढत चांगलीच रंगात आली होती. लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ होते. याच कालावधीत दिल्लीतील राजकारणात भूकंप होऊन मोठी उलथापालथ झाली. राजीव गांधी यांचे अकाली निधन झाल्याने काँग्रेस पक्षची धुरा राजीव गांधी यांच्या पत्नी सोनिया गांधी यांच्याकडे आली होती. राजीव गांधी यांच्या नंतर सोनिया गांधी यांच्याकडे काँग्रेसचे 'हाय कमांड' नेतृत्व आले. जेव्हा देशाचा पंतप्रधान निवडण्याचा प्रश्न आला, तेव्हा अर्थात ते नेत्या म्हणून सोनिया गांधी यांनी स्वीकारावे, असा प्रस्ताव काँग्रेस कमिटीमधून मांडण्यात आला. सोनिया गांधी या मूळ इटलीमध्ये जन्मलेल्या असल्यामुळे त्या भारताच्या पंतप्रधान होऊ शकतात का, यावरून मोठा राजकीय वाद झाला. सोनिया गांधी यांनी पंतप्रधान व्हावे, या प्रस्तावाला काँग्रेसचे त्या वेळचे ज्येष्ठ नेते शरद पवार, पी. ए. संगमा आणि तारिक अन्वर यांनी विरोध केला. या मतभेदामुळे शरद पवार, पी. ए. संगमा आणि तारिक अन्वर या तिघांना काँग्रेसमधून निलंबित करण्यात आले. काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर या तिघांनी १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्याचा परिणाम १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या राजकारणात दिसून आला. लोकसभा आणि विधानसभा अशा एकत्रित होत असलेल्या या निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीमुळे काँग्रेस पक्ष दुभंगला गेला. शिवसेना-भाजप युती, काँग्रेस व स्थानिक पक्ष असलेला शेकाप, त्यात आता

राष्ट्रवादी काँग्रेस या अजून एका पक्षाची भर पडली होती. आता शरद पवारही लोकसभेसाठी आपला उमेदवार उभा करणार का, म्हणून शेकापच्या नेत्यांनी शरद पवार यांना भेटून विचारले. त्या वेळी पवारसाहेब म्हणाले, "रायगडमधून मला रामशेठ ठाकूर हेच खासदार हवे आहेत." शरद पवारसाहेबांच्या पाठिंब्यामुळे रामशेठ यांच्या विजयाला अधिक बळ मिळाले.

रायगडमध्ये स्थानिक पातळीवर शेकापचा प्रभाव पारंपरिकरीत्या मोठा होता. रामशेठ यांनी मतदारसंघावर आपली पकड घट्ट केली होती. त्यांना मागच्या वेळेला जेथे कमी मतदान झाले होते, तिथे अधिक लक्ष घातले. आमदारकीच्या उमेदवारांशी चर्चा करून मतदानाचा टक्का वाढविला. विजय तर मिळणारच होता, पण जेथे कमी पडलो होतो, तेथे मतदान वाढले तरच विजयाचा आनंद द्विगुणित होईल, असे त्यांना वाटत होते. रामशेठनी प्रचार दौऱ्यादरम्यान संपूर्ण कुलाबा मतदारसंघ पिंजून काढला. केंद्रात भाजपाची सत्ता व राज्यात शिवसेनेचा जोर होता. त्याच वेळी भाजपा व शिवसेना युती असल्यामुळे दि. बा. आणि रामशेठ या गुरुशिष्यात अटीतटीची लढाई होणार, अशा चर्चा सुरू झाल्या होत्या. निवडणुकीत काँग्रेस आणि युतीच्या उमेदवारांना रामशेठ खूप मागे सोडून पुढे निघून गेले होते. या निवडणुकीत रामशेठ ठाकूर ७५,००० मतांची आघाडी घेऊन विजयी झाले होते.

खासदार रामशेठ ठाकूर एक अभ्यासू खासदार म्हणून लोकसभेत ओळखले जात होते. रायगड जिल्ह्याच्या अनेक प्रश्नांबरोबरच देशातील विविध समस्यांवर सुद्धा वेळोवेळी आवाज उठविलेला आपल्याला दिसून येतो. संसदेत त्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांनी केवळ रायगडच नव्हे, तर देशातील नागरिकांच्या अनेक समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

- पनवेल सी.एस.टी. हार्बर लाईनवर धावणाऱ्या लोकल गाड्या पनवेलमधून सुटल्यावर खांदेश्वर स्थानकात थांबत होत्या या दोन स्थानकांतील अंतर जास्त असल्यामुळे आणि पनवेल ते खांदेश्वर (कामोठे) दरम्यान लोकवस्ती वाढल्यामुळे या भागातील नागरिकांना बरेच अंतर गाठावे लागत होते. त्यामुळे पनवेल-खांदेश्वर दरम्यान एका स्थानकाची गरज लक्षात घेऊन त्यांनी सभागृहात हा मुद्दा उपस्थित केला. रेल्वे राज्यमंत्री दिग्विजय सिंग यांच्याकडे मध्य रेल्वेच्या खांदेश्वर आणि पनवेल स्थानकादरम्यान 'मानसरोवर' हे वेगळे स्थानक तयार करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यांनी त्या वेळी केलेल्या मागणीची उपयोगिता किती स्तुत्य होती, हे आजच्या 'मानसरोवर' या स्टेशनच्या निर्मितीमुळे विदित होते.
- जे.एन.पी.टी. बंदराचे काम सुरू असताना जमिनीच्या स्वरूपात बरेच बदल करण्यात आले. त्यामुळे न्हावा-शेवा खाडीचे मुख जे ३०० मीटर होते, ते केवळ १५० मीटर राहिले. त्या दीडशे मीटरच्या पट्ट्यातही अनेक खडक आहेत. याचा परिणाम होऊन लाटांचा जोर वाढतो आणि त्याचा त्रास न्हावा, न्हावा खाडी, गव्हाण, बेलपाडा येथील स्थानिक मच्छीमारांना होतो. येथून दिवसाला २०-२५ ट्रॉलर्स आणि ५० ते ६०

लहान बोटी जात असतात. जर हे खडकाळ भाग काढून टाकले, तर खाडीची रुंदी तसेच खोलीदेखील वाढेल आणि स्थानिक मच्छीमारांना मच्छी वेळेवर विकण्यासाठी त्यांचा मार्ग सुकर होईल. शासनाने या विषयाकडे लक्ष देण्याची विनंती त्यांनी केली होती.

● जवाहरलाल नेहरू बंदरातील (जे.एन.पी.टी.) फलाटांकरिता समुद्रात करण्यात आलेल्या वाढीव कामामुळे समुद्रात मासेमारी करायला जाणे न्हावा येथील मच्छीमारांना शक्य होत नसल्याच्या स्थितीची तपासणी करण्याचे आदेश भूपृष्ठ राज्यमंत्री ओमप्रकाश गोयल यांनी संबंधितांना दिल्याने ते काम सरकारला करावे लागले.

● प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी घेतल्यानंतर साडेबारा टक्के जमीन मिळावी म्हणून त्यांनी संसदेत प्रश्न उपस्थित केला व याबाबत काय झाले, याची विचारणा केली. २३ नोव्हेंबर २००० ला संसदेत त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीबाबत तारांकित प्रश्न विचारला. ज्यांची शेतजमीन जे.एन.पी.टी.साठी ताब्यात घेतली अशांना शासनाने ताब्यात घेतलेल्या जमिनीच्या साडेबारा टक्के जमीन नुकसान भरपाई म्हणून देणार का? तेथील प्रकल्पग्रस्त अशी मागणी करीत आहेत का? आणि असल्यास अशी कोणती पावले उचलली गेली आहेत? या त्यांच्या प्रश्नावर उत्तर देताना नौकावहन राज्यमंत्री हुकूमदेव यादव म्हणाले, 'होय, महाराष्ट्र शासनाने १९८४ मध्ये जमीन ताब्यात घेताना साडेबारा टक्के जमीन विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी देण्याचे ठरविले आहे. तशी प्रकल्पग्रस्तांची मागणी होत असून, महाराष्ट्र शासन हा प्रश्न सोडविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

● दिनांक ८ मे २००० ला त्यांनी घरगुती गॅस सिलेंडर वितरणाबाबत संसदेत तारांकित प्रश्न विचारला, की सिलेंडर घरपोच देण्यासंदर्भात काही अंतराचे बंधन घालण्यात आले आहे का? महाराष्ट्र, कर्नाटक विशेषकरून रायगड जिल्ह्यात सिलेंडर वितरक सिलेंडर घरपोच देण्याची टाळाटाळ करीत असल्याचे त्यांनी सांगितल्यानंतर घरगुती वापराचे गॅस सिलेंडर ग्राहकांना घरपोच देण्याचे आदेश पेट्रोलियम राज्यमंत्री संतोष कुमार गंगवार यांना त्या वेळी द्यावे लागले. घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरची कमतरता दूर करण्यासाठी अंतर्गत संशोधन, उत्सर्जन आणि आयात या मार्गाने त्याचा मुबलक पुरवठा करण्याचे आश्वासन पेट्रोलियम मंत्री संतोष कुमार गंगवार यांनी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या एका तारांकित प्रश्नावर दिले.

● एलिफंटा बेट मुंबईपासून जवळ असल्याने तेथील निसर्गसौंदर्य आणि लेण्या पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने जातात. तेथील स्थानिक रहिवासी पर्यटनावर आपली गुजराण करतात, मात्र या बेटावर विद्युत नसल्यामुळे ते कायम अंधारात राहतात. येथे वीज का पोहोचत नाही म्हणून खासदार रामशेठ ठाकूर यांनी याबाबत सरकारला विचारणा केली. त्या वेळी एलिफंटा बेटाची देखभाल आणि त्याच्या विद्युतीकरणाची ताबडतोब दखल घेतली जाईल. महाराष्ट्रातील पुरातत्व वास्तूंच्या विकासासाठी राष्ट्रीय सांस्कृतिक निधी वापरण्यावर विचार सुरू आहे, असे सांगण्यात आले.

• रायगड जिल्ह्यातील विषारी वायूची निर्मिती करणाऱ्या कारखान्यांमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होत असल्यामुळे अशा कारखान्यांना धोकादायक रसायने आणि वायू हाताळण्यासाठी कडक उपाययोजनांचे आदेश खासदार रामशेठ ठाकूर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे केंद्राला द्यावे लागले.

• रायगड जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून ज्या माथेरानची ख्याती आहे, त्या माथेरानचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात रूपांतर करण्याची तयारी केंद्र सरकारला रामशेठ ठाकूर यांच्या मागणीनंतर करावी लागली.

• रायगड जिल्ह्यात विशेष आर्थिक क्षेत्राबाबत (एसईझेड) शेतकऱ्यांमध्ये बरीच उलट-सुलट चर्चा सुरू होती. या विशेष आर्थिक क्षेत्रामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार होते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. खासदार रामशेठ ठाकूर यांनी दिनांक ११ मार्च २००२ रोजी यासंबंधी लोकसभेत प्रश्न विचारून सरकारला जाब विचारला होता. सरकारने विशेष आर्थिक क्षेत्राची योजना सुरू केली आहे काय? असे क्षेत्र बनविण्यासाठी राज्य सरकारने सर्व प्रस्ताव मंजूर केले आहेत का? असल्यास तपशील काय आहे? आजपर्यंत किती आर्थिक क्षेत्रे बनविली? त्यांचे प्रवर्तक कोण? अशी क्षेत्रे बनविण्यासाठी राज्यांना आर्थिक मदत केली जाते का? विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आधारभूत सुविधांबरोबरच आर्थिक किंवा इतर मदत केली जाते का? असल्यास त्याचा तपशील द्यावा? असे अनेक प्रश्न त्यांनी लोकसभेत उपस्थित केले. या प्रश्नाला उत्तर देताना तत्कालीन व्यापार व उद्योगमंत्री राजीव प्रताप रुडी यांनी सांगितले, की मार्च २००० मध्ये घोषित केलेल्या धोरणानुसार विशेष आर्थिक क्षेत्राची योजना सुरू झाली. यात केंद्र सरकारला प्रत्यक्ष क्षेत्र उभारण्याची गरज नाही, पण यात सरकारी, गैरसरकारी, संयुक्त क्षेत्राद्वारे अथवा राज्य सरकारतर्फे विशेष आर्थिक क्षेत्राच्या स्थापनेची परिकल्पना केली गेली आहे. सध्याच्या निर्यात क्षेत्राचे रूपांतर देखील विशेष आर्थिक क्षेत्रात करण्यात येणार आहे. या धोरणानुसार सांताक्रूझ, कोचीन, कांडला, सुरतमधील चार निर्यात क्षेत्राला विशेष आर्थिक क्षेत्रात परावर्तित करण्यात आले आहे. याशिवाय 'गुजरात रोजीटरा इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड'द्वारे एक प्रस्ताव आला आहे. इतरही अकरा ठिकाणी विशेष आर्थिक क्षेत्र बनविण्याचा प्रस्ताव आहे. या योजनेत अनेक सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यामध्ये आर्थिक क्षेत्रातील युनिटमध्ये होणाऱ्या वस्तूंना स्पर्धेत राहण्यासाठी मुक्त आयात व खरेदीची सूट, प्रायोजकांना आयकरामध्ये प्रोत्साहन देणे इत्यादींचा समावेश आहे. महाराष्ट्रासह सर्व ठिकाणचे कार्य नुकतेच सुरू झाल्यामुळे नक्की किती कालावधी लागेल, हे सांगता येत नाही. मात्र सरकारी क्षेत्रात आधीच तीन विशेष आर्थिक क्षेत्रे कार्यरत आहेत. रामशेठ ठाकूर यांनी एसईझेडबाबत लोकसभेत प्रश्न विचारून सरकारला जाब विचारला होता.

त्यांनी आपल्या खासदारकीच्या काळात जनतेच्या जिव्हाळ्याचे अभ्यासपूर्ण प्रश्न लोकसभेत मांडून ते सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्याचबरोबर जिल्ह्यातील गरजू नागरिकांना त्यांच्या अडीअडचणीच्या वेळी पंतप्रधान साहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळवून दिली.

त्या काळी घरगुती गॅस, दूरध्वनी यंत्रणेसाठी खासदारांना ठरावीक कोटा दिला जात असे, या खासदार

कोट्यातून रामशेठ ठाकूर यांनी शेकडो लोकांना घरगुती गॅस व दूरध्वनी मिळवून दिले. त्यांनी रायगड जिल्ह्यातील दूरध्वनी सेवेचा प्रश्न पहिल्याच खासदारकीच्या टर्ममध्ये उपस्थित केला व पनवेल तालुक्यात पळस्पे येथे नवीन दूरध्वनी एक्सचेंज सुरू करून घेतले. शिवाय, दूरध्वनी केंद्र मंजुरी समितीवर आपले दोन प्रतिनिधी नेमून खासदारकीच्या पहिल्या वर्षभराच्या कारकिर्दीत रायगड जिल्ह्यातील ७०० अपंग व बेरोजगारांना दूरध्वनी केंद्र (बूथ) मंजूर करून ती उभी करून दिली व त्यांच्या रोजगाराचा प्रश्न मिटविला.

ही दूरध्वनी केंद्रे (बूथ) उभारण्यासाठी रामशेठ ठाकूर यांनी बँका व इतर आर्थिक संस्थांकडून त्यांना कर्जही उपलब्ध करून दिले. त्यामुळे पूर्वीच्या खासदारांच्या व रामशेठ ठाकूर यांच्या कार्यपद्धतीतील हा बदल मतदारांना सुखावणारा होता. आपला खासदार म्हणून त्यांना रायगडकरांनी स्वीकारले ते त्यांच्या कार्यकुशलतेमुळेच. त्यांनी आपली खासदारकी मिरविण्यासाठी आणि स्वतःच्या उद्धारासाठी न वापरता जनतेच्या उद्धारासाठी उपयोगात आणली. रायगडकरांना आपल्या हक्काचा खासदार मिळाला होता.

८

शेतकरी कामगार पक्ष सोडताना

रामशेठ यांनी राजकारणात आल्यावर शेकापची धुरा सांभाळून प्रचंड निष्ठेने पक्ष मोठा केला.पक्षाला मोठेपण मिळवून दिले. शेकापचे दोन वेळा खासदार झाले, तरीही रामशेठ यांनी शेकाप सोडला? का सोडला? त्या वेळी अनेक उलटसुलट चर्चा रंगल्या होत्या. शेकापच्या नेत्यांनी या रंगात स्वत:चे वैचारिक रंग भरून या चर्चांना तथ्यहीन खतपाणी घातले व रामशेठ यांच्याबद्दल लोकांची मने कलुषित करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याचा काहीही उपयोग झाला नव्हता, कारण रामशेठ यांच्या विचारात 'राम' होता.

रामशेठ ठाकूर यांच्यावर शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी विचारसरणीचे संस्कार लहानपणापासून होत गेले. वडील शेकापचे कट्टर कार्यकर्ते, ते भगतसाहेबांसोबत सावलीसारखे राहायचे. दि. बा. पाटील, दत्तूशेठ पाटील, जनार्दन भगत, एन. डी. पाटील या शेकापच्या नेत्यांना ते लहानपणापासून जवळून पाहत होते. शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांची नाळ त्यांच्याशी जोडली गेली ती मा. जनार्दन भगतसाहेब, मा. दत्तूशेठ पाटील, मा. दि. बा. पाटील यांच्यामुळे. या नेतृत्वाकडे बघून आपणही त्यांच्यासारखेच व्हायला पाहिजे असे त्यांना सतत वाटत असे. शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांची आंदोलने आयुष्याची जडणघडण होत असताना मनावर कोरली गेली. त्यातून त्यांची स्वत:ची एक वैचारिक भूमिका तयार झाली. यशाचे एक-एक शिखर पादाक्रांत करीत असताना व्यवसाय, राजकारण, शिक्षण अशा सगळ्याच क्षेत्रात त्यांनी स्वत:ला शंभर टक्के सिद्ध केले. शेतकरी कामगार पक्षाच्या वाटचालीत रामशेठ ठाकूर यांचा वाटा फार मोठा आहे, हे कोणीच नाकारू शकत नाही. एक व्यावसायिक म्हणून यश संपादन करीत असतानाच त्यांची समाजाप्रति असणारी संवेदनाही तितकीच उत्कट होती. आपले सामाजिक उत्तरदायित्व म्हणून ते दानधर्म करीत होतेच, पण त्या जोडीला पक्ष कार्यासाठीही मदतीचा ओघ सुरू होता. सक्रिय राजकारणात उतरण्याअगोदर रामशेठ ठाकूर यांचे नाव शेकाप नेत्यांच्या यादीत अग्रगण्य होते. अगदी ग्रामपंचायतींच्या निवडणुकांपासून ते लोकसभेच्या निवडणुकांपर्यंत रामशेठ ठाकूर यांनी शेतकरी कामगार पक्षात 'किंग मेकर'ची भूमिका निभावली. खासदारकीपूर्वी ते कोणत्याही निवडणुकीत स्वत: उमेदवार म्हणून उभे राहिले नसले, तरी उमेदवार ठरविताना त्यांच्या विचाराला तितकेच महत्त्व होते.

पुरोगामी विचारसरणीतून केशवराव धोंडगे, कृष्णराव धुळप, गणपतराव देशमुख, प्रा. एन. डी. पाटील,

नाना पाटील, ॲड. दत्ता पाटील, दि. बा. पाटील, दत्तूशेठ पाटील, प्रभाकर पाटील, जनार्दन भगत, वीर वाजेकरशेठ, माजी मंत्री मोहन पाटील या नेत्यांनी शेतकरी कामगार पक्षाला सामाजिक आणि राजकीय उंची दिली. रामशेठ ठाकूर, विवेक पाटील, जे. एम. म्हात्रे, अलिबागचे भाई जयंत पाटील, पंडित पाटील, मीनाक्षीताई पाटील या नेत्यांनी शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन शेतकरी कष्टकऱ्यांचे नेतृत्व करून तितक्याच ताकदीने पक्षाला पुढे नेले. पक्षाला जी काही मदत लागेल ती रामशेठ सढळ हस्ते करीत होते. त्यांचे नेतृत्व नेहमीच ठळकपणे पक्षाच्या व्यासपीठावर, त्याचबरोबर आंदोलनांमध्ये सुद्धा दिसून आले.

पनवेल, उरणसाठी पक्षबांधणी करीत असतानाच कार्यकर्त्यांना व नेत्यांना हक्काचे कार्यालय नव्हते. पक्षाची अडचण ओळखून रामशेठ ठाकूर यांनी स्वतःच्या मालकीची पनवेल शहरामधील १,६०० चौरस फूट जागा पक्ष कार्यालयासाठी दिली. व्यवसायात स्थिरस्थावर झाल्यानंतर त्यांचा राजकारणाशी संबंध यायला सुरुवात झाली. मात्र ते प्रत्यक्षपणे राजकीय मैदानामध्ये उतरले नव्हते. त्यांची एक दानशूर व संवेदनशील नेतृत्व म्हणून जनमानसांत ओळख निर्माण झाली होती. १९७६ मध्ये व्यवसाय सुरू केल्यानंतर साधारण २२ वर्षांनी ते प्रत्यक्ष राजकारणामध्ये आले. १९९५ ला झालेल्या विवेक पाटील यांच्या आमदारकीच्या निवडणुकीत रामशेठ यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजाविली. जेव्हा शेतकरी कामगार पक्षाला रायगड जिल्ह्यात अस्तित्वाच्या लढाईसाठी एका योद्ध्याची गरज होती, तेव्हा पक्षात असा एकही नेता नव्हता, जो विजयाचा



● **चंदरशेठ, रामशेठ ठाकूर, विवेक पाटील आणि जे.एम म्हात्रे एकेकाळचे चार जिगरी दोस्त.**

गुलाल उधळू शकेल. पराजयाच्या भीतीने शेतकरी कामगार पक्षाच्या इतर नेत्यांनी निवडणूक रिंगणातून पळ काढला होता, कारण विजयाची कोणालाच शाश्वती नव्हती. लोकसभेच्या सन १९८९ च्या निवडणुकीत दि. बा. पाटील, सन १९९१ आणि १९९६ च्या निवडणुकांमध्ये ॲड. दत्ता पाटील यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांना पराभवाची हॅट्रिक पचवावी लागली होती. आता पक्षाकडे रामशेठ नावाचा एकच पर्याय शिल्लक होता. रामशेठ यांचे सर्वसमावेशक नेतृव व सामाजिक प्रतिमा सगळ्यांना माहिती होती. पक्षाला त्यांची गरज भासली, तेव्हा त्यांनी जय-पराजय, नफा-तोटा याचा विचार आजपर्यंत कधीच केला नव्हता. शेकापच्या सर्व नेत्यांनी खासदारकीला 'रामशेठ तुम्हीच उभे राहा' असा आग्रह धरला. रामशेठ नेहमीप्रमाणे पक्षासाठी धावून आले होते. १९७६ ते १९९८ पर्यंत सलग २२ वर्षे उद्योगधंद्यात मन रमल्यामुळे सामाजिक व राजकीय कामांची ओढ असलेल्या रामशेठना समाजकारणाला जास्त वेळ द्यावा, असे वाटू लागले. गोरगरिबांना, खेळाडूंना, मंदिरांना मदत करताना मर्यादा होत्या. मात्र खासदार म्हणून निवडून आल्यास जनतेची अधिक सेवा करता येईल म्हणून ते योद्ध्याच्या भूमिकेत निवडणुकीच्या मैदानात उतरले. लढले आणि लोकसभेचे युद्ध जिंकले. रामशेठ यांचा लोकसभा विजय हा 'न भूतो न भविष्यति' असा होता. या विजयामुळे शेतकरी कामगार पक्षाला नवसंजीवनी मिळाली.

१३ महिन्यांच्या वाजपेयी सरकारच्या कालखंडात त्यांनी केलेली कामे डोंगराएवढी होतीच. या कालावधीत मतदाराला कधीच ते विसरले नाहीत. त्यांच्या स्वतःच्या खासदार निधीबरोबरच त्यांनी अंतुलेसाहेबांनी न वापरलेला खासदार निधीही मतदारसंघासाठी आणला. त्यांनी कधीही लोकसभेचे सभागृह चुकविले नव्हते. शनिवार-रविवार आपल्या मतदारांच्या भेटीसाठी ते मतदारसंघात यायचे. सोमवारी विमानाने दिल्लीला परत जायचे. मतदारांच्या भेटीचा कालखंड त्यांनी कधी चुकविला नाही. त्यांच्या समस्या सातत्याने समजून घेतल्या आणि त्या पूर्ण करण्यासाठी कायम पाठपुरावा केला. एक प्रामाणिक नेता म्हणून त्यांनी नेहमी संसदेबरोबर मतदारांशीही आपली निष्ठा कायम ठेवली.

संसदेत जेव्हा तेरा महिन्यांच्या कालावधीत वाजपेयी सरकारला विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाण्याची वेळ आली, त्या वेळी खासदार रामशेठ ठाकूर यांनी आपली पक्षनिष्ठा आणि पक्षाच्या विचारांना महत्त्व देऊन आपली भूमिका कोणत्याही आमिषाला बळी न पडता प्रामाणिकपणे निभावली. हा त्यांच्या विचारांचा आणि प्रामाणिकपणाचा विजय होता. त्यांनी कधी स्वतःच्या विचारांशी प्रतारणा केली नाही.

खासदार रामशेठ ठाकूर यांनी शेतकरी कामगार पक्षाला जिवंत ठेवण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले होते. १९९९ पासून २००४ पर्यंत आपल्या दुसऱ्या खासदारकीच्या कालखंडात सार्वजनिक हिताच्या कामांचा डोंगर त्यांनी उभा केला आणि आपले राजकीय भवितव्य उज्ज्वल करून ठेवले होते. एक प्रामाणिक आणि सचोटीचा राजकारणी जो लोकांना आपले आयुष्यच नव्हे, तर कमाईचा हिस्साही तितक्याच प्रामाणिकपणे आणि सचोटीने वाटतो आहे म्हणून जनताजनार्दनाने रामशेठ यांच्यासाठी लोकसभेचे दार कायम उघडे करून

दिले असते, याची खात्री रामशेठ यांनाच काय, पण राजकारणाचा सारीपाट खेळणाऱ्या प्रत्येकाला होती.

आपल्याला खरोखरच जनतेची दु:खे दूर करून त्यांना सुखाचे दिवस दाखवायचे असतील, तर आपण राष्ट्रीय पक्षाची कास धरणे महत्त्वाचे आहे. हा आपल्या मनातील विचार त्यांनी अनेक वेळा शेतकरी कामगार पक्षाच्या सर्व नेत्यांना सांगितला होता. आपला पक्ष हा एक पूर्ण प्रादेशिक पक्षदेखील नाही. केवळ पनवेल, उरण, अलिबाग रायगडपुरता मर्यादित आहे. त्याने विकासाला खीळ बसते. लोकसभेत, विधानसभेत जाणारे आपले खासदार व आमदार किती? लोकांच्या समस्या सोडविताना अनेक मर्यादा येतात. त्यासाठी आपला पक्ष कोणत्या तरी राजकीय पक्षात विलीन करू, ही रामशेठ यांची भूमिका सर्वव्यापी आणि सर्वहिताची होती. ती शेकापच्या नेत्यांना पटली नाही, त्यामुळे त्यांनी आपण एका छोट्याशा तळ्यात किती आणि कोठवर विहार करायचा, याचा विचार करून एकला चलोची भूमिका घेतली.

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांची बदललेली वैचारिक भूमिका आणि राजकीय स्वार्थ साधण्यासाठी बदलेली पक्षाची तत्त्वे त्यांना पटत नव्हती. पक्षात नवीन आलेले कार्यकर्ते ज्येष्ठ नेत्यांचा वेळोवेळी अपमान करीत होते. पूर्वीचा शेकाप आणि आताचा शेकाप यामध्ये जमीन-आसमनचा वैचारिक बदल झाला होता. शेतकरी कामगार पक्ष ध्येयधोरणे व तत्त्वे जोपासणारा पक्ष होता. जुन्याजाणत्या नेत्यांनी या ध्येयधोरणांना कधीही तडा जाऊ दिला नव्हता. मात्र आता ज्येष्ठ नेत्यांना पक्षातील तरुणमंडळी 'म्हातारे कोतारे' म्हणून हिणवायला लागली होती. हे रामशेठ यांच्यासारख्या निष्ठावंतांला कधीच पटले नाही. ज्येष्ठ नेत्यांना डावलून केवळ स्वार्थ आणि सत्तेसाठी शेकापच्या नव्या पुढाऱ्यांनी पूर्वी विळा-भोपळ्याचे वैर असलेल्या पक्षांच्या पायाशी लोटांगण घालायला सुरुवात केली. त्यामुळे शेकापचे अस्तित्व कोठेच दिसून येत नव्हते. राजकारण समाजाला पूरक असायला हवे, अशी रामशेठ यांची सुरुवातीपासूनच भावना होती. म्हणूनच काँग्रेस किंवा राष्ट्रवादी पक्षात शेकाप विलीन करावा, ही व्यापक भूमिका रामशेठ त्यांनी घेतली. कारण त्यांना शेकापच्या मर्यादा लोकसभेत गेल्यावर विदित झाल्या होत्या. मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

१९९९ च्या लोकसभेची निवडणूक त्यांनी जिंकली. नंतर २००४ पर्यंत रामशेठ समाजसेवेत अविरत मग्न होते. खासदार म्हणून ते आपली भूमिका चोख बजावीत होते. २००४ ला लोकसभा बरखास्त करण्यात आली, त्या वेळी ते म्हणाले, "मी यापुढे कोणतीही निवडणूक लढविणार नाही. मला दिल्लीचे हवामान मानवत नाही. अपघातामुळे हातात व पायात लोखंडी सळ्या आहेत. दिल्लीत जेवढी कडाक्याची थंडी असते, तेवढाच उन्हाळा प्रचंड असतो." त्यांच्या या निर्णयाने शेकापच्या नेत्यांना फार मोठा प्रश्न पडला. त्यांची मनधरणी करण्यासाठी दस्तुरखुद्द प्रा. एन. डी. पाटील, गणपतराव देशमुख सर्व आमदार आले, तरी त्यांनी आपला निर्णय बदलला नाही. खरेतर रामशेठ हे कधी माघार घेणारे नेते नव्हतेच. आयुष्यभर परिस्थितीशी झगडत ते खंबीरपणे उभे राहिले होते. दिल्लीचे हवामान पेलणे ही त्यांच्यासाठी फार मोठी बाब नव्हती. ते त्यांनी पुढे केलेले केवळ एक कारण होते. खरे कारण होते ते पक्षातील नेत्यांच्या बदललेल्या वैचारिक

भूमिकेचे. ज्या पक्षाला आपण सर्वस्व दिले, त्या पक्षात आपल्या शब्दाला किंमत उरली नाही, त्या पक्षासाठी यापुढे लढाच कशाला! संसदेत छोट्या पक्षातून निवडून जाऊन लोककल्याण किती आणि कसे साधणार आहोत. त्यापेक्षा राजसंन्यास घेतलेला चांगला म्हणून त्यांनी आपल्या निवृत्तीचा निर्णय घेतला.

विवेक पाटील यांना लोकसभेसाठी उभे करण्याचे ठरले. तेव्हा विवेक पाटील यांनी रामशेठ ठाकूर यांना अट घातली, की 'रामशेठ पनवेल विधानसभा लढणार असतील, तर मी लोकसभा लढवितो.' त्यावर रामशेठ त्यांना म्हणाले होते, "तुम्ही लोकसभा जिंकलीत, तर मी विधानसभा लढवेन, पण जर तुम्हाला पराभव पत्करावा लागला, तर मात्र तुम्हीच विधानसभा लढवायची. कारण मी राजकारणाशिवाय राहू शकतो, मात्र तुम्ही राजकारणाशिवाय राहू शकत नाही."

रामशेठ लोकसभेसाठी उभे राहणार नाहीत, हे औरंगाबादला गेलेल्या बॅ. ए. आर. अंतुले यांना समजले. आपल्यासमोर शेकापचे उमेदवार विवेक पाटील आहेत कळल्यानंतर परत त्यांनी रायगडमधून निवडणूक लढविण्याचे ठरविले. लोकसभेला विवेक पाटील विरुद्ध अंतुले अशी लढत उभी राहिली. पण विवेक पाटलांचा अंतुलेसमोर निभाव लागला नाही. त्यांचा ३२ हजार मतांनी अंतुले यांनी पराभव केला. मात्र पनवेल विधानसभा मतदारसंघात १८ हजार मतांची आघाडी होती. "विवेक पाटील खासदारकीला पराभूत झाले असले, तरी पनवेल विधानसभा मतदारसंघात १८,००० मतांची आघाडी असल्याने ते आमदारकीची निवडणूक जिंकू शकतील. मला विधानसभा निवडणूक लढवण्याची तुम्ही सगळ्यांनी अट घातली होती. मी निवृत्तीचा निर्णय अगोदरच घेतला आहे, हे आपणा सर्वांना माहीत आहे. मी दिलेल्या शब्दाप्रमाणे मला दिलेली आमदारकी विवेक पाटील यांच्यासाठी सोडत आहे. त्यांनी विधानसभा लढवावी, त्यांच्या विजयासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करीन, हा शब्द देतो," असे पुन्हा रामशेठ यांनी सांगितले.

आज गावचे अध्यक्षपद असो किंवा अगदी ठराव करूनसुद्धा सरपंचपद न सोडणारे सत्तालोलुप राजकारणी असो, त्यांना सत्तेपुढे सगळे गौण वाटते. रामशेठ यांच्यासारखे नेते मात्र आपल्या शब्दाला सर्वस्व मानतात. लोकसभेच्या निवडणुकीत पनवेल विधानसभा मतदारसंघात १८,००० मतांची शेकापची आघाडी असूनसुद्धा त्यांनी विवेक पाटील यांना दिलेल्या शब्दासाठी आणि मैत्रीसाठी आमदारकी सोडून आपला शब्द पाळला होता.

विधानसभा निवडणुकीत विवेक पाटील यांच्या विजयासाठी आपले सर्वस्व पणाला लावून विवेक पाटलांना विजयी केले. विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर दोन महिन्यांनी पनवेल येथील 'वादळवारा' या दैनिकात एक सनसनाटी बातमी प्रसिद्ध झाली. या बातमीत 'शेकाप आता काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात विलीन करावा,' असे जाहीर वक्तव्य करण्यात आले होते. बातमी वाचून शेतकरी कामगार पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांत खळबळ उडाली. 'वादळवारा'चे संपादक विजय कडू यांना पक्ष कार्यालयात बोलावून घेण्यात आले आणि ही बातमी का छापली, अशी विचारणा केली गेली. 'रामशेठ तुम्हाला सोडणार नाहीत,'

असे जेव्हा त्यांना सांगण्यात आले, तेव्हा विजय कडू म्हणाले, "मला रामशेठ यांनीच ही बातमी दिलेली आहे." हे ऐकून शेकापच्या नेत्यांच्या पायाखालची जमीन सरकली. रामशेठ यांच्याशिवाय शेतकरी कामगार पक्ष ही कल्पना कोणीच करू शकत नव्हते. एवढी मेहनत त्यांनी पक्ष उभा करण्यासाठी घेतली होती. रामशेठ ठाकूर शेतकरी कामगार पक्षाचा 'श्वास' झाले होते. सगळ्यांची धावाधाव सुरू झाली. रामशेठ असा निर्णय घेऊ शकत नाहीत, असेच सगळ्यांना वाटत होते. पण हे उलटेच घडले होते.

महेंद्र घरत यांनी विवेक पाटील, दत्तूशेठ पाटील यांच्यासमोरच रामशेठ यांना फोन लावला. आपली पक्षाच्या विरोधात बातमी आली आहे, असे सांगितले. रामशेठ म्हणाले, "होय, मीच दिली आहे." रामशेठ यांचे हे शब्द ऐकून आता काय करावे, हे कोणालाच कळेना. शेवटी 'शेकापच्या नेत्यांना तुम्हाला भेटायचे आहे,' असा निरोप महेंद्र घरत यांनी फोनवरच सांगितला. त्यांनी ११ वाजता बंगल्यावर या, असे सांगितल्यानंतर शेकापची नेतेमंडळी बंगल्यावर पोहोचली. जवळजवळ तीन तास ही बैठक सुरू होती. शेकापच्या नेत्यांनी 'आपण पक्ष का सोडत आहात?' म्हणून त्यांना विचारले, तेव्हा त्यांची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले, "शेकापचे अस्तित्व आता गावापुरते मर्यादित राहिलेले आहे, हे तुम्हाला मी वारंवार सांगत आलोय. मात्र तुम्ही त्याकडे दुर्लक्ष केले. आपल्याला पक्षांतर केल्याशिवाय गत्यंतर नाही. सिडकोचा साडेबारा टक्के जमिनीचा प्रश्न, नैसर्गिक गरजेपोटी बांधलेल्या घरांचा प्रश्न, नागरी सुविधा, पनवेल-उरण तालुक्याचा विकास आपण विरोधात राहून करू शकणार नाही. पनवेलचे नागरीकरण झपाट्याने होत आहे. तेव्हा सत्ताधारी पक्षाची कास धरल्याशिवाय हे अशक्य आहे." रामशेठ पुन्हा पुन्हा तेच तेच सगळ्यांना समजावून सांगत होते. जे. एम. म्हात्रे शेवटचा प्रयत्न म्हणून पुन्हा सगळ्या नगरसेवकांना घेऊन आले. त्यांनीही पक्ष न सोडण्याचा आग्रह केला, मात्र रामशेठ आपल्या निर्णयावर ठाम राहिले.

रामशेठ यांनी शेतकरी कामगार पक्ष सोडण्याचा जेव्हा निर्णय घेतला, त्या वेळेला प्रशांत ठाकूरदेखील शेतकरी कामगार पक्षाच्या पक्ष कार्यात पूर्ण सक्रिय झाले होते. शेतकरी कामगार पक्षाची कामाची पद्धत त्यांना कळलेली होती. मात्र आपले वडील अचानक पक्ष सोडण्याचा निर्णय घेत आहेत, याचे त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी रामशेठ यांना विचारले, "आपण पक्ष का सोडायचा?" त्या वेळी त्यांनी आधी झालेल्या अनेक प्रसंगांविषयी त्यांना सांगितलं. जे प्रसंग त्यानी कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचू दिले नव्हते. माणूस जेव्हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाकांक्षी असतो, त्या वेळेला आपले विचार आपल्यापर्यंत ठेवत नाही. तो त्या विचारांना खतपाणी घालणारा एक वर्ग उभा करीत असतो. रामशेठ ठाकूर यांचा तो स्वभाव नसल्यामुळे त्यांनी पक्षात आपला एखादा गट असावा, त्याच्या माध्यमातून आपण कोणावरती दबाव ठेवावा, अशी भूमिका कधीच ठेवली नाही. ते आपली भूमिका मित्र या नात्याने त्यांच्या सहकाऱ्यांना सतत सांगत राहिले. ज्या वेळी त्यांना वाटले, की आपल्याला पक्षात एकाकी पाडण्यात येत आहे, तेव्हा ते स्पष्टपणाने सांगून बाजूला झाले. त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आणि बाजूला होण्याचा निर्णय घेतला.

रामशेठ यांच्या पक्ष सोडण्याच्या निर्णयानंतर शेवटची मीटिंग मार्केट यार्डमध्ये झाली. त्या मीटिंगमध्ये रामशेठ यांनी आपली पक्ष कार्यालयासाठी दिलेली १,६०० चौरस फुटांची जागा शेतकरी कामगार पक्षाला देत असल्याचे सांगितले. रामशेठ यांना, 'तुम्हाला काय हवे', हे विचारण्यात आले, तेव्हा ''मला बाकी काही नको मी फक्त 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचा' कारभार पाहीन, असे त्यांनी सांगितले. रामशेठ ठाकूर यांनी शेकापत कधी कोणाला दुखावले नाही. जे. एम. म्हात्रे, विवेक पाटील, चंदर घरत हे त्यांचे जिवलग मित्र होते. मार्केट यार्डमधील मीटिंग संपवून जेव्हा रामशेठ बाहेर पडत होते, तेव्हा विवेक पाटील यांना अश्रू अनावर झाले. ते रामशेठ यांच्या खांद्यावर डोके ठेवून रडत होते. आयुष्याकडे कायम सकारात्मक पाहणारे रामशेठ यांनी कधी कोणी आपल्यामुळे दुखावला जाऊ नये म्हणून काळजी घेतली. जे करायचे, जे जपायचे ते जिवापाड. मग मैत्री असो की माणसं... त्यासाठी त्यांनी स्वत:ला नेहमीच जमिनीवर ठेवले.

आपण कशासाठी जगले पाहिजे, हे रामशेठ यांना चांगले कळले असल्यामुळे त्यांनी जगताना आजवरच्या आयुष्यात मातीशी आणि माणसाशी कधी नाते तोडले नाही. राजकारणाशिवाय ते जगतील, पण माणसांशिवाय नाही. कारण माणूसपण त्यांच्या हृदयात ओतप्रोत भरलेले आहे. त्यांनी जगाकडे सकारात्मक नजरेने पाहिले. जे पटले नाही ते स्वीकारले नाही, जे पटले ते त्यांनी सोडले नाही. मग ते राजकारण असो, समाजकारण असो अथवा आयुष्य. जे निर्णय त्यांनी घेतले, त्या प्रत्येक निर्णयाशी ते एकनिष्ठ राहिले. रामशेठ ही केवळ व्यक्ती नसून, ते एक फार मोठे संघटन होते, हे शेकापच्या नेत्यांना त्यांनी पक्ष सोडल्यानंतर कळले. रामशेठ यांचा शेतकरी कामगार पक्ष सोडण्याचा निर्णय त्यांच्यासाठी सोपा आणि सहज नव्हता. त्यांनी हा निर्णय हृदयावर दगड ठेवून घेतला होता.

९

रायगड काँग्रेसला नवसंजीवनी

सन १९९८ ची लोकसभा केवळ १३ महिन्यांच्या कालावधीतच सन १९९९ ला विसर्जित झाली. सन १९९९ ला रामशेठ दुसऱ्यांदा प्रचंड बहुमताने निवडून आले होते. मात्र २००४ मध्ये लोकसभा विसर्जित झाल्यानंतर माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी आपली राजकारणातून निवृत्ती घोषित केली. रामशेठ यांनी आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात केलेली कामे आणि संसदेतील त्यांचे कामकाज एका कसलेल्या राजकीय नेत्याचे होते. त्यामुळे रायगड मतदारसंघातील हा एक परखड आणि आधुनिक विचारांचा नेता राजसंन्यास घेणार, हे कोणालाच पटले नाही. त्यांनी राजकारण सोडू नये, कारण रामशेठ यांच्यासारखी नि:स्वार्थी माणसेच सामाजिक बदलाची क्रांती घडवून आणू शकतात म्हणून त्यांनी राजकारण सोडू नये, असे सगळ्यांचे मत होते.

रामशेठ आजपर्यंत सक्रिय राजकारणात राहिले असते, तर त्यांनी रायगड मतदारसंघाचे नंदनवन बनविले असते, एवढा जनाधार त्यांच्यामागे होता. ते लोकांचे नेते होते. हे लोकनेतेपद त्यांना लोकांनीच बहाल केले होते. हा लोकनेता आज जरी सक्रिय राजकारणात नसला, तरी आजही त्यांचा लोकसंपर्क, लोकसंग्रह हा पनवेल-उरणचा राजकीय रिमोट हातात देण्यास कारणीभूत ठरलेला आहे. जनतेच्या समस्या सुटाव्यात म्हणून आजही त्यांचा प्रवास अविरत सुरूच आहे. राजकारणातच नव्हे, तर वैयक्तिक आयुष्यातसुद्धा त्यांचे कधीच कोणाशी शत्रुत्व नाही. पक्ष आणि मतदारांविषयी प्रचंड निष्ठा असलेल्या रामशेठनी शेतकरी कामगार पक्षाला सुगीचे दिवस दाखविले होते. त्यांनी सक्रिय राजकारणात राहण्याचा विचार केला असता, तर त्यांच्याकडे सगळी उपलब्धता होती. पुढील अनेक निवडणुका ते लढवू शकले असते आणि जिंकलेही असते. मोह आणि मायेच्या पाशात सर्वसामान्य माणूसच अडकतो, ते तोडण्यासाठी असामान्यत्व असावे लागते. ती विरक्तीची भावना रामशेठ यांच्यात जन्मत:च आली होती. आपण कोठे आणि कधी थांबायला पाहिजे, हे त्यांना कळले होते. हेच त्यांच्या यशाचे गमक होते. सक्रिय राजकारणातून निवृत्त झाले, तरी त्यांची राजकीय जादू संपली नव्हती. त्यांच्या राहत्या बंगल्यावर सकाळ-संध्याकाळ प्रत्येक क्षेत्रातील येणाऱ्यांची गर्दी हेच सांगत असते. सत्तेच्या सारीपाटाच्या सोंगट्या त्यांनी कायम आपल्या हातात ठेवल्या. ते सत्ता एकहाती कशी फिरवू शकतात, हे सगळ्याच राजकीय पक्षांना कळले होते. शेतकरी कामगार पक्षातील नेत्यांच्या भूमिकेवर रामशेठ नाराज आहेत, हे समजल्यावर त्यांना काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी संपर्क करायला सुरुवात केली. २००४ च्या

विधानसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले होते. रामशेठ आपल्या कामानिमित्त सकाळीच कॉरीवर गेले होते. त्यांच्या मोबाईलची रिंग वाजली. त्यांनी फोन रिसीव्ह केला, तर समोरून मुख्यमंत्री विलासराव देशमुख बोलत होते. विलासरावांनी सरळ मुद्द्याचं बोलायला सुरुवात केली. "रामशेठ, पनवेल विधानसभा मतदारसंघासाठी आम्हाला उमेदवार द्या." त्या वेळी रामशेठ विलासरावांना विनम्रपणे म्हणाले, "२००४ च्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराला विजयी करण्याचा मी शब्द दिला आहे. मी उमेदवार कसा देणार?" यावर विलासरावही नि:शब्द झाले. खरेतर रामशेठ काँग्रेसमध्ये यावेत, अशी विलासरावांची इच्छा होती.

२००४ च्या निवडणुका पार पडल्या. विवेक पाटील निवडून आले. रामशेठ त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. त्यांनी विवेक पाटील यांना विजयरथावर आरूढ करून दिलेला शब्द पाळला होता. आता ते पुढच्या वाटचालीला मोकळे झाल्याने अखेर त्यांनी शेतकरी कामगार पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला होता. विलासराव २००४ ला पुन्हा मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाले होते. विलासरावांना रामशेठ यांनी शेकाप सोडत असल्याची खबर लागली. त्यांनी पुन्हा रामशेठ यांच्याशी संवाद साधण्याचे प्रयत्न सुरू केले. दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी काँग्रेसचे दत्ताजीराव मसूरकर, वसंतराव ओसवाल यांचे फोन आले. मा. सुनील तटकरे यांनी भेट घेतली. भीमसेन माळी, विभाकर नाईक घरी येऊन भेटून गेले. अंतुले यांच्यासारख्या दिग्गज नेत्याला देखील रामशेठ ठाकूर यांच्या ताकदीचा अंदाज निवडणुकीदरम्यान आला होता. त्यांनी रामशेठना काँग्रेसमध्ये येण्याचा आग्रह धरला. काँग्रेसमध्ये त्यांचा यथोचित सन्मान केला जाईल, असा शब्दही दिला. काँग्रेसचे महाडचे नेते माणिकराव जगताप यांनीही फोन करून काँग्रेसमध्ये येण्याचा आग्रह धरला. काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष आर. सी. घरत, निस्सारशेठ यांनी रामशेठ यांची भेट घेतली. मा. आमदार रवीशेठ पाटील यांनी एका हॉटेलमध्ये बसून चर्चा केली, तेव्हा त्यांच्यासोबत मुश्ताक अंतुलेही होते. राष्ट्रवादीचे नेते रामशेठ यांच्या राष्ट्रवादी प्रवेशासाठी जोरात प्रयत्न करीत आहेत, हे समजल्यावर मुख्यमंत्री विलासराव देशमुखांनी आमदार कपिल पाटील, कळवा खारेगावचे मा. दशरथ पाटील यांना पनवेलला पाठविले. त्यांनी सरळ मुख्यमंत्र्यांना फोन लावला व त्यांच्याशी रामशेठना बोलायला सांगितले. फोनवर विलासराव म्हणाले, "रामशेठ, उलट्या हातानं कशाला जेवताय. इतर पक्षाचा विचार करू नका, सरळ काँग्रेसमध्ये या." त्यांनी दुसऱ्या दिवशी भेटायला बोलावलं. प्रशांत ठाकूर, महेंद्र घरत व संजय पाटील यांना बरोबर घेऊन रामशेठ मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेले. चर्चेदरम्यान मुख्यमंत्री म्हणाले, "रामशेठ, तुम्हाला काय पाहिजे सांगा." यावर रामशेठनी उत्तर दिलं, "साहेब, माझ्यासाठी काही नको फक्त सिडको प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवा. साडेबारा टक्यांची जमीन प्रकल्पग्रस्तांना लवकरात लवकर द्या. गावठाणाचा प्रश्न मार्गी लावा." रामशेठ यांच्या या उत्तराने विलासराव अचंबित झाले होते. समोरून मुख्यमंत्री म्हणत आहेत काय हवे सांगा आणि हे स्वत:साठी काही न मागता जनतेसाठी मागत आहेत. मुख्यमंत्र्यांनी सगळ्या मागण्या मान्य करतो, असे आश्वासन दिले. ही चर्चा जरी पक्ष प्रवेशाची असली, तरी कार्यकर्त्यांशी बोलल्याशिवाय पक्षप्रवेशाचा निर्णय घेता येणार नसल्याचे रामशेठनी मुख्यमंत्र्यांना सांगितले व पनवेलकडे परतले.

१ डिसेंबर २००४... सी. के. टी. कॉलेजच्या प्रांगणात गर्दी जमायला लागली. जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य उपस्थित झाले होते. ठाणे, शहापूर, मुरबाड, कल्याण, नवी मुंबई, उरण, पनवेलमधून निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या संख्येने आले होते. ते शेकापमध्ये अत्यंत निष्ठेने काम करणारे होते. प्रत्येक कार्यकर्ता रामशेठ यांच्यावर प्रचंड प्रेम करणारा होता. सी. के. टी. कॉलेजच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये प्रमुख कार्यकर्त्यांशी रामशेठनी सभेच्या अगोदर पुढील वाटचालीसंदर्भात चर्चा केली. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या भेटीतील चर्चेचे इतिवृत्त सगळ्यांना सांगितले. तरीही काँग्रेस व राष्ट्रवादी या दोन्ही पक्षाचे नेते प्रवेशासाठी आग्रही आहेत. पण तुम्ही जे सांगाल त्या पक्षात आपण प्रवेश करू, असे म्हणाले. त्यांनी निर्णय सर्वस्वी कार्यकर्त्यांवर सोपविला. कार्यकर्त्यांनी 'आय काँग्रेस' कशी योग्य आहे, यावर आपली स्पष्ट मते मांडली. सगळ्यांचे एकमत झाले आणि सर्व जण मुख्य सभेसाठी बाहेर आले, तेव्हा सी. के. टी. कॉलेज प्रांगण हजारो कार्यकर्त्यांनी तुडुंब भरले होते. यात महिलांचे प्रमाणही लक्षणीय होते. सभेच्या ठिकाणी बसायला जागा नाही म्हणून कॉलेजच्या पहिल्या-दुसऱ्या माळ्याच्या गॅलरीत कार्यकर्ते उभे होते. कार्यकर्त्यांनी तुडुंब भरलेल्या सभेत रामशेठनी प्रवेश केला, तेव्हा 'रामशेठऽऽऽ आगे बढोऽऽऽ हम तुम्हारे साथ हैऽऽऽ' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. रामशेठनी जेव्हा शेतकरी कामगार पक्ष सोडतोय, असे सांगितले होते, तेव्हा 'रामशेठ कोण येणार तुमच्या सोबत?' असे कुत्सितपणे शेकापच्या नेत्यांनी वक्तव्य केले होते. अशा वल्गना करणाऱ्या त्या शेकापच्या नेत्यांना आजच्या गर्दीनेच उत्तर दिले होते. रामशेठने केवळ पैसा कमाविला नव्हता, तर माणसे कमाविलेली होती. व्यासपीठावर रामशेठ येऊन बसेपर्यंत घोषणांचा पाऊस पडतच होता. महेंद्र घरत यांनी या वेळी केलेल्या भाषणातून शेकाप नेत्यांच्या मनोवृतीचा खरपूस सामाचार घेतला. प्रशांत ठाकूर यांनी शेतकरी कामगार पक्ष सोडण्याची वेळ का आली, याबाबत कार्यकर्त्यांसमोर प्रत्येक घटनेची कारणमीमांसा स्पष्ट केली. कृषि उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन संचालक अरुणशेठ भगत यांनी मनोगत व्यक्त केले. रामशेठ यांनी आपल्या मनोगतातून शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांचे अहंकारी वर्तन आणि ज्येष्ठ नेत्यांचा अवमान करणाऱ्या त्यांच्या भूमिकेबद्दल खेद व्यक्त केला. ते म्हणाले, "शेकापत हृदयापासून काम करणारे कार्यकर्ते होते. पण त्यांच्या भावनांचा सन्मान नेत्यांना करता आला नाही. त्यांनी शेतकरी कामगार पक्ष बुडवायला काढलेला आहे. आपला फायदा कसा होईल, एवढाच विचार या नेत्यांच्या मनात आहे. एक वेळ अशी होती, की विधानसभेत शेतकरी कामगार पक्षाचा विरोधी पक्षनेता होता. एवढी मोठी असलेली आमदारांची संख्या आज फक्त दोनवर आली.'' रामशेठ कळकळीने बोलत होते. शेतकरी कामगार पक्षाची वाताहत झालेली पाहून त्यांच्या वेदना बोलण्यातून जाणवत होत्या. पक्ष सोडण्याचा निर्णय हा रामशेठ यांचा एकट्याचा नव्हता, तर समोर बसलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा होता. प्रत्येकाच्या मनात खदखद होती. केवळ रामशेठ यांच्यासाठी कार्यकर्ते शेकापत राहिले होते. काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत निर्णय झाला.

५ डिसेंबर २००४ रोजी सांयकाळी पक्ष प्रवेशाचा दिवस नक्की झाला. पनवेल नगरपालिकेच्या जवळील



● लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी हजारो कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला

छत्रपती संभाजी महाराज मैदानात भव्य व्यासपीठ उभे राहू लागले. तयारी सुरू झाली. कार्यक्रमाला मुख्यमंत्री येणार म्हणून त्यांच्या सुरक्षेसाठी आणि बंदोबस्तासाठी पोलिसांचे नियोजन सुरू झाले. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह ओसंडून वाहत होता. पनवेल शहरात मुख्यमंत्र्यांच्या स्वागताच्या कमानी उभ्या राहू लागल्या. कमानींवर काँग्रेसच्या नेत्यांसोबत रामशेठ ठाकूर यांचे फोटो पाहून आता रामशेठ खरोखरच काँग्रेसवासी होणार, यावर सगळ्यांचा विश्वास बसला. हाताच्या निशाणीने भिंती रंगू लागल्या. रायगड जिल्ह्यातील काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या मीटिंग घेऊन पनवेलला येण्याचे नियोजन करू लागले. रामशेठ काँग्रेसमध्ये येणार म्हणून कार्यकर्त्यांनाही बळ आल्यासारखे वाटत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. चौकाचौकांत रामशेठ यांच्या पक्षप्रवेशाच्या चर्चा रंगायला लागल्या होत्या. हा क्षण याची देही याची डोळा अनुभवण्यासाठी रायगडच्या प्रत्येक गावागावांत विसावलेले काँग्रेसचे कार्यकर्ते या दिवसाची वाट पाहत होते.

इतकी वर्षे शेतकरी कामगार पक्षाचा सूर्य होऊन तेजाने तळपणारे रामशेठ ठाकूर शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांच्या अविचारांना मागे सोडून एका राष्ट्रीय पक्षाच्या व्यापक विचारांच्या स्वागतासाठी सज्ज झाले होते. आज रायगड काँग्रेसच्या नवसंजीवनीचा दिवस होता. रामशेठ एका राष्ट्रीय पक्षाच्या उंबरठ्यावर उभे होते. प्रचंड जनसमुदाय त्यांच्या समोर होता. हा दिवस रामशेठ कधीच विसरणार नाहीत. हा क्षण त्यांच्यासाठी खूप

भावुक करणारा होता. आयुष्यभर त्यांनी प्रत्येकाच्या आयुष्याला जी मदत केली होती, असे अनेक श्वास त्यांच्या मागे उभे होते. महिला, पुरुष कार्यकर्त्यांचे लोंढेच्या लोंढे कार्यक्रमस्थळाकडे प्रवाहासारखे वाहत होते. व्यासपीठावरील सूत्रसंचालिका उपस्थितांचे स्वागत करीत होत्या. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या अध्यक्षा श्रीमती प्रभा राव यांचे आगमन झाले. मा. ए. आर. अंतुले, मा. पतंगराव कदम, मा. दत्ता पाटील, मा. दि. बा. पाटील, मा. रवीशेठ पाटील व्यासपीठावर उपस्थित झाले. पोलिस ताफ्यासह माननीय मुख्यमंत्र्यांची गाडी कार्यक्रम स्थळाजवळ येऊन थांबली. सगळ्यांच्या नजरा मुख्यमंत्र्यांकडे वळल्या, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्या चेहऱ्यावरील स्मितहास्याने कार्यकर्त्यांना उत्साह आला. पुन्हा घोषणांचा आवाज चढला. रायगडमध्ये होणारा हा बदल सगळ्यांसाठी अनपेक्षित असला, तरी अवर्णनीय होता. मुख्यमंत्र्यांच्या जयजयकाराच्या घोषणा दुमदुमू लागल्या, काँग्रेसला रायगडमध्ये एक नवा जिवंत प्रवाह सापडला होता. विलासराव देशमुख रामशेठ यांच्याविषयी भरभरून बोलले. रामशेठ विलासरावांच्या उपस्थितीत काँग्रेसवासी झाले. व्यासपीठावरील सगळ्याच नेत्यांनी आपल्या भाषणातून रामशेठ यांच्या काँग्रेस प्रवेशाच्या भूमिकेबद्दल गौरवोद्‌गार काढले. रामशेठ यांचे काँग्रेसमध्ये येणे ही खरोखरच रायगडमधील काँग्रेसला मिळालेली संजीवनी होती. त्या वेळी व्यासपीठावर आवर्जून उपस्थित असलेले माजी विरोधी पक्ष नेते ॲड. दत्ता पाटीलसाहेब व दि. बा. पाटीलसाहेबांनी रामशेठ यांनी शेकाप सोडण्याच्या भूमिकेचे व काँग्रेस पक्ष प्रवेशाचे जाहीरपणे समर्थन केले.

रामशेठ यांच्या काँग्रेस प्रवेशाने कार्यकर्त्यांत चैतन्य निर्माण झाले होते. पनवेल-उरण सोडून उर्वरित रायगड जिल्ह्यात बॅ. ए. आर. अंतुले यांनी आजपर्यंत काँग्रेसचा गड राखला होता. रामशेठ यांनी शेकापमध्ये असताना त्यांनी अंतुलेंचा गड दोन वेळा जिंकला होता. रामशेठ यांच्या समोर निवडणुकीला उभे राहण्याचे अंतुलेसाहेबांसारख्या बड्या नेत्याने सोडले होते. त्यांना रामशेठ यांचा आवाका माहीत झाला होता. आता रामशेठ काँग्रेसमध्ये आल्यामुळे एक मोठा जनाधार सोबत घेऊन आले होते. त्यामुळे पनवेल-उरण या दोन तालुक्यांत जेथे काँग्रेसला कधीच काही हाती लागले नव्हते, तेथे आता रामशेठ यांच्यामुळे कायापालट व्हायला सुरुवात झाली.

काँग्रेस प्रवेशानंतर आपल्या विभागातील मतदारसंघांमधून जास्तीत जास्त कामे कशी करता येतील, याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले. प्रकल्पग्रस्त गावांच्या नागरी सुविधांसाठी शेकडो कोटींचा निधी सिडकोच्या माध्यमातून त्यांनी मिळवून दिला. उरण, पनवेल तालुक्यात जेथे काँग्रेस पक्ष कोठेच नव्हता, तेथे आता काँग्रेसचे बालेकिल्ले उभे राहायला सुरुवात झाली. रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेनेत युती झाली, ती केवळ काँग्रेसला विरोध करण्यासाठी नव्हती, तर रामशेठ ठाकूर या व्यक्तीला विरोध करण्यासाठी होती. विरोधाचे राजकारण करून रामशेठना कोंडीत गाठणे एकट्या शेकापला झेपणार नव्हते, त्यामुळे त्यांनी रायगडात अपंग असलेल्या शिवसेनेची काठी हातात घेतली होती. शेकापच्या पुरोगामी

विचारात याअगोदर शिवसेना ही फक्त 'हिंदुत्ववादी' होती. त्यांच्या हिंदुत्ववादी विचारांवर प्रचंड टीकाही केली होती. शिवसेनेबरोबर हातमिळवणी करणे शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांना पटले नव्हते. पण त्यांचे नेत्यांपुढे काहीच चालत नव्हते. नेते रामशेठ यांच्याबद्दल द्वेषाने पेटले होते. रामशेठ यांच्याबद्दलची द्वेषभावना आणि शेकाप नेत्यांनी सोडलेली पक्षाची तत्त्वे यांचा परिणाम असा झाला, की पक्षातून एक-एक करीत कार्यकर्ते रामशेठ यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसकडे प्रवास करायला लागले.

शेकापने रामशेठ यांना प्रत्येक पायरीवर विरोध करण्याचा प्रयत्न करायला सुरुवात केली. प्रत्येक निवडणुकीत संघर्ष झाला. शेतकरी कामगार पक्षाने सत्तेसाठी मारामारी करून दहशत निर्माण करण्याची रणनीती आखली होती. ती दहशत झुगारून लावण्याची आवश्यकता होती. 'रामशेठ ठाकूर स्वतःच्या स्वार्थासाठी काँग्रेसमध्ये गेलेले आहेत. मोठमोठी कंत्राटे मिळविण्यासाठी गेलेले आहेत,' असा खोटा प्रचार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या वेळी शेकाप नेते जाहीर भाषणातून करीत होते. १९६२ सालापासून ग्रामीण भागात ताब्यात असलेल्या पंचायत समित्या, सहकार क्षेत्रातील सोसायट्या, कृषी उत्पन्न बाजार समिती त्यांनी ताब्यात ठेवल्या होत्या. कर्नाळा बँक, पनवेल अर्बन बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक यांसारख्या बँकांमुळे त्यांनी लोकांना सातत्याने आपल्या नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला. रामशेठ ठाकूर यांच्यासोबत असलेल्या युवा सहकाऱ्यांसोबत कोणी संवाद व संबंध ठेवू नये, अशी सक्ती पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर केली जात होती. रामशेठ ठाकूर यांना एकटे पडण्याचा प्रयत्न सुरू होता. हे सगळे प्रकार त्यांनी आजमावून पाहिले. मात्र रामशेठ ठाकूर यांनी समोरच्या लोकांविषयी कधीच द्वेषभाव ठेवला नाही. ज्या वेगाने कार्यकर्ते काँग्रेस पक्षाला जोडले जात होते, ते पाहता शेकापचे हे दबावतंत्र खूप काळ चालले नाही.

पनवेलच्या पश्चिमेकडचा पट्टा हा पूर्ण शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला. तेथे कोणत्याही पक्षाचा सहजासहजी शिरकाव होणे अशक्य होते. शेतकरी कामगार पक्षाचे नेते, पुढारी दुसऱ्या पक्षाला तेथे पाय ठेवून देत नव्हते. जनार्दन भगतसाहेबांनी येथे शेतकरी कामगार पक्षाची मजबूत बांधणी करून पक्ष जनमानसांत रुजविला होता. १९८८ ला भगतसाहेब निवर्तले आणि या विभागाचे नेतृत्व साहजिकच रामशेठ ठाकूर यांच्याकडे आले. रामशेठ ठाकूर यांनी शेतकरी कामगार पक्ष जनार्दन भगतसाहेबांच्या पावलावर पाऊल ठेवून त्याच नेटाने पुढे नेला होता. रामशेठ ठाकूर यांच्या काँग्रेस प्रवेशानंतर काँग्रेस विरुद्ध येथे सगळे एकत्र आले. त्यांना माहीत होते, येथे काँग्रेस म्हणजे दुसरे-तिसरे कोणी नसून, रामशेठ ठाकूर आहेत. रामशेठ आपले राजकीय अस्तित्व संपवतील म्हणून विवेक पाटील यांना भीती वाटत होती. स्वतः समोर येऊन टीका न करता त्यांनी आपले प्यादे पुढे केले. प्याद्यांनी आपल्या मालकाच्या बरहुकूम अगदी खालच्या पातळीवर जाऊन अर्वाच्य भाषेमध्ये रामशेठ यांच्यावर बोलायला सुरुवात केली. रामशेठ एक सुसंकृत राजकारणी असल्यामुळे त्यांनी मात्र कोणतेच उत्तर दिले नाही. एक प्रगल्भ राजकारणी असाच विचार करतो. 'शब्द कशाला हवेत, कृती करूनच उत्तर देता येईल. ती उत्तरे अशी

असतील, की कधीही विसरता येणार नाहीत.' रामशेठ यांनी संयमित राजकारण करून या भागातून काँग्रेस पक्ष उभा केला.

गव्हाण ग्रामपंचायत समोरासमोर लढण्याची वेळ आली. एकूण १७ सदस्यांची गव्हाण ग्रामपंचायत, त्यात बेलपाडा गावातून दोन सदस्य निवडून द्यायचे होते. मात्र गावकऱ्यांनी अडवणुकीची भूमिका घेतली. निवडणूक लढवताना दोन सदस्यांसाठी लिलाव टाकला. पाच सदस्यांची निवडणूक कोळी समाजाने बहिष्कार टाकल्यामुळे झालीच नाही. आता उरलेल्या १२ जागांवर प्रत्यक्ष मतदान होणार होते. बेलपाडा गावातील लोक म्हणत होते, जो पक्ष गावासाठी अधिक पैसे देईल त्याला आमच्या दोन जागा देणार. लिलाव सुरू झाला. दोन लाखांपासून बोली सुरू झाली. बोलीवर बोली लागत होती. काँग्रेसच्या बाजूने ३१ लाखांची बोली लावली गेली. शेकापचे पुढारी ३३ लाख बोलले. त्यांना वाटत होते, की काहीही झाले, तरी रामशेठ ही बोली प्रतिष्ठेची करतील, ते माघार घेणार नाहीत. पण झाले उलटे, काँग्रेसने माघार घेतली. 'आम्हाला या दोन जागा नकोत. शेकापकडून ३३ लाख घ्या आणि दोन सदस्य शेकापला द्या,' असे सांगण्यात आले. खरेतर शेकाप तोंडघशी पडला होता. शेकापच्या पुढाऱ्यांना वाटत होते, दोन जागा हातातून जाऊ द्यायच्या नाहीत म्हणून ते पेटले होते. पण रामशेठनी सगळी गणिते अगोदरच करून ठेवली होती. दोन जागा शेकापकडे गेल्या तरी जाऊ दे. आपण उरलेल्या १२ जागांचा विचार करू म्हणून त्यांनी त्यावर लक्ष केंद्रित केले. १२ जागा लढवूनसुद्धा आपण बहुमत घेऊ शकतो, याची त्यांना खात्री होती. त्यांना दोन जागांमुळे काहीही फरक पडणार नव्हता. उरलेले १२ सदस्य त्यांनी एकहाती निवडून आणले. गव्हाण ग्रामपंचायत आपल्या ताब्यात घेतली.

काँग्रेसच्या माध्यमातून विकास कामांना गती मिळाली. तेव्हा जे अजूनपर्यंत काँग्रेसपासून दूर होते, त्यांच्याही लक्षात आले, की रामशेठ विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत आहेत. याउलट शेतकरी कामगार पक्ष रामशेठ ठाकूर यांना रोखणे, एवढाच दृष्टिकोन ठेवून वाटचाल करीत आहे. जोपर्यंत लोकांच्या अडचणी होत्या, मजबुरी होती, तोपर्यंत कार्यकर्ते शेकापसोबत थांबले, नंतर त्यांच्यातील अनेक मंडळी काँग्रेसमध्ये सामील झाली. उरण-पनवेल तालुक्यांतील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांवर काँग्रेसचा झेंडा लागला. पनवेल-उरणमध्ये काँग्रेसने हातपाय पसरायला सुरुवात केली.

पनवेल नगरपालिकेवर ५२ वर्षे शेतकरी कामगार पक्षाची मक्तेदारी होती. तसे पनवेल नगरपालिका क्षेत्रातही काँग्रेसचा फारसा प्रभाव नव्हताच. कांतिलाल बांठिया, रमणिक माखेजा यांसारखे काँग्रेसचे पुढारी नगरसेवक म्हणून निवडून येत होते. आर. सी. घरत हे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. डॉ. भक्तीकुमार दवे, मदन कोळी यांच्यासारखे काँग्रेसचे निष्ठावंत अनेक होते. मात्र सत्ता प्रबळ करणारे, शेतकरी कामगार पक्षाला टक्कर देणारे, सत्ता उभी करण्याची क्षमता असणारे तसे कोणी नव्हते.

पनवेल नगरपालिकेवर आता शेतकरी कामगार पक्षासमोर खऱ्या अर्थाने विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस उभा होता. रामशेठ यांना कोणत्याही परिस्थितीत नगरपालिकेवर आपले वर्चस्व निर्माण करू द्यायचे नाही, या हेतूने

शेतकरी कामगार पक्ष कामाला लागला. दरम्यान नगरपालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या. नगरपालिकेवर शेतकरी कामगार पक्षाची सत्ता होती, उद्योगपती जे. एम. म्हात्रे मागील पाच वर्षे नगराध्यक्ष होते. रामशेठ यांनी प्रशांत ठाकूर यांना मैदानात उतरविले. प्रशांत ठाकूर यांना निवडणूक जिंकू न देणे, हा एकमेव अजेंडा शेकाप आघाडीने तयार केला आणि प्रतिष्ठेची लढाई सुरू केली. प्रशांत ठाकूर मिडलक्लास सोसायटीतून वॉर्ड ३३ मधून निवडणूक लढवू शकतात, याचा अंदाज शेकापने घेतला आणि विजयाची खात्री असलेले पनवेलचे शेकापचे तत्कालीन नगराध्यक्ष यांना वॉर्ड ३३ मधून उमेदवार म्हणून जाहीर केले. जे. एम. म्हात्रे यांना तेथून उमेदवारी दिली. रामशेठ विरोधकांच्या राजकीय चालीचा अंदाज घेत होतेच. त्यांनीही निश्चय केला, की प्रशांत ठाकूर यांना वॉर्ड नंबर ३३ मधूनच नगरसेवकपदासाठी उभे करायचे. 'बघूया कोण जिंकतोय!'

मिडलक्लास सोसायटीमधील हा वॉर्ड सुशिक्षितांचा होता. या वॉर्डमध्ये प्रतिष्ठेची लढाई सुरू झाली होती. खरेतर ही लढाई शेतकरी कामगार पक्ष आणि रामशेठ ठाकूर यांच्यामधील होती. त्यामुळे या लढतीकडे सगळ्यांचेच लक्ष लागले होते. पनवेल नगरपालिका ही रायगड जिल्ह्यातील एक प्रतिष्ठित नगरपालिका, त्यामुळे ती ताब्यात ठेवण्यासाठी येथील लढाईसुद्धा प्रतिष्ठेची होती. शेतकरी कामगार पक्षाने राष्ट्रवादी काँग्रेस सोडून इतर सगळ्या पक्षांशी युती करून काँग्रेसला एकटे पाडण्याचा प्रयत्न सुरू केला. राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सत्तेवर असल्यामुळे साहजिकच पनवेल नगरपालिकेच्या निवडणुकीत दोन्ही पक्ष एकत्र आले. खरेतर पनवेलमध्ये राष्ट्रवादीचा प्रभाव नगण्यच होता. राष्ट्रवादीकडून रामशेठ यांना निरोप आला, 'रामशेठ, काँग्रेस आणि राष्ट्रवादीची युती करून घ्या.' त्या वेळी नगरविकास मंत्री असलेले अरुण गुजराथी यांनी युतीची घोषणा केली खरी, मात्र राष्ट्रवादीकडे निवडणुकीला उभे करण्यासाठी उमेदवार नव्हते. त्या वेळी खांदा कॉलनी युवक काँग्रेसचे पदाधिकारी असलेले सुनील नाईक व शशिकला सिंग या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादीमधून उमेदवारी दिली. उमेदवारांची निवड करतानाही चोखंदळपणे करण्यात आली होती. डॉक्टर, इंजिनीअर, वकील, समाजसेवक अशा विविध क्षेत्रांतील सुशिक्षित तरुणांचा विचार करण्यात आला. विजयाची खात्री असलेले असे ३८ उमेदवार या निवडणुकीच्या रिंगणात रामशेठ ठाकूर यांनी उतरविले. या सगळ्यांचे नेतृत्व प्रशांत ठाकूर यांच्याकडे दिले आणि स्वत: मार्गदर्शकाच्या भूमिकेत उभे राहिले.

८ डिसेंबर २००६ ला मतदान होणार होते, पण काही कारणास्तव निवडणूक आयोगाने मतदानाची तारीख तीन दिवस पुढे ढकलली. तीन दिवसांनी मतदान पार पडले. मतदान ५१ टक्के झाले. मतमोजणीला सुरुवात झाली आणि जाहीर होणारे निकाल शेकापला एकामागून एक धक्के देत होते. शेकापच्या कार्यकर्त्यांचे चेहरे काळवंडले. पुढे काय होणार, याचा अंदाज आल्याने कार्यकर्त्यांनी काढता पाय घ्यायला सुरुवात केली. भरून आणलेली गुलालाची पोती बांधून परत नेली. फटाक्यांच्या वाती थंड झाल्या. काँग्रेसच्या गोटात मात्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सगळे निकाल हातात आले, तेव्हा काँग्रेस २१ जागांवर विजय मिळवून सत्तेत

आली होती. काँग्रेसने विजयानंतर काढलेली मिरवणूक ही शेतकरी कामगार पक्षाला आत्मपरीक्षण करायला लावणारी होती. पनवेलच्या राजकारणातील हा ऐतिहासिक विजय होता. हा केवळ रामशेठ ठाकूर यांचा करिष्मा होता. काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेसशी आघाडी करून नगरपालिकेत सत्ता स्थापन केली आणि पनवेलचे नगराध्यक्ष म्हणून प्रशांत ठाकूर यांना बहुमताने निवडण्यात आले. पाच वर्षांच्या कालखंडात नगराध्यक्षपदाचा कालखंड मात्र अडीच वर्षांचा होता. अडीच वर्षांनी पुन्हा नगरसेवकांची मते जाणून घेऊन पुन्हा नगराध्यक्ष निवडला जाणार होता. नगराध्यक्षपदाच्या अडीच वर्षांच्या कालखंडात प्रशांत ठाकूर यांनी आपल्या कामाचा चांगलाच ठसा उमटविला. अगदी तालुकास्तरीय कार्यकर्तेसुद्धा श्रेष्ठींशी थेट संवाद करू लागले.

सन २००७ मध्ये मुख्यमंत्री विलासराव देशमुख प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये कार्यक्रमासाठी आले होते. तेथे रायगड जिल्ह्यातील सर्व स्वातंत्र्यसैनिकांच्या सत्काराचा कार्यक्रम रामशेठ यांनी आयोजित केला होता. रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक स्वातंत्र्यसैनिकाचा केला जाणारा यथोचित सत्कार बघून मुख्यमंत्री भारावले. सत्कार सोहळ्यात रामशेठना प्रशांतच्या वाढदिवसाची भेट म्हणून काय हवे विचारले, तर रामशेठ म्हणाले, "आमच्या पनवेल एसटी स्टँडवर रस्ता ओलांडताना अपघात होतात प्रशांतच्या वाढदिवसाची भेट म्हणून तेथे उड्डाणपूल जाहीर करा." तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले, "सतत दुसऱ्यांना देणारा हा माणूस रामशेठ नसून दानशेठ आहे." त्याच कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी १८५ कोटींचा उड्डाणपूल जाहीर केला.

जून २००९ पर्यंत प्रशांत ठाकूर नगराध्यक्षपदावर कार्यरत होते. या कालावधीत १८५ कोटी रुपये खर्चाचा महत्त्वाकांक्षी उड्डाणपूल, ३५ कोटी रुपयांची भुयारी गटार योजना, 'स्वच्छ सुंदर पनवेल'साठी राबविलेल्या योजनांमुळे आणि केंद्र व राज्य सरकारचा कोट्यवधी रुपयांचा विकासनिधी पनवेलच्या विकासासाठी आणल्यामुळे त्यांनी आपल्या कल्पक नेतृत्वाने पनवेलकरांवर वेगळी छाप पाडली. एक तरुण नेतृत्व रामशेठ यांनी पनवेलकरांना दिले होते. नगराध्यक्ष म्हणून प्रशांत ठाकूर यांनी अनेक विकास कामांना चालना देऊन आपली राजकीय परिपक्वता सिद्ध करायला सुरुवात केली होती. अडीच वर्षांनंतर पुन्हा नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लागली. नगरपालिकेत पुन्हा काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचा नगराध्यक्ष होणार होता. कारण युतीचे संख्याबळ अधिक होते. मात्र या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे यांची महत्त्वाकांक्षा जागृत झाली. त्यांनी शेकापला हाताशी धरून नगराध्यक्षपदाची भाकरी फिरवण्याचा प्रयत्न सुरू केला. युतीत असलेल्या राष्ट्रवादीने गद्दारी करून युती तोडली व राष्ट्रवादीचे सुनील मोहड यांना नगराध्यक्षपदी बसविले. हा युतीचा धर्म नव्हता, तर फसवणूक होती. पुढील अडीच वर्षांचा पनवेल नगरपालिकेचा नगराध्यक्ष कोण असावा, हा नगरसेवकांच्या राजकीय जाणिवेच्या मतातून ठरले असते. मात्र सुनील तटकरे यांनी केलेले कटकारस्थान रामशेठ यांच्या जिव्हारी लागणारे होते. अडीच वर्षांच्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीत प्रशांत ठाकूर यांना प्रशासकीय कामाची चांगली जाण आली होती. मुख्यमंत्री विलासरावांना विधानसभेसाठी पनवेलमधून जो

उमेदवार हवा होता, तो रामशेठ यांच्या तालमीत तयार झाला होता.

याच दरम्यान नोव्हेंबर २००९ ला विधानसभेची निवडणूक जाहीर झाली. लोकसभेची निवडणूक नुकतीच पार पडली होती, मात्र आचारसंहिता अजून शिथिल झाली नव्हती. पावसाळा जवळ आला होता. पावसाव्यापूर्वीची कामे युद्धपातळीवर पूर्ण व्हावीत म्हणून रामशेठ आग्रही होते. २८ मे पर्यंत आचारसंहिता लागू राहणार असल्याने शहरातील विकास कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने सत्ताधाऱ्यांनी आग्रह धरला. त्यांनी सी. के. टी. महाविद्यालयात सर्व नगरपालिका सदस्यांची व पालिकेच्या अधिकाऱ्यांची एक बैठक बोलावून शहरातील विकास कामांचा आढावा घेतला.

काँग्रेसचे पनवेल १८८ विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार म्हणून प्रशांत ठाकूर यांची उमेदवारी जाहीर झाली. उमेदवारी अर्ज दाखल करताना काँग्रेस पक्ष कार्यालयातून निघालेली रॅली ही काँग्रेसच्या पनवेलच्या इतिहासातील अभूतपूर्व रॅली होती. हजारो कार्यकर्ते उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित झाले. आजपर्यंत शेकापच्या लाल बावट्याने लाल दिसणारे पनवेलचे रस्ते आता काँग्रेसचा हात हातात घेऊन चालत होते. कार्यकर्त्यांचा उत्साह पराकोटीला पोहोचला होता. शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने बाळाराम पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

नवीन पनवेल येथे बांठिया हायस्कूलच्या मैदानात काँग्रेस आघाडीचे उमेदवार म्हणून प्रशांत ठाकूर यांच्या प्रचार सभेदरम्यान असा योग आला आणि कधीही एकत्र न येणारे मुख्यमंत्री विलासराव देशमुख, व मा. नारायण राणे हे एकाच व्यासपीठावर उपस्थित झाले होते. प्रशांत ठाकूर यांनी नगराध्यक्ष म्हणून केलेल्या कार्याचे तोंडभरून कौतुक विलासरावांनी केले. रामशेठ ठाकूर यांच्याप्रमाणे वचनाला जागून विनम्रपणे काम करणारे प्रशांत ठाकूर या तरुण नेतृत्वाला विजयी करण्याचे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

प्रचाराला जोरदार सुरुवात झाली आणि कार्यकर्ते कामाला लागले. पराजयाच्या भीतीने विवेक पाटील यांनी पनवेलमधून उरणला पळ काढला. त्यांनी बाळाराम पाटील यांना शेतकरी कामगार पक्षाची उमेदवारी दिली. प्रचाराचा रंग गावागावांत, वाडी-वस्त्यांत चढत गेला. प्रशांत ठाकूर प्रत्येक गावात जाऊन मतदारांना भेटत होते. आपले विचार प्रचार सभा घेऊन विकासाची दिशा स्पष्ट करीत होते. प्रशांत ठाकूर यांच्यासारखा सुशिक्षित तरुण मतदारांना भावला होता. निवडणुकीचे वातावरण काँग्रेसमय व्हायला लागले आणि त्याची छाप मतदानयंत्रावर पडली. प्रशांत ठाकूर यांच्या गळ्यात आमदारकीच्या विजयाची माळ घातली गेली.

काँग्रेसला पनवेलमध्ये पहिलाच कर्तृत्ववान आमदार मिळाला होता. राज्यात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचे सरकार स्थापन झाले. त्यामुळे विकासाच्या प्रलंबित कामांना मूर्त रूप देणे सोपे झाले. सलग अकरा वेळा शेतकरी कामगार पक्षाने विधानसभा जिंकली होती. त्यामुळे येथील वतनदारी आपलीच,



● **प्रशांत ठाकूर ह्यांच्या प्रचारासाठी उपस्थित तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, नारायण राणे, लोकनेते रामशेठ ठाकूर, प्रशांत ठाकूर आदी मान्यवर जनसमुदायाला अभिवादन करताना**

या आविर्भावात शेकापचे नेते कायम वावरत राहिले. 'रामशेठ काँग्रेसमध्ये जाऊन एकटे काय करणार?' अशा त्यांच्या वल्गना होत्या. त्यांचा बुडबुडा फुटला. सन २००९ च्या विधानसभा निवडणुकीत रामशेठ यांनी होत्याचे नव्हते केले. शेतकरी कामगार पक्षाचा गड भेदून त्यांनी २००९ ची विधानसभा जिंकली आणि प्रशांत ठाकूर यांना आमदार केले. पनवेल नगरपरिषद ताब्यात घेतलीच होती. ५५ वर्षांची शेकापची मक्तेदारी मोडून काँग्रेसचा आमदार निवडून आणणे, ही सोपी गोष्ट नव्हती.

रामशेठ यांनी केवळ राजकारण न करता सामाजिक न्यायासाठी सातत्याने लढा दिला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जे.एन.पी.टी.चा साडेबारा टक्के भूखंड वाटपाचा तिढा सोडविण्यासाठी दि. बा. पाटील यांनी आंदोलन उभे केले होते. या आंदोलनात रामशेठ कायम सक्रिय राहिले. पण या आंदोलनाची दखल सरकार काही घेत नव्हते. काँग्रेसमध्ये गेल्यानंतर त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना सदरच्या प्रश्नाबाबत सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यास भाग पाडले. प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. मंगळवार, दिनांक २९ मे २०१२ रोजी नवी दिल्लीत ट्रान्सपोर्ट (वाहतूक) भवन येथे याबाबत महत्त्वपूर्ण बैठक झाली. त्या वेळी नौकानयनमंत्री जी. के. वासन यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाची पंधरा दिवसांत मान्यता घेण्याची ग्वाही दिली. या वेळी बैठकीला उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, नामदार बबनराव पाचपुते, आमदार प्रशांत

ठाकूर, जे.एन.पी.टी.चे विश्वस्त भूषण पाटील, दिनेश पाटील, महेंद्र घरत, सुरेश पाटील उपस्थित होते. या बैठकीत जे. एन. पीटी प्रकल्पग्रस्तांच्या साडेबारा टक्के भूखंडाबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला.

रायगड जिल्ह्यातील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (एसईझेडसाठी) जमिनी अधिग्रहण करण्याला शेतकऱ्यांनी प्रखर विरोध करायला सुरुवात केली. त्यासाठी 'महामुंबई शेतकरी संघर्ष समिती'ची स्थापना करण्यात आली होती. काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांची भूमिका काय आहे, हे समजून घेण्यासाठी आणि 'सेझ'संदर्भात वस्तुस्थितीदर्शक अहवाल तयार करण्यासाठी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा प्रभा राव यांनी माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर, संजय निरुपम, खासदार संजय पाटील यांची त्रिसदस्यीय सत्यशोधक समिती गठित केली. या समितीने पेण, अलिबाग दौरा करून शेतकऱ्यांची मते जाणून घेतली. सदर समितीने २८ मार्च २००७ रोजी अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन सेझसंदर्भातील सत्य परिस्थिती जाणून घेतली. कारण सरकारी अधिकारी शेतकऱ्यांच्या विरोधात भूमिका घेत असून, रायगड जिल्हा प्रशासन जबरदस्तीने भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करीत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या होत्या. त्रिसदस्यीय समितीने शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांना या प्रश्नावर शेतकरी आणि सरकारने एकत्र बसून विचारविनिमय करून हा प्रश्न सोडवायला हवा, अशी काँग्रेसची भूमिका आहे. आंदोलन, हिंसाचारातून निरपराध लोकांच्या डोक्यात दगड भिरकावून हा प्रश्न सुटणार नाही, असे त्यांनी सांगितले. रामशेठ यांनी सरकारची बाजू शेतकऱ्यांना समजावून सांगत असताना शेतकऱ्यांच्या हिताला कोठेही धक्का लागणार नाही, याची पूर्ण काळजी घेतली, त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनातील गैरसमज दूर झाला.

सिडकोचे अतिक्रमण विरोधी पथकाचे प्रमुख सुमंत भांगे हे शेकडो पोलिसांच्या बंदोबस्तात कामोठे येथील दिनकर मारुती पावणेकर यांचे घर जेसीबीच्या साहाय्याने पाडण्यासाठी आले. ग्रामस्थांनी तत्काळ रामशेठ ठाकूर यांना कळविले. तातडीने रामशेठ ठाकूर यांनी प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर यांना सोबत घेऊन घटनास्थळी धाव घेतली. सिडकोने पोलिसांची आणलेली फौज चारही बाजूंना उभी केली होती, जेणेकरून कोणीही आत येऊन तोडकाम थांबवू नये. तेथे पोहोचल्यावर त्यांनी एकंदरीत परिस्थितीचे अवलोकन केले. पोलिसांनी त्यांना अडवले, त्यांना आत जाऊ देईनात. सिडकोच्या अशा कारवाईविरोधात त्यांचा संताप अनावर झाला होता. ते खाली वाकले आणि पोलिसांना चुकवून आत शिरले व तोडकामाला आडवे गेले. तोडकाम करणाऱ्यांसमोर जाऊन उभे राहिले. या कारवाईत घरातील महिलांना घरातून बाहेर काढून मारहाण करण्यात आली होती. पाच महिन्यांच्या मुलाला दुखापत झाली होती. हे पाहून त्यांनी सिडको अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आदेश दिले होते. तसा जीआर शासनाने काढलेला असतानाही त्याची अंमलबजावणी न करता प्रकल्पग्रस्तांची घरे तोडायची हे रामशेठ यांना पटले नाही. सिडकोमार्फत

विकसित झालेल्या व काम सुरू असलेल्या विभागात सर्व सोयीसुविधा न देताच सिडको नुसताच देखावा करीत होती. जुलूमशाही कारभार करणाऱ्या सिडकोला धडा शिकविण्याची वेळ आली होती. शासनाचे आदेश न मानणाऱ्या सिडको अधिकाऱ्यांनी व पोलिसांनी प्रकल्पग्रस्तांची माफी मागून त्यांना भरपाई द्यावी, असा सज्जड दम रामशेठ ठाकूर यांनी दिल्यानंतर अधिकारी कारवाई थांबवून आल्या पावली आपली यंत्रणा घेऊन परत निघून गेले. रामशेठ यांच्या कठोर भूमिकेमुळे अधिकाऱ्यांना कारवाई थांबवावी लागली. जेव्हा अन्याय समोर दिसतोय, तेव्हा रामशेठ कधी थांबले नाहीत. त्या प्रत्येक अन्यायाविरुद्ध त्यांनी आवाज उठवला आणि न्याय मिळवून दिला.

केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाकडून प्रस्तावित (इकोसेन्सिटिव्ह झोन) मधील वनक्षेत्रालगत गौण खनिज उत्खनन परवान्याची पडताळणी करण्याबाबत उरणचे परिक्षेत्र वनाधिकारी यांच्याकडून आलेल्या पत्रानुसार राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये याभोवती सुमारे दहा किलोमीटरपर्यंतचे क्षेत्र 'इकोसेन्सेटिव्ह' झोन घोषित करण्याची शिफारस करण्यात आली होती. या अनुषंगाने पनवेल, उरण, पेण व खालापूर या तालुक्यांच्या हद्दीतील काही भाग पर्यावरण संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे व अधिसूचना तपशिलासह सादर करण्याचे निर्देश जाहीर करण्यात आले. या अधिसूचनेला रामशेठ यांनी कडाडून विरोध केला. कारण दहा किलोमीटर त्रिज्येत संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित केले, तर या भागातील सर्व दगड-माती खाणी आणि क्रशर व छोटे-मोठे गौण खनिज उद्योग बंद पडून हजारो कामगार बेरोजगार होणार होते. ही अधिसूचना रद्द करून दहाऐवजी दोन किलोमीटर त्रिज्येत संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करावे, अशी त्यांनी मागणी केली.

काँग्रेस ओबीसी सेलच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी महाराष्ट्रभर दौरे सुरू केले. ओबीसी समाजापर्यंत पोहोचले. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. महाराष्ट्राची नाडी ओळखणारा आणि ओबीसी समाजाप्रमाणेच इतरांच्या मदतीला धावून जाणारा नेता म्हणून रामशेठ यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाऊ लागले. रामशेठ यांच्या कार्यशैलीचा एवढा प्रभाव पडला होता, की ओबीसी समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी रामशेठ ठाकूर यांना लोकसभेची उमेदवारी मिळावी, अशी एकमुखी मागणी महाराष्ट्र ओबीसी सेलच्या मेळाव्यात राज्यभरातून आलेल्या ओबीसी नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली. तसा ठराव केला. मात्र रामशेठ यांनी आपण २००४ मध्येच कोणतीही निवडणूक लढविणार नाही, असा निर्णय घेतल्याची आठवण करून दिली. ओबीसींचे नेतृत्व रामशेठ ठाकूर यांच्याकडे आल्यानंतर ओबीसींच्या कार्याला अधिक गती मिळाली. सगळ्यांना चांगले काम करण्याची संधी मिळाल्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला. त्यांच्या कामामुळे काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी व ओबीसी सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष के. सी. लेंका, तसेच इतर राष्ट्रीय नेतेही प्रभावित झाले होते. राज्यात, देशात ओबीसींना राजकीय प्रतिनिधित्व मिळायला हवे, त्यासाठी सर्वांनी जागरूक राहणे

गरजेचे असून, आपले हक्क मिळविण्यासाठी प्रसंगी रस्त्यावर उतरण्याची तयारी कार्यकर्त्यांनी ठेवायला हवी, असे त्यांना वाटत होते.

संगणक प्रणालीचा उपयोग करून त्यांनी रायगड जिल्ह्यातील काँग्रेसची महत्त्वाची कार्यालये एकमेकांशी जोडण्याचा विचार केला व सन २०१२ मध्ये पनवेल व अलिबाग येथील कार्यालये व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे प्रदेश काँग्रेस व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीशी थेट जोडली, त्यामुळे अगदी तालुकास्तरीय कार्यकर्ते सुद्धा श्रेष्ठींशी थेट संवाद करू लागले.

मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या उड्डाणपुलाच्या मागणीची पूर्तता मुख्यमंत्र्यांनी केली होती. या कामाच्या निविदा निघाल्या. १८५ कोटींच्या उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात झाली. या कामाचा शुभारंभ सन २०१० मध्ये मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला आणि आज मुंबई गोवा महामार्गाने जाणाऱ्या प्रवाशांना पनवेल शहरातून सुखाने बाहेर पडता येऊ लागले. रामशेठ यांनी आपल्या प्रत्येक विचारात, प्रत्येक कृतीत परमार्थ साधला. पनवेलमध्ये साकार झालेला हा उड्डाणपूल अर्थाचा नव्हे, तर परमार्थाचा एक भाग होता.

१०

काँग्रेसला टोलनाका भोवला

सन २०१४ च्या लोकसभा निवडणुका जवळ आल्या होत्या. रामशेठ काँग्रेसच्या एका कार्यक्रमासाठी माटुंग्याच्या षण्मुखानंद हॉलमध्ये उपस्थित होते. त्याच दिवशी रात्री ते परिवार आणि मित्रमंडळीसह परदेश दौऱ्यावर निघणार असल्याने त्यांनी आपले समान सोबत घेतले होते. रात्रीचे विमान असल्याने ते कार्यक्रम संपल्यानंतर परस्पर विमानतळावर जाणार होते. पनवेलमधील सोबत येणारी मित्रमंडळींनी त्यांना विमानतळावर भेटायचे, असे एकंदरीत नियोजन होते. कार्यक्रमादरम्यान त्यांना दिल्लीमधून राहुल गांधींच्या कार्यालयातून शेट्टी यांचा निरोप आला, की राहुल गांधी यांनी दिल्लीला भेटायला बोलावले आहे. दिल्लीला जाणे महत्त्वाचे असल्याने त्यांनी आपल्या बाकीच्या मित्रमंडळींना पुढे जाण्यास सांगितले. कार्यक्रम संपल्यावर ते दिल्लीला जायचे आणि दिल्लीवरून परदेशात जाऊन मित्रमंडळींना भेटायचे, असे नियोजन करून ते दिल्लीकडे रवाना झाले. दिल्लीतील तुघलक रोडवरील राहुल गांधींच्या कार्यालयात त्यांना भेटायला गेले. राहुल गांधींनी रामशेठ यांना २०१४ च्या निवडणुकीसाठी उभे राहण्याविषयी सांगितले .पण आता रामशेठ यांना निवडणूक लढवायची नसल्याने त्यांनी त्या वेळी राहुल गांधींना प्रामाणिकपणे सांगितले, की 'मी यापुढे निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला असून, यापुढे मला फक्त पक्षासाठी काम करायचे आहे.' आपल्या राजकीय कारकीर्दीत यशाच्या शिखरावर असताना असा निवृत्तीचा निर्णय एक संन्यस्त माणूसच घेऊ शकतो. कारण मनुष्यजीवन हे पूर्ण मोहाने भरलेले आहे. छोट्या छोट्या गोष्टींचा मोह माणसाला सोडता येत नाही. त्यात राजकीय मोह सोडणे अवघड असते. यश आपल्या पाठीशी असताना रामशेठ यांनी राजकीय संन्यास घेणे, ही सामान्य बाब नव्हती. काँग्रेसला पनवेल, उरणबरोबर रायगड जिल्ह्यात मोठ्या उंचीवर घेऊन जाणारे रामशेठ पनवेल, उरणमधील जनतेसाठी विकासाची कामे व्हावीत, त्यांच्या समस्यांना वाचा फुटावी म्हणून कायम दक्ष राहिले. पण जेव्हा सार्वजनिक कामात खोडा घालून त्यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न सत्तेतील सरकारने केला, तेव्हा मात्र त्याची गय त्यांनी केली नाही. राजकारण आणि सत्तेपेक्षा समाजकारणाला त्यांनी आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान दिले. त्यासाठी आपण ज्या पक्षात आहोत त्या पक्षाच्या विरुद्ध जनहितासाठी रस्त्यावर उतरायला त्यांनी कमी केले नाही, म्हणूनच खारघर टोल नाक्याचा प्रश्न त्यांनी लावून धरला. तो महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत पोहोचला.

सायन-पनवेल महामार्गावरील रस्त्याचे काम जवळजवळ पूर्णत्वाला आलेले होते. दहा पदरी असणारा



● खारघर टोलनाक्याच्या आंदोलनात रामशेठ ठाकूर टोलनाका रद्द करावा म्हणून कार्यकर्त्यांसह रस्त्यावर बसले

हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने खासगी कंपनीला तयार करायला दिला होता, तो 'बांधा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर. हे काम सुरू असल्यामुळे काम पूर्ण होण्याअगोदरच सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदाराच्या माध्यमातून खारघर येथील टोलनाका उभा करायला सुरुवात केली. रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांना हे कळताच ते आक्रमक झाले. पनवेल-मुंबई रस्त्यावर जाण्या-येण्याकरिता स्थानिक रहिवाशांना आपल्या मुलांना शाळेत सोडणे-आणणे, रुग्णालयात जाणे, डॉक्टरांकडे जाणे-येणे, शासकीय कार्यालयात जाणे-येणे हे रोजच करावे लागत होते. प्रत्येक वेळी स्थानिकांनी येता-जाता टोल भरायचा का? पनवेल तालुक्यातील स्थानिकांना टोल द्यावा लागणे, ही बाब अन्यायकारकच होती. त्यामुळे येथील टोलनाका रद्द करा किंवा एमएच ४६ आणि एमएच ०६ असलेल्या वाहनांना पूर्णपणे टोल माफी मिळावी, अशी भूमिका घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांनी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निवेदन देऊन मागणी केली. सरकारने प्रशांत ठाकूर यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. सार्वजनिक बांधकाम विभागही याबाबत गप्प होता. जास्त वाट न पाहता काँग्रेसच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली. गावोगावी रॅली काढून स्वाक्षरी मोहीम सुरू केली व या आंदोलनात जास्तीत जास्त पनवेलकरांना सहभागी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पनवेलकरांना टोल भुर्दंड कशाला, असा सवाल करणारे फलक हातात घेऊन अनेक तरुण सिग्नलवर उभे



• **'कोणत्याही परिस्थितीत टोलनाका रद्द झाला पाहिजे, नाहीतर मी जागेवरून हलणार नाही,' असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना निक्षून सांगितले**

राहिले. सिग्नल पडल्यावर वाहनचालकांना संबंधित फलक दाखवून जनजागृती केली जात होती. एलईडी लावलेली वाहने रस्त्यात, चौकात उभी करून त्यावरून प्रशांत ठाकूर यांची टोलनाक्याबाबतची भूमिका ऐकवली जात होती व आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत होते. प्रभावीपणे ही जनजागृती मोहिम राबविली जात असल्याने टोलनाक्याची चर्चा आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाविषयीची भावना तीव्र होत गेली. या मोहिमेला चांगलेच यश आले व टोलविरुद्ध जनमत तयार झाले.

११ जुलै २०१४ रोजी होणाऱ्या आंदोलनाबाबत माननीय मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना निवेदन देण्यात आले. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाममंत्री छगन भुजबळ, रणजित कांबळे यांच्याबरोबर बैठक घेण्यात आली. मुख्यमंत्र्यांना निवेदन देताना रामशेठ ठाकूर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, की 'त्या परिसरात राहणाऱ्या स्थानिकांना टोलचा भुर्दंड कशाकरिता? कोणत्याही परिस्थितीत स्थानिकांना तो लावू देणार नाही, त्याकरिता आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागले तरी चालेल. आपल्याला याची कल्पना असावी म्हणून हे निवेदन आपल्याला देत आहोत.' निवेदन देऊन मुख्यमंत्री कोणता निर्णय देतात, याचा विचार न करताच आंदोलनाची तयारी सुरू केली.

११ जुलै २०१४ ला ठरल्याप्रमाणे टोल आंदोलनासाठी सकाळी १० वाजल्यापासून कामोठे येथे आमदार

प्रशांत ठाकूर यांच्या जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांनी गर्दी करायला सुरुवात केली. काँग्रेसचे झेंडे हातात घेऊन भरपावसात निघालेले कार्यकर्ते, यात शेकडो महिला आघाडीवर होत्या. दोन किलोमीटरचे अंतर चालून मुंबईकडे जाणाऱ्या खारघर टोलनाक्याला आंदोलकांनी घेराव घातला. पाऊस पडत होता, तरी आंदोलनकर्ते पाऊस अंगावर झेलत रस्त्यावर उभे होते. लोकनेते रामशेठ ठाकूर भरपावसात उभे राहून टोलनाक्याबाबतची आपली भूमिका स्पष्ट करीत होते.आपल्या लोकनेत्याचे विचार ऐकून कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले. शांत स्वभावाच्या रामशेठ ठाकूर यांचा हा अवतार अनेकांना नवखा होता, पण रामशेठ ठाकूर यांना आंदोलन नवे नव्हते.

अनुचित प्रकार घडू नये म्हणून आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलिसांच्या फौजा टोलनाक्यावर आंदोलकांच्या प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवून उभ्या होत्या. रामशेठ ठाकूर आपले भाषण पूर्ण झाल्यानंतर सरळ रस्त्यावर झोपले. "आमच्या अंगावरून गाड्या न्या, पण कोणत्याही परिस्थितीत स्थानिक लोकांना टोलमाफी मिळाल्याशिवाय उठणार नाही. हवे तर आम्हाला अटक करा." त्यांनी पोलिसांना निक्षून सांगितले. संतप्त आंदोलकांचा पवित्रा बघून नवी मुंबई परिमंडळ २ चे पोलिस उपायुक्त संजयसिंग ऐनपुरे, साहाय्यक उपायुक्त शेषराव सूर्यवंशी जातीने हजर झाले होते. त्यांनी सरकारी यंत्रणेशी संपर्क करून मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू केला. पोलिस अधिकारी रामशेठ यांना विनंती करीत होते. "ट्रॅफिक पूर्ण थांबले आहे. गाड्यांच्या रांगा वाशी टोलनाक्यापर्यंत गेल्या आहेत." रामशेठ संतापून म्हणाले, "या रांगा अशाच वर्षा बंगल्यापर्यंत जायला हव्यात, तरच मुख्यमंत्र्यांना जाग येईल." नेते आणि कार्यकर्ते निश्चित आश्वासन मिळाल्याशिवाय रस्त्यावरून उठायला तयार नव्हते.

रामशेठ ठाकूर भरपावसात रस्त्यावर झोपलेले आहेत, हे बघून पोलिसांसमोर पेच निर्माण झाला. नेमके काय करावे, हे त्यांना सुचत नव्हते. प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांनी रामशेठ ठाकूर यांना फोन करून सांगितले, की 'मी यामधून मार्ग काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांशी बोलत आहे. तुम्ही शांत राहा.' पण रामशेठ ठाकूर यांनी त्यांना सांगितले, की जोपर्यंत मुख्यमंत्र्यांकडून टोलसंबंधातील बैठक घेऊन आम्हाला निर्णय मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही. प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे फोनवर मुख्यमंत्र्यांशी बोलले आणि आंदोलन करणाऱ्या नेत्यांची मागणी मुख्यमंत्र्यांच्या कानांवर घातली. मुख्यमंत्री कार्यालयाने रामशेठ ठाकूर यांच्याशी संपर्क साधून, उद्या १२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सह्याद्री अतिथिगृहात बैठक आयोजित केली असल्याचा निरोप फोनवर दिला. बैठकीची वेळ मिळाल्यानंतर रामशेठ आमदार प्रशांत ठाकूर यांना म्हणाले, ''उद्याच्या बैठकीत त्यांनी स्पष्ट आश्वासन नाही दिले, तर राजीनामा देशील?'' आमदार त्यावर लगेच 'होय' म्हणाले. यावेळी हजारो लोकांनी 'प्रशांत ठाकूर जिंदाबाद', 'रामशेठ ठाकूर जिंदाबाद', 'काँग्रेस जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या.

मुख्यमंत्री कार्यालयाकडून बैठकीसाठी वेळ देण्यात आली, नंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

त्याअगोदर प्रशांत ठाकूर यांनी आंदोलक कार्यकर्त्यांना सांगितले, की '१० जुलै रोजी मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलावली होती, पण त्यांना अचानक दिल्लीला जावे लागले. त्यामुळे टोलप्रश्नावर चर्चा होऊ शकली नव्हती, आता बैठकीची उद्याची तारीख दिली आहे. पनवेल तालुक्याच्या सामान्य लोकांच्या प्रश्नांसाठी मी लढा लढत आहे. कोणतीही शिक्षा भोगायला मी तयार आहे. प्रश्न सुटला नाही, तर आमदारकीचा राजीनामा मी देणार आहे. सत्तेसाठी मी आंदोलन करीत नाही. प्रसिद्धीसाठी तर अजिबातच नाही. सत्तेपेक्षा जनतेचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. पनवेल तालुक्याच्या माझ्या नागरिकांना वेठीस धरणारा हा टोल रद्द झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.' दोन तास वाहतूक बंद पाडल्यामुळे पोलिसांनी रामशेठ व प्रशांत ठाकूर यांच्यासह कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यांना रोडपाली येथील मुख्यालयात नेऊन काही वेळाने सोडून देण्यात आले.

१२ जुलै रोजीच्या सह्याद्री अतिथिगृहातील बैठकीसाठी मुख्यमंत्र्याबरोबर मुख्य सचिव सहारिया, याखेरीज अर्थ खात्याचे सचिव श्रीवास्तव, बांधकाम खात्याचे सचिव नाईक आणि एमएमआरडीएचे व्यवस्थापकीय संचालक देवधरही उपस्थित होते. पनवेलमधून रामशेठ ठाकूर व प्रशांत ठाकूर यांच्यासोबत नवी मुंबईचे पालकमंत्री गणेश नाईक, आर. सी. घरत, लक्ष्मण पाटील व महेंद्र घरत उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुरुवातीलाच पनवेलच्या विकासाकरिता एमएमआरडीएमार्फत १८० कोटी रुपये दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करून खारघर येथील प्रस्तावित टोलनाक्यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली.

बैठकीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले, की 'टोलनाकावाल्यांनी येथे टोल बूथ बसविले आहेत, ते हलवायला सांगा.' पालकमंत्री गणेश नाईक यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले, की 'रामशेठ आणि प्रशांत ठाकूर यांनी घेतलेल्या भूमिकेचे आम्ही समर्थन करीत आहोत. वाशीला टोल भरल्यानंतर पुन्हा पुण्याच्या रस्त्यावर खालापूरजवळ टोल भरायचा आहे. त्यामुळे खारघरचा टोलनाका पूर्णपणे चुकीचा आहे. या रस्त्यासाठी झालेला १,२०० कोटींचा खर्च आहे, तो खर्च ठेकेदाराला कसा परत करायचा आणि संपूर्ण मार्गावर टोलमुक्ती कशी करायची, याचा निर्णय तुमच्या नेतृत्वाखाली होऊ द्या. त्याचा महाराष्ट्रात एक चांगला संदेश जाईल म्हणून हा संपूर्ण टोलनाका रद्द करण्याची भूमिका आपण घेऊया.'

याबाबत काय करता येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सचिवांना विचारले. सचिव म्हणाले. "टोल परिसरातील पाच किलोमीटरच्या आतील गावांना टोलमाफी देण्यासाठी अभ्यास करावा लागेल.'' त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, ''स्थानिकांना टोल लावणे पूर्णपणे अव्यवहार्य आहे, ही गोष्ट मलाही मान्य आहे. ठेकेदाराची आर्थिक प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मी समिती नेमतो. ती दोन महिन्यांत निर्णय देईल.'' यावर समितीचा निर्णय दोन महिन्यांऐवजी एका महिन्यात घेण्यात यावा, असे रामशेठ यांनी सांगितले. ते मान्य करण्यात आले.

टोलबाबतचा हा प्रश्न मंत्रिमंडळासह सगळ्याच नेत्यांना माहिती होता. सामान्य माणसाच्या दैनंदिन

जीवनाशी हा प्रश्न निगडित असूनही मुख्यमंत्री जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत होते. हा प्रश्न धगधगत असतानाच पनवेलमधील महसूल भवनाच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमाला बाळासाहेब थोरात आले होते. हा कार्यक्रम नाट्यगृहात झाला. त्या वेळी रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणातून पुन्हा टोलचा विषय काढला आणि हा विषय नाही सुटला, तर आमदार प्रशांत ठाकूर राजीनामा देतील, असे जाहीरपणे सांगितलं. यावर बाळासाहेब थोरात यांनी, "प्रशांत ठाकूर यांना राजीनामा देण्याची वेळ येणार नाही,'' असे सांगितले. मात्र बाळासाहेब थोरातांचे हे आश्वासनही हवेत विरून गेले.

बैठकीला एक महिना होत आला. ११ सप्टेंबर उजाडला, तरी मुख्यमंत्री काहीच निर्णय घेत नव्हते. समिती स्थापन करणे हे केवळ मुख्यमंत्र्यांचे वेळकाढूपणाचे धोरण होते. कारण निवडणुका जवळ आल्या होत्या. त्यामुळे एकदा आचारसंहिता लागली, की टोलचा विषय स्थगित राहणार होता. मुख्यमंत्री त्याच हिशेबाने चालले होते. त्यांची सुरू असलेली टोलवाटोलवी स्पष्ट दिसत होती. त्यांना हा प्रश्न सोडवायचाच नव्हता. त्यांना आचारसंहिता लागेपर्यंत हा प्रश्न तसाच चिघळत ठेवायचा होता. पण आचारसंहिता लागली, तर लोकांना काय उत्तर देणार? मुख्यमंत्र्यांना टोलमाफी द्यायचीच नव्हती, म्हणून ते पुढे पुढे ढकलक होते, हे रामशेठ यांना माहीत होते. निवडणुकांसाठी उमेदवारांच्या मुलाखती सुरू झाल्या, मात्र विधानसभेच्या निवडणुकीच्या मुलाखतीसाठी आमदार प्रशांत ठाकूर गेले नाहीत. टोलमाफी झाली तरच उमेदवारी अर्ज भरणार, नाहीतर प्रशांत ठाकूर आमदारकीचा राजीनामा देणार, या भूमिकेवर ते ठाम होते. त्यांनी याबाबत पक्षाच्या सगळ्या नेत्यांना माहिती दिली. कारण कोणी म्हणायला नको, की पक्ष सोडण्याची संधी शोधत आहे, राजीनामा देईन, असे सांगितले असतानासुद्धा मुख्यमंत्र्यांना दखल घ्यावी वाटली नाही. ते पनवेलकरांच्या तोंडाला पाने पुसण्याचेच काम करीत आहेत, असे दिसायला लागले होते.

पनवेल काँग्रेसमध्ये घडत असलेल्या या घटनांचे पडसाद महाराष्ट्रातच नव्हे, तर दिल्लीपर्यंत पोहोचले. रामशेठ यांनी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला होता. पनवेलमध्ये काँग्रेस शिल्लक राहणार नाही आणि काँग्रेसची हक्काची आमदारकीची जागा कमी होईल म्हणून प्रदेश काँग्रेसच्या गोटामध्ये हालचाली सुरू झाल्या. रामशेठ यांची मनधरणी करण्यासाठी वने व पर्यावरणमंत्री ना. पतंगराव कदम आणि प्रशांत ठाकूर यांचे अत्यंत जवळचे मित्र राजीव सातव यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली. पण टोलमाफी झाल्याशिवाय राजीनाम्याचा निर्णय बदलणार नाही, असे प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

एवढे सगळे घडत असूनदेखील मुख्यमंत्र्यांची निर्णय घेण्यात चालढकल सुरूच होती. शेवटी प्रशांत ठाकूर यांनी निर्णय घेतला आणि पनवेल काँग्रेसच्या सगळ्या पदाधिकाऱ्यांनी मुंबईत टिळक भवनमध्ये जाऊन ९ ऑक्टोबर २०१४ ला आपल्या पदाचे राजीनामे दिले. जे दिलेला शब्द पाळत नाहीत अशा मुख्यमंत्र्यांच्या सोबत काम करणे नको म्हणून शुक्रवार, दि. १२ ऑक्टोबर २०१४ रोजी प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेच्या सभापतींच्या कार्यालयात जाऊन आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला. राजीनामा देत

असतानाच मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना एक पत्र पाठवून त्यांच्या कारभारावर ताशेरे ओढले. केवळ शोभेचा आमदार म्हणून काम करण्यापेक्षा या पदाचा आपण त्याग करीत असल्याचे त्यांनी नमूद केले. जे.एन.पी.टी.च्या प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंड द्यावेत म्हणून केंद्र सरकारने ऑक्टोबर २०१२ मध्ये निर्णय घेऊनही राज्य सरकारच्या उदासीन भूमिकेमुळे आजपर्यंत त्याची अंमलबजावणी झाली नाही. पनवेल-सायन महामार्गावरील टोलनाका रद्द करण्याची विनंती २०१४ रोजी केली. ११ जुलै २०१४ रोजी रास्ता रोको करेपर्यंत आपण याबाबत बैठकीचे आयोजन केले नाही. पनवेलमधील स्थानिकांना, तसेच एमएच ४६ व एमएच ०६ क्रमांकाच्या वाहनांना टोलमधून वगळण्यात येईल, असे आश्वासन आपण दिले होते. महिनाभरात हा निर्णय घेऊ, असे सांगूनही आजपर्यंत हा निर्णय घेतला नाही. अशा स्थितीत शोभेचा आमदार राहण्यापेक्षा आपण आमदारकीचा त्याग करीत आहोत, असे पत्रात नमूद केले होते. आपल्या अस्मितेचा प्रश्न आहे, असे समजून त्यांनी पनवेलकरांना दिलेला शब्द पाळला. प्रशांत ठाकूर यांच्या राजीनाम्याने एकच खळबळ उडाली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत चर्चा सुरू झाल्या. प्रशांत ठाकूर यांच्यावर प्रेम करणारा प्रत्येक कार्यकर्ता हळहळला. आपला नेता एखादा प्रश्न सुटत नाही म्हणून राजीनामा देतो, ही बाब कार्यकर्त्याला अभिमानास्पद वाटली आणि प्रशांत ठाकूर यांच्यावरचा विश्वास अधिक दृढ झाला.

प्रशांत ठाकूर यांनी आमदारकीच्या कालखंडात पनवेलच्या विकासाचे नवे पर्व सुरू केले होते. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी रामशेठ ठाकूर यांच्या राजकीय वजनाला झुकते माप दिले होते. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना रामशेठ ठाकूर यांचे राजकीय वजन कळलेच नाही. ते त्या टोलनाक्याच्या लढाईत मात्र त्यांना समजून आले होते. खारघर टोलनाक्याच्या बाबतीत मुख्यमंत्र्यांनी केलेली चालढकल रायगडमधील काँग्रेसला किती हानी पोहोचवू शकते, याची कल्पना त्यांना आली नाही. रामशेठ ठाकूर ही फक्त व्यक्ती नसून, ती स्वतः एक संघटना आहे, हे दिल्लीत पंतप्रधान कार्यालयात बसून महाराष्ट्रात आलेल्या आणि मुख्यमंत्री झालेल्या पृथ्वीराज चव्हाण यांना समजू नये, याचे आश्चर्य सगळ्यांना वाटत होते.

रामशेठ ठाकूर लोकनेते होते. ते जिथे उभे राहतात तेथे पक्ष उभा राहतो, हे कळायला फार काळ लागला नाही. प्रशांत ठाकूर यांचा आमदारकीचा राजीनामा हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी काँग्रेस पक्षाचा दिलेला राजीनामा होता. पनवेलचे राजकीय वातावरण जनतेच्या हितासाठीच बिघडलेले होते, त्यात गैर असे काहीच नव्हते. जो नेता लोकहिताचे निर्णय घेत नसेल, असे नेते आणि त्यांचे पक्ष काय कामाचे, असा विचार करून त्या सत्तेला आणि मानापमानाला ठोकर मारतो, तेव्हा त्याच्या नेतृत्वाला अधिक धार चढत जाते. जनतेच्या प्रश्नांना जेथे किंमत उरत नाही, तेव्हा लोकप्रिय नेत्याला अशी ताठर भूमिका घ्यावीच लागते. ती घेतली तरच त्याच्या नेतृत्वावरचा विश्वास अधिक दृढ होत राहतो.

शुक्रवार, दि.१२ ऑक्टोबर २०१४ रोजी आमदारकीचा राजीनामा देऊन पनवेलला आल्यावर त्यांनी आपल्या मुख्य कार्यकर्त्यांशी चर्चा केली. निवडणूक लढविणार नाही, अशी ठाम भूमिका प्रशांत ठाकूर

यांनी घेतली. प्रशांत ठाकूर यांची ही भूमिका मात्र कोणत्याच कार्यकर्त्याला पटण्यासारखी नव्हती. जनतेला विकासासाठी प्रशांत ठाकूर यांच्यासारखा उमदा आणि युवा व आधुनिक विचारांचा नेता पाहिजे होता. त्यामुळे प्रशांत ठाकूर यांच्या या निर्णयावर मात्र कार्यकर्त्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी आणि पुढील वाटचाल काय असेल, याबाबत कार्यकर्त्यांना सांगण्यासाठी रविवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी मार्केट यार्डमध्ये जी सभा घेतली, त्या सभेला कार्यकर्त्यांनी तुफान गर्दी केली. विशेष म्हणजे, काँग्रेसच्या जुन्याजाणत्या पदाधिकाऱ्यांनीही या सभेला हजेरी लावली. पक्षाचे सर्व नगरसेवक, ग्रामपंचायत सदस्य, पक्षाचे शहर आणि तालुका पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून पाठबळ दिले. आपण निवडणूक लढविणार नाही, असे प्रशांत ठाकूर यांनी म्हणताच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घोषणाबाजीला सुरुवात केली. 'तुम्हाला निवडणूक लढवावीच लागेल,' अशा शब्दांत कार्यकर्त्यांनी आग्रह धरला. सत्ताधारी आमदार असतानाही पृथ्वीराज चव्हाण यांनी कशी वागणूक दिली. दिवस दिवस कसे बाहेर बसवून ठेवले, ही मनातील सल त्यांनी बोलून दाखविली. 'काहीही करा, पण पुन्हा मैदानात उतरा, मैदान सोडले, तर पनवेलचा विकास होणार नाही. विरोधकांचे आयतेच फावेल म्हणून निवडणूक लढवा,' असे कार्यकर्त्यांचे म्हणणे पडले. कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवायची म्हणजे लढवायचीच, या मतावर पदाधिकारी आणि कार्यकर्ते ठाम राहिल्याने शेवटी प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक कमिटी स्थापन करून दोन दिवसांत ते निर्णय घेतील, अशी घोषणा रामशेठ ठाकूर यांनी केली. कमिटीने दोन दिवस कार्यकर्ते, हितचिंतक यांच्याशी गटनिहाय चर्चा केली. या चर्चेतून प्रशांत ठाकूर यांनी निवडणूक लढवावी, त्यासाठी दुसऱ्या पक्षात प्रवेश करावा लागला, तरी चालेल, असे ठरविण्यात आले. निवडणूक लढविण्यासाठी युवक, महिला, हितचिंतकांचा दबाव जास्त होता. प्रशांत ठाकूर यांच्या जनहिताच्या मागण्यांची वारंवार अवहेलना करणाऱ्या मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याविषयी जनमानसांत तीव्र संताप व्यक्त केला जात होता. सोशल मीडियाच्या माध्यमातून नाराजी व्यक्त केली जात होती. कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेऊन रामशेठ ठाकूर, प्रशांत ठाकूर, लक्ष्मणशेठ पाटील, अरुणशेठ भगत, जयंत पगडे यांनी काँग्रेस सदस्यत्वाचे राजीनामे प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांच्याकडे मंगळवारी, दि. १६ ऑक्टोबरला पाठविले. तेव्हा मात्र पनवेल-उरणमधून काँग्रेसची 'इतिश्री' झाली.

एका विशिष्ट ध्येयाने कार्यकर्त्यांना एकसंध ठेवून संघटना उभी करणे, ती वाढविणे आणि टिकविणे सोपे नसते. रामशेठ म्हणजे एक संघटन आहे, हे आजही कोणीच नाकारू शकत नाही. संस्था आणि संघटना मोठी करायला नेतृत्वही तितकेच प्रगल्भ आणि विश्वासार्ह असावे लागते. रायगडमध्ये काँग्रेसला नवसंजीवनी देणारा जिवंत झरा काँग्रेसच्या असंवेदनशील राजकाराणाने संपूर्ण आटवला. रामशेठ यांच्यासारखी प्रचंड ताकद काँग्रेसने गमावली आणि पुन्हा एकदा 'कुणी मत देता का मत' म्हणायची वेळ रायगडमध्ये काँग्रेसवर आली. विलासराव जर या कालावधीत हयात असते, तर त्यांनी रामशेठ यांच्यासारखा हिरा कधीच गमावला नसता. त्यांनी रामशेठना कोंदणात सजवून ठेवले असते.

११

पनवेलमध्ये कमळ फुलले

प्रशांत ठाकूर यांनी काँग्रेसच्या आमदारकीबरोबरच प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि पनवेल शहरामधील काँग्रेसच्या बॅनरसोबत पक्षाचे झेंडे उतरवले गेले. पक्ष कार्यालयाबरोबर संपर्क कार्यालयावरील नामफलक, झेंडे, काँग्रेस नेत्यांचे फोटो उतरवले गेले आणि बघता बघता पनवेल, उरणमधील काँग्रेसची रया गेली. कार्यकर्त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे रामशेठ यांना दुसऱ्या एका राष्ट्रीय पक्षात प्रवेश करायलाच लागणार होता. पनवेलमध्ये सुरू असणाऱ्या एकंदरीत परिस्थितीवर इतर पक्ष लक्ष ठेवून होतेच. पनवेल-उरणमध्ये रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला, असे समजल्यावर शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचे पी. ए. राहुल नार्वेकरांचा फोन आला. राष्ट्रवादीचे अजितदादा पवार, सुनील तटकरे यांनीही संपर्क केला. भाजपाचे महेश बालदी येऊन भेटले. त्यांनी बांद्रा येथे रंगशारदामध्ये भाजपाच्या कार्यक्रमाला येण्याचे निमंत्रण दिले. गडकरीसाहेबांना फोन लावून बोलणे करून दिले. टोलचा विषय सहज सुटणारा नव्हताच, तो सत्तेवर असलेले भाजपा सरकारच सोडवू शकत होते. भाजपा टोलमाफीवर आपली काय भूमिका घेणार आहे, याची चर्चा करण्यासाठी वांद्रे येथील रंगशारदामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर गेले, त्यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते, विनोद तावडे, सुधीर मुनगंटीवार यांच्याशी चर्चा केली. त्यांनी भाजपा टोल माफी नक्की करेल, असा शब्द दिला. या वेळी सुधीर मुनगंटीवार प्रशांत ठाकूर यांना म्हणाले, "प्रशांत, तुझी जागा येथेच आहे. तू येथेच शोभून दिसशील.'' दरम्यान, 'टोलचं भूत आम्ही डोक्यावरून उतरवू,' असे भाजपाने आश्वासन दिले. भाजपा प्रवेशाबाबत सकारात्मक चर्चा झाली. पनवेलमध्ये येऊन रामशेठ यांनी कार्यकर्त्यांशी चर्चा करून भाजपा प्रवेशाचे सूतोवाच केले. कार्यकर्त्यांना भाजपा प्रवेशाची तयारी करायला सांगितले. रंगशारदामध्ये झालेल्या स्नेहभेटीतून पनवेलच्या राजकारणाची दिशा बदलली. रामशेठ आणि प्रशांत ठाकूर यांनी भाजपाच्या दिशेने पाऊल टाकले होते.

आजपर्यंत रायगडमध्ये भाजपा हा आरएसएसच्या कार्यकर्त्यांसह सक्रिय होता. पनवेलमधील भाजपाचे रायगड जिल्हाअध्यक्ष म्हणून जबाबदारी असलेले बाळासाहेब पाटील यांनी रायगडमध्ये भाजपाचे अस्तित्व जेमतेम टिकवून ठेवले होते. मात्र रामशेठ भाजपावासी होणार म्हटल्यावर रायगडमध्ये भाजपाची पहाट झाली आणि बाळासाहेब पाटील यांच्यासह नंदू पटवर्धन, चांगा भगत या भाजपाची धुरा वाहणाऱ्या मुख्य नेत्यांसह भाजपा कार्यकर्त्यांत नवचैतन्य निर्माण झाले.



• सन २०१४ मध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. या अभूतपूर्व सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, विनोदजी तावडे, सुधीरजी मुनगंटीवार आदी मान्यवर उपस्थित होते

मंगळवार, दि. २४ सप्टेंबर २०१४ हा पक्षप्रवेशाचा दिवस नक्की करण्यात आला. बघता बघता पनवेल भाजपामय व्हायला लागले. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्ते नव्या आशेने पल्लवित झाले. पक्षप्रवेशाची तयारी सुरू झाली. रस्ते, गल्ल्यांमध्ये भाजपाचे झेंडे उभे राहिले. होर्डिंग चढवले गेले. भाजपा नेत्यांच्या स्वागताच्या कमानी उभ्या राहिल्या. केंद्रीय जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरीसाहेब, देवेंद्र फडणवीस साहेब हे राष्ट्रीय नेते पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार होते. दुसऱ्या बाजूला काँग्रेस सुन्न झाली. रामशेठ यांनी कार्यकर्त्यांची मजबूत फळी तयार केली होती. आपल्या सर्व कार्यकर्त्यांसह रामशेठ ठाकूर आणि प्रशांत ठाकूर भाजपामध्ये प्रवेश करणार होते.

पनवेल नगरपालिकेच्या ज्या छत्रपती संभाजी महाराज मैदानात रामशेठ यांचा काँग्रेस प्रवेश झाला होता, त्याच मैदानावर आता त्यांचा भाजपामध्ये प्रवेश होणार होता. समोर बसणारे तेच कार्यकर्ते होते, जे त्यांच्या सोबत काँग्रेसमध्ये होते. फक्त विचारप्रवाह बदलला होता. कार्यक्रमासाठी भव्य व्यासपीठ उभारले गेले. रायगडमधील भाजपाचे कार्यकर्ते नव्या चैतन्याने पनवेलकडे रवाना झाले होते. नितीन गडकरीसाहेब व्यासपीठावर विराजमान झाले. सोबत विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते विनोद तावडे, भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार, माजी आमदार पाशा पटेल, गुजरात (कच्छ) चे माजी आमदार छबिलदास पटेल यांच्यासह रामशेठ ठाकूर व प्रशांत ठाकूर भाजपा नेत्यांसोबत व्यासपीठावर आले, तेव्हा घोषणांनी परिसर दणाणून गेला.भाजपाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील सगळ्या कार्यक्रमाच्या व्यवस्थेवर लक्ष ठेवून होते. स्वागत समारंभ पार पडला. नितीन गडकरीसाहेब

बोलायला उभे राहिले आणि पुन्हा एकदा कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा देत टाळ्यांचा कडकडाट केला. घोषणांच्या आवाजातच गडकरीसाहेबांनी बोलायला सुरुवात केली.

"भाजपा जातिवादी, सांप्रदायिक पक्ष असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे, तो पूर्णतः चुकीचा आहे. जातीपातीचा विचार न करता सर्व घटकांना न्याय देण्याचे काम भाजपा करतो आहे. ज्या दिवशी तळागाळातील शेवटच्या माणसाला अन्न, वस्त्र, निवारा मिळेल, तेव्हाच आमचे कार्य पूर्ण होईल. काँग्रेस ही प्रायव्हेट लिमिटेड पार्टी झाली आहे. काँग्रेस नेते गरिबी हटावचा नारा देत आले. मात्र जनतेची गरिबी काही हटली नाही, उलट ती वाढतच गेली. देशात गरिबी हाच मोठा प्रश्न आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली महागाई कमी करून जीवन सुसह्य करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. आजचा दिवस पनवेलच्या इतिहासात लक्षात ठेवण्यासारखा आहे. आम्ही याआधीही अनेकदा पनवेलला आलो, मात्र भाजपाला यश मिळत नव्हते. लोकमान्य लोकनेते रामशेठ ठाकूर आणि लोकप्रिय प्रतिनिधी प्रशांत ठाकूर भाजपामध्ये आल्याने रायगडात पक्ष वाढेल व मजबूत होईल, याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. येत्या विधानसभेच्या निवडणुकीत प्रशांत ठाकूर यांचा विजय निश्चित असून, ते मागच्या पेक्षा अधिक मताधिक्याने विजय मिळवतील. टोलप्रश्नावर नक्की मार्ग काढला जाईल, असा शब्द मी देतोय.'' 'जो खेल हमने शुरू किया था, वो हम ही खत्म करेंगे' ना. नितीन गडकरी साहेबांनी घोषणा केली आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. काही दिवसांतच पनवेलला टोल मुक्त करू, असे दिलेले आश्वासन त्यांनी टोलमाफी देऊन पूर्ण केले. केवळ पनवेलच नव्हे, तर महाराष्ट्रातील सगळ्याच छोट्या चारचाकी गाड्यांना टोलमाफी मिळाली.

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते विनोद तावडे म्हणाले, "टोलप्रश्नावर प्रशांत ठाकूर यांनी घेतलेल्या भूमिकेकडे आम्ही लक्ष ठेवून होतो. टोल सूट झाली नाही, तर राजीनामा देईन, असे ते म्हणाले होते आणि त्यांनी जाहीर केल्याप्रमाणे आमदारकीचा त्याग करून शब्द पाळला. त्यांनी हा त्यांचा सच्चेपणा वडिलांकडून घेतला आहे. रामशेठ ठाकूर हे खासदार असताना त्यांच्या एका मताने वाजपेयी सरकार पडले होते. रामशेठ ठाकूर यांनी मनात आणले असते, तर ते मंत्रिपदासह बरेच काही मिळवू शकले असते. त्यांना पक्षांतर कायदा लागू होणार नव्हता. मात्र ते पक्षाशी प्रामाणिक राहिले. अटलजींचे सरकार पडल्याचे वाईट वाटले खरे, पण पक्षाशी एकनिष्ठ राहणाऱ्या रामशेठ यांचे कौतुकही वाटले. चांगली संधी असतानाही पक्षाला त्यांनी दिलेली साथ वाखाणण्याजोगी होती."
"मुंबईचे प्रवेशद्वार असलेल्या पनवेलचा सेनापती भाजपामध्ये आल्याने साताऱ्याचे पृथ्वीराज चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मुंबईचा प्रवेश एकाकी झाला आहे. काँग्रेसमधून राम निघून गेल्याने पनवेलमध्ये काँग्रेस पक्ष निष्प्राण झाला," अशी कोटी भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

रामशेठ यांच्या भाजपा प्रवेशाच्या वेळी कार्यकर्त्यांची मांदियाळी बघून आता पनवेलचा गड आपल्या हातातून गेल्याची खात्री काँग्रेसच्या नेत्यांना झाली. आज रायगडमध्ये काँग्रेस आपल्या अस्तित्वासाठी झगडत आहे. रामशेठनी पुन्हा एकदा दाखवून दिले होते, 'जहाँ हम खडे होते है, वहाँ से लाईन शुरू होती है।'

१२

भाजपाचा झंझावात

भाजपात प्रवेश केल्यावर रामशेठ ठाकूर यांनी आपला प्रवास भाजपाच्या विचारप्रणालीच्या दिशेने सुरू केला. त्यांच्या आयुष्यात त्यांनी जे स्वीकारले ते परिपूर्ण आणि समर्पित भावनेने स्वीकारले. दुधात जशी साखर विरघळल्यानंतर वेगळी करता येत नाही, तसेच ते जेथे उभे राहिले त्या विचारांत ते विरघळले. मात्र जेव्हा त्यांचा स्वाभिमान डिवचण्याचा कोणी प्रयत्न केला, तेव्हा मात्र त्यातून स्वत:ला अलगद वेगळे केले. 'जेथे काम नाही तेथे राम नाही.' त्यांच्या मनाला न पटणाऱ्या प्रत्येक विचारापासून ते दूर राहिले.

सक्रिय राजकारणातून निवृत्तीची घोषणा केल्यानंतर आणि सक्रिय राजकारणात प्रवेश करण्याअगोदर रामशेठ 'किंग मेकरची' भूमिका बजावत होते. त्यांनी सक्रिय राजकारण केले ते सरळ लोकसभेच्या दोन निवडणुका लढवून. त्यांच्या आयुष्यातील लोकसभेची तिसरी निवडणूक लागण्याअगोदर व दुसऱ्या निवडणुकीचा कार्यकाल संपण्यापूर्वीच त्यांनी, 'यापुढे मी निवडणूक लढविणार नाही,' असे जाहीर केले. रामशेठ यांच्या लोकसभेच्या दुसऱ्या कार्यकाळाचे सत्र संपण्याअगोदर दिल्लीत शरद पवारसाहेबांना रामशेठ यापुढे निवडणूक लढवणार नाहीत ही बातमी कळली. या गोष्टीचे त्यांना आश्चर्य वाटले. रामशेठ यांच्यासारखा नेता वयाच्या ५२ व्या वर्षीच राजकारणातून संन्यास घेणे योग्य नाही, असे त्यांचे मत होते. दिल्लीत नवीन महाराष्ट्र सदनाच्या भूमिपूजनाच्या वेळी रामशेठ आणि शरद पवारसाहेब यांची भेट झाली, तेव्हा पवारसाहेबांनी विचारले, "रामशेठ, तुम्ही पुढची निवडणूक लढविणार नाही असे कळले." तेव्हा रामशेठ म्हणाले "होय साहेब, यापुढे निवडणूक न लढविण्याचा विचार पक्का केलाय." स्वत:ला त्यांनी राजकीय खुर्चीच्या मोहपाशातून अलगद वेगळे केले. रामशेठ यांनी स्वत:ला सक्रिय राजकारणातून वेगळे केले असले, तरी राजकारण रामशेठ यांना वेगळे करायला आजही तयार नाही. हेच आजवरच्या त्यांच्या आयुष्यातील राजकीय घडामोडीतून दिसून येते. आज राजकारणात सक्रिय नसले, तरी पनवेल-उरणमध्ये राजकारणाची प्रत्येक क्रियात्मक स्थित्यंतरे रामशेठ यांच्याशिवाय अपूर्ण राहतात. आजही पनवेल-उरणचे राजकारण त्यांच्या शब्दाबाहेर जात नाही. शेकाप सोडल्यानंतर काँग्रेस आणि काँग्रेस सोडल्यानंतर आज भाजपाची संपूर्ण राजकीय जबाबदारी त्यांच्या राजकीय संस्कारात घडलेला त्यांचा मुलगा आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर यांनी सक्षमपणे सांभाळली आहे. एका कार्यकर्त्यापासून सुरू झालेला प्रशांत ठाकूर

यांचा राजकीय प्रवास पनवेल नगरपालिकेचे नगराध्यक्ष ते आज चार वेळा आमदार होईपर्यंत दमदार झाला आहे. त्यामुळे आज भाजपाच्या पनवेल-उरणमधील वाटचालीलाही यशाची शिखरे गाठता आली आहेत. रामशेठ या वाटचालीकडे बारीक लक्ष ठेवून असतात. निर्णयाच्या अवघड परिस्थितीत ते 'किंग मेकर' म्हणून असतात.

भारतीय जनता पार्टीची काम करण्याची एक शिस्तबद्ध पद्धत आहे. रामशेठ स्वतः शिस्तीचे भोक्ते असल्याने भाजपाची शिस्तप्रिय कार्यप्रणाली त्यांना अत्यंत भावली. पनवेल-उरणच्या विकासाच्या यामुळे अधिक गतिमानता आली. रामशेठ आणि प्रशांत ठाकूर हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकल्प मार्गी लावत आहेत.

पक्ष मजबुतीबरोबर पक्षाची वाढ आणि विकासात रामशेठ यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर यांनी काँग्रेसमध्ये असताना घेतलेल्या अनेक ग्रामपंचायती, पनवेल नगरपालिका या सगळ्यांमध्ये सत्तांतर करायला सुरुवात केली. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे लक्ष केंद्रित केले. त्यासाठी कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन त्यांना पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सतर्क राहण्याचे आवाहन केले. पक्ष वाढीबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारच्या माध्यमातून राबविलेल्या योजनांची माहिती व पक्षाची विचारधारा विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून तळागाळापर्यंत



• **मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबतचा एक क्षण**

पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

उरण-पनवेलचा विकास वेगाने होत असल्याने पनवेल महानगरपालिका व्हावी, या दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरू केले होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वेचे दुपदरीकरण, सी-लिंक असे महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारणार होते. रायगड जिल्ह्यातील पनवेल नगरपालिका ही अतिशय महत्त्वपूर्ण नगरपालिका, त्यामुळे नगरपालिकेची महानगरपालिका झाल्यास कोकणच्या विकासाला चालना मिळेल, असा रामशेठ यांना विश्वास होता. "आपली ताकद पक्षासाठी वापरणे, हा आपला धर्म आहे. पक्ष संघटना मजबूत करणे आपले कर्तव्य आहे. प्रत्येक गावात सक्रिय कार्यकर्ता असायला हवा," असे त्यांनी सांगितले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी रामशेठ यांच्या या विचारांना भाजपाच्या विचारधारेने कार्यकर्त्यांना जोडून मूर्त रूप दिले. खरेतर रामशेठ यांच्या विचारधारेशी आजपर्यंत प्रत्येक कार्यकर्ता जोडला गेल्यामुळे जेथे रामशेठ तेथे आम्ही हीच भावना प्रत्येक कार्यकर्त्याची असली, तरी त्यांनी कार्यकर्त्याला कधी गृहीत धरले नाही. प्रथम त्या प्रत्येक माणसाचा विचार आणि भावना जाणून घेतल्या. आपल्या आयुष्याच्या प्रवासात, मग तो सामाजिक असो अथवा राजकीय, त्यांनी कोणाला थांबविले नाही, की ते कोणासाठी थांबले नाहीत. जे येतील त्यांना सोबत घेऊन, ज्यांना यायचे नाही त्यांना मागे ठेवून ते पुढे निघून गेले. जे सोबत आले, त्यांनाही त्यांनी मोठे केले आणि त्यामुळेच रामशेठ जेव्हा शेकापमध्ये होते, तेव्हा पनवेल-उरण शेकापचे होते. रामशेठ जेव्हा काँग्रेसमध्ये होते, तेव्हा पनवेल-उरण काँग्रेसचा बालेकिल्ला झाला होता. रामशेठ भाजपामध्ये आल्यावर आज पनवेल-उरण भाजपामय झाले आहे. त्यांच्या वयाच्या ७५ व्या वर्षी, अमृतमहोत्सव साजरा करताना पनवेलने त्यांना सन २०२५ च्या महानगरपालिका निवडणुकीतील एकहाती सत्तेचा विजय भेट म्हणून दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार 'एक झाड आईसाठी' हा उपक्रम देशभर राबविला जात होता. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल तालुक्यातील आंबिवली (नेरे) येथे जवळपास दोन हजार वृक्षांची लागवड केली. त्याच्या संवर्धनाची जबाबदारी पनवेल महानगरपालिकेचे तत्कालीन सभागृह नेते व रामशेठ यांचे दुसरे सुपुत्र परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या 'कोशिश फाऊंडेशन' या सेवाभावी संस्थेने घेतली. वाढते औद्योगिकीकरण, इमारतींचे पसरणारे जाळे, अमर्याद वृक्षतोड यांमुळे निसर्गाची मोठी हानी होत आहे. त्याचा परिणाम पर्जन्यवृष्टीवरती होत असल्याने अवकाळी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, पिकांची नासाडी, भूकंप, महापूर, अनियमित ऋतुमान, वाढते प्रदूषण अशा विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मात्र आपण पाऊस आणि निसर्गाला दोष देऊन मोकळे होतो. मात्र मानव म्हणून निसर्गाचे रक्षण करणे, ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करतानाच वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन हा उपक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, रायगड जिल्हा उत्तर भारतीय मोर्चा, नमो नमो मोर्चा, पंडित पारसनाथ शर्मा चॅरिटेबल ट्रस्ट आणि सखी वूमन वेल्फेअर यांच्या

संयुक्त विद्यमाने राबविला जात आहे.

रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी जेएनपीटीच्या चौथ्या बंदराचे उद्घाटन करण्यासाठी येणार होते, त्या वेळी संघर्ष समितीची बैठक घेण्यात आली. रखडलेल्या साडेबारा टक्क्यांच्या भूखंडाचा प्रश्न या बैठकीत उपस्थित करण्यात आला, त्या वेळेस जेएनपीटीचे चेअरमन श्री. डिग्गीकर यांनी संघर्ष समितीला हा प्रश्न लवकरच सोडवू, असे आश्वासन दिले. जेएनपीटीने साडेबारा टक्क्यांसाठी जी जागा आरक्षित केली आहे, ती सीआरझेडमध्ये आहे. या संदर्भातील पूर्तता करावी लागणार आहे. येत्या दोन महिन्यांत ती करू व साडेबारा टक्के भूखंडाचा प्रश्न मार्गी लावू, असे ते म्हणाले असता, ''पंतप्रधानांचे आम्ही जल्लोषात स्वागत करूच, पण आमच्या प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंड मिळावा, ही मागणी कायम असणार आहे. जर जेएनपीटी प्रशासन काही महिन्यांची मुदत मागत असेल तर ती देऊ, मात्र हा प्रश्न मार्गी लागल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही,'' असे रामशेठ यांनी बैठकीत निर्वाणीचा इशारा देऊन सांगितले. जेव्हा समाजकारण आणि प्रकल्पग्रस्तांचा विषय आला, तेव्हा रामशेठ यांनी पक्ष आणि पक्षीय राजकारण बाजूला ठेवून आपल्या माणसांच्या भावनेला महत्त्व दिले.

रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महानगरपालिका व्हावी म्हणून आपले प्रयत्न सुरू ठेवले होते. पनवेल महानगरपालिका होण्याच्या दृष्टीने रामशेठ यांनी प्रशांत ठाकूर यांना सर्वतोपरी प्रयत्न करण्यास सांगितले. पनवेल महानगरपालिका होऊ नये म्हणून विरोधकांकडून अनेक अडचणी निर्माण करण्यात आल्या. पण सगळ्या अडचणींवर मात करून अखेर १ ऑक्टोबर २०१६ पासून पनवेल महानगरपालिका 'ड' वर्गाची महानगरपालिका म्हणून सरकारने घोषित केली. २५ ऑगस्ट १८५२ रोजी महाराष्ट्रातील पहिली नगरपरिषद म्हणून पनवेल नगरपरिषद स्थापन करण्यात आली होती. १९९१ मध्ये पनवेल नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर करण्याची प्राथमिक अधिसूचना निघाली. २००० नंतरच्या जलद शहरीकरणानंतर पनवेल नगरपरिषदेचे अखेर २०१६ मध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महानगरपालिकेत रूपांतर केले. पनवेल महानगरपालिका ही रायगड जिल्ह्यातील पहिली महानगरपालिका आहे. मुंबई महानगर प्रदेशात ९ व्या आणि महाराष्ट्र राज्यात २७ व्या क्रमांकावर असणाऱ्या महानगरपालिकेत पनवेल तालुक्यातील २९ महसुली गावे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली. ज्यात तळोजा, खारघर, कळंबोली, कामोठे, नवीन पनवेल या सिडको वसाहतींचा समावेश करण्यात आला.

महानगरपालिका म्हणून पहिल्या निवडणुकीचे वेध लागले. रामशेठ ठाकूर भाजपामध्ये गेल्यानंतर विरोधकांनी सर्वपक्षीय आघाडी उघडून 'रामशेठ विरोध' मोहीम उघडली. रामशेठ ठाकूर यांना विरोध करण्यात शिवसेनासुद्धा आघाडीवर होती. दुरावलेली शिवसेना रामशेठ भाजपामध्ये आल्यानंतर पुन्हा एकत्र येऊन युती म्हणून निवडणूक लढविणार का, यावर शहरात चर्चा रंगू लागल्या. नगरपरिषदेसह ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शिवसेना विरोधक म्हणून भाजपापासून चार हात दूर होती. मात्र मागचे

सगळे विसरून शिवसेनेने भाजपच्या बरोबर येऊन युती म्हणून निवडणूक लढवावी, असे प्रामाणिक मत रामशेठ यांचे होते. पनवेल नगरपालिका असताना नगरपालिकेच्या अग्निशमन केंद्राच्या नव्या इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी पनवेलमधील शिवसेना-भाजपा नेते एका व्यासपीठावर उपस्थित होते. त्यामुळे लवकरच होणाऱ्या निवडणुकीत शिवसेना-भाजपा एकत्र लढतील, अशी चर्चा सुरू झाली. तसे संकेत रामशेठ ठाकूर आणि शिवसेनेचे सल्लागार बबन पाटील यांनी व्यासपीठावरून बोलताना दिले होते. मागील चार वर्षांपासून नगरपरिषद, ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत विरोधात जाऊन विरोधी पक्षाशी युती करायची आणि सत्तेत बसता येते का, ते पाहायचे हेच शिवसेना करीत आली होती. रामशेठ यांनी शिवसेनेला कधीच स्वतःहून दूर केले नव्हते. उलट शिवसेनेने वेळोवेळी आपली राजकीय खेळी बदलली आणि भाजपाच्या विरोधात उभे राहिले. 'आमच्यापासून दुरावलेले शिवसेनेचे नेते हे आमचेच राहणार,' हे न विसरता रामशेठ नगरपरिषदेच्या कार्यक्रमादरम्यान बोलले होते. 'इतिहासात काय घडले ते विसरून शिवसेना आमच्यासोबत राहील,' असे संकेत रामशेठ ठाकूर यांनी देऊन शिवसेनेला जवळ करण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला. शिवसेना जिल्हाप्रमुख आमदार मनोहर भोईर यांनी रामशेठ यांना फोन करून चर्चा केली. खासदार अनंत गीते यांच्या विलेपार्ले येथील बंगल्यावर रामशेठ, मनोहरशेठ भोईर, बबन पाटील यांच्यात युतीबाबत बोलणी झाली. त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. यासंबंधीची माहिती पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना देण्याच्या सूचना खासदार अनंत गीते यांनी जिल्हाप्रमुखांना दिल्या. या मीटिंगमध्ये सुरुवातीला १२ जागा शिवसेनेला देतो, असे रामशेठ म्हणाले. शिवसेनेचे नेते जागा वाढवून मागत होते, शेवटी २० जागा देण्यासाठी रामशेठ तयार झाले. याला सगळ्यांनी आपली संमती दर्शवली. युतीच्या जागा वाटपाच्या ठरावावर सह्या झाल्या. शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांशी जागावाटपाबाबतची अखेरची बोलणी होऊनदेखील दोनच दिवसांत आदेश बांदेकर यांनी 'खो' घातल्याने युती फिस्कटली. शिवसेनेने स्वतंत्र लढणार म्हणून जाहीर केले. शेकाप, राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांची आघाडी झाली होती. या तीन पक्षांच्या आघाडीविरोधात शिवसेना-भाजपाची युती होऊ नये म्हणून विरोधकांच्या प्रयत्नांना यश आले होते. शिवसेनेच्या निर्णयावर रामशेठ यांनी कोणतीही प्रतिक्रिया न देता, 'तुम्हाला स्वतंत्र लढायचे असेल तर स्वतंत्र लढा, आमचे काहीही म्हणणे नाही, आम्हाला आमचा रस्ता मोकळा आहे,' असे म्हणून त्यांनी निवडणूकीसाठी आपल्या पक्षातील उमेदवारांची तयारी सुरू केली. २४ मे २०१७ रोजी मतदान होणार होते. तेव्हा कोण कोठे आहे ते कळणारच होते. भाजपा विकास आणि पारदर्शकतेच्या मुद्द्यावर निवडणूका लढवायला सज्ज झाला. टोल प्रश्नाबरोबर पनवेल शहरातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण, आमदार निधीतून गृहनिर्माण संस्था अंतर्गत विकास कामे, असे अनेक सकारात्मक मुद्दे भाजपाकडे होते.

निवडणुका पार पडल्या आणि ७८ जागांपैकी ५१ जागा एकट्या भाजपाच्या निवडून आल्या. शेकाप, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला २७ जागांवर समाधान मानावे लागले, तरी स्वतः शिवसेना पक्षप्रमुख

महापालिका निवडणुकीत उतरले. कामोठ्यात त्यांनी जाहीर सभा घेतली. तरीही शिवसेनेला एकही जागा जिंकता आली नाही. स्वतंत्र लढून आपली ताकद आजमाविणाऱ्या शिवसेनेला एकही जागा न मिळणे हे त्यांचे अपयश होते. ते भाजपाबरोबर युतीत आले असते, तर निश्चितपणे शिवसेनेचे नगरसेवक सत्तेच्या बाकावर बसले असते. आदेश बांदेकरांच्या अपरिपक्व राजकारणामुळे शिवसेनेने स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतला. भाजपाचे संख्याबळ जास्त असल्याने पनवेल महानगरपालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत भाजपचा एकहाती झेंडा फडकला. रायगडच्या आणि भाजपाच्या इतिहासात भाजपाला पहिल्यांदाच स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सत्तेत येण्याची संधी मिळाली होती. निवडणुकीच्या धामधुमीत शिवसेनेने जरी युती तोडली, तरी छोटासा पक्ष असलेला 'आरपीआय'बरोबर राहिल्याने भाजपाच्या मदतीने त्यांच्या दोन जागा निवडून आल्या. महानगरपालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेलेल्या संख्याबळापेक्षा अधिक जागा भाजपाने पटकाविल्यामुळे महापालिकेत भाजपाचा महापौर होणार, हे निश्चित झाले होते.

एक स्त्री शिकली, की सगळे घर आणि पर्यायाने सगळा समाज शिक्षित होतो. हा दृष्टिकोन जर राजकारणात उतरला, तर त्याचा परिणाम राजकीय स्थित्यंतरावर व्हायला वेळ लागत नाही. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपले अस्तित्व ठळकपणे दाखविले आहे. राजकारणात स्त्रियांना स्थान मिळाले आणि पुरुषांची मक्तेदारी संपली. रामशेठ यांनी राजकारण करताना महिला कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवला व त्यांना मानाचे स्थान देऊन त्यांचा गौरव केला. नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या डॉ. कविता चौतमल यांना पनवेल महानगरपालिकेच्या पहिल्या महापौर व चारुशीला घरत यांना उपमहापौर म्हणून मान मिळाला.

रामशेठ ठाकूर यांनी आपल्या आयुष्यात कधीच द्वेषाचे राजकारण केले नाही. सर्वसमावेशक विकासात्मक भूमिका ठेवून त्यांनी राजकारणाकडे पाहिले. त्यामुळेच त्यांनी २६ सप्टेंबर २०१८ रोजी होणाऱ्या गव्हाण ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी विकासाची सर्वसमावेशक भूमिका घेऊन भाजपा, शेकाप, काँग्रेस महाआघाडी तयार केली. वहाळ, उलवे नोडच्या विकासासाठी त्यांनी सर्व पक्षांना एकत्र येण्यास कोणतीही राजकीय विरोधाची बाजू न धरता खुल्या मनाने ती स्वीकारली आणि इतर पक्षांना ते स्वीकारण्यास भाग पाडले. खासदार असताना गव्हाण भागाचा विकास करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न सकारात्मकच होते. 'गव्हाणच्या विकासाला जर कोणी विरोध करणार असेल, तर त्याच्या नात्याचा-गोत्याचा विचार न करता त्याला खड्यासारखे बाजूला काढू, गव्हाणच्या विकासासाठी आम्ही सर्व पक्ष एकत्र आलो आहोत,' असे त्यांनी प्रचारादरम्यान सगळ्यांना सांगितले. गव्हाणमधील विकासाच्या राजकारणावर त्यांनी घेतलेली भूमिका हळूहळू सगळ्यांना पटायला लागली होती आणि ती सगळ्यांनी स्वीकारली.

न्हावा-शिवडी या समुद्रसेतूने शिवडी ते चिर्ले (उरण) हा सागरी सेतू प्रकल्प सुरू झाला. या मार्गाने मुंबईचे अंतर कमी होणार होते. न्हावा ते शिवडीदरम्यान या समुद्रसेतूमुळे शेकडो मच्छीमार बांधवांच्या व्यवसायावर परिणाम झाला. या प्रकल्पात बाधित होणाऱ्या मच्छीमारांना नुकसानभरपाई मिळावी म्हणून

रामशेठ यांनी पुढाकार घेतला. त्या अनुषंगाने सातत्याने संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. शेवटच्या टप्प्यात तलाठी, सर्कल अधिकारी, तहसिलदार यांच्याकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल सादर केला. त्यानुसार सेतू प्रकल्पातील नुकसानभरपाईसाठी जवळपास १,६०० मच्छीमारांचे अर्ज सर्वेक्षणांती ग्राह्य धरण्यात आले. सतत पाठपुरावा करीत असताना मात्र अधिकाऱ्यांकडून कार्यवाही धिम्या गतीने होत आहे, हे लक्षात आल्यानंतर रामशेठ यांनी अधिकाऱ्यांसोबत गव्हाण ग्रामपंचायतीच्या कार्यालयात घेतलेल्या बैठकीत त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. बाधितांना जोपर्यंत भरपाई देत नाहीत, तोपर्यंत काम बंद पाडू, असा निर्वाणीचा इशारा त्यांनी दिला. तेव्हा पंधरा दिवसांत मच्छीमारांना भरपाई देण्याचे मान्य करण्यात आले. याचबरोबर कोळी समाजाची नोंदणी करण्यासाठी उलवे नोडमध्ये शिवाजीनगर येथे ५ ते १५ जानेवारी २०१८ या कालावधीकरिता कार्यालय सुरू करण्याचे मान्य केले. रामशेठ यांनी दिलेल्या पंधरा दिवसांच्या मुदतीनंतर प्रकल्पबाधितांच्या बँक खात्यात नुकसानभरपाईचा पहिला हप्ता जमा झाला, मात्र त्यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा सोडला नाही. उरलेल्या मच्छीमारांना नुकसानभरपाई मिळावी म्हणून त्यांनी आपले प्रयत्न सुरूच ठेवले. रामशेठ यांनी आपली राजकीय ताकद समाजकारणासाठी जास्तीत जास्त वापरून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. धर्म, जात आणि कोण कोणत्या पक्षाचा आहे, याचा कधीही विचार न करता समोरच्या माणसाला काय हवे आहे, त्याची गरज काय आहे, याची पूर्तता करण्यात त्यांना परमेश्वर सापडला.

पनवेलमधील भाजपा म्हणजेच रामशेठ ठाकूर आणि प्रशांत ठाकूर यांची ताकद महाराष्ट्राला कळली. पनवेल-उरणच्या राजकारणाचा जेव्हा विषय येतो, तेव्हा ते राजकारण रामशेठ यांच्याभोवती फिरत असल्याचे दिसते. कोणतेही निर्णय हे रामशेठ यांच्याशिवाय होऊ शकत नसल्याने २०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार म्हणून मावळ मतदारसंघातून श्रीरंग बारणे उभे राहिले, तेव्हा मावळ मतदारसंघाचा कणा असलेल्या रामशेठ यांच्याशिवाय बारणे यांच्या विजयाची खात्री कोणीच देऊ शकत नव्हते.

लोकसभेच्या निवडणुकीसाठी शिवसेनेला भाजपाची गरज लागली. पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत भाजपाला शेवटपर्यंत झुलवत ठेवणारे शिवसेना नेते लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आणि शिवसेना नेत्यांना जाग आली ती मनोमिलनाची. पनवेलमधील अशोका गार्डनमध्ये मनोमिलन मेळावा घेण्यात आला. पनवेल महानगरपालिके बरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येसुद्धा भाजपाला टोलवाटोलवी करणारे शिवसेना नेते लोकसभेच्या निवडणुका जवळ आल्यानंतर मनोमिलन करायला तयार झाले होते. या मेळाव्यात रामशेठ यांनी अत्यंत मार्मिक शब्दांत शिवसेनेचे कान टोचले. "शिवसेना दोन पावले पुढे येत असेल, तर आम्ही चार पावले पुढे जाऊन प्रचार करू, देशात पुन्हा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी कंबर कसली आहे. गतवेळी श्रीरंग बारणे दीड लाखांच्या मताधिक्याने निवडून आले आहेत. आता आम्ही सोबत असल्याने आणखी मताधिक्य वाढेल.'' रामशेठ यांनी स्वतः पनवेलमध्ये स्थायिक झालेले आंध्र, कर्नाटक, तमीळ,

ओडिशी, मल्याळम, उत्तर भारतीय, सिंधुदुर्ग रहिवासी मंडळ बांधवांच्या बैठका घेतल्या. नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी प्रत्येक मताचे महत्त्व सांगून बारणे यांना विजयी करण्याचे आवाहन केले. रामशेठ यांच्या प्रचाराने बारणे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले होते. श्रीरंग बारणे मोठ्या मताधिक्याने निवडून आले. खारघर येथे बारणे यांच्या स्वागतासाठी विजय सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, "माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सिडको अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची वाढती लोकप्रियता व दांडगा लोकसंपर्क या एकत्रीकरणातून पनवेल विधानसभा क्षेत्रात प्रचंड मताधिक्य मिळू शकले." विजयाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम रामशेठ ठाकूरसाहेबांनी केल्याबद्दल खासदार बारणे यांनी त्यांचे ऋण व्यक्त केले.

जे.एन.पी.टी. प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणाऱ्या १२.५ टक्के भूखंड वाटपाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. तो मार्गी लावण्यासाठी लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय प्रकल्पग्रस्त समितीने केलेल्या मागणीला सिडकोकडून दिरंगाई होत असल्याने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार मनोहर भोईर, समितीचे सचिव महेंद्र घरत, अतुल पाटील, शिवसनेचे जिल्हा सल्लगार बबन पाटील, कामगार नेते दिनेश पाटील, कॉम्रेड भूषण पाटील, अतुल पाटील, सुरेश पाटील या शिष्टमंडळासोबत जे.एन.पी.टी.चे डेप्युटी चेअरमन उन्मेष वाघ यांच्यासह जे.एन.पी.टी. प्रशासन भवनात गुरुवारी, २ जुलै २०२० रोजी बैठक घेण्यात आली. जे.एन.पी.टी. व सिडकोकडे प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न प्रलंबित होते. त्यात प्रामुख्याने १२.५ टक्के भूखंड वाटपाचा मुद्दा महत्त्वाचा होता. या बैठकीत भूखंड वाटपासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. ज्या परिसरात भूखंडाचे वाटप करण्यात येणार आहे, तेथील जमीन भूखंड वाटपाच्या दृष्टिकोनातून विकसित करून देण्याची मागणी करण्यात आली. भूखंड वाटपानंतर त्या ठिकाणी येणाऱ्या मेंटेनन्सचा विषय मांडण्यात आला. त्याचबरोबर शाळा, समाजमंदिर, रुग्णालय, स्मशानभूमी, गटारे, रस्ते अशा विविध सार्वजनिक सुविधाही पुरविण्याची मागणी करण्यात आली. जे.एन.पी.टी.चे डेप्युटी चेअरमन उन्मेष वाघ यांनी १२.५ टक्के भूखंडाचे ४१८ कोटी जे सिडकोला देणे आहेत, ते लवकरात लवकर सिडकोकडे वर्ग करून वाढीव रकमेचा प्रश्नसुद्धा मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. मात्र रामशेठ यांनी याबाबतची आढावा बैठक पुढील पंधरा दिवसांत घेण्यात यावी, अशी सूचना जे.एन.पी.टी. प्रशासनाला केली. मीटिंग संपल्यानंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड भूषण पाटील रामशेठ यांना म्हणाले, "रामशेठ, दि. बा. पाटील यांचे खरे शिष्य तुम्ही आहात, त्यांच्यासारखे तुम्हीच लढू शकता.''

मुस्लिम समाज शैक्षणिक, सामाजिक बाबतीत इतर अन्य समाजाच्या तुलनेत मागे आहे. या समाजाला विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर प्रयत्न करीत आहेत. या समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम 'पनवेल एज्युकेशन

सोसायटी' गेली अनेक वर्षे करीत आहे. संस्था सध्या चालवीत असलेल्या शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जागा अपुरी पडत असल्याने नगरपालिकेचा आरक्षित भूखंड क्रमांक ४५ संस्थेला मिळण्यासाठी संस्थाचालक प्रयत्न करीत होते. संस्थेची मागणी रामशेठ ठाकूर यांच्यापर्यंत पोहोचली आणि प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून त्यांनी सदरचा भूखंड संस्थेला लवकरात लवकर मिळावा म्हणून प्रशांत ठाकूर यांना सांगितले. 'पनवेल एज्युकेशन सोसायटी'ला आरक्षित भूखंड क्रमांक ४५ वर्ग करण्यात आला. सदरचा भूखंड मिळवून दिल्याबद्दल मुस्लिम समाजाने लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महानगरपालिका यांचे जाहीर आभार मानून कृतज्ञता व्यक्त केली.

जे.एन.पी.टी.मध्ये चौथ्या बंदराचे बांधकाम सुरू झाले, या बंदरांमध्ये प्रकल्पग्रस्त तरुण-तरुणींसाठी भरती घेण्यात आली, विविध पदांसाठी असलेल्या भरतीत जे.एन.पी.टी.ने मात्र प्रकल्पग्रस्त तरुण-तरुणी हे ग्रॅज्युएट, डिग्री होल्डर, डिप्लोमा होल्डर असायला हवेत, अशी अट घालून त्यांना विशिष्ट वयाचीही अट घातली. त्यामुळे या पात्रतेत मोडणारे असे किती प्रकल्पग्रस्त तरुण-तरुणी यांना सिडको नोकरी देणार होती? खरेतर सिडकोने अशा अटी घालून प्रकल्पग्रस्त तरुण-तरुणींसाठी नोकरीचा मार्ग खुला करण्याऐवजी बंद करायचा प्रयत्न केला होता. त्यामुळे हा अन्याय आहे, हे रामशेठ ठाकूर यांच्या लक्षात आले. ही जे.एन.पी.टी.ची एक वेगळीच चाल होती. नोकरीपासून प्रकल्पग्रस्त तरुणांना वंचित ठेवण्याचा एक मार्ग होता, त्यामुळे रामशेठ यांनी जे.एन.पी.टी.च्या अध्यक्षांना याबाबत विचारणा करून चौथ्या बंदरातील या भरतीसाठी प्रकल्पग्रस्त तरुणांना १२ वी पास आणि ३५ वर्षे वयापर्यंतची मुभा देऊन भरती करावी, अशी मागणी केली. रामशेठ हे प्रकल्पग्रस्त तरुणांच्या मागे उभे राहिले. कामगार नेते सुरेश पाटील, सुधीर घरत हे त्यांच्यासोबत होते.

आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्श्वभूमीवर विमानतळ क्षेत्रफळात येणाऱ्या कोल्ही, कोपर, चिंचपाडा, वरचा ओवळा. वाघिवली, वाघिवली वाडी या पहिल्या भागाबरोबरच उलवे, तरघर, कोंबडभुजे गणेशपुरी यांचा दहा गाव समितीत समावेश करून त्यांचे पुनर्वसन करावे. शिवाय, पारगाव, दापोली, डुंगीगाव आणि खालचा ओवळा गावच्या नदीकिनारी असलेल्या कमी उंचीवरील सखल भागातील घरांनाही पूरग्रस्त म्हणून मान्यता देऊन त्यांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी रामशेठ ठाकूर यांनी सिडकोचे मुख्य अभियंता राजन दाहीरकर, सिडकोचे सर्व वरिष्ठ अभियंता, कार्यकारी अभियंता, ग्रामस्थांचे नेते आणि सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालिका प्राजक्ता लवंगारे यांच्याकडे सिडको भवनातील बैठकीदरम्यान केली. सिडकोने प्रकल्पग्रस्त दहा गावांचे पुर्नवसन केले, मात्र पारगाव, दापोली गावांच्या पुनर्वसनाबाबत टाळाटाळ केली. या गावांच्या पुनर्वसनाची मागणी रामशेठ ठाकूर यांनी अगोदरच केली होती. मात्र सिडकोच्या चालढकलपणामुळे या गावांना पुराच्या पाण्याचा फटका बसायला लागल्यानंतर सिडकोचे डोळे उघडले. त्या वेळी या गावांच्या पुनर्वसनाच्या मागणीची सार्थकता किती महत्त्वाची होती, हे सिडकोला

उशिरा लक्षात आली आहे.

गव्हाण, कोपर विभागात ग्रामस्थांनी बांधलेली घरे सिडकोने अनधिकृत ठरवून पाडण्याची मोहीम हाती घेतली. त्या वेळी रामशेठ यांच्या नेतृत्वाखाली विभागातील सर्वपक्षीय नेते जमले आणि याविरुद्ध आवाज उठवला. "मुळात घरे अनधिकृत ठरविण्याचे धोरण अद्याप स्पष्ट झाले नव्हते, त्यामुळे घरे पाडणे हा आपल्यावर सरळ सरळ अन्याय आहे. सिडकोच्या या अन्यायाविरोधात आपण सातत्याने लढत आहोत. त्यामुळे जर भविष्यात सिडकोचे अधिकारी कोणाचे घर पाडण्यास आले, तर सर्वांनी एक होऊन त्याला खंबीर विरोध करावा,'' असे रामशेठ ग्रामस्थांना सांगत होते. या कारवाईविरोधात सर्वपक्षीय समितीचे नेते गव्हाणमध्ये दाखल झाले होते. अरुणशेठ भगत, जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, भाऊशेठ पाटील, रघुशेठ घरत, गव्हाणच्या सरपंच रत्नप्रभा घरत, गव्हाण-कोपर विभागातील विविध समाजाचे अध्यक्ष यांच्या उपस्थितीत ही सभा होत असताना रामशेठ आक्रमकपणे सिडकोच्या लाजिरवाण्या कारभारावर बोलत होते. ते म्हणाले, "गावातील एका घरावर जरी सिडकोचा हातोडा पडला, तरी संघटनेच्या भक्कम एकजुटीवर त्याचा परिणाम होणार आहे. सिडको परिसर विकसित करीत असताना आपल्याला मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे." कोपर ग्राउंडवरील क्रिकेट स्टेडियम अनधिकृत ठरवून ते पाडण्यासाठी सिडकोचे पथक येणार होते, ही बाब रामशेठ यांना कळताच त्यांनी सिडको भवनमध्ये धाव घेतली. अधिकाऱ्यांशी चर्चा केली, कारवाई टळली, पण प्रत्येक वेळी असे होईल असे नाही, हेही त्यांना माहीत असल्याने त्यांनी सर्वपक्षीय नेत्यांच्या समितीला सावध केले.

आज उलवा नोड परिसराचे मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झाले. अटल सेतूबरोबरच बेलापूर-उरण रेल्वे आणि आता लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाने हा भाग जोडला गेल्यामुळे उलवा नोडचे महत्त्व अधिक वाढले आहे. रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी हे भाजपाच्या माध्यमातून या भागात विकासाची गंगा पोहोचवीत आहेत.

जनार्दन भगतसाहेबांनी या विभागाच्या विकासासाठी फार मोठे योगदान दिले होते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज हे त्यांचे श्रद्धास्थान होते. या भागात छत्रपतींचा पुतळा असावा म्हणून आपल्या नेतृत्वाखाली 'गव्हाण जिल्हा परिषद विभागीय समिती' स्थापन करून त्यांनी मे १९८१ मध्ये गव्हाण कोपर फाटा येथे महाराजांच्या पुतळ्याची उभारणी केली. या घटनेला ४४ वर्षे पूर्ण होत आली. आज हा पुतळा ऊनपावसाचे तडाखे खात उभा आहे. अनेक वेळा त्याची डागडुजी करण्यात आली. पण अशी डागडुजी किती वर्षे करणार. वाढते शहरीकरण व या भागाचे बदलत असलेले स्वरूप पाहता महाराजांचा पुतळा भव्यदिव्य स्वरूपात दुसऱ्या मोक्याच्या ठिकाणी उभा केला जावा, असे रामशेठ यांना वाटत होते. सध्याची छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची झालेली अवस्था आणि गव्हाण कोपर भागाचे बदललेले स्वरूप व मोठ्या प्रमाणात झालेले नागरीकरण त्याचबरोबर राजकीय परिस्थितीची स्थित्यंतरे ओळखून सगळ्या पक्ष

कार्यकर्त्यांना सोबत घेऊन त्यांनी सन २०१८ मध्ये आपल्या अध्यक्षतेखाली 'सर्वपक्षीय छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समिती'ची स्थापन केली. या समितीत उपाध्यक्ष जे. एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, सरचिटणीस महेंद्र घरत, कार्यकारणी सदस्य माननीय आमदार प्रशांत ठाकूर, माननीय आमदार महेश बालदी यांची नियुक्ती केली.

उलवा नोड, गव्हाण-कोपर हे भविष्यात एक विकसित शहर होणार, याची खात्री भविष्याचा वेध घेणाऱ्या रामशेठ यांना होती. चेंबूर-मुंबई येथील, तसेच नवी मुंबईतील वाशी येथे सेक्टर ९ मध्ये विष्णुदास भावे नाट्यगृहाशेजारी उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासारखाच अश्वारूढ पुतळा व शिवसृष्टी उलवे नोडच्या मध्यवर्ती असलेल्या खारकोपर स्टेशनजवळील परिसरात उभारून त्याचे सुशोभीकरण करावे, असे रामशेठ ठाकूर यांना कित्येक वर्षांपासून वाटत होते. सन २०१८ मध्ये या कामाला चालना मिळाली. हा सर्व परिसर सिडकोच्या अखत्यारीत असल्याने खारकोपर रेल्वे स्टेशनसमोरील सेक्टर १२ मध्ये, जेथे शिवडी ते चिर्ले हा अटल सेतू समुद्र मार्ग जातो व गव्हाणकडे उतरण्यासाठी बायपास दिला आहे, तेथील मोकळा भूखंड खेळाचे मैदान, बगीचा (गार्डन) व छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी मिळावा, अशी मागणी रामशेठ यांनी सुरुवातीला 'श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समिती'मार्फत सन २०१८ मध्ये सिडकोकडे केली. त्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या 'सर्वपक्षीय छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समिती'ने मागील अनेक वर्षे यासाठी गव्हाण ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पत्रव्यवहार, तसेच सिडको अधिकाऱ्यांशी वेळोवेळी मीटिंग घेऊन पाठपुरावा करीत आहेत.

सुरुवातीला 'श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समिती'मार्फत दिनांक २७ डिसेंबर २०१८ रोजी सिडकोला पत्र लिहिण्यात आले. या पत्राद्वारे समितीने सिडकोला कळविले होते, की तत्कालीन पनवेल पंचायत समितीचे सभापती स्वर्गवासी जनार्दन आत्माराम भगतसाहेब यांच्या नेतृत्वाखाली कोपर फाटा गव्हाण येथे शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची मे १९८१ मध्ये उभारणी करून सभोवताली महाराष्ट्राच्या नकाशाच्या स्वरूपात संरक्षक भिंत उभारली होती. सदर पुतळ्याच्या उभारणीस आज सुमारे ४४ वर्षे पूर्ण झाली आहेत. दीर्घ कालावधी, तसेच ऊनपावसामुळे पुतळ्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. सिडकोच्या उभारणीमध्ये येथील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देऊन मोलाचा वाटा उचललेला आहे. सिडकोमार्फत उभारण्यात येत असलेल्या एन.एम.एस.ई.झेड, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नेरूळ-उरण रेल्वे प्रकल्प, न्हावा- शिवडी सागरी सेतू महामार्ग (अटल सेतू), जे.एन.पी.टी. जलदगती मार्ग अशा प्रकल्पांसाठी जमिनी देऊन नवी मुंबईच्या विकासात भरीव योगदान दिलेले आहे. शिवप्रेरणेने संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे, तर अखंड भारत देशालासुद्धा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरव व अभिमान आहे. त्यामुळे शहराशहरांतच नव्हे, तर गावागावांत नागरिकांनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे उभारले आहेत. शिवरायांचे पुतळे सर्वांना स्वाभिमान व

पराक्रमाची स्फूर्ती देत आहेत. या प्रेरणा स्फूर्तीमुळे उलवे नोडमधील तमाम नागरिकांना देखील श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारावा, अशी तीव्र इच्छा असून मुंबई येथील चेंबूर, तसेच नवी मुंबईतील वाशी सेक्टर ९ मधील विष्णुदास भावे नाट्यगृहाशेजारी उभारलेल्या पुतळ्याप्रमाणे सदर पुतळा हा उलवे नोड येथील मध्यवर्ती असलेल्या खारकोपर रेल्वे स्टेशनसमोरील परिसरात उभारून सिडकोने हे अभिमानास्पद काम करावे, अशी मागणी रामशेठ यांनी केली.

सुदैवाने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव खारकोपर स्टेशनच्या उद्घाटनासाठी येणार असल्याने सिडकोचे एम.डी. आदल्या दिवशी तयारीचा आढावा घेण्यासाठी आले होते. त्या वेळी रामशेठ यांनी त्यांची भेट घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची जागा प्रत्यक्ष नेऊन दाखविली. सुदैवाने याच कालावधीत मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांना सन २०१९ मध्ये सिडकोच्या चेअरमनपदी नियुक्त केले होते.

सिडकोच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली १ फेब्रुवारी २०१९ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या जागेसंबंधी सिडको अध्यक्षांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला सिडकोचे मुख्य अभियंता श्री. वरखेडकर, अधीक्षक अभियंता श्री. गिरी, अतिरिक्त मुख्य नियोजनकार श्री. मानकर, कामगार नेते व समितीचे सचिव महेंद्र घरत उपस्थित होते. प्रशांत ठाकूर आपल्या वडिलांच्या राजकीय तालमीत तयार झाले आहेत. सिडको अधिकारी कशा पद्धतीने एखादा विषय हाताळतात, हे त्यांना चांगलेच माहीत असल्यामुळे हा विषय त्यांनी सिडको अधिकाऱ्यांच्या पुढचा विचार करून बैठकीत स्वत: हाताळायला सुरुवात केली. मा. अध्यक्ष यांनी सिडको अधिकाऱ्यांना विचारले, की प्रस्तावित पुतळ्याच्या आणि मैदनाच्या जागेची मालकी कोणाकडे आहे? त्यावर श्री. मानकर यांनी सांगितले, की सदरची जागा सिडकोच्या मालकीची असून, सिडकोने एम.एम.आर.डी.ए.ला भाडेपट्ट्याने हस्तांतरित केलेली आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले, की छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी खारकोपर येथील जागा प्रस्तावित करण्यात आली आहे. सुमारे दोन ते अडीच हेक्टर जागा उपलब्ध आहे. त्यावर मा. अध्यक्ष म्हणाले, की पुतळ्याचा परिसर हा सुशोभित करून देण्यात यावा. त्या सभोवतालचे क्षेत्र विकसित करून देण्यात यावे व पुतळ्याच्या जवळ मैदान उपलब्ध करून देण्यात यावे, जेणेकरून सार्वजनिक कार्यासाठी त्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करता येतील. त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले, की खारकोपर येथील सुमारे २.५ हेक्टर जागा पुतळा आणि मैदानासाठी निश्चित करण्याबाबतचे पत्र गव्हाण ग्रामपंचायतीकडून सिडकोला देण्यात यावे. त्यानुसार पुतळ्यासाठी ०.५ हेक्टर जागा व उद्यानासाठी २ हेक्टर जागा निश्चित करण्यात येईल.

२०२१ मध्ये गव्हाण ग्रामपंचायतीने सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मुखर्जी यांना पुन्हा पत्र देऊन श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी आरक्षित केलेला भूखंड गव्हाण ग्रामपंचायतीस

हस्तांतर करण्यात यावा म्हणून पत्र लिहिले. त्या पत्रात त्यांनी पुन्हा एकदा सिडकोला जुन्या पुतळ्याच्या अवस्थेविषयी नमूद केले होते. पुतळा भंग होऊ शकतो. पूर्वीचा पुतळा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून लोकवर्गणीतून उभा करण्यात आलेला होता. सदर पुतळ्याच्या जागी नवीन अश्वारूढ पुतळा व शिवसृष्टी उभारण्याच्या दृष्टीने अनेक वर्षे सिडकोच्या माध्यमातून आम्ही जागा मिळावी म्हणून पाठपुरावा करीत आहोत व त्यातून सेक्टर १२ उलवे नोड येथे ठरल्याप्रमाणे शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा व शिवसृष्टीसाठी भूखंड आरक्षण करण्यात आलेला आहे. सदर पुतळा ग्रामपंचायतीने उभारावा असे ठरले होते, म्हणून नवीन पुतळा उभारणीसाठी पुन्हा एकदा महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून रीतसर परवानगी घेणे आवश्यक असल्याने सदर शिवसृष्टीसाठी आरक्षित असलेला भूखंड ग्रामपंचायतीला हस्तांतरित करण्यात यावा. जुन्या पुतळ्याची दुरवस्था लक्षात घेता, यासंदर्भात तातडीने विचार करणे आवश्यक झालेले आहे, तरी आपण यामध्ये जातीने लक्ष घालून भूखंड ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावा, अशी मागणी आहे.

सिडकोने गव्हाण ग्रामपंचायतीला २ फेब्रुवारी २०२२ रोजी पत्र लिहून सदरचा भूखंड हा सध्या MMRDA च्या ताब्यात असल्यामुळे तो त्यांच्याकडून हस्तांतर झाल्यानंतर ग्रामपंचायतीकडे हस्तांतर करण्यात येईल, असे कळविले. २०१८ पासून सिडकोची दिरंगाई लक्षात घेता छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीने सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरूच ठेवला होता. सन २०२४ उजाडले, तरी अजून सिडकोची दिरंगाई संपत नव्हती. सिडकोला पुन्हा एकदा १५ फेब्रुवारी २०२४ रोजी पत्र लिहून जमीन हस्तांतर करण्यासाठी मागील सगळ्या बाबींची आठवण करून दिली.

गव्हाण ग्रामपंचायतीने सिडको व्यवस्थापनाला दिनांक २४ फेब्रुवारी २०२० रोजी ग्रामपंचायत हद्दीतील सेक्टर १२ उलवे नोडमधील खारकोपर रेल्वे स्टेशनसमोरील मैदानाला 'मा. लोकनेते रामशेठ ठाकूर मैदान' नाव देण्यात यावे, अशी विनंती केली. याबाबतचा ठराव ग्रामपंचायतीने २६ जानेवारी २०२० रोजीच्या ग्रामसभेमध्ये केला. छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या अथक प्रयत्नांनंतर यश आले आहे. सिडकोच्या माध्यमातून बगीचा, शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा व मैदानासाठी २०,००० स्क्वेअर मीटर जागेची उपलब्धता करून देण्यात आली आहे. तरी गव्हाण विभागातील व उलवे नोडमधील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे नेते माननीय रामशेठ ठाकूरसाहेब यांचे नाव प्लॉट नं. ६ या २०,००० स्वेअर मीटरच्या मैदानासाठी देण्यात यावे, असे ग्रामपंचायत व प्रकल्पग्रस्त संघटनेने सर्वानुमते ठराव मंजूर करून सिडकोकडे पाठविला.

अथक प्रयत्नांनंतर सिडकोने शिवस्मारकासाठी ५,००० चौ. मीटर (०.५ हेक्टर) व खेळाच्या मैदानासाठी २०,००० चौ.मीटर (२ हेक्टर) भूखंड आरक्षित केला आहे. रामशेठ ठाकूर यांनी केवळ गव्हाण ग्रामपंचायतीसाठीच नव्हे, तर संपूर्ण उलवे नोड मधील सेक्टर ६, ९, १६, १७, १८, १९ ब, ८, ९, १०ब, ११, १२, १३, १४, १५, १६अ, मध्ये राहणाऱ्या तमाम जनतेच्या अभिमानासाठी छत्रपती शिवरायांच्या

अश्वारूढ पुतळ्याचे व भव्य मैदानाचे पाहिलेले स्वप्न सत्यात उतरत आहे. मागील अनेक वर्षांचा हा प्रवास रामशेठ ठाकूर यांनी जागृत ठेवलेल्या व्यापक चळवळीचा आणि सिडकोकडे केलेल्या पाठपुराव्याचा आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महारांजाचा आश्वारूढ पुतळा या परिसराला प्रेरणा देणारा असेल. तो इथे उभा करूया, असा विचार त्यांच्या मनात आला आणि त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले.

'लोकनेते रामशेठ ठाकूर मैदाना'कडे सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रासाठी एक व्यापक विचाराचे प्रतीक म्हणून नक्कीच पाहावे लागेल. या मैदानावर सामाजिक, सांकृतिक त्याचबरोबर क्रीडामेळाव्यांचा उत्सव कायम भरला जाईल. याची सुरुवात नमो चषकाच्या आयोजनाने झाली. खेळ व क्रीडा क्षेत्रासाठी भाजपाचे योगदान कशा पद्धतीने दिले जाते, त्याचे एक प्रतीक म्हणून नमो चषक स्पर्धांचे आयोजन २३ ते २५ जानेवारी २०२५ च्या दरम्यान उलवा नोडमधील सेक्टर १२ प्लॉट नं.६ येथील खारकोपर स्टेशन समोरील मैदानावर अर्थात 'लोकनेते रामशेठ ठाकूर मैदाना'वर करण्यात आले.

गव्हाणजवळील कब्रस्तानाच्या वाढीव जागेच्या प्रस्तावाला सिडकोकडून त्यांनी हिरवा कंदील मिळविला. अनेक वर्षांपासून मुस्लिम बांधवांची ही मागणी होती, की गव्हाणमधील 'मदारी' या ठिकाणी गव्हाण कोपर जासई गावातील व परिसरातील मुस्लिम समाजाचे पिढ्यान् पिढ्यापासून कब्रस्तान आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता ही जागा अपुरी पडत होती. त्यामुळे या ठिकाणी कब्रस्तानाला वाढीव जागा मिळावी, अशी मागणी 'ख्वाजा गरीब नवाज सामाजिक संस्थे'ने लोकनेते रामशेठ ठाकूर व सिडको यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. सिडको या बाबीकडे दुर्लक्ष करीत आहे, हे लक्षात येताच रामशेठ ठाकूर यांनी सिडकोकडे स्वतः पाठपुरावा करायला सुरुवात केली. त्या अनुषंगाने या दफनभूमीला वाढीव जागा, तसेच दफनभूमीचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून सिडकोने हिरवा कंदील दिला.

बदलत्या राजकीय प्रवाहात रामशेठ यांनी शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस, भारतीय जनता पार्टी यांच्याकडून स्वत:साठी काहीही न घेता स्वत:चेच भरभरून दिले. शेकापच्या कार्यालयासाठी आपली जागा दिली. काँग्रेसमध्ये गेल्यावर काँग्रेसला पनवेलमधील मुख्य कार्यालयासह अनेक छोटी-मोठी कार्यालये स्वखर्चाने उभी करून संपूर्ण रायगड जिल्ह्यातील काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांना हक्काच्या जागा उपलब्ध करून दिल्या. आज पनवेल मधील रूपाली सिनेमाजवळ असलेले भारतीय जनता पार्टीचे कार्यालय पाहिले, तर कार्यालयात प्रवेश करण्यासाठी पायऱ्या चढतानाच भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि त्यांचे वैचारिक सामर्थ्य समजून देणाऱ्या ओळी वाचावयास मिळतात. कोकणच्या प्रवेशद्वारावर भाजपाचे कार्यालय व्हावे, असे पक्षाला वाटत होते.त्यानुसार जागेचा शोध सुरू केल्यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, 'जागा शोधण्याची गरज नाही. आम्ही विनाशुल्क जगा देतो,' असे सांगितले. पनवेल तालुक्यातील 'डेरवली' येथे त्यांनी पक्षाच्या कार्यालयासाठी जागा दिली. या जागेवर उभ्या राहणाऱ्या भव्य कार्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन झाले असून, लवकरच संपूर्ण भारताला जोडणारे अद्ययावत सुसज्ज कार्यालय उभे राहणार आहे. या इमारतीच्या

भूमिपूजन कार्यक्रमाच्या वेळी राज्याचे तत्कालीन सार्वजनिक बांधकाममंत्री व भाजपाचे विद्यमान महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना रामशेठ ठाकूर यांच्यातील माणसाचे नेहमीच अप्रूप वाटते. ते म्हणाले, ''रामशेठ यांनी एखादी गोष्ट करण्याची ठरविली, तर ती केल्याशिवाय ते स्वस्थ बसत नाहीत. त्यांची मेहनत, कर्तृत्व, जिद्द विधायक कार्याला प्रेरणा देणारी आहे. पनवेल तालुक्यातील डेरवली येथे त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयासाठी जागा दिली. रामशेठ यांच्या दानशूरपणाबद्दल नव्याने सांगण्याची गरज नाही, त्याचा प्रत्यय संपूर्ण महाराष्ट्राला आहे. पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत रात्रंदिवस मेहनत करून एकहाती सत्ता आणली. तरुणाला लाजवेल अशी त्यांची मेहनत आहे.''

रामशेठ ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून सांगितले, ''उत्तर रायगड जिल्हा चार तालुके, महापालिका अशी मोठी लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. या ठिकाणी देशभरातील नागरिक वास्तव्यास येत असून, सर्व देशाचे लक्ष या भागाकडे आहे. येथे आलेली प्रत्येक व्यक्ती आपली झाली आहे, त्यामुळे 'सबका साथ सबका विकास' या अनुषंगाने प्रत्येक व्यक्तीचा विकास झाला पाहिजे. प्रत्येकाला पक्षाची ध्येयधोरणे समजून घेण्यासाठी, आपले विचार निर्भीडपणे मांडता येण्यासाठी आपल्या हक्काची जागा मिळावी म्हणून अधिक मोठ्या कार्यालयाची गरज असल्याने ती या निमित्ताने पूर्ण होत आहे. आपल्याकडे आलेल्या प्रत्येकाला या कार्यालयाची सावली मिळणार आहे. भाजपा देशातील सर्वात मोठा पक्ष आहे. त्यामुळे उत्तर रायगड जिल्हा भाजपाचा बालेकिल्ला होण्यासाठी आणि पक्ष मजबुतीसाठी आपण सतत कार्यरत राहूया.''

२०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत मावळ मतदारसंघातून श्रीरंग बारणे यांना विजयी करण्यात पनवेल



● सन २०२४ मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग ऊर्फ अप्पा बारणे यांच्या प्रचारसभेदरम्यानचा क्षण

मधील भारतीय जनता पार्टीबरोबर रामशेठ ठाकूर आणि प्रशांत ठाकूर यांचा मोलाचा वाटा होता. पाच वर्षानंतर पुन्हा एप्रिल २०२४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. महायुतीचे उमेदवार म्हणून मावळ लोकसभा मतदारसंघातून पुन्हा एकदा श्रीरंग बारणे यांना उमेदवारी देण्यात आली. २०१९ च्या निवडणुकांपेक्षा आणि २०२४ च्या निवडणुकांचे चित्र वेगळे होते. २०१९ मध्ये श्रीरंग बारणे महायुतीचा घटक असलेल्या शिवसेनेमधून निवडून आले होते. त्या वेळी अखंड शिवसेना ही उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली काम करीत होती. मात्र या पाच वर्षांत अंतर्गत वादामुळे शिवसेनेची दोन शकले झाली आणि उद्धव ठाकरे गट व शिंदे गट असे शिवसेनेचे दोन गट झाले. एकनाथ शिंदे यांनी मोठ्या संख्येने शिवसेनेचे आमदार सोबत घेऊन भाजपाशी हातमिळवणी केली. आता भाजपा, एकनाथ शिंदेंची शिवसेना एकत्रित निवडणुका लढवीत होते. त्यांच्यासोबत आरपीआय, रासप अशा मित्रपक्षांची महायुती झाली होती. एकनाथ शिंदेंबरोबर श्रीरंग बारणे गेल्याने २०२४ ची लोकसभा निवडणूक ही एकनाथ शिंदेंच्या गटातील महायुतीचे उमेदवार म्हणून श्रीरंग बारणे लढवीत होते. लोकसभेचा मावळ मतदारसंघ असला, तरी मावळ मतदारसंघ पनवेलशिवाय श्रीरंग बारणे जिंकू शकतच नव्हते. त्यामुळे मावळ मतदारसंघाची खरी चावी रामशेठ ठाकूर व प्रशांत ठाकूर यांच्याच हातात होती. विजयाचे दार उडायचे असेल, तर श्रीरंग बारणे यांना रामशेठ ठाकूर यांच्याशिवाय पर्याय नव्हता, हे मागच्या निवडणुकीत सिद्ध झाले होते. मावळ लोकसभा मतदारसंघातून विजयी होण्यासाठी श्रीरंग बारणे यांना फार काही कष्ट घ्यावे लागले नाहीत. कारण 'मागच्या निवडणुकीप्रमाणेच या निवडणुकीतही तुम्ही विजयी होणार,' हा शब्द रामशेठ यांनी त्यांना शब्द दिला होता. श्रीरंग बारणे मोठ्या मताधिक्याने मावळ लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले.

सन २०२४ च्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या. आमदार प्रशांत ठाकूर हे चौथ्यांदा आमदारकीच्या निवडणुकीसाठी सज्ज झाले होते. मागील तीन निवडणुकांमध्ये विरोधकांना चितपट करून त्यांनी आपला विजय साजरा केला होता. चौथ्यांदा असणारी ही निवडणूक खरेतर त्यांच्यासाठी फार अवघड नव्हतीच, तरीही ते बेसावध राहिले नाहीत. विजयचा चौकार मारण्यासाठी ते सज्ज झाले होते. भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आर.पी.आय., पी.आर.पी. आणि मित्र पक्षांच्या महायुतीचे उमेदवार म्हणून त्यांनी २८ ऑक्टोबर २०२४ रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या वेळी महायुतीतील नेत्यांसह हजारो कार्यकर्ते उपस्थित राहिले होते. खरेतर हे शक्तिप्रदर्शन नव्हते. हा कार्यकर्त्यांचा प्रतिसाद प्रशांत ठाकूर यांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि त्यांच्यावरील प्रेमाचा होता.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रशांत ठाकूर यांनी आपल्या प्रचार दौऱ्याला सुरुवात केली. गावागावांत शेवटच्या माणसापर्यंत ते पोहोचले. आता प्रशांत ठाकूर कोण, हे मतदारांना सांगण्याची गरज राहिलीच नव्हती, कारण मागील तीन निवडणुकांनंतर त्यांनी केलेले कार्य एका कार्यसम्राटाचे होते. त्यामुळे आता निवडणूक ही फक्त औपचारिक बाब होती. प्रशांत ठाकूर मतदारांच्या मनात कधीच वसलेले होते. विधानसभेच्या



● **पनवेल पंचायत समितीवर भारतीय जनता पार्टीने आपले वर्चस्व निर्माण केले आणि रंजना वासकर सभापती म्हणून विराजमान झाल्यानंतर त्यांचे अभिनंदन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, नगरसेवक व माजी सभागृह नेते परेश ठाकूर व अन्य मान्यवर**

निवडणुकीत त्यांनी पुन्हा एकदा इतिहास रचला आणि विजयी झाले.

प्रशांत ठाकूर यांच्या विजयासाठी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पनवेलची जनता त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिली. त्यामुळे त्यांचा विजय हा सहज आणि सोपा झाला. रामशेठ यांनी प्रशांत ठाकूर यांच्या विजयाचे भाकीत निवडणुकीच्या अगोदरच केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत ठाकूर यांनी या अगोदर तीन निवडणुका जिंकल्या होत्या. आपल्या वडिलांचे निर्णय आणि दूरदृष्टी किती पक्की आहे, हे त्यांना माहीत होते. त्यांच्या राजकीय प्रवासाचे मार्गदर्शक असलेल्या रामशेठ यांनी ही निवडणूकसुद्धा सोपी केली होती. "पनवेल विधानसभा मतदारसंघातून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयाचा चौकार ही खऱ्या अर्थाने षटकाराच्या दिशेने केलेली वाटचाल आहे. देशातील आणि राज्यातील नेतृत्व एकजुटीने काम करते, म्हणूनच राज्यात महायुतीला मोठे यश आलेले आहे. रायगडमधील महायुतीच्या सर्व जागा निवडून आल्या आहेत. खऱ्या अर्थाने हा त्यांच्या कामाचाच विजय आहे,'' अशा भावना रामशेठ ठाकूर यांनी विजयी मिरवणुकीदरम्यान व्यक्त केली.

पनवेल आणि रायगड परिसरात शेतकरी कामगार पक्षाचे दीर्घकाळ वर्चस्व राहिले होते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत या पक्षाचे लोकप्रतिनिधी सातत्याने निवडून येत होते. मात्र रामशेठ यांनी शेकाप सोडल्यापासून २००९ नंतर या वर्चस्वाला हळूहळू उतरती कळा लागली. सर्वप्रथम पनवेल नगरपरिषदेत शेकापला धक्का बसला, त्यानंतर विधानसभा निवडणुकांमध्येही पराभवाचा सामना करावा लागला. त्याच काळात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने या मतदारसंघासोबत रायगड जिल्ह्यात मजबूत पकड निर्माण



● सन २०२६ मध्ये प्रथमच भारतीय जनता पार्टीचा जिल्हा परिषद अध्यक्ष विराजमान झाला. त्या वेळी अभिनंदन करताना भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, खासदार सुनील तटकरे, लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेलचे महापौर नितीन पाटील, भाजपा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजपाचे नेते प्रीतम म्हात्रे आणि अन्य मान्यवर

केली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सलग चार टर्म आमदार म्हणून नेतृत्व करताना राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली. पनवेल महानगरपालिकेतही भाजपाने सलग दुसऱ्यांदा एकहाती सत्ता प्रस्थापित केली. सन २०१७ च्या पनवेल महानगरपालिका निवडणुकीत ७८ पैकी ५१ जागांवर नगरसेवक निवडून आणले. सन



● पनवेल महानगरपालिकेत महायुतीने एकहाती सत्ता प्रस्थापित करून दुसऱ्यांदा आपला महापौर विराजमान केला

२०२६ च्या पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवणुकीत ७८ पैकी ६० जागांवर नगरसेवक निवडून आणून ८० टक्के जागा मिळविल्या आणि पनवेल महानगरपालिकेवर एकहाती सत्ता आणली. शहरात भाजपाची सत्ता असली, तरी ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मात्र शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा फडकत होता. मात्र २०२६ च्या निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने हे समीकरण पूर्णपणे बदलून टाकले. जिल्हा परिषदेवर ८ पैकी ८ सदस्य व पंचायत समितीवर १६ पैकी १५ सदस्य आणल्यामुळे पनवेलच्या राजकारणात लाल बावट्याचा अध्याय संपून भाजपाचा नवा अध्याय सुरू झाला.

रायगड जिल्हा परिषदेवर कायम शेतकरी कामगार पक्षाची मक्तेदारी राहिली होती. रामशेठ ठाकूर भाजपामध्ये येण्याअगोदर रायगड जिल्ह्यातील भाजपाची नगण्य ताकद पाहता कधीतरी रायगड जिल्हा परिषदेवर भाजपाचा अध्यक्ष असेल, असा विचारदेखील केला जाणे शक्य नव्हते. पण आज सत्तेच्या सारीपाटात रायगड जिल्ह्यात भाजपाने हे स्वप्नवत यश खेचून आणले आणि रायगड जिल्ह्या परिषदेत भाजपाचे पनवेल तालुक्यातील मंगेश वाकडीकर अध्यक्ष म्हणून विराजमान झाले. रायगड जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपाचा अध्यक्ष निवडून आला. हे यश असामान्यच आहे.

सत्कार्यासाठी दानाची ओंजळ रामशेठ यांनी नेहमीच रिकामी केली. त्यांच्या दानातून किती मंदिरे, विद्यालये उभी राहिली, याचा हिशेब नाही. हिंदूंचे जाज्वल्य दैवत असलेल्या राममंदिरासाठी आपले योगदान द्यायला ते कसे विसरतील. अयोध्येतील राममंदिर हे पूर्णपणे जनतेच्या आर्थिक सहभागातूनच उभे राहणार असल्याने १५ जानेवारी २०२२ पासून त्यासाठी निधी संकलन सुरू होते. पनवेल शहरातून सुरू होणाऱ्या या निधी संकलन अभियान कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्रीराम मंदिराच्या उभारणीसाठी आपल्या कुटुंबीयांकडून एक कोटी रुपयांचा निधी दिला. त्यांच्या या योगदानाबद्दल विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने राम मंदिराची प्रतिकृती भेट देऊन त्यांचे आभार मानण्यात आले. २२ जानेवारी २०२४ रोजी रामलल्ला मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमासाठी ते उपस्थित राहिले. भाजपाचे जेष्ठ नेते विनोद तावडे श्री. रामशेठ यांना आमंत्रण देण्यासाठी घरी आले होते. रामलल्ला मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाला रामशेठ अगत्याने उपस्थित राहिले होते.

१३

शैक्षणिक क्षेत्रातील गगनभरारी

माणूस घडवायचा आणि घडायचा असेल, तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. माणूस शिकून शिक्षित होतो आणि परिस्थितीने शेकून सुद्धा शिकतो. शिकणे आणि शेकणे यात अनुभवसंपन्नतेचा आणि विद्वत्तेचा अंतर्भाव मोठा आहे. शिकलेल्या माणसांना जगाचे व्यवहार कळतात, पण शेकलेल्या माणसांना जगण्याचे व्यवहार कळलेले असतात. महाविद्यालयात जाऊन घेतलेल्या शिक्षणाची व्याप्ती मोठी असते. जगण्याचे खरे शिक्षण अनुभवायला शालेय शिक्षणाची जोड मिळाली, तर आत्मविश्वासाने ध्येयाकडे चालता येते.

रामशेठ ठाकूर यांच्यासारखे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व जे परिस्थितीने शेकलेही आणि कठीण परिस्थितीवर मात करून शिकलेही. अद्वितीय निर्णयक्षमता असल्यामुळे त्यांचे निर्णय कधी चुकले नाहीत. शिक्षकी पेशापासून व्यावसायिक, त्याहीपुढे जाऊन राजकारणी अशी मजल दरमजल करीत त्यांनी यशाचे मार्ग आपल्या निर्णयक्षमतेवर पादाक्रांत केले. व्यवसायाने आर्थिक आणि राजकारणातून सामाजिक वैभव त्यांनी उभे केले. ते उभे करणे सहज सोपे नव्हते. 'मला शिक्षकच व्हायचे आहे,' असे जेव्हा त्यांनी ठरविले होते, तेव्हा ते व्यावसायिक होतील आणि इतके मोठे व्यावसायिक होतील, असा त्यांनी विचारदेखील केला नव्हता. पण हे आयुष्य आहे, कोणाला कोठे आणि कसे घेऊन जाईल, हे कोणीच सांगू शकत नाही. फक्त आपण कोणते निर्णय कसे आणि कोणत्या परिस्थितीत घेतोय, ते फार महत्त्वाचे असते. शिक्षक म्हणून प्रवास करीत असतानाच त्यांना रामशेठ ठाकूर नावाचा व्यावसायिक सापडला. व्यवसायाबरोबर समाजसेवा करीत असताना जनतेने त्यांना आपला लोकनेता म्हणून खासदार बनविले. मोठा व्यावसायिक, संवेदनशील समाजकारणी, जाणता राजकारणी म्हणून त्यांनी स्वत:ला इतके मोठे आणि उत्तुंग केले, की ते आज म्हणतात, "मला परमेश्वर देत गेला, एवढे कसे मिळत गेले मलाच माहिती नाही, पण जे मिळाले ते माझे नाही, त्या परमेश्वराचे आहे ते त्याला अनेक रूपाने परत करतो आहे." व्यावसायिक झाल्यांनतर त्यांच्या दातृत्वाच्या प्रवासाला सुरुवात झाली. त्यांनी कर्णाचे दातृत्व जोपासले. ते शिक्षक होते. शिक्षणावरील प्रेमाने त्यांनी स्वत:ची शिक्षण संस्था निर्माण करून ते शिक्षणमहर्षी झाले. आज त्यांचा आदर्श कोणीही घेऊन माणूस म्हणून मोठे व्हावे, मात्र त्यांचा आदर्श घेण्याची हिंमत करणेसुद्धा आजच्या स्वार्थी आणि व्यावहारिक जगात सोपे नाही.

शिक्षक असतानाच व्यावसायिक झाल्यानंतर त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला असला, तरी रामशेठ

यांच्या आत अंकुरलेला शिक्षक मात्र कधीच राजीनामा देऊ शकला नाही. तो तसाच आत त्यांच्याशी सतत बोलत राहिला. कारण त्याला कर्मवीर भाऊरावांच्या भव्यतेचा, त्यागमयी विचारांचा स्पर्श झाला होता. कर्मवीर भाऊराव पाटील हाच त्यांचा पांडुरंग, सातारा ही त्यांची पंढरी. त्या पांडुरंगाच्या भक्तीने त्यांना जगण्याचा आणि जगविण्याचा मूलमंत्र सापडला होता. त्यांचा तो कर्मवीर नावाचा पांडुरंग आजही त्यांच्यात वास करून रामशेठ ठाकूर या व्यक्तीच्या रूपात जगतो आहे. ज्ञानमंदिरे उभी करीत आहे, त्यांना आधुनिक स्वरूप देत आहे. शिक्षणातून पिढ्या घडविण्याचे पुण्यतत्त्व कर्मवीर भाऊराव नावाच्या पांडुरंगाने त्यांना दिले. आज वयाच्या ७५ वर्षांच्या प्रवासात अविरत जोपासले हे त्यांनी उभ्या केलेल्या ज्ञानमंदिरांच्या वैभवातूनच दिसते आहे.

रयत शिक्षण संस्था आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था, शिवप्रेमी कर्मवीर अण्णांनी लावलेल्या रोपट्याचे आज विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. छत्रपती शिवराय आपल्या प्रजेला रयत म्हणायचे म्हणून त्यांनी आपल्या शिक्षण संस्थेचे नाव 'रयत' ठेवले. शिवरायांच्या समतेचा वारसा फुलेंनी चालविला, फुलेंचा वारसा शाहूंनी चालविला, शाहूंचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविला, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा वारसा कर्मवीर भाऊराव पाटील यांनी चालविला, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा रामशेठ ठाकूर चालवीत आहेत. शाळा उभ्या राहिल्या पाहिजेत, समृद्ध व्हायला हव्यात म्हणून रयत शिक्षण संस्थेला भरभरून देणारे रामशेठ यांची शिक्षणाप्रति प्रचंड तळमळ आहे. रामशेठ यांच्यात सरस्वती आणि लक्ष्मी यांचा मिलाफ पाहायला मिळतो. 'रयत'चे विद्यार्थी असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रगतीची शिखरे पादाक्रांत केली. जेव्हा जेव्हा रयत शिक्षण संस्थेला आर्थिक अडचण आली, तेव्हा आपले उत्तरदायित्व समजून ते धावून गेले. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान मौलिक आणि महत्त्वपूर्ण आहे. रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण-कोपर येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवाच्या कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील हे रामशेठ यांच्या उत्तुंग कार्याचा गौरव करताना म्हणाले,

''जनार्दन भगतसाहेब फार शिकलेले नव्हते, तरी शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळले होते. म्हणून गव्हाणसारख्या खेडेगावात त्यांनी छत्रपती शिवाजी विद्यालयाची पायाभरणी केली. कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेला गावची भावी रयत सुशिक्षित करण्यासाठी सोपविली. शिक्षणाची समान संधी सगळ्यांना मिळाली पाहिजे म्हणून ते सातत्याने धडपडत होते. त्यांचे कार्य रामशेठ यांनी जवळून पाहिले. साताऱ्याला गेल्यानंतर ते कर्मवीर अण्णांच्या शैक्षणिक व सामाजिक विचारांनी अधिक पुलकित झाले. कर्मवीरांचा वारसा आणि जनार्दन भगतसाहेबांचे स्वप्न उराशी घेऊन जगणाऱ्या रामशेठ ठाकूर यांनी आपल्यातील शिक्षकाला कायम जागता ठेवला. त्यातूनच ते 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळ' या नावाने शिक्षण संस्था स्थापन करून त्या शिक्षण संस्थेचे चेअरमन झाले. अनेक शिक्षक, इंजिनीअर, डॉक्टर, वकील, कर्तृत्वाच्या प्रत्येक क्षेत्रात उभे राहण्याची ज्याला जी इच्छा होती त्या प्रत्येकाला उभे केले. ''आधुनिक शिक्षणाची विचारधारा माझ्या

भागातील शाळांमधून दिल्याशिवाय समाजाचा विकास साधणार नाही,'' असे भगतसाहेबांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी सुरू केलेली धडपड त्यांच्या हयातीत तितकीशी पूर्ण झाली नव्हती. जनार्दन भगतसाहेब निवर्तल्यानंतर या समाजसेवकाचा भव्य पुतळा उभारून त्यांच्या स्मृती जागत्या ठेवाव्यात, अशी कल्पना त्यांना पाहिलेल्या, अनुभवलेल्या आणि त्यांच्या कार्याने भारावलेल्या तरुणांनी केली. पण याच तरुणांमधील रामशेठ ठाकूर यांच्यासारखा दूरदृष्टी जोपासणाऱ्या तरुणाने आपल्या मित्रांना त्यांच्या कल्पनेपुढची एक कल्पना सांगितली. ''पुतळा उभारून होणार काय, त्याची किती दिवस आणि कशी देखभाल आपण करणार आहोत, त्याला कुंपण घातले तरी कावळे, चिमण्या त्यांच्यावर बसून जीवनव्यवहार करतील. भगतसाहेबांना पुढची पिढी आधुनिक जगाशी जोडून शिक्षित करायची होती. त्यांची ती इच्छा त्यांच्या नावाने शिक्षण संस्था काढून आपण पूर्ण करू.'' रामशेठ ठाकूर यांचा हा विचार सगळ्यांनाच भावला. सगळ्यांनी एकमेकांच्या हातावर हात ठेवला आणि गव्हाणच्या मातीतच एका शिक्षण संस्थेचे बीज पेरले गेले. ३० मार्च १९९२ ला 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था' नावाच्या शिक्षण संस्थेची पायाभरणी केली गेली, ती 'विद्या विनयेन शोभते' या ब्रीदवाक्याचा दीप हाती घेऊन. संस्थेने समाजातील सर्व घटकांच्या शैक्षणिक उन्नतीच्या कार्यास सुरुवात केली. गव्हाण हे पनवेल तालुक्यातील खाडीकिनारी वसलेले गाव, येथील आगरी - कोळी समाज शेती आणि मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा, जगण्याच्या लढाईत शिक्षणाला येथे फारसे महत्त्व नव्हतेच, पण जनार्दन भगत यांच्यासारखे दूरदृष्टीचे नेते या भागाला लाभले आणि शाळेत न जाणारी पोरे शाळेकडे वळली... शिकली. तरीही जनार्दन भगतसाहेबांना अपेक्षित असलेली आधुनिक शिक्षण व्यवस्था उभी करायची असेल, तर इंग्रजी शिक्षणाशिवाय पर्याय नाही म्हणून 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थे'ची 'इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्याचा निर्णय या तरुण मंडळींनी घेतला. १२ जून १९९२ रोजी गव्हाणसारख्या ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाची पहिली शाळा उभी राहिली. 'न्यू इंग्लिश स्कूल, गव्हाण' या नावाने सुरू झालेल्या या शाळेत नर्सरी, ज्युनिअर के.जी., सीनिअर के.जी., फर्स्ट स्टँडर्डचे वर्ग सुरू करण्यात आले. १९९३ मध्ये शासनाच्या प्राथमिक शिक्षण विभागातर्फे पहिलीच्या वर्गाला मान्यता मिळाली. गव्हाण परिसर शहरीकरणासाठी सिडकोने विकसित करायला घेतला होता. त्यामुळे येथे राहायला येणाऱ्या नागरिकांसाठी भविष्यात मराठी माध्यामाबरोबरच इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची सोय व्हायला पाहिजे, या उद्देशाने इंग्रजी माध्यमाच्या शाळेची स्थापना करण्यात आली. सन १९९७ मध्ये या शाळेचे नाव बदलून 'मोरू नारायण म्हात्रे विद्यालय' असे नामकरण करण्यात आले. सिडकोकडून 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक' संस्थे'ला एक एकर आरक्षित जागा उपलब्ध झाली. रामशेठ यांनी शाळेसाठी सुंदर इमारत बांधली. रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या 'जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेज' गव्हाण- कोपर येथे कला, वाणिज्य शाखेचे वर्ग सुरू केले होते. विज्ञान शाखा मात्र येथे उपलब्ध नसल्यामुळे नवी मुंबई किंवा पनवेलशिवाय पर्याय नव्हता संस्थेने २००८ मध्ये 'मोरू नारायण म्हात्रे' या माध्यमिक विद्यालयाला जोडूनच

विज्ञान शाखेच्या 'तुकाराम नारायण घरत कनिष्ठ महाविद्यालय', गव्हाण- कोपर उच्च माध्यमिक विद्यालयाची सुरुवात केली.

न्यू इंग्लिश स्कूल नवीन पनवेल (चांगू काना ठाकूर विद्यालय)

शाळा ही केवळ चार भिंतींमधील वर्गखोल्यांची नसावी. तिच्या गुणवत्तेत शाळेच्या सुखसोयींबरोबरच इमारतीचाही फार मोठा वाटा असतो. रामशेठ यांनी उभ्या केलेल्या शाळांच्या इमारती आपल्याला काहीतरी सांगत असतात. आपल्याशी बोलत असतात, त्यांची रचनाच इतकी सुंदर असते, की प्रथमदर्शनी त्या इमारतीच्या आपण प्रेमात पडतो. रामशेठ सतत शाळांचा विचार करताना शाळांच्या रचना कशा असाव्यात, याचादेखील विचार करतात. 'पैसे किती खर्च होऊ दे, इमारती सुंदर, स्वच्छ आधुनिक पद्धतीच्या असाव्यात,' यावर ते नेहमी भर देतात. त्यासाठी कोठेही कसलीही तडजोड करायचीच नाही, या विचाराशीदेखील त्यांनी कधी तडजोड केली नाही.

भविष्यातील पनवेलची व्याप्ती लक्षात घेऊन नवीन पनवेल ही सिडकोने नियोजनबद्ध अशी वसाहत वसविली. वाढत्या नागरीकरणाबरोबर शैक्षणिक गरजाही तितक्याच पटीने वाढणार होत्या. याचा विचार करून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पहिल्या शाळेनंतर संस्थेने आपली व्याप्ती वाढवायला सुरुवात



● चांगू काना ठाकूर विद्यालय मराठी व इंग्रजी माध्यम आणि ज्युनिअर कॉलेज, नवीन पनवेल

करून संस्थेच्या दुसऱ्या शाखेचा विस्ताराचा विचार सुरू केला. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेचा भाग बनायचे असेल, तर शैक्षणिकदृष्ट्या सक्षम व्हायला हवे, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान समजून घेणे गरजेचे आहे. शहर आणि गावे जोडायची असतील, तर ती तांत्रिकदृष्ट्या सक्षम असलेल्या शाळांनी जोडता येऊ शकतात. हे रामशेठ ठाकूर यांना कळले होते, कारण त्यांच्या आयुष्यातील शैक्षणिक प्रवास जुन्या शैक्षणिक धोरणापासून नव्या शैक्षणिक धोरणापर्यंत सांधला गेला होता. पनवेल गावाचे शहर होत असताना सिडकोने नवीन पनवेल या नावाने नव्याने वसाहती बांधायला सुरुवात केली. नव्याने वसवलेल्या आधुनिक शहरात राहायला येणाऱ्या लोकांची शिक्षणाची गरज ओळखून सिडकोच्या नवीन पनवेल सेक्टर ८ व १४ मध्ये शाळा सुरू करण्याचा संस्थेने निर्णय घेतला. आज ज्या इमारतीमध्ये शाळा भरते, ती इमारत सिडकोने हायर पर्चेस स्कीमवर एक कोटी ५० लाख रुपयांना विकायला काढली होती. त्यासाठी सुरुवातीला १५ लाख रुपये भरायचे होते. रामशेठ यांनी स्वत:चे १० लाख रुपये दिले व इतर सभासदांनी पाच हजार, दहा हजार असे करून पाच लाख दिले. असे १५ लाख भरले. इमारत ताब्यात घेऊन शाळा सुरू करण्यात आली असली, तरी पुढील १९ वर्षे प्रत्येक वर्षी १९ लाख ४५ हजार भरावे लागणार होते. ते दरवर्षीप्रमाणे चार वर्षे भरले व सिडकोला पत्र लिहून उर्वरित सगळे पैसे एकदाच एक रकमी भरतो, असे सांगितले. मात्र नफेखोर सिडकोने याला नकार दिला. त्यामुळे दरवर्षी १९ लाख ४५ हजार प्रमाणे सिडकोला व्याजासह ३ कोटींच्या वर पैसे भरून ही इमारत विकत घेऊन १९९४ साली न्यू इंग्लिश स्कूल, नवीन पनवेल (चांगू काना ठाकूर विद्यालय) ही संस्थेची दुसरी शाळा सुरू केली.

सन १९९४-९५ मध्ये चांगू काना ठाकूर प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम, प्री-प्रायमरी मराठी माध्यम, प्रायमरी इंग्रजी माध्यम, प्राथमिक व माध्यमिक मराठी माध्यम व पुढे १९९५-९६ मध्ये माध्यमिक इंग्रजी माध्यम एकाच संकुलात सुरू करण्यात आले. विद्यार्थ्याला दहावीनंतरच्या प्रवेशासाठी धावाधाव करायला लागू नये, बारावीपर्यंतचे शिक्षण एकाच ठिकाणी मिळावे म्हणून १९९७ मध्ये उच्च माध्यमिकच्या कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखा सुरू केल्या.

चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त)

हे महाविद्यालय परंपरागत शिक्षणाबरोबरच अत्याधुनिक शिक्षण देणारे मुंबई विद्यापीठातील प्रतिष्ठित शैक्षणिक केंद्र आहे. विज्ञान शाखेमध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, संगणक, माहिती तंत्रज्ञान, तसेच वाणिज्य शाखेमध्ये व्यवस्थापन, अकाऊंटन्सी, फायनान्शिअल मार्केटिंग, आणि कला शाखेमध्ये हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, भूगोल, इतिहास, फॅशन डिझायनिंग, इंटिरिअर डिझायनिंग, डेटा ॲनालिटिक्स, पत्रकारिता यांसारख्या अत्याधुनिक शाखा सुरू करून विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख बहुपर्यायी अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले गेले आहेत. या महाविद्यालयाची नेत्रदीपक वास्तू, अद्ययावत



● **चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय (स्वायत्त), खांदा कॉलनी, नवीन पनवेल**

प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय व अभ्यासिका, समुपदेशन प्रयोगशाळा या सर्व गोष्टी पाहता लक्षात येते, की या महाविद्यालयाने नॅकचे अ++ दर्जा मानांकन, मुंबई विद्यापीठाचे सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पारितोषिक आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे श्रेष्ठत्व सक्षम महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील विद्यापीठ, राज्य-राष्ट्रीय स्तरावरील चमकदार कामगिरी ही श्री. रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या अचूक मार्गदर्शनाची उत्तम उदाहरणे आहेत. महाविद्यालयातील एकूण दहा विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष परीक्षेतील गुणवत्तायादीमध्ये सर्वप्रथम येऊन मुंबई विद्यापीठामध्ये सुवर्णपदक मिळवून महाविद्यालयाची विजयी पताका फडकावली व आपला ग्रामीण विद्यार्थीही संधी मिळाली, तर आपल्या शैक्षणिक क्षमतेची चुणूक दाखवू शकतो, हे दाखवून दिले. येथील ग्रामीण भागातील विद्यार्थिनी मुंबई विद्यापीठामध्ये रसायनशास्त्र विषयामध्ये सर्वप्रथम येऊन मुंबई विद्यापीठातील १५० वर्षांतील गुणांचा इतिहास बदलते, ही साधी गोष्ट नाही. आपल्या जीवन विकासासाठी झेप घेण्याची संधी रामशेठ ठाकूर यांनी येथील विद्यार्थ्यांना दिली, त्यामुळे परिसरातील शिक्षण क्षेत्राचा इतिहास बदलला. नवनवीन अभ्यासक्रम, अत्याधुनिक शिक्षण सामग्री आणि उच्चतम प्राध्यापक उपलब्ध करून दिल्यामुळे येथील मातीचा सुगंध शहरातील वातावरणातही दरवळू लागला. पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण येथे उपलब्ध झाले आहे. महाविद्यालयाची सातत्यपूर्ण गुणवत्ता, शैक्षणिक क्षेत्रामधील देदीप्यमान कामगिरी यांचा एकत्रित परिणाम म्हणून विद्यापीठ



अनुदान आयोगाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून महाविद्यालयास मानाचा 'स्वायत्तता' दर्जा प्राप्त झाला आहे.

रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय, खारघर, ओवेपेठ

खारघर शहर आधुनिक रूप घेऊन विस्तारत असताना मूळची गावे मात्र शिक्षणापासून दूर पडली होती. इंग्रजी शिक्षणाचा गाजावाजा आणि बाजार तेजीत येत असतानाच गोरगरिबांना मातृभाषेतून शिक्षण मिळणे अवघड झाले होते. अशावेळी ओवेपेठसारख्या अविकसित गावाची शिक्षणाची अडचण ओळखून रामशेठ ठाकूर यांनी मराठी माध्यमाचे आठवी ते दहावीचे वर्ग न्यू इंग्लिश स्कूल, ओवेपेठ या नावाने सुरू केले.२०२२ मध्ये या शाळेचे नाव 'रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय, खारघर, ओवेपेठ' असे करण्यात आले.

रामशेठ ठाकूर हायर सेकंडरी विद्यालय खारघर

नवी मुंबई परिसरातील खारघर रोड या विकसित होत असलेल्या शहराची नजीकच्या काळातील वाढणाऱ्या लोकसंख्येची गरज ओळखून माननीय रामशेठ ठाकूर यांनी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये उच्च माध्यमिक वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या ११ व १२ वीच्या शाखा सुरू केल्या. आज या विद्यालयात ८८० विद्यार्थी शिकत असून, या विद्यालयाला बेस्ट ज्युनिअर कॉलेज, एज्युकेशन वर्ल्ड ॲवॉर्ड २०२४-२५, एज्युकेशन टुडे ॲवॉर्ड, इंडियन एक्सलन्सी अवॉर्ड -२०२५ असे राष्ट्रीय स्तरावरचे प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले. विद्यालयासाठी एक सुसज्ज प्रशासकीय इमारत आणि विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रयोगशाळा, कॅफेटेरिया, हायटेक आयटी लॅब, जागतिक गुणवत्तापूर्ण



पुस्तकांचे वाचनालय, सेमिनार हॉल, प्रशस्त खेळाचे मैदान अशा व्यवस्था उपलब्ध करण्यात आल्या आहेत. विद्यालयाने शैक्षणिक, संशोधन, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रामध्ये राज्यस्तर, तसेच राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे.

रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खारघर

भविष्यात 'एज्युकेशनल हब' म्हणून खारघरला अतिशय महत्व प्राप्त होणार, हे रामशेठ यांनी अगोदरच जाणले होते. आज खारघरला आलेले शैक्षणिक महत्त्व पाहता रामशेठ ठाकूर यांच्या दूरदृष्टीची निश्चितच प्रचिती येते आहे. त्यांनी काळाची पावले ओळखूनच 'रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालया'ची



● **रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,खारघर येथील नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी**

स्थापना सन २०१० मध्ये 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थे'च्या माध्यमातून केली. हे महाविद्यालय सुरुवातीला खारघर सेक्टर-१९ मध्ये सुरू करण्यात आले. नवी मुंबईतील उदयोन्मुख शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्ध झालेल्या या महाविद्यालयाने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती केली. खारघरमधील वाढत्या शैक्षणिक गरजा आणि विद्यार्थ्यांचा वाढता शैक्षणिक कल लक्षात घेऊन २०१६ मध्ये महाविद्यालय सेक्टर-१९ वरून सेक्टर-३३ येथील प्रशस्त आणि आधुनिक इमारतीत स्थलांतरित झाले. या नव्या इमारतीचे उद्घाटन सन २०१६ मध्ये केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. रामशेठ ठाकूरसाहेबांच्या अविरत परिश्रमामुळे आणि संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे, ४९ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेले हे महाविद्यालय आज जवळजवळ १,४०० विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणारा वटवृक्ष म्हणून नवी मुंबईत आपली ओळख दृढ करीत आहे. वाढत असलेली विद्यार्थिसंख्या आणि शिक्षणाची गरज लक्षात घेऊन महाविद्यालयाला जोडून सन २०१४-२०१५ मध्ये 'रामशेठ ठाकूर हायर सेकंडरी विद्यालय, खारघर' हे उच्च माध्यमिक विद्यालय सुरू केले. उच्च माध्यमिक विद्यालयाची सुरुवात केवळ १६०विद्यार्थ्यांसह झाली होती. परंतु आज गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे, तसेच रामशेठ ठाकूर यांची दूरदृष्टी आणि शिक्षणावरील निष्ठा यांमुळे हे शैक्षणिक संकुल खारघरमधील शिक्षणाचे केंद्रस्थान बनले आहे.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर

नवी मुंबईतील खारघर परिसराला एक वेगळे महत्त्व आहे. उच्चभ्रू नागरिकांची लोकवस्ती म्हणून या वसाहतीकडे पाहिले जाते. या भागात सिडकोने खारघरचा नियोजनबद्ध विकास करताना क्रीडांगणे, बगीचे आणि शाळांसाठी भूखंड राखून ठेवले. रामशेठ ठाकूर यांच्यासारख्या शिक्षणप्रेमी व्यावसायिकाने दूरदृष्टीने खारघरच्या शैक्षणिक विकासासाठी 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थे'च्या माध्यमातून रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल हे शैक्षणिक संकुल उभे करायला सुरुवात केली. एक उच्च गुणवत्तापूर्ण आदर्श सीबीएसई



● खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची भव्य इमारत

अभ्यासक्रमाचे हे विद्यालय व्हावे, हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून त्यानुसार शाळेचा शैक्षणिक दर्जा सर्व अत्याधुनिक सुविधांसह वाढविला. आज राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट सीबीएसई स्कूल म्हणून याला मान्यता मिळाली आहे. 'क्वॉलिटी' हा रामशेठ ठाकूर यांचा विचार असल्यामुळे मुलांना सर्व सुख-सुविधा शाळेत मिळाल्याच पाहिजेत, म्हणूनच त्यांच्या संस्थेच्या सगळ्या शाळा अत्याधुनिक सोयीसुविधांनी सज्ज आहेत. खारघरचे 'रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल' हे याचे उत्तम उदाहरण आहे. आज या विद्यालयात नर्सरी ते १२ वीपर्यंत एकूण ४,४७० विद्यार्थी शिक्षण घेत आहे. विद्यालयास उत्कृष्ट गुणवत्ता प्रणालीसाठी प्रमाणित शाळा, ब्रिटिश कौन्सिलचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार, राष्ट्रीय स्तरावरील स्वच्छ विद्यालय स्पर्धेत संपूर्ण देशातून ८ लाख २३ हजार शाळांनी सहभाग घेतला होता, त्यात खारघर पब्लिक स्कूलला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कार आणि सर्वोत्तम सुविधांसाठी राष्ट्रीय शाळा पुरस्कार असे सर्वोत्तम पुरस्कार मिळाले. २००८-९ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमातून शिक्षण देणारी (सी.बी.एस.ई.) शाळा आज नामांकित शाळा म्हणून उदयाला आली आहे. या शाळेत प्रवेश मिळावा म्हणून पालक दोन-दोन वर्षे अगोदरपासूनच तयारीला लागतात.

श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी

उरणमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची शाळा असावी, असा रामशेठ ठाकूर यांचा मानस होता. त्यांनी एकदा ठरवले, की ते पूर्ण होणार नाही, असे कधी झाले नाही. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्थापनेनंतर जवळजवळ अठरा वर्षांनंतर म्हणजे सन २०१० मध्ये सिडकोच्या द्रोणागिरी नोड परिसरात 'श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी' शाळेची स्थापना करून आपला शाखा विस्तार केला. इंग्रजी पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाची निर्मिती करून उरणमध्ये आधुनिक शिक्षणाची



● **श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी-उरण येथील सुसज्ज इमारत**



दारे खुली करून दिली. ही शाळा दर्जेदार शिक्षण देणारी शाळा ठरावी यासाठी संस्था अथक प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्र शासन आयोजित 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उरण तालुक्यातून रुपये तीन लाखांचे प्रथम पारितोषिक विद्यालयास प्राप्त झाले.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे, नवी मुंबई

संस्थेच्या नावीन्यपूर्ण शाखांपैकी 'रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे' शाळेचा या शैक्षणिक दर्जाही तितकाच मोठा आहे. या शाळेची स्थापना नावीन्यपूर्ण आणि प्रगतिशील शिक्षण देण्यासाठी करण्यात आली. उलवे शहरात विद्यार्थ्यांची व पालकांची शैक्षणिक गरज ओळखून संस्थेने विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रम देणारी सी.बी.एस.ई. बोर्डाची 'रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे' ही शाळा एप्रिल २०२४ मध्ये सेक्टर १२ या ठिकाणी सुरू केली. ही शाळा दर्जेदार शिक्षणाच्या ध्येयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी काम करीत आहे. विद्यालयामध्ये एक सर्वसमावेशक शिक्षण अनुभव देण्यासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. अभ्यास हा लादलेले कर्तव्य न मानता एक आकर्षक अनुभव म्हणून दिला जातो, त्यामुळे सकारात्मक वर्तणुकीत बदल होतो आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास शाळेत केला जातो.

भागूबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालय, नवीन पनवेल

रामशेठ ठाकूर हे दूरदृष्टी असलेले नेतृत्व असून, त्यांच्या योगदानामुळे या परिसरातील विधी शिक्षणाच्या



क्षेत्रालाही नवे परिमाण लाभले आहे. सन २००९ मध्ये भागूबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजची स्थापना करून त्यांनी गुणवत्तापूर्ण व सुलभ विधी शिक्षणाची दीर्घकालीन गरज पूर्ण केली. हे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाशी संलग्न असून, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे मान्यताप्राप्त आहे. येथे LL.B., B.A., LL.B. आणि LL.M. असे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

या महाविद्यालयाचे सन २००९ मध्ये ज्येष्ठ विधिज्ञ व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांच्या शुभहस्ते उद्घाटन झाले. या वेळी रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध वकील ॲड. दत्ता पाटील, तसेच माजी खासदार दि. बा. पाटील आवर्जून उपस्थित होते. ही बाब महाविद्यालयाच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना ठरली. अवघ्या १६ वर्षांच्या कालावधीत या संस्थेने २५,००० पेक्षा अधिक विधी पदवीधर घडविले आहेत. यापैकी अनेक विद्यार्थी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा येथे अधिवक्ता म्हणून नोंदणीकृत असून, महाराष्ट्रातील विविध न्यायालयांत यशस्वीरीत्या वकिली करीत आहेत. अनेक विद्यार्थी विधी विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून कायदा महाविद्यालयांमध्ये साहाय्यक प्राध्यापक म्हणून सेवा देत आहेत. महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब म्हणजे श्री. ऋषिकेश पाटील यांनी JMFC परीक्षा उत्तीर्ण करून या महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले पहिले न्यायाधीश म्हणून नाव कोरले आहे.

१४

'रयत'चा राम

रामशेठ ठाकूर 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थे'च्या शाळांना अत्याधुनिक करीत असताना फक्त आपल्या संस्थेच्या शाळा म्हणून त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रवाहात आणले नाही, तर ते 'रयत शिक्षण संस्थे'चे माजी विद्यार्थी या नात्याने 'रयत शिक्षण संस्थे'च्या शाळादेखील ते स्वखर्चाने नव्याने उभ्या करीत आहेत.

रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य, पुढे रायगड जिल्हा समितीचे चेअरमन आणि सध्या मॅनेजिंग कौन्सिलचे आणि एक्झिक्युटिव्ह कमिटीचे सदस्य ही जबाबदारी सांभाळत असताना त्यांनी फक्त शाळा व्यवस्थापनावर लक्ष ठेवले नाही, तर प्रत्येक शाळेकडे जातीने लक्ष दिले. त्यांना अत्याधुनिक बनविण्यासाठी सदैव कार्यरत राहिले आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाणच्या 'छत्रपती शिवाजी विद्यालया'चे ते विद्यार्थी. या शाळेत दहावीच्या वर्गात शिकत असताना जनार्दन भगतसाहेबांच्या नेतृत्वाखाली गावकरी व आपल्या सहकारी विद्यार्थ्यांसोबत शाळेच्या वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी दगड, माती घमेल्याने डोक्यावरून वाहिली. १९६६-६७ मध्ये दगड-मातीचे कच्चे बांधकाम करून पत्र्याचे छत टाकलेल्या शाळेच्या वर्गखोल्या १९९२ साली वारा व पावसाच्या तडाख्याने पडल्या. त्यात ते बसत असलेला अकरावीचा वर्गही होता. या



● रामशेठ ठाकूर यांनी १९९५-९६ मध्ये गव्हाण येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाची स्वखर्चाने उभी केलेली भव्य इमारत

शाळेची दुरवस्था त्यांनी पाहिली. रामशेठ १९७६-७७ मध्ये बांधकाम क्षेत्रात उतरल्याने १९९४-९५ पर्यंत त्यांच्या हातात चार पैसे आले होते. आपण शिकलेल्या शाळेची ती दुरवस्था त्यांनी पाहिली आणि मग २००१ मध्ये त्यांनी भव्य इमारत उभी केली. त्यांनी १९९५-९६ मध्ये स्वखर्चाने १ कोटी १० लाख रुपये खर्च करून त्यांनी इंग्रजी 'सी' आकाराची ४० खोल्यांची तीन मजली भव्य इमारत उभी केली. खासदार झाल्यानंतर त्या इमारतीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले, हा दुग्धशर्करा योग होता. शाळेचे ऋण फेडण्याची त्यांना मिळालेली ही संधी हे त्यांच्या आयुष्याचे खरे संचित होतं. छत्रपती शिवाजी विद्यालयाची विद्यार्थिसंख्या वाढत असल्याने तीन मजली इमारत अपूर्ण पडू लागली. त्यांनी सिडकोकडे नवीन इमारतीसाठी अनुदान मिळावे म्हणून प्रयत्न सुरू केले. दोन वर्षांनंतर सिडकोने १ कोटी ८८ लाख रुपये दिले. रामशेठ यांनी त्यात २ कोटी ६२ लाख रुपये स्वत:चे टाकले व पुन्हा इंग्रजी 'एल' आकाराची अजून एक नवीन इमारत बांधली. ही इमारत ४ कोटी ५० लाख रुपयांची झाली. आपण ज्या शाळेत शिकलो, त्या शाळेचे हे सुंदर रूप पाहून रामशेठ यांचा आनंद गगनात न मावणारा होता. त्यांनी लहानपणापासून शाळेची स्थित्यंतरे पाहिली होती. ती शाळा त्यांनी स्वत: उभी केली. या इमारती इतिहासाच्या साक्षीदार बनून रामशेठ यांच्या कर्तृत्वाची गाथा पुढील पिढ्यांना सांगत राहतील. गव्हाण हायस्कूल हे रयत शिक्षण संस्थेचे. रामशेठ या शाळेचे विद्यार्थी. त्यांचे जेवढे या शाळेवर प्रेम आहे, तेवढेच प्रेम 'रयत'च्या सर्व शाळांवर आहे. ते कायम म्हणत असतात, "मी रयतचे लेकरू आहे, रयत ही माझी माउली आहे, माझे श्रद्धास्थान आहे, मी माझ्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या शाळांवर जेवढे प्रेम करतोय, तेवढेच रयत शिक्षण संस्थेच्या शाळांवर करतो, अण्णांनी जे दिले ते शब्दांत सांगता न येणारे आहे. जेव्हा मी शाळा आणि विद्यार्थी उत्कर्षाचा विचार करीत असतो, त्या वेळेला अण्णा माझ्या सोबत असल्याचा अनुभव सतत घेत असतो. मला ते सतत प्रेरणा देतात. सातारा हीच माझी पंढरी आहे. मी ९ मे ची साताऱ्याची वारी कधी चुकविली नाही. श्वास असेपर्यंत ती चुकणार नाही. त्या तीर्थक्षेत्री जाऊन समाधीवर डोके ठेवले, की पुन्हा पुन्हा नव्याने दृष्टी व्यापक होत नवचैतन्य मिळते. नवे ध्यास लागतात, त्यातूनच मला शाळांच्या इमारतीबरोबर विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर उभे राहण्याची, मोठे करण्यासाठी नवीन मार्ग सापडतात." रामशेठ 'रयत'विषयी बोलताना अत्यंत भावुक होतात.

रायगड जिल्ह्यातील 'रयत'च्या शाळांचे पालकत्व रामशेठ यांनी नुसतेच घेतले नाही, तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणापासून अत्याधुनिक इमारती उभ्या करण्याचा त्यांनी ध्यास घेतला आहे. पनवेलमधील कामोठे येथील सेक्टर ६/ ए मध्ये शाळेसाठी १९ कोटी रुपये खर्चून एक भव्य इमारत त्यांनी स्वखर्चाने उभी केली. रयत शिक्षण संस्थेने या स्कूलचे 'लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज' असे नामकरण केले. विविध उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर असणाऱ्या या विद्यालयाच्या शिरपेचात 'आयएसओ' मानांकनाने मानाचा तुरा खोवला गेला. विद्यार्थ्यांची प्रगती व सर्वांगीण विकास हाच ध्यास असणाऱ्या या विद्यालयातील शैक्षणिक व इतर उपक्रम, भौतिक सुविधा, स्वच्छ व पोषक वातावरण या साऱ्याची दखल

घेऊन हे मानांकन प्राप्त झाले. २०२५ चे आयएसओ ९००१:२०१५ क्वॉलिटी मॅनेजमेंट सिस्टमचे हे मानांकन प्रमाणपत्र किंगबोर्ड कन्सल्टन्सीचे डायरेक्टर विजय नाळे, तसेच ऑडिटर प्रमोद मांडवे यांच्या सहकार्याने मिळाले.

उलवा नोड सेक्टर २४ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या 'सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूल'साठी त्यांनी १७ कोटींची इमारत बांधली. 'रयत'चे चेअरमन व संपूर्ण मॅनेजिंग कमिटीने स्कूलला भेट दिली. या भेटीदरम्यान चेअरमन अनिल पाटील म्हणाले, "एखाद्या विद्यापीठाला शोभेल असे हे संकुल आहे."

पनवेल येथील रिटघर 'न्यू इंग्लिश स्कूल' त्यांनी दत्तक घेतले. शाळेच्या इमारतीची जीर्ण अवस्था पाहून त्यांच्यातील दातृत्व जागे झाले. ज्या वर्गात मुले बसून शिकतात ते वर्ग आणि ती इमारत ही शिक्षणाला पूरक असलीच पाहिजे यावर त्यांचा नेहमी कटाक्ष असल्याने मोडकळीस आलेल्या रिटघर शाळेची त्यांनी नवीन इमारत बांधायचा संकल्प करून जवळजवळ १ कोटी १० लाख रुपये स्वखर्चाने त्यांनी एक अत्याधुनिक इमारत उभी केली. दोन वेळा खासदार असताना सहा वर्षांत त्यांचा आलेला खासदार निधी बराचसा 'रयत'च्या शाळांना दिला.

'रयत'च्या रायगड विभागातील अनेक शाळांबरोबरच पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रामधील अनेक हायस्कूल व कॉलेजना त्यांनी करोडो रुपयांची मदत केली.

रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. रावसाहेब शिंदे सन २०१३ मध्ये छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या सुवर्ण महोत्सव कार्यक्रमासाठी आले होते. रावसाहेब रामशेठ यांचे कार्यकर्तृत्व व दानशूरपणाबद्दल कायम कौतुक करायचे. या कार्यक्रमात रामशेठ यांच्याबद्दल बोलताना ते म्हणाले, "रामशेठ आणि माझी ओळख जेव्हा रामशेठ रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलवर गेले तेव्हाची. मी देशात-परदेशात अशी खूप माणसे पाहिली आहेत. पण रामशेठसारखे व्यक्तिमत्त्व पाहायला आणि जवळ यायला दुर्मीळच. मला नेहमीच आश्चर्य वाटते, की अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व निर्माण व्हावे, रामशेठची आणि माझी ओळख खूप उशिरा झाली, याची नेहमी मला खंत वाटत असते. मला नेहमी रामशेठ ठाकूर यांच्याशी ओळख झाल्याचा आनंद वाटतो. हे मी माझे नशीब समजतो, खरेतर आम्ही मीटिंगनिमित्तच एकत्र भेटायचो. तेवढीच काय ती तोंडओळख, पण आम्ही खरेच जवळ आलो ते मी 'रयत'च्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा. शरद पवारसाहेब मला नेहमी म्हणायचे, की संस्थेतील मुलांना संगणक यायला पाहिजे. मुलांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असले पाहिजे. आपल्या मुलांना हे जर नाही आले तर कोणी विचारणार नाही. येथे प्रश्न होता तो संगणक कसे मिळवायचे याचा. जवळजवळ साडेबारा कोटींचे काम आहे, एवढा पैसा उभा करायचा कसा? मात्र शरद पवारसाहेबांनी 'रयत'च्या जाहीर कार्यक्रमात माझे अभिनंदन केले आणि म्हणाले, काम सुरू करा. रामशेठ तुम्ही एक कोटी द्यायचे असे सांगितले. रामशेठ ठाकूरांनी लगेच होकार दिला आणि या कार्याचा शुभारंभ केला. रायगड विभागातील आदिवासी भागात ही योजना राबविताना अडचणी येणार होत्या.



● रयत शिक्षण संस्थेच्या एका कार्यक्रमप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते मा. शरदचंद्रजी पवार, संस्थेचे चेअरमन मा. अनिल पाटील व मॅनेजिंग कौन्सिल व एक्झिक्युटिव्ह समितीचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर

कारण शिक्षक, टेक्निशियन, लाईट नसेल तर जनरेटर, बाकीचे खर्च करणार कसे? लगेच रामशेठ म्हणाले, "आमच्याकडे हा प्रश्न येणार नाही, आणि जर आला तर मी आहेच." आणि ही योजना यशस्वी झाली. त्यांचे हे असे देणे 'रयत'पुरतेच मर्यादित नाही, तर कितीतरी कोटींची मदत त्यांनी लोकांना केलेली आहे, याचा हिशेब नाही. 'देतो तो देव राखतो तो राक्षस' असे विनोबा नेहमी म्हणायचे. मला रामशेठ यांच्या रूपाने नेहमी देवाचे दर्शन झाले आहे. येथे राखून ठेवण्यासारखे काहीच नाही. नेहमी देण्यासाठी हात पुढे असलेला हा देव माणूस! बरं, पैसा आहे म्हणून द्यायचा असेही नाही, यामध्ये सामाजिक जाणिवेचा, सामाजिक कळकळीचा फार मोठा अर्थ आहे."

''एक वचन मी वाचलेले आहे, 'कोणत्याही सामाजिक प्रगतीच्या चळवळीचा पाया त्यात काम करणाऱ्या माणसांच्या समाजाविषयीच्या कळकळीतून आलेला नसेल, तर मग तो जो आहे, ती व्यक्ती, त्याचा दंभ, त्याचा गर्व व त्याचा अहंपणा वाढण्यापलीकडे त्यातून काहीच निघत नाही. दंभ, गर्व, अहंपणा रामशेठ यांच्या जवळही कधी पोहोचले नाहीत. त्यांना मी एकदा विचारले, 'रामशेठ तुम्ही इतक्या भरभरून देणग्या देता, याचे मूळ काय आहे? सर म्हणाले, 'साहेब आपण कुठून आलो? कुठे होतो? काय होतो? माझ्या कष्टाने मी हे मिळविले, समाजानेच दिले हे आपल्याला. 'रयत'नेच मला शिकविले, मी शिक्षक झालो, व्यावसायिक झालो. मग आपण का बरे हात आखडता घ्यावा. दिले म्हणून काय बिघडले. यात काय मोठे आपण विशेष करतो.' हा मनाचा मोठेपणा, एवढे करून मी त्या गावचाही नाही. असा मोठेपणा त्यांच्यात आहे. त्यातूनच

रामशेठ यांचे कार्य दिसून येते.”

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये चालणारे विविध कोर्स आणि वाढणारी विद्यार्थिसंख्या पाहता एका इमारतीची आवश्यकता होती. सुरुवातीला एका माळ्याची इमारत बांधून निधी उपलब्धतेनुसार पुढील बांधकाम करता येईल, असा विचार संस्थेने केला होता. मात्र चार मजल्याची परवानगी घेतलेली होती. एक मजल्याच्या इमारतीसाठी १ कोटी ३० लाखांचा खर्च होता. याबाबत रामशेठ यांच्याशी बोलल्यानंतर त्यांनी लगेच ‘पैसे मी देतो’ म्हणून सांगितले. नंतर त्यांना चार मजल्याचा प्लॅन तयार असल्याचे समजले. त्यांनी विचारले, ‘चार मजल्यांच्या इमारतीला किती खर्च येणार आहे.’ तेव्हा त्यांना ३ कोटी ३० लाख येणार असल्याचे सांगण्यात आले. ते म्हणाले, ‘मी देतो तुम्ही बांधकामाला सुरुवात करा.’ बांधकामाला सुरुवात झाल्यानंतर अजून एक मजला बांधण्याचे ठरले, त्याला पुन्हा १ कोटी दिले.

इमारत सुसज्ज हवी बांधकामात आणि बांधकाम साहित्यात कोणतीही तडजोड नको, म्हणून ते सतत बांधकामावर लक्ष ठेवून होते. फर्निचर, लिफ्ट उच्च दर्जाचे असायला हवे म्हणून त्यांनी त्याचेही पैसे दिले. अग्निसुरक्षा यंत्र लावण्यासाठी खास पनवेलमधील तज्ज्ञ माणसांना साताऱ्याला घेऊन आले. आज ८ कोटींचे ‘लोकनेते रामशेठ ठाकूर भवन’ छत्रपती शिवाजी महाविद्यालयात डौलाने उभे आहे. तेथील शिक्षक म्हणतात, ‘ठाकूर साहेब येथे आले, की आम्हाला ऊर्जा मिळते, अण्णांच्या विचारांवर चालणारे साहेब या कॉलेजचे



• रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, कामोठे, पनवेलची अत्याधुनिक इमारत

विद्यार्थी आहेत, संस्थेचे आणि शिवाजी कॉलेजचे हे भाग्यच आहे.'

'रामशेठ ठाकूर भवन' या अद्ययावत असलेल्या इमारतीचे सोमवार, दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषिमंत्री खासदार शरद पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी शरद पवारसाहेब रामशेठ यांच्या दातृत्वाबद्दल भरभरून बोलताना म्हणाले, "थोर देणगीदार रामशेठ ठाकूर यांनी धनाचा उपयोग सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी करत 'रयत'ला भरभरून दिले आहे. त्यामुळे त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. ज्या भूमीत शिक्षण घेऊन रामशेठ ठाकूर कर्तृत्ववान झाले त्या भूमीला ते विसरले नाहीत. त्यांच्या नावाने साताऱ्यात हे भवन उभारले गेले आहे. त्यामुळे आजचा दिवस रयत शिक्षण संस्थेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आणि आनंददायी दिवस आहे. रामशेठ यांच्याकडून संस्थेच्या विकासासाठी कधीही नकार शब्द आला नाही. रयत शिक्षण संस्थेच्या विकासात रामशेठ यांचा मोठा वाटा आहे. संस्थेत जेव्हा कोणताही प्रकल्प हाती घेतला जातो, त्या वेळी रामशेठ यांचे नाव येत नाही तोपर्यंत काम पूर्ण होत नाही. रामशेठ हे 'रयत'चे खरे हितचिंतक आहेत. रायगड जिल्हा पुरोगामी विचारांचा जिल्हा म्हणून ओळखला जायचा. या जिल्ह्यामध्ये अनेक कर्तृत्ववान लोक पुढे आले. दि. बा. पाटील यांच्यासह अनेक सहकाऱ्यांचे नाव घेता येईल, पण या सगळ्या सहकाऱ्यांमध्ये जोपर्यंत रामशेठ ठाकूर यांचे नाव येत नाही तोपर्यंत ते पूर्ण होत नाही. संस्थेच्या विकासात रामशेठ यांनी कधीही कसूर केली नाही. वेळोवेळी मदत केली. रायगड, नवी मुंबई त्याचबरोबर राज्यातील विद्यालयांना कोटीच्या कोटी रुपयांची मदत करून 'रयत'ला सर्वस्व अर्पण केले. रामशेठ ठाकूर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. कर्मवीर अण्णांनी शाहू, फुले, आंबेडकर, गाडगे महाराज यांचे विचार आत्मसात करून वाटचाल केली, त्याचप्रमाणे त्यांच्या आदर्शाचा वारसा पुढे चालविण्याचे काम रामशेठ ठाकूर करीत आहेत. त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत मोठ्या उदार मनाने कार्य केले आहे. त्यामुळे संस्थेच्या जडणघडणीत रामशेठ यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. ''

'रामशेठ ठाकूर भवन'च्या उद्घाटन समारंभासाठी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सिक्कीम राज्याचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, कार्याध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, चिरंजीव आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव विठ्ठल शिवणकर, कायदेशीर सल्लागार ॲड. दिलावर मुल्ला, मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या मीनाताई जगधने, ॲड. रवींद्र पवार, राजेंद्र फाळके, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, पनवेलमधील अनेक नगरसेवक-नगरसेविकांसह अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात संस्थेतर्फे रामशेठ यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. आपल्या सत्काराला उत्तर देताना रामशेठ म्हणाले, "स्वावलंबी शिक्षण हे आमचे ब्रीद आहे. रयत शिक्षण संस्था माझे घर आहे. कर्मवीर अण्णांची कृपादृष्टी झाली नसती, तर आम्ही सुशिक्षित झालो नसतो. आम्हाला पैलू पाडण्याचे काम अण्णांनी केले आहे. रामचा रामशेठ 'रयत'मुळे झालाय. पवारसाहेबांच्या नेतृत्वाखाली



● रयत शिक्षण संकुल, श्रीरामपूर येथील कृतज्ञता पुरस्कार वितरण समारंभातील क्षणचित्रे



● रयत शिक्षण संकुल, श्रीरामपूर येथील कृतज्ञता पुरस्कार वितरण समारंभातील क्षणचित्रे

आम्ही रयत शिक्षण संस्थेत काम करीत आहोत, याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांचे सातत्याने संस्थेला मार्गदर्शन लाभते. मी त्यांच्यासोबत राजकारणात गेलो नाही, पण त्यांचा शिक्षण क्षेत्राचा आदर्श घेऊन वाटचाल केली. अण्णांचा आशीर्वाद आणि पवारसाहेबांची साथ यामुळे शिक्षण क्षेत्रात वाटचाल सुरू आहे. अण्णांच्या आपुलकीने विशेष संस्कार घडले. त्यामुळे आपल्याकडे असलेला काहीतरी भाग समाजासाठी द्यावा, ही कायम इच्छा असते. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेचे ऋण फेडू तेवढे कमी आहेत. आजचा समारंभ माझ्या आयुष्यातील मोजक्या पाच-दहा समारंभांपैकी एक आहे. 'रयत'चे आपल्यावर अनंत उपकार आहेत, त्यामुळे संस्थेच्या विकासासाठी यापुढेही कार्य करत राहीन.''

'रयत'ला जेव्हा देण्याची वेळ आली आणि जेव्हा जेव्हा त्यांना मदतीची हाक मारली, तेव्हा तेव्हा रामशेठ यांनी हात आखडता न घेता भरभरून दिले. पनवेलमधील 'रयत'च्या शाळांना त्यांनी आपल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या शाळांच्या बरोबरीने उभे केले. तसेच महाराष्ट्रातील 'रयत'च्या शाळांनाही दिले.

सातारा जिल्ह्याच्या खटाव तालुक्यातील 'निढळ' या गावात असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या हनुमान विद्यालयाच्या नूतनीकृत इमारतीच्या उद्घाटनाच्या वेळी रामशेठ ठाकूर उपस्थित होते. या वेळी रामशेठ ठाकूर यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या शाळेचे नूतनीकरण रामशेठ ठाकूर यांनी दिलेल्या ७५ लाख रुपयांच्या देणगीतून करण्यात आले होते. नूतनीकरण झालेल्या इमारतीचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष शरद पवारसाहेब यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवारसाहेब म्हणाले, "लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या कामाला प्रोत्साहन देण्यासाठी नेहमीप्रमाणे मुक्तहस्ते मदत केली. ते सातारला रयत शिक्षण संस्थेचे चार वर्षे विद्यार्थी होते. कर्मवीर अण्णांच्या 'कमवा आणि शिका' योजनेमध्ये यांनी एक वर्ष काम केले. चार वर्षे या ठिकाणी राहून शिक्षण पूर्ण केले आणि पुढे बी.एड. करून त्यांनी शिक्षक म्हणून काम केले. नंतरच्या काळामध्ये व्यवसायामध्ये पडले आणि या क्षेत्रात कष्ट करून सगळ्यांना बरोबर घेऊन प्रचंड यशस्वी झाले. संस्थेचे कोणतेही नवीन काम असले आणि ते हजर असले, तर मला खात्री असते, की आता या कामाला जो काही अडथळा किंवा कमतरता आहे त्यातून मार्ग निघेल. आजपर्यंत मला आकडा लक्षात नाही, पण मागे एकदा मी माहिती घेतली होती, तेव्हा जो आकडा वर्षांपूर्वीचा माझ्याकडे होता तो १०० कोटींचा होता. रामशेठ यांचे वैशिष्ट्य हे आहे, की आम्ही लोक आदिवासी भागात गेलो, संस्थेची शाखा त्या ठिकाणी आहे. सगळे काम बघितले काही कमतरता जाणवल्यावर रामशेठ यांना सांगितले, की इतके पैसे जाहीर करा, त्यानुसार त्यांनी अशा अनेक शाखांमध्ये अर्थसाहाय्य केले आहे. पैसे मिळविता येतात, पण त्या पैशांचा सदुपयोग कसा करायचा, याचा आदर्श रामशेठ यांनी सगळ्यांसमोर ठेवला आहे. म्हणून याही शाखेला त्यांनी अर्थसाहाय्य करण्याचा निर्णय घेतला, त्याबद्दल मी त्यांना अंत:करणापासून धन्यवाद देतो, त्यांचे आभार मानतो.''

पालघर जिल्ह्यातील मोखाडा हा आदिवासी बांधवांची मोठी वस्ती असलेला भाग. शासन आदिवासी



● **मोखाडा (जि. पालघर) येथील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उभारलेली 'लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालया'ची सुसज्ज इमारत**

बांधवांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असले, तरी प्राथमिक शिक्षण झाल्यांनतर पुढील शिक्षणासाठी आदिवासी विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागते. आर्थिक परिस्थिती आणि अगोदरच असलेली शिक्षणाची अनास्था, त्यामुळे हे विद्यार्थी शिक्षण सोडून देतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या जवळच माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण मिळावे म्हणून रयत शिक्षण संस्थेने या भागात १ ली ते १२ वी आश्रमशाळा, ५ वी ते १२ वी हायस्कूल व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरू केले. सुरुवातीला महाविद्यालयाचे विद्यार्थी हायस्कूलमध्ये बसत होते. मात्र महाविद्यालयासाठी वेगळी जागा नसल्याने संस्थेने महाविद्यालयासाठी वर्गखोल्या बांधल्या. मात्र वाढणाऱ्या विद्यार्थिसंख्येमुळे वर्गखोल्या अपुऱ्या पडू लागल्याने नवीन इमारत बांधण्याचे ठरविण्यात आले. शरद पवारसाहेबांनी रामशेठ ठाकूर यांच्याशी चर्चा केली आणि रामशेठ यांनी ८ कोटी ५० लाख रुपये खर्चून एक अद्ययावत इमारत उभी केली. या महाविद्यालयाला 'रयत'ने नाव दिले 'रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा.' मोखाडासारख्या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून रामशेठ यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत.

"ज्याप्रमाणे वारकऱ्यांना पंढरीत गेल्यावर आनंद होतो, तोच आनंद आम्हाला धनिणीच्या बागेत आल्यावर होतो. त्यामुळे धनिणीची बाग ही रयत शिक्षण संस्थेची पंढरी आहे," असे रामशेठ सातारा येथे

रयत माउली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ९५ व्या पुण्यतिथी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, त्या वेळी बोलत होते. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. कर्मवीर अण्णा, लक्ष्मीवहिनी यांच्या वसतिगृहातील प्रसंगांवर आधारित म्यूरल शिल्पाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी त्यांनी शाहू बोर्डिंगसाठी ५० लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, रयत शिक्षण संस्थेच्या शाळा म्हणजे रामशेठ यांचा श्वास झाला आहे. आजही या वयात सकाळी उठल्यापासून रात्रीपर्यंत राजकारणापासून दूर राहूनही राजकीय निर्णय घेतच आहेत. आपली मुले आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते नगरसेवक परेश ठाकूर यांच्या राजकीय कारकिर्दीवर कायम लक्ष ठेवून आहेत. 'तुम्ही तुमचे निर्णय घ्या, अगदीच निर्णय अवघड वाटले तर मी आहेच, पण स्वयंसिद्ध व्हा. मी माझ्या जगात जगायला मोकळा झालोय. याबाबत मी सगळ्यांना सांगितले आहे. मी आतापर्यंत जे केले तेच मला सांभाळायचे आहे. त्याच्यावर माझं कुटुंब सुखाने जगू शकेल. त्यातही मी लोकांना देणग्या देऊ शकतो. अजून बरीच ध्येय गाठायची आहेत. ती गाठत असताना कोणाला कोणते स्थान द्यावे याचाही मी विचार करतो,' असे ते म्हणतात. रामशेठ व्यावसायिक, राजकारणी यापेक्षा शिक्षणक्षेत्रात अधिक रमलेले दिसून येतात. त्यांना जी ध्येय गाठायची आहेत, त्यात त्यांच्या शाळा आणि शिक्षणाचा भाग निश्चितच मोठा आहे. ''आज मी करोडो रुपयांचा मालक असलो, तरी माझा शिक्षक म्हणून असलेला ३४२ रुपयांचा पगार मी कधीच विसरणार नाही. तो पगारच मला कायम माणूस म्हणून आजपर्यंत जगायला शिकवीत आहे. आपल्या आयुष्यातील ते दिवस मी विसरणार नाही.'' दिवसभरात त्यांना शाळा पाहिल्याशिवाय त्यांची सुरू असलेली कामे बघितल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. ते या वयातही दिवसाचे दहा ते बारा तास काम करतात. ते दिवसभरात एका ठिकाणी सापडणार नाहीत, सतत कामानिमित भ्रमंती करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणजे केवळ व्यक्ती नसून, अखंड वाहणारी ऊर्जा आहे.

अहमदनगर जिल्ह्यात राहुरी तालुक्यात सात्रळ येथे रयत संकुलामध्ये मुलींसाठी स्वतंत्र विद्यालय आहे. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वतः सात्रळ गावी येऊन स्वर्गीय कॉम्रेड पी. बी. कडू पाटील आणि ग्रामस्थांच्या मदतीने रयतची शाखा येथे सुरू केली होती. शाखेची नंतर मुले आणि मुली अशी विभागणी झाली. मुलींच्यासाठी असलेली इमारत पूर्णपणे धोकादायक स्थितीत होती, त्यामुळे कन्या विद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पाडून नवीन इमारत बांधणे आवश्यक होते. रामशेठ ठाकूर यांनी ५० लाख रुपयांची देणगी त्या वेळी 'श्रीमती कोंडाबाई नानासाहेब कडू पाटील कन्या विद्यालया'स दिली.

अहमदनगर जिल्ह्यातील चिंचोली पाटील गावामध्ये १९६० मध्ये रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय सुरू झाले. या विद्यालयाची इमारत अत्यंत जीर्ण झाल्याने पावसाळ्यात छप्पर गळती

व इतर कारणाने विद्यार्थ्यांसह शिक्षकांना शिक्षणात खूप गैरसोय होत होती. त्यामुळे नवीन इमारत बांधण्याच्या दृष्टिकोनातून विद्यालय व स्कूल कमिटीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांना मदतीसाठी आवाहन केले होते. त्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आर्थिक मदत करून विद्यालयाला नवसंजीवनी दिली. दुर्गम भागात असलेल्या या विद्यालयाला नवसंजीवनी दिल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे चिंचोली पाटील येथील ग्रामस्थ व विद्यालयाच्या वतीने आभार मानण्यात आले.

''ज्या ज्या गावांना कर्मवीर भाऊराव पाटील यांचे पाय लागले, त्या गावांचा उद्धार झाला.'' रामशेठ ठाकूर यांचे अण्णांबद्दलचे हे उद्‌गार अण्णांच्या कार्याचा आणि त्यांच्या कार्याबद्दल रामशेठ ठाकूर यांच्या मनात असलेल्या प्रचंड प्रेमाचा ओलावा अधोरेखित करतात. सातारा जिल्ह्याच्या जावळी तालुक्यातील पवारवाडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये २०२३ मध्ये शाळेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला, त्यानिमित्ताने ते बोलत होते. हा कार्यक्रम शिवछत्रपती पुरस्कार विजेते व सातारा जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष साहेबराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या कार्यक्रमात खासदार श्रीनिवास पाटील, रयतचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, माजी आमदार सदाशिव सपकाळ, विभागीय अधिकारी राजेंद्र साळुंखे, अतुल पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी



• कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमादम्यान रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार, मा. एन. डी. पाटील, डॉ. अनिल पाटील व लोकनेते रामशेठ ठाकूर.

उपस्थित होते. या शाळेसाठी रामशेठ ठाकूर यांनी ५० लाख रुपयांची देणगी दिली, त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे तीन वर्षांचा 'बी.ए. हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग' हा पदवी अभ्यासक्रम सन २०२४-२५ मध्ये सुरू करण्यात आला. या तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या हॉल उभारणीसाठी त्यांनी १५ लाख रुपयांची देणगी दिली. या शैक्षणिक उपक्रमाचा शुभारंभ रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक मराठी संमेलनाच्या निमित्ताने करण्यात आला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३७ वा जयंती सोहळा २२ सप्टेंबर २०२४ रोजी सातारा येथे कर्मवीर भूमीत अनेक मान्यवर व हजारो रयत सेवकांच्या उपस्थितीत पार पडला. या वेळी शरद पवारसाहेब व्यासपीठावरून बोलत होते. "रामशेठ ठाकूर कुटुंबीयांनी रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी सातत्याने भरीव मदत करून या संस्थेच्या प्रगतीसाठी नेहमीच मोलाचा हातभार लावला. रयतच्या शाळा-कॉलेजसाठी आजपर्यंत १०० कोटींहून अधिक रुपयांची देणगी त्यांनी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे. कर्मवीर अण्णांच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांचा शैक्षणिक वारसा जपण्याचे अखंड कार्य ते करीत आहेत. विधायक कामाला प्रोत्साहन देण्यासाठी ते नेहमी मुक्तहस्ते मदत करीत आले आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत असलेल्या 'रयत'च्या विद्यालयांना उभारी देण्याचे काम त्यांनी केले आहे. विद्यमान शैक्षणिक वर्षात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २ कोटी ६५ लाख रुपये, त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी ३ कोटी ९१ लाख रुपये, तर सुपुत्र परेश ठाकूर यांनी ५५ लाखांची देणगी रयत शिक्षण संस्थेला दिली. त्याबद्दल त्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले होते. याच वेळी सात्रल विद्यालयाच्या विकासासाठी ५० लाख रुपयांची देणगी दिल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. चांगले विचार स्वतःला आणि इतरांना घडविण्याचे काम करतात. माणुसकी आणि विचार अमर असतात. शैक्षणिकदृष्ट्या समाजाच्या विकासासाठी सर्वांनी सामाजिक कार्यात स्वतःला वाहून देणे गरजेचे आहे. याच सामाजिक भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंब कार्य करीत असतात. 'रयत' आणि ठाकूर कुटुंबीयांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी कर्मवीर अण्णांनी केलेले कार्य पुढे नेण्याचे काम 'रयत सेवक' म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर करीत आहेत. स्वतःची 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था' ही शैक्षणिक संस्था असतानाही त्यांचे रयत शिक्षण संस्थेवर असलेले जिवापाड प्रेम कायम अधोरेखित झाले आहे. रयत शिक्षण संस्था मातृसंस्था माणून सदैव रयतेच्या विकासासाठी कार्य करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संपूर्ण देशात आदर्श घालून दिला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या प्रत्येक उपक्रमात रामशेठ यांनी स्वतःला झोकून दिले, त्यामुळे संस्थेच्या विकासात त्यांचा मोलाचा वाटा कायम राहिला आहे."

आजपर्यंत रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळांमधून करोडो विद्यार्थी शिकून बाहेर पडले आहेत. पण

रामशेठसारख्या विद्यार्थ्यांनी 'रयत'चे नावलौकिकाला सोनेरी लकाकी दिली. ते रयत आणि विद्यार्थ्यांसाठी आदर्शवत राहिले. सन २०२५ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या 'छत्रपती शिवाजी कॉलेज माजी विद्यार्थी संघा'च्या कार्यकारिणी मंडळाची सभा झाली. या सभेत संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार रामशेठ ठाकूर यांची माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

सांगलीतील ईश्वरपूर येथे महात्मा फुले शिक्षण संस्था संचालित 'प्रा. डॉ. एन. डी. पाटील विधी महाविद्यालय', 'सरोज पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्र' आणि 'डॉ. एन. डी. पाटील सभागृहा'चे उद्घाटन झाले, त्या वेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार रामशेठ यांच्या दानशूरपणाबद्दल कौतुकाने बोलत होते. "माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे दानशूर कर्णाचा अवतार आहेत. त्यांच्यासारखा दिलदारपणा मी कोणामध्येच पाहिलेला नाही. पैसे तर सगळेच कमावतात, मात्र ते देण्याची दानत ही फक्त रामशेठ ठाकूर यांच्यामध्येच आहे. त्यामुळे मी महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो," अजित पवार म्हणाले. या कार्यक्रमादरम्यान रामशेठ यांनी बहुउद्देशीय सभागृहासाठी एक कोटी देण्याचे जाहीर केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, ''डॉ. एन. डी. पाटील आणि सरोज पाटील यांनी माझ्यावर भरपूर प्रेम केले असून, रयत शिक्षण संस्था ही माझी मातृसंस्था आहे. त्यामुळे संस्थेला जी काही मदत लागेल ती मी सर्वतोपरी करेन.'' या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत मंत्री चंद्रकांत पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील माने, आमदार जयंतराव पाटील, रोहित पवार, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य आशिष देशमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

रामशेठ यांनी देण्याचे हिशेब कधीच ठेवले नाहीत. 'कशाला हवेत हिशेब! माझ्याकडे आहे ते देतोय,' असेच ते म्हणत आले. 'रयत'साठी रामशेठ यांनी किती दिले, हा हिशेब येथे मांडलेला नाही, तर यासाठी लिहिले आहे, की रामशेठ यांच्यासारख्या दानशूर व्यक्ती समाजात निर्माण होणे गरजेचे आहे. रामशेठ यांच्यासारखी दानशूर माणसे जन्माला यायला हवीत. राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांचे एक वाक्य पुन्हा येथे अधोरेखित करावेसे वाटते. विलासराव नेहमी म्हणायचे, 'मला प्रत्येक जिल्ह्यात एक रामशेठ हवा आहे.' या वाक्यातच रामशेठ यांच्या जीवनाची सार्थकता दिसून येते. विलासरावांना अपेक्षित असलेले रामशेठ प्रत्येक गावात जन्माला यावेत, म्हणून येथे रामशेठ यांचे दानशूरत्व मांडावेसे वाटले. स्वत:ची शिक्षण संस्था असताना रामशेठ यांच्यासारखी माणसे दुसऱ्या संस्थेला इतके भरभरून देतात, यासारखी पवित्र भावना ती कोणती असावी? 'रयत ही माझी मातृसंस्था' म्हणणाऱ्या रामशेठ यांनी आपल्या आईवर जेवढे प्रेम केले, तेवढेच प्रेम ते 'रयत'वर करीत आले आहेत. 'रयत'विषयी त्यांचे बोलणे हे सभेमध्ये टाळ्या वाजवून वाहवा मिळविण्यासाठी कधीच नव्हते किंवा आपण काही तरी करतोय, हे सांगण्यासाठीही नव्हते. तो श्वास आहे. ध्यास आहे. ती प्रेमाची आस आहे. 'रयत'वर रामशेठ करीत असलेले प्रेम हे कर्मवीर अण्णा आणि त्यांच्या विचारांवर करीत असलेले उत्तुंग प्रेम आहे. पैशाने सगळे विकत घेता येते, पण पैशाने प्रेम विकत घेता येत नाही. ते अंतर्मनातून अंकुरावे लागते. रयत आणि रामशेठ यांचे नाते याच अंकुरलेल्या प्रेमाचा वटवृक्ष आहे.

१५

रामशेठ आणि सामाजिक विकास मंडळ

रामशेठ ठाकूर यांच्या आयुष्याच्या प्रवासात जे काही त्यांनी मिळविले त्यावर माझा अधिकार नाहीच, असा परमार्थिक विचार त्यांनी कृतीत उतरविला. आपल्या दोन्ही हातांनी येणाऱ्या प्रत्येकाला देत राहिले. सामाजिक विकासाची आयुष्यभर कास धरलेल्या रामशेठ यांना व्यवसायातून जो आर्थिक लाभ मिळाला, त्यातून त्यांनी गोरगरीब आणि गरजूंना हिस्सा काढून दिला, तो याच सामाजिक विकासाच्या ध्यासातून. व्यवसायात स्थिरस्थावर झाल्यानंतर त्यांच्या माध्यमातून गव्हाण भागात अनेक सामाजिक उपक्रम राबविले जात होते. मात्र या उपक्रमांची नोंद तशी फार कोठेच ठेवली जात नव्हती. रामशेठ नि:स्वार्थीपणे हे काम करीत होते. 'कोठे कशाला नोंद हवी' म्हणून ते कोणत्याही नोंदीच्या भानगडीत पडले नव्हते. त्यांना तसे वाटतही नव्हते. एवढे चांगले उपक्रम राबविण्यासाठी एक सामाजिक संस्था असली, तर त्या संस्थेच्या माध्यमातून हे काम अधिक चांगल्या प्रकारे व नियोजनपूर्वक करता येईल, असा विचार रामशेठ ठाकूर यांनी केला. आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, त्याचबरोबर इतर मंडळींना याबाबत मार्गदर्शन करून १९९६ मध्ये प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संस्था म्हणून 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ' नावाने नोंदणी करून या संस्थेच्या कार्याला कायदेशीररीत्या सुरुवात झाली. १९ ऑक्टोबर १९९६ पासून गव्हाणमध्ये काम करणाऱ्या या संस्थेची नोंद सरकारदप्तरी झाल्यानंतर तिला दातृत्वाचे सामाजिक रूप यायला फारसा वेळ लागला नाही. संस्थेचे अध्यक्ष म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव महेंद्रशेठ घरत, खजिनदार हरिभाऊ पाटील, सहसचिव अनिल देशमुख, तर संचालक मंडळामध्ये श्री. परेश ठाकूर, श्री. वसंत पाटील, श्री. सीताराम ठाकूर, श्री. सागर काना ठाकूर या मंडळींनी आपल्या सोबत अनेक कार्यकर्त्यांना घेऊन या मंडळाच्या वाटचालीला सुरुवात केली आणि आज उत्तुंग कार्यामुळे या संस्थेचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले.

विद्यार्थी हा देशाचा सुसंस्कृत नागरिक व भावी आधारस्तंभ असल्यामुळे विद्यार्थी जीवनामध्ये त्याच्यावर चांगले संस्कार झाले, तरच देश सुसंस्कृत आणि विकासाच्या मार्गाने वाटचाल करायला सुरुवात करतो. देशाचा सुजाण नागरिक घडविण्याचा दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून मंडळाने आपल्या कार्याचा श्रीगणेशा विद्यार्थी कार्यापासून सुरू केला. पनवेल उरणमधील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक, माध्यमिक शाळांमधून विभागीय स्पर्धा परीक्षांचे आयोजन मंडळामार्फत करण्यात आले. त्यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व

विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्यात आले. ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांत मोठी दरी पडली होती. जिल्हा परिषदेतील शाळांमधून शिक्षणाला बऱ्याच मर्यादा पडत असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि शहरी भागातील विद्यार्थी एकाच बौद्धिक पातळीवर येऊन उभा राहिला पाहिजे, म्हणून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. त्याच प्रयत्नामुळे ग्रामीण भागातून आलेला विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी जेव्हा शहरांमध्ये प्रवेश घेऊ लागला, त्या वेळेला त्या मुलांचे न्यूनगंड दूर व्हायला अशा उपक्रमांतून मदत झाली असल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांमधील हा बदल निश्चितच मंडळाच्या कार्याला सकारात्मक दृष्टिकोन देणारा होता.

गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या व गणवेशवाटप, विविध प्रकारची रोग निदान शिबिरे, स्पर्धा, अटल करंडक एकांकिका स्पर्धा, स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार, रुग्णवाहिका सेवा, विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी, हिवाळी गुणवत्ता वाढ उपक्रम, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा, स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी, क्रीडा स्पर्धा, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय भजन, कबड्डी स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, मल्हार महोत्सव, मॅरेथॉन स्पर्धा, अपंग विद्यार्थ्यांना मोफत तीन चाकी सायकल वाटप, व्हीलचेअरचे वाटप असे अनेक उपक्रम रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक स्तरावर सुरू झाले.

गरीब व गरजू विद्यार्थ्यांचे शिक्षण त्यांच्या गरिबीमुळे थांबायला नको म्हणून त्यांच्या शिक्षणासाठी मंडळाने आर्थिक मदत द्यायला सुरुवात केली. आजपर्यंत लाखो विद्यार्थ्यांना त्यांचा लाभ मिळालेला आहे. दरवर्षी



● **रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी मोफत शालेय साहित्य वाटप करण्यात येते**

मंडळातर्फे लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना वह्या आणि गणवेशाचे वाटप केले जाते. त्यासाठी जवळजवळ २० ते ३० लाखांपेक्षा अधिक निधीची तरतूद केली जाते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मंडळाने आजपर्यंत करोडो रुपये खर्च केले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना देश, परदेशात जाऊन पैशाअभावी शिक्षण घेता येत नाही, त्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मंडळाकडून मदत उपलब्ध करून दिली जाते. या मदतीमुळे विद्यार्थ्यांना देश-परदेशात शिक्षणाच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. आज अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन चांगल्या पदावर कार्यरत आहेत, ही मंडळाच्या आणि रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची खरी ओळख आहे. त्यांच्या सामाजिक क्षेत्राच्या कार्याचा गौरव म्हणून अलिबागमधील 'नेहरू युवा केंद्रा'च्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरावरील 'उत्कृष्ट युवा मंडळ' पुरस्कार देऊन मंडळाचे अध्यक्ष प्रशांत ठाकूर यांना गौरविण्यात आले.

मन आणि शरीर या मानवी आरोग्याच्या दोन बाजू आहेत. 'मन धड तर शरीर धड', 'शरीर धड तर मन धड' या दोन्ही बाजू एकमेकांना पूरक असल्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले असणे फार महत्त्वाचे असते. प्रत्येक व्यक्ती आरोग्यक्षम राहणे म्हणजेच कुटुंब, घर, समाज आणि देशाचे आरोग्य हे निरोगी राहणे, उत्तम आरोग्य हे चांगले विचार आणि आचाराचा प्रत्यय देते. व्यक्तीला विकास आणि यशाकडे घेऊन जाते. सामाजिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी 'रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ने आजपर्यंत आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हजारो बांधवांच्या आरोग्याची तपासणी करण्याचे व्रत अविरत सुरू ठेवलेले आहे. याशिवाय वर्षभरात ठिकठिकाणी अशी मोफत आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार शिबिरे, मोफत नेत्ररोग तपासणी, दिव्यांगाकरिता कृत्रिम हात व पाय वाटप शिबिर, सर्वसाधारण आरोग्य तपासणी, मधुमेह तपासणी, अस्थिरोग तपासणी, रक्तदान शिबिरे घेतली जात आहेत. तपासणीबरोबर तज्ज्ञ डॉक्टरांकडून औषधोपचार केले जातात. कर्णबधिर रुग्णांसाठी श्रवणयंत्रांचे वाटप, अपंगांसाठी तीन चाकी सायकलचे वाटप, डोळ्यांच्या आरोग्यासाठी मोफत चष्मे वाटप केले जाते. आजपर्यंत महाआरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका, विविध हॉस्पिटलचा स्टाफ स्वखुषीने सहभागी होऊन रामशेठ ठाकूर यांच्यासोबत आपली सामाजिक बांधिलकी जपत आला आहे. एकावेळी जवळजवळ पंधरा हजारांवर लाभार्थी दरवर्षी या शिबिराचा लाभ घेतात. दरवर्षी शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते अहोरात्र काम करीत असतात.

'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ने क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी शालेय स्तरावरून सुरुवात केली. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मंडळ प्राथमिक व माध्यमिक स्तरावर वैयक्तिक व मैदानी खेळांचे आयोजन करते. विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता आणि त्यांच्यातील क्रीडागुण हेरून अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्रीडा प्रकारात अधिक कौशल्य प्राप्त करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करून त्यांच्या क्रीडा विकासात आपला वाटा उचलत आली आहे. मंडळाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा म्हणजे कबड्डीप्रेमींसाठी पर्वणी ठरत आहे. रामशेठ ठाकूर यांच्या



● **'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'तर्फे दरवर्षी मोफत आरोग्य शिबिर, तसेच औषधांचे वाटप करण्यात येते**

कल्पनेतून साकारलेल्या या स्पर्धा आदर्शवत ठरल्या. कबड्डी स्पर्धांची सुरुवात २००६ पासून राष्ट्रीय स्तरावर करण्यात आली. २७ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान 'अश्विनकुमार भोईर सुवर्ण चषक' व 'दादोबा गावंड चषक' २००६ पहिली राष्ट्रीय स्तरावरची कबड्डी स्पर्धा घेण्यात आली. यात ४२ पुरुष संघ, ३८ महिला संघांचा सहभाग होता. तत्कालीन जलसंपदा आणि सिंचनमंत्री व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. 'रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ने आयोजित केलेल्या या कबड्डी स्पर्धा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर तयार केलेल्या दिवंगत लोकनेते दि. बा .पाटील क्रीडा नगरीत भरविण्यात आल्या. या समारंभाचे अध्यक्ष रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री सुनीलजी तटकरे होते. सिडकोचे चेअरमन प्रमोद हिंदुराव, आमदार किरण पावसकर हे उपस्थित होते. या वेळी अजितदादा यांनी रामशेठ आणि 'रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ने अखिल भारतीय स्तरावरील कबड्डी खेळांचे आयोजन करून रायगड जिल्ह्याला संधी उपलब्ध करून फार मोठे योगदान दिल्याचे गौरवोद्गार काढले.



● **'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'तर्फे कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेला महाराष्ट्र कबड्डी असोशिएनचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री (स्व.) अजितदादा पवार, तसेच अनेक मंत्री, केंद्रीय मंत्री यांनी आपली उपस्थिती लावली आहे**

सन २००९ मध्ये या कबड्डी स्पर्धांचे नामकरण 'राजीव गांधी सुवर्ण चषक कबड्डी स्पर्धा' असे करण्यात आले. २ जून २००९ ते ५ जून २००९ दरम्यान घेण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटनदेखील मा. अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले होते. या वेळी व्यासपीठावर शिक्षणमंत्री वसंत पुरके, केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, तसेच पारितोषिक वितरणासाठी राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री सुनील तटकरे, माजी आमदार मधुकर ठाकूर, जयप्रकाश छाजेड उपस्थित होते. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी स्पर्धेचे आयोजन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे असल्याचे गौरवोद्गार काढले. अंतिम सामना पाहून आपण रोमांचित झाल्याचे ते म्हणाले. रामशेठ जे करतात ते भव्य दिव्य असते, याचा प्रत्यय प्रत्येक वेळी आपण घेत असल्याचे ते म्हणाले.

सन २०११ व २०१४ मध्ये दरवर्षी या स्पर्धा घेण्यात आल्या. अखिल भारतीय स्तराबरोबरच जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहित करण्यासाठी जिल्हा स्तरावरदेखील या स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊ लागले. त्या वेळी पारितोषिकाची रक्कमसुद्धा १ लाख ५१ हजार, महिला आणि पुरुष गटांसाठी समान करण्यात आली व जिल्हा स्तरावरील विजेत्यास ८१ हजार रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले. सन २०१४ च्या स्पर्धेदरम्यान

स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातून बचावलेले धाडसी पोलिस नाईक अरुण जाधव यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. लोकनेते दि. बा. पाटील क्रीडा नगरीत लावलेल्या भव्य एलईडी स्क्रीनवर अरुण जाधव यांच्या कार्यकर्तृत्वावर बनविलेली चित्रफीत पाहून उपस्थितांनी उभे राहून त्यांना टाळ्यांच्या कडकडाटात अभिवादन केले, तेव्हाचा तो क्षण अत्यंत भावुक अंत:करणाने उपस्थितांनी अनुभवला. देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांची आठवण आपण ठेवली. तसेच चित्रफितीच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण केल्याबद्दल पोलिस नाईक अरुण जाधव यांनी आयोजकांचे आभार व्यक्त केले. या स्पर्धेच्या आयोजनाला इतके महत्त्व प्राप्त झाले, की या स्पर्धेचे स्वरूप आणि आयोजनाची पाहणी करण्यासाठी प्रो कबड्डी लीगच्या आयोजकांनी भेट देऊन स्पर्धेच्या नियोजनाचे कौतुक केले. मार्शल स्पोर्ट्स व स्टार स्पोर्ट्सचे क्रीडा निवेदक चारू शर्मा, पटना कबड्डी टीमचे मालक राजेश शहा, बेंगलोर टीमचे मालक अखिल रानडे उपस्थित होते. भेटीदरम्यान बोलताना चारू शर्मा म्हणाले, "कबड्डी हा प्राचीन खेळाचा जनक आहे, या खेळाकडे आज संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिलेले आहे, ते केवळ रामशेठ यांच्यासारख्या दानशूर व्यक्तीमुळेच. कोणतीही गोष्ट साकारण्यासाठी केवळ पैसा नव्हे, तर मानसिकता हवी असते, ती रामशेठ यांच्याकडे आहे." स्पर्धेदरम्यान मुंबई असोसिएशनचे कामगार नेते भाई जगताप यांनी या कबड्डी स्पर्धांचा उल्लेख 'महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट स्पर्धा' असा केला. या स्पर्धेचे भव्य स्वरूप याचेच हे फलित आहे. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचा खेळ पाहावयास मिळतो.

रामशेठ यांना विद्यार्थिदशेपासूनच खेळाची आवड आहे. 'खेळ हा जीवनाचा स्थायीभाव आहे, तो जर फुलत गेला तर जीवनाला आकार यायला आणि जगणे सुंदर व्हायला मदत होते. खेळ शरीर आणि मन तंदुरुस्त करतात, जगण्याचे बळ देतात. खेळाडूवृत्ती, सहकार्य असे अनेक गुण व्यक्तिमत्त्वात साकारतात.' आपण जरी व्यावसायिक आणि राजकीय खेळाडू झालो, मात्र मैदानी खेळाडू होता आले नाही, तरी आपल्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत, त्यासाठी आपले स्वत:चे क्रीडासंकुल असावे, हे त्यांचे स्वप्न होते. पनवेल तालुक्यात नागरी विकास होत असला, तरी क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी कोणत्याही सुविधा उपलब्ध नव्हत्या. त्या पूर्ण करता याव्यात म्हणून २००६ मध्ये पनवेल, उरण या तालुक्यांना मध्यवर्ती असेल अशा ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याचे त्यांनी ठरविले, त्यासाठी जागा शोधायचे काम सुरू असतानाच सिडको महामंडळ हे उलवे नोडमध्ये १० एकर जागेत अशाच प्रकारचे क्रीडासंकुल विकसित करीत असल्याचे त्यांना समजले, त्यानुसार सिडकोकडे त्यांनी अर्ज केला. खरेतर क्रीडा संकुलासाठी अनेक संस्थांनी सिडकोकडे निविदा भरल्या होत्या. त्यातून 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'चे कार्य, त्यामागे झटणारे हात, मंडळाचे आधारस्तंभ, आर्थिक कणा अशा साऱ्या गोष्टी लक्षात घेऊन सिडकोने उलवे नोड सेक्टर १६ मधील १० एकरांचा भूखंड सिडकोच्या आरक्षित किमतीत विकसित करण्यासाठी 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'स दिला. मात्र सिडको देत असलेल्या १० एकरांच्या भूखंडावर मैदानी खेळ व खेळाडूंसाठी

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्व सोयीसुविधा देण्यासाठी जागा अपुरी पडणार होती. रामशेठ यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासंकुल बांधण्याकरिता १७ एकर भूखंडाची गरज होती. त्यांना कुठल्याही प्रकारची तडजोड मान्य नसल्याने त्यांनी नियोजित स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससाठी वाढीव ७ एकर जागेची सिडकोकडे मागणी केली. सिडकोकडे भूखंड देण्यासाठी फक्त १० एकरचीच मर्यादा असल्याने सिडकोने वरील ७ एकर भूखंड देण्यास असमर्थता दर्शविली. रामशेठ यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय अशोकराव चव्हाण यांच्याकडे भूखंड मिळावा म्हणून पत्राद्वारे विनंती केली. आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलाकरिता जागेबाबत काय निकष लावले जातात, याबाबतीत योग्य ती माहिती स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांनी द्यावी, असे सांगितल्यावर रामशेठ यांनी संपर्क करून याबाबतची माहिती मागवून घेतली. त्यांनी निकष लक्षात घेऊन सतरा एकर जागेची आवश्यकता असते, असे सरकारला कळवले. तसेच त्यांनी तत्कालीन केंद्रीय क्रीडामंत्री प्रतीक पाटील यांच्या कार्यालयाकडे संपर्क साधून त्यांच्याकडून सुद्धा माहिती घेतली असता, त्यांनी ही माहिती दिल्याने रामशेठ ठाकूर यांना सिडकोने सात एकर वाढीव जागा देऊन १७ एकरचा प्लॉट 'रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स'ला देण्याचे मंजूर केले. आणि रामशेठ ठाकूर यांनी वरच्या ७ एकर जागेची वाढीव किंमत भरून भूखंड क्रीडा संकुलासाठी मिळविला. एकूण १७ एकरचा भूखंड मिळाल्याने जागेचा प्रश्न मार्गी लागला. पण आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल बांधायचे म्हणजे पैसाही खूप लागणार होता. बांधकामापूर्वी मेंबरशिप खुली करण्याची पारंपरिक पद्धत अवलंबायची म्हटले, तरी त्यात अनेक बंधने येणार होती. कारण अनेक वेळा बांधकाम थांबण्याची आणि प्रकल्प लांबण्याची परिस्थिती उद्‌भवते आणि बांधकामाचा दर्जा ढासळतो, ही बाब त्यांना मान्य नव्हती. जागेसाठी स्वतःचे ७ कोटी २८ लाख रुपये खर्च करून सिडकोकडून जागा घेतली मात्र अजून बांधकामासाठी पैसे लागणार होते. म्हणून १९९८ मध्ये त्यांनी व्यवसायवृद्धीसाठी 'कुंडेवाहाळ' परिसरातील 'पाडेघर' येथील प्रशांत ठाकूर यांच्या नावावर असलेली 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ची ४० एकर जमीन ३६ कोटी रुपयांना विकली आणि क्रीडा संकुल साकार केले. आपले सामाजिक उद्धाराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ज्या जमिनीला भविष्यात कोट्यवधी रुपये भाव मिळाला असता, ती जमीन विकून आलेला पैसा क्रीडासंकुलासाठी वापरणाऱ्या रामशेठ यांच्या मनात खेळ, खेळ भावना आणि घडणाऱ्या खेळाडूंविषयी प्रचंड आदरभाव आणि सद्‌भावना, खेळाडूंना उभे करण्यासाठी त्यांची तळमळ दिसून येते. सर्व अडचणींवर मात करून सिडकोने दिलेल्या मुदतीपेक्षा दहा महिने अगोदरच भव्य व आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स' उभे राहिले. यात चार बॅडमिंटन कोर्ट, चार टेबल टेनिस कोर्ट, चार लॉन टेनिस कोर्ट, जिमनॅस्टिक, स्क्वॅश कोर्ट, कॅरम, बुद्धिबळ, जलतरण तलाव, स्नूकर, बिलियर्ड्स, वॉल क्लायंबिंग, स्पीनिंग, किड्स प्ले झोन हे इनडोअर, तसेच फुटबॉल मैदान, रनिंग ट्रॅक, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, कबड्डी, खो-खो अशा खेळांचा समावेश या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये केला गेला. बँक्वेट हॉल, कॉन्फरन्स हॉल, बैठकीसाठी कक्ष, रेस्टॉरंट, योगा, लक्झरी बार, मल्टीपर्पज हॉल, बिझनेस सेंटर, स्पा,

फुटबॉल कोर्ट, ईस्ट स्टँड, वेस्ट स्टँड बनविले. रनिंग ट्रक तयार केले. आज अनेक खेळ आणि सुविधांनी युक्त असे क्रीडा संकुल अनेक खेळाडूंसाठी पंढरी झाली आहे. ३०० चार चाकी एका वेळी पार्क होतील अशी पार्किंग व्यवस्था येथे करण्यात आली आहे. यासाठी जवळजवळ ६० कोटी रुपये खर्च करून आपल्या स्वप्नातील क्रीडासंकुल तयार झाल्यानंतर रामशेठ ठाकूर यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या अद्ययावत स्पोर्ट कॉम्प्लेक्समध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू येऊन सराव करतात. या स्पोर्ट कॉम्प्लेक्सचे महत्त्व एवढे वाढले आहे, की आजूबाजूच्या परिसरातील घरांच्या किमती वाढल्या आहेत.

पनवेल परिसर मुंबईपासून एका तासाच्या अंतरावर असल्याने मुंबईच्या गर्दीतून बाहेर पडून अनेक कुटुंबे पनवेलमध्ये स्थायिक व्हायला सुरुवात झाली. पनवेल-उरण हा भाग मूळ आगरी, कोळी समाजाच्या वास्तव्याचा असल्याने समुद्रकिनारी व खाडीकिनारी वसलेल्या गावातून आगरी, कोळी समाज मोठ्या प्रमाणात वस्ती करून राहत आहे. येथील आगरी-कोळी संस्कृती, येथील चालीरीती, रूढी, परंपरा आगरी, कोळी समाजाने आधुनिक काळातही तशाच टिकवून ठेवल्या आहेत. पनवेलमध्ये येणारी कुटुंबे ही विविध जातिधर्माची जरी असली, तरी पनवेल-उरणकरांनी त्यांना आपल्यात सामावून घेऊन 'आम्ही पनवेलकर', आम्ही उरणकर' अशी ओळख दिली आहे. येथील् आगरी-कोळी समाजातील परंपरांची, रीतीरिवाजांची आणि संस्कृतीची माहिती त्यांना व्हावी म्हणून 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ने 'आगरी-कोळी महोत्सवा'चे सन २००६ पासून आयोजन करायला सुरुवात केली. या महोत्सवातून आगरी-कोळी समाजाचे नृत्यप्रकार, खाण्याचे पदार्थ, बोलीभाषांचे विविधांगी दर्शन व्हायला लागले. रामशेठ ठाकूर यांनी आगरी-कोळी समाजाचा सामाजिक स्तर उंचाविण्यासाठी अशा उपक्रमांना कायम प्रोत्साहित केले आहे. त्यामुळे या महोत्सवाने एक वेगळीच उंची गाठली. पनवेल परिसराचे झपाट्याने नागरीकरण होऊन नागरी वस्ती वाढत असल्याने त्यांना सामावून घेण्यासाठी हाच महोत्सव पुढे व्यापक स्वरूपात 'मल्हार महोत्सव' या नावाने साजरा करण्यात येऊ लागला.

सन २००९ मध्ये संपन्न झालेल्या मल्हार महोत्सवाचे उद्घाटन तत्कालीन कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले होते, तेव्हा ''मल्हार महोत्सव हा आनंदोत्सव असल्याचे म्हणत पनवेल आणि रायगड जिल्ह्यात निकोप वातावरण निर्माण करण्याचे काम मल्हार महोत्सवाने केले आहे. गेल्या वर्षी मी या महोत्सवाला हजर राहिलो, या वर्षीही आलो आहे, पुढच्या वर्षीही येईन,'' अशी दिलखुलास दाद देऊन बाळासाहेब थोरात म्हणाले, ''मल्हार महोत्सव आयोजित करणारे रामशेठ ठाकूर व त्यांचे सामाजिक विकास मंडळ, तरुण नगराध्यक्ष प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन... तुम्ही मल्हार महोत्सवाने राष्ट्रीय एकात्मतेची ज्योत प्रज्वलित केली आहे. ज्याप्रमाणे तिजोरीत रत्नांची खाण असते, त्याप्रमाणे इतक्या गुणीजनांचे सत्कार पाहता पनवेल शहरात गुणीजनांची खाणच आहे, हे लक्षात येते. विविध क्षेत्रांतील गुणी

कलावंतांना व्यासपीठ देण्याचे काम रामशेठ ठाकूर यांनी केले आहे. या महोत्सवाची पनवेलकर दरवर्षी चातकासारखी वाट पाहत असतील, इतका हा आनंददायी सोहळा आहे. सर्व समाजाला एकत्र करणारा हा महोत्सव असून, आजच्या द्वेषपूर्ण वातावरणात सर्व पक्षांना बरोबर घेऊन रामशेठ ठाकूर आणि प्रशांत ठाकूर यांनी जो एकोपा निर्माण केला आहे, त्यामुळे पनवेलचे वातावरण सौहार्दाचे जाणवते." या प्रत्येक महोत्सवात रामशेठ यांनी पनवेलमधील शिक्षण, समाजसेवा, समाजसेवी संस्था, क्रीडा, कला, व्यवसाय, वैद्यकीय क्षेत्र, विधी क्षेत्र, साहित्य क्षेत्र, पत्रकारिता, कामगार, सहकार क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या पनवेलमधील व जिल्ह्यामधील गुणीजनांचा सन्मान केला. त्यांना त्यांच्या क्षेत्रात उत्तुंग कार्य करण्यासाठी ते प्रोत्साहित करीत आले आहेत. दरवर्षी होणारा हा मल्हार महोत्सव खवय्यांसाठी मेजवानी ठरत आला आहे.

पनवेलमध्ये अनेक नाट्यकलावंत जन्माला आले. त्यांनी नाट्य क्षेत्रात नावलौकिक मिळविला. नाट्यचळवळ ही अविरत सुरू राहिली पाहिजे आणि त्यातून कलावंत घडला पाहिजे, हा विचार करून रामशेठ ठाकूर यांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद - पनवेल शाखा, चांगू काना ठाकूर महाविद्यालय - खांदा कॉलनी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय 'अटल करंडक एकांकिका' स्पर्धा भरविण्यास सुरुवात केली. प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांनी स्पर्धांना राज्यस्तरावर मानाचे स्थान निर्माण करून देण्यास मोलाचे काम केले आहे. अटल करंडक एकांकिका स्पर्धा ही नाट्यक्षेत्रातील



● **भारतरत्न मा. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने गेली १२ वर्षे भरविण्यात येणारी अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा**



● **पनवेलमध्ये 'श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'तर्फे घेण्यात आलेल्या नाट्य महोत्सवातील कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले यांच्या सोबतचा एक क्षण**

एक लाख रुपये प्रथम क्रमांकाचे बक्षीस देणारी महाराष्ट्रातील एकमेव स्पर्धा, त्याचबरोबर उत्कृष्ट नियोजन व आयोजन असणारी महाराष्ट्र राज्यातील एक अविस्मरणीय स्पर्धा असल्याने नाट्यप्रेमी या स्पर्धेची आतुरतेने वाट पाहत असतात.

राज्यस्तरावर पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, नागपूर, रत्नागिरी, रायगड या केंद्रातून या स्पर्धेची प्राथमिक फेरी घेतली जाते. जवळजवळ शंभरच्यावर नाट्यसंघ यामध्ये दरवर्षी प्राथमिक स्तरावर आपल्या या एकांकिका सादर करतात. त्यातून सकस आविष्कार दाखविणाऱ्या नाट्यसंस्थांना अंतिम फेरीसाठी निवडले जाते. अंतिम फेरीत तीन दिवसांत पंचवीस नाट्यसंस्था आपली कला सादर करून प्रेक्षकांची मने जिंकून घेतात. 'अटल करंडक स्पर्धा' ही नाट्यप्रेमींसाठी आजपर्यंत एक पर्वणीच ठरली आहे. उत्तम नियोजन व कलाकारांची उत्तम व्यवस्था ही या स्पर्धेची वैशिष्ट्ये. 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'चे कार्यकर्ते त्यासाठी दरवर्षी अविरत मेहनत घेत असतात.


'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'च्या माध्यमातून घेण्यात येणारी 'मॅरेथॉन' स्पर्धा ही पनवेल आणि खारघरकरांसाठी एक आनंदसोहळा ठरलेली आहे. 'पनवेल मॅरेथॉन' हा पनवेलकरांसाठी एक नवा आणि नावीन्यपूर्ण असा उपक्रम या मंडळाने राबवायला सुरुवात केली. खुला पुरुष गट, महिला गट, १९ वर्षांखालील



● रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सतर्फे भरविण्यात येणाऱ्या पनवेल, तसेच खारघर मॅरेथॉनची क्षणचित्रे



● रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सतर्फे भरविण्यात येणाऱ्या पनवेल, तसेच खारघर मॅरेथॉनची क्षणचित्रे



मुले, १७ वर्षांखालील मुली, १४ वर्षांखालील मुले, मुली, ११ वर्षांखालील मुले, मुली, ज्येष्ठ नागरिक पुरुष गट, ज्येष्ठ नागरिक महिला गट आणि पनवेल दौड अशा गटातून सुरुवातीला दोन वर्षे 'पनवेल मॅरेथान' घेण्यात आली. पुढे ही स्पर्धा 'खारघर मॅरेथॉन' नावाने खारघरमध्ये होऊ लागली. या स्पर्धेसाठी देखील ५१ हजार, २५ हजार, ११ हजार रुपयांची मोठी बक्षिसे देऊन धावपटूंना प्रोत्साहन देण्याचे काम रामशेठ ठाकूर करीत आहेत. या स्पर्धांमधून 'एक धाव पनवेलच्या आरोग्यासाठी', 'एक धाव निर्भय भारतासाठी', 'एक धाव पाणी बचतीसाठी', 'एक धाव भ्रूणहत्येच्या विरोधासाठी', 'एक धाव महिलांच्या सन्मानासाठी', 'एक धाव कौशल्यपूर्ण भारत घडविण्यासाठी', 'एक धाव कॅशमुक्त व्यवहारासाठी', 'एक धाव आम्ही तंदुरुस्त तर भारत तंदुरुस्तीसाठी' अशा दरवर्षी वेगवेळ्या ब्रीदवाक्यांनी या स्पर्धांना सजविण्यात आले. भारतातील अनेक धावपटू या स्पर्धांमधून धावताना दिसतात, हेच या स्पर्धांचे मोठेपण म्हणायला हवे.

हातातील मोबाईलमुळे सगळे विश्व एका क्षणात समोर येऊ लागले. घराघरातील स्मार्ट टीव्ही जग दाखवू लागला. ज्ञान-मनोरंजन सगळेच क्षणार्धात समोर येऊ लागल्याने वाचनसंस्कृतीचा लोप व्हायला सुरुवात झाली. दिवाळीत विविध विषयांवर येणारे दिवाळी अंक हा महाराष्ट्राच्या साहित्य चळवळीचा एक मोठा भाग झाल्यामुळे दिवाळीबरोबर दिवाळी अंकांची वाचक वाट पाहायचे. मात्र आधुनिक तंत्रज्ञानाने दिवाळी अंकांच्या विक्री आणि वाचकांची घटणारी संख्या पाहून दिवाळी अंक निर्मितीतून संपादकांनी माघार घ्यायला सुरुवात केली, कारण दिवाळी अंकनिर्मिती केल्यानंतर त्याच्या छपाईचा खर्चसुद्धा निघत नाही. पण दिवाळी अंक टिकले पाहिजेत, ती आपलीच साहित्यिक चळवळ आहे. ते केवळ साहित्यनिर्मितीचे साधन नसून, ते



● 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'तर्फे गेली अनेक वर्षे घेण्यात येणारी भरघोस बक्षिसांची पर्वणी असणारी सर्वोत्तम दिवाळी अंक स्पर्धा



● संपूर्ण महाराष्ट्रातून सहभागी झालेल्या दिवाळी अंकांची कौतुकाने पाहणी करताना

सामाजिक वृत्तीप्रवृत्तींना, समाजातील कथा-कल्पनांना साकारणारे व्यासपीठ असल्याने रामशेठ ठाकूर यांनी दिवाळी अंक संपादक व साहित्यिकांना प्रोत्साहित करण्यासाठी 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'च्या माध्यमातून सन २००० पासून 'जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा' घ्यायला सुरुवात केली. सन २००४ पासून ही स्पर्धा मुंबई मराठी पत्रकार संघ आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीयबरोबरच राज्यस्तरीय घेण्यात येऊ लागली. सुरुवातीला राज्यस्तरीय दिवाळी अंकासाठी प्रथम क्रमांक २५,००० रुपये, जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकासाठी १०,००० रुपयांचे ट्रॉफीसह बक्षीस ठेवण्यात आले. मात्र वाढती महागाई आणि छपाईचा खर्च पाहता दिवाळी अंक दर्जेदार निर्माण व्हावेत, तेथे निर्मात्यांनी कोणतीही तडजोड करू नये म्हणून पारितोषिकाची रक्कम वाढवून राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाच्या दिवाळी अंकासाठी १ लाख व ट्रॉफी, द्वितीय क्रमांकासाठी रुपये ७५ हजार व ट्रॉफी, जिल्हास्तरीय प्रथम दिवाळी अंकासाठी रुपये ४० हजार रुपये व ट्रॉफी असे पारितोषिक रामशेठ ठाकूर यांनी जाहीर केले. गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत ही स्पर्धा पोहोचली आणि स्पर्धेसाठी मोठ्या प्रमाणात दर्जेदार दिवाळी अंक येऊ लागले, हे या स्पर्धेचे यश आहे. या स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे, पत्रकार-साहित्यिका नीला उपाध्ये यांनी गेली २५ वर्षे यशस्वीपणे सांभाळली.

रामशेठ ठाकूर यांनी या स्पर्धेलादेखील मोठी उंची दिली. 'जे करायचे ते उत्तुंग' असेच ठरवून 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जन्मदिनी २ जून ते १० जून २०१६ दरम्यान एक अनोखा उपक्रम राबवून 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये या उपक्रमाची नोंद घेण्यास भाग पाडले. पनवेल-उरणबरोबर रायगड हा शूरांचा, लढवय्यांचा, शौर्य आणि पराक्रमाचा जितका आहे, तितकाच तो आध्यात्मिक तत्त्वज्ञानाने पुरेपूर भरलेला असल्याने वारकरी संप्रदायाचे उपासक मोठ्या प्रमाणात आहेत. विठ्ठलनामाचा गजर करीत ज्ञानोबा-तुकोबांच्या अभंगवाणीने विठ्ठल नामात तल्लीन होऊन भजन गाणाऱ्या मंडळींसाठी मंडळाने सतत म्हणजे रात्रंदिवस कसलाही खंड पडू न देता भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सलग भजन करण्याचा हा विक्रम रायगड जिल्ह्यातील २७६ भजनी मंडळींनी १९२ तास दिवस-रात्र भजन म्हणून साकारला. २ जून रोजी सायंकाळी ६.०० वाजता भजन गायनाला सुरुवात होऊन १० जून रोजी सायंकाळी ६.०० वाजता भजन गायनाचा समारोप झाला. हा भगवंतभक्तीने भरलेला अनोखा विक्रम 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंदविला गेला. हा कार्यक्रम राबविण्यासाठीचे नियोजन मंडळाच्या कार्यकर्त्यांनी रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

२७ जुलै २००५ रोजी पनवेलला महापुराने वेढा घातला. मुसळधार कोसळणाऱ्या पावसामुळे नदी, नाले ओसंडून वाहू लागले. बघता बघता नदीच्या पाण्याने आपले रौद्र रूप दाखवायला सुरुवात केली. आपल्या प्रवाहाच्या कक्षा विस्तारून पनवेल शहरात पसरल्या. संपूर्ण पनवेल जलमय झाले होते.

इमारतीच्या दुसऱ्या मजल्यापर्यंत पाण्याची पातळी वाढली. जीव वाचविण्यासाठी पनवेलकरांची तारांबळ

उडाली. अनेकांचे संसार पाण्यात बुडाले. पावसाच्या पुराबरोबर अश्रूंचाही पूर डोळ्यांतून ओसंडून वाहू लागला. आयुष्यभर साकारलेली अनेकांची स्वप्ने पाण्याने भिजली होती. पुरामुळे सरकारी यंत्रणा पोहोचणे शक्यच नव्हते. तेव्हा पनवेलकरांचे तारणहार होऊन रामशेठ व प्रशांत ठाकूर आपल्या कार्यकर्त्यांची फौज घेऊन जिवाची पर्वा न करता पाण्यात उतरून पूरस्थितीची पाहणी केली. पनवेलकरांना आपली गरज आहे, हे ओळखून त्यांनी मदतीचा हात पुढे केला. आपली स्वतःची यंत्रणा कामाला लावली. जेवढी शक्य होईल तेवढी मदत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू झाला. पूरग्रस्तांना त्यांनी तातडीने ७० हजार किलो तांदूळ, डाळ, ब्लँकेट, चादर, भाजीपाल्याचे वाटप केले. प्रत्येक सोसायटीत पिण्याच्या पाण्याचे टँकर पुरवले गेले. पूर ओसरल्यानंतर चिखलमातीने पनवेल भरले होते. त्यांनी आपल्या टीआयपीएल कंपनीच्या मशिनरी कामाला लावून चिखल काढून घेतला. संसार पाण्यात बुडाल्यामुळे घरी स्वयंपाक करणे काहींना शक्य नव्हते, त्यांच्यासाठी अन्न शिजवून त्यांना शिजवलेल्या अन्नाचे वाटप केले. पुरानंतर रोगराई पसरू नये म्हणून आरोग्य शिबिरे भरवली. पनवेलकरांना मोफत औषधे पुरवली. 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'ने पूरपरिस्थितीत केलेले भरीव कार्य कौतुकास्पद होते. मंडळाला 'प्रियदर्शनी फाऊंडेशन'तर्फे 'प्रियदर्शनी कर्तृत्व गौरव पुरस्कार २०१०', तसेच 'पनवेल तालुका ऐक्य संघटने'तर्फे 'सामाजिक राष्ट्रीय एकात्मता समिती महाराष्ट्र राज्य पुरस्कृत 'राष्ट्रीय एकात्मता' या विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

खारघरमधील नागरिकांची व विद्यार्थ्यांची सरकारी दाखले मिळविण्याकरिता होणारी धावपळ लक्षात घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ' आणि महसूल विभाग, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दाखले वाटप शिबिराचा कार्यक्रम आयोजित करून या शिबिरात उत्पन्न, अधिवास, नॉन क्रीमिलेयर, जातीचा दाखला देण्याचे काम मंडळाने केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळा'च्या माध्यमातून होणारे रोजगार मेळावे हे बेरोजगार तरुण-तरुणींसाठी आशेचा किरण घेऊन येतात. अनेक कंपन्यांचे व्यवस्थापक या रोजगार मेळाव्यात हजेरी लावून आपल्या कंपनीच्या आस्थापनेवर लागणारे तज्ज्ञ कामगार या मेळाव्यातून निवडतात. आज अनेक तरुण-तरुणींना या रोजगार मेळाव्यातून नोकरी मिळाल्याने त्यांच्या भविष्याच्या वाटा सुखकर झालेल्या आहेत. दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या या रोजगार मेळाव्यातून आजपर्यंत अनेक तरुण-तरुणींना चांगल्या नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. दरवर्षी होणाऱ्या या रोजगार मेळाव्याची तरुण-तरुणी वाट पाहत असतात.

२०२० हे वर्ष संपूर्ण जगासाठी न विसरता येणारे होते. जागतिक महामारीने जगाची अर्थव्यवस्थाच ढासळली. संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था गिळून टाकणाऱ्या या वर्षामध्ये कोविडने संपूर्ण जगभर हाहाकार माजविला. जगात सगळ्यात जास्त लोकसंख्या असलेल्या भारतात त्याचा प्रादुर्भाव झाला. संपूर्ण भारतभर २३ मार्च २०२० पासून अनेक महिने लॉकडाऊन लागू झाले. कोविड संसर्ग होऊ नये म्हणून घरांचे दरवाजे बंद

करून कुटुंबे घरात बंदिस्त झाली. शहरातील कामे बंद पडल्यामुळे हातावर कमाविणाऱ्यांची पैशाअभावी व अन्नधान्याअभावी उपासमार होऊ लागली. कोविड प्रादुर्भाव झालेला आपला माणूस घरी परत येईल की नाही याची खात्री संपली. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. बेरोजगारीने उपासमार वाढली. अशा वेळेला समाजातील अनेक संस्था, माणसै मदतीला धावली. त्यामध्ये 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ' अग्रेसर होते. या काळात रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने केलेली आर्थिक मदतही तितकीच मोलाची होती. आपले सामाजिक उत्तरदायित्व जपत मंडळाने १ लाख अन्नधान्याचे किट वाटप, १ लाख १० हजार मास्कचे वाटप, १ लाख रोगप्रतिकारक गोळ्यांचे वाटप, १ लाख ५० हजार जणांना मोदी भोजनाचे वाटप मंडळाच्या वतीने करण्यात आले.

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ. कोविड काळात इतर सगळ्याबरोबरच पत्रकारिता क्षेत्रालाही आर्थिक फटका बसला. त्याचा परिणाम असा झाला, की पत्रकारांच्या कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली. पत्रकारांच्या मदतीसाठी रामशेठ ठाकूर धावून आले. मुंबई आणि पनवेलमधील पत्रकारांना त्यांनी अन्नधान्य आणि आर्थिक मदत देऊन आधार दिला. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या लॉक डाऊन काळात अबोली महिला रिक्षा चालकांचा रोजगार बंद झाला, त्यांच्यावर उपाशी राहण्याची वेळ आली. अशावेळी रामशेठ ठाकूर यांनी त्यांना जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या.

कोरोना काळ संपल्यानंतर सन २०२१ च्या सप्टेंबर महिन्यात माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सेवा व समर्पण अभियानांतर्गत पं. दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त रायगड जिल्हा भाजपाच्या वतीने खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमासाठी आले होते. त्या वेळी रामशेठ ठाकूर यांनी कोरोना काळात केलेल्या मदतीविषयी ते आवर्जून बोलले. ते म्हणाले, की कोरोना काळात माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी केलेले कार्य देवदूतासारखे आहे. पदरचे पाच कोटी रुपये खर्च करून अन्नधान्य गोरगरीब गरजूंना वाटप केले असून, ते खऱ्या अर्थाने गरिबांचे कैवारी आहेत. अनाथ झालेल्या विद्यार्थ्यांना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून पाच हजार रुपयांची मदत, त्याचबरोबर या विद्यार्थ्यांच्या दहावीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी मंडळाच्या माध्यमातून घेण्यात आली. त्या मदतीचे वाटप या कार्यक्रमादरम्यान करण्यात आले. त्या वेळी केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव म्हणाले, की रामशेठ ठाकूर यांच्याकडून लोकांची प्रदीर्घ काळापासून सेवा केली जात असून, त्यांनी कोरोनाच्या काळात केलेल्या मदतीला तोड नाही.

रामशेठ ठाकूर यांनी कोविड काळात पनवेल, उरण, खारघर, कामोठे या भागात गोरगरीब नागरिकांना जो मदतीचा हात दिला, त्यांच्या दैनंदिन जीवनाला उभारी देण्यासाठी जी मदत केली, त्यांचे दु:खाश्रू पुसण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, त्याची योग्य ती दखल मुंबईतून प्रकाशित होणाऱ्या दै. शिवनेरने घेतली व त्यांना राज्यस्तरीय पातळीवरचा 'कोविड योद्धा' पुरस्कार देऊन महाराष्ट्राचे राज्यपाल मा. भगतसिंह कोश्यारी यांच्या



● **महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल मा. भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांना 'कोरोना देवदूत पुरस्कार' प्रदान करण्यात आला**

हस्ते बुधवार दि. १४ ऑक्टोबर २०२० रोजी सन्मानित करण्यात आले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातील हा क्षण आनंदाचा तर होताच, शिवाय सुवर्णाक्षरांनी लिहावा असाच होता.

रायगड जिल्ह्यातून पंढरपूर, आळंदीला जाणारे अनेक वारकरी जेव्हा देवभूमीत पाय ठेवतात, तेव्हा त्यांच्या राहण्याची सोय व खाण्याची व्यवस्था होताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. रामशेठ ठाकूर बालपणापासून आपल्या वडिलांसोबत पंढरपूर, आळंदी यात्रा करीत होते. त्या वेळेला या अडचणी काय असू शकतात, हे तेव्हापासून त्यांना कळलेले होते. पंढरपूरमध्ये जाणाऱ्या माझ्या प्रत्येक वारकऱ्याला राहण्यासाठी चांगली आणि हक्काची जागा उपलब्ध व्हायला हवी, या उद्देशाने त्यांनी आळंदी, पंढरपूर येथे धर्मशाळांना मदत केली. आज या धर्मशाळांमधून अनेक भाविक आश्रय घेऊन विसावतात. तनपुरे महाराजांच्या वृद्धाश्रमाला रामशेठ ठाकूर यांनी केलेली मदतही तितकीच मौल्यवान होती.

ज्या आगरी समाजात त्यांचा जन्म झाला, त्या अखिल भारतीय आगरी समाज परिषद या मध्यवर्ती संघटनेच्या उपाध्यक्षपदाची सूत्रे त्यांनी सांभाळली. परिषदेतर्फे प्रकाशित होणाऱ्या 'आगरी दर्पण' या मासिकाचे ते प्रमुख आश्रयदाते झाले. आगरी जनगणना मोहिमेचे प्रमुख सल्लागार, पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे खजिनदार म्हणून कार्य करीत असताना पनवेल-उरण आगरी समाज मंडळाची पनवेलमध्ये स्वत:ची अद्ययावत दुमजली इमारत उभी करण्यासाठी त्यांनी सिंहाचा वाटा उचलला.

त्यांनी वेगवेगळ्या संस्थांमध्ये अनेक पदे भूषविली. मात्र या पदांचा गैरवापर न करता त्या पदांच्या

माध्यमातून त्यांनी अनेकांना उभे करण्याचा प्रयत्न केला. रायगड जिल्हा सहकारी बँकेचे संचालक म्हणून ते निवडून आले होते. या बँकेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेकडो तरुणांना त्यांनी उद्योग-व्यवसायासाठी स्फूर्ती देऊन त्यांच्यामागे आर्थिक पाठबळ उभे केले.

भेंडखळ, शेलघर, जासई येथील साई मंदिर, फुंडे, गव्हाण, कोपर येथील मारुती मंदिर, तसेच नवघर येथील विठ्ठल मंदिराच्या उभारणीसाठी त्यांनी आपला हातभार लावला. पनवेल तालुक्यातील मानघर गावात नवरात्रोत्सवासाठी गेले होते, त्या वेळी ग्रामस्थांनी त्यांच्यासमोर गावात भेडसावणाऱ्या अनेक समस्या मांडल्या. त्याचबरोबर गावात जीर्ण झालेल्या शिवमंदिराचा जीर्णोद्धार करण्याची व्यथा मांडताच त्यांनी जीर्णोद्धारासाठी मदत केली. 'मी देव देव करीत नाही, माझा दैवावर विश्वास नाही. माझा विश्वास चांगल्या कृतीवर, चांगल्या कर्मावर आणि चांगल्या विचारांवर आहे. देवाचे अवडंबर मला माजवता येत नाही. पण देवासमोर हात जोडताना मी मनोभावे जोडतो,' असे सांगणारे रामशेठ ठाकूर अनेकांना आपल्या मेहनतीवर विश्वास ठेवायला सांगतात.

रामशेठना मदतीसाठी कधी गावच्या सीमा किंवा जिल्ह्याच्या सीमा थांबवू शकल्या नाहीत. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कणकवली तालुक्यातील 'कुरूळ पंचक्रोशी शिक्षण संस्थे'च्या कुरूळ येथील 'बॅरिस्टर नाथ पै शाळे'च्या विकासासाठी देणगी देऊन शाळा उभारणीत आपला हातभार लावला. संस्थेचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी भावपूर्ण पत्र लिहून त्यांचे आभार मानले.

पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे सभागृह हे पनवेलच्या ज्येष्ठ नागरिकांचे हक्काचं सभास्थान. या ठिकाणी अनेक जेष्ठ नागरिक एकत्र येऊन आपल्या सुखदुःखांची चर्चा करीत बसतात. त्या अनुषंगाने वेगवेगळे उपक्रम राबवितात आणि स्वतःचे मन रमवून घेतात. ज्येष्ठ नागरीक सभागृहाच्या वरच्या माळ्यावर जाण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना दोन माळे चढून यायला त्रास होत आहे, हे रामशेठ ठाकूर यांना कळल्यानंतर त्यांनी स्वतःच्या खर्चातून ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्वहन (लिफ्ट) बसविण्याची व्यवस्था केली.

घाटकोपर मुंबईहून लग्नसमारंभ आटोपून येरवडा पुणे येथे वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या दोन मिनीबसना द्रुतगती मार्गावर टेम्पोने जोरदार धडक दिली. मिनी बसमधील २६ माणसे जागेवरच मृत्यू पावली. २९ वऱ्हाडी जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच रामशेठ ठाकूर, प्रशांत ठाकूर यांनी हॉस्पिटलमध्ये धाव घेतली. जखमींची चौकशी केली. अपघातग्रस्तांना चांगली वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून त्यांच्या मदतीसाठी रामशेठ ठाकूर यांनी तातडीची मदत पनवेलचे तहसिलदार पवन चांडक यांच्याकडे दिली.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रफिक नाईक कोल्ड स्टोअरेज कंपनीत झालेल्या वायुगळतीबाधितांना मदत करण्यासाठी ते तातडीने घटनास्थळी गेले. तेथील परिस्थितीची पाहणी करून अत्यवस्थ रुग्णांना आर्थिक मदत देऊन कंपनीला भरपाई देण्याच्या सूचना केल्या.

क्रीडा क्षेत्रासाठी ते नेहमीच आश्रयदाते म्हणून मदत करीत आले आहेत. पनवेल-उरणमधील कोणतीही

क्रीडास्पर्धा त्यांच्या मदतीशिवाय होत नाही. खेळ आणि खेळाडूंप्रति त्यांना कायम आदर राहिला आहे. रामशेठ ठाकूर यांनी खेळाडू तयार व्हावेत म्हणून खूप बारकाईने लक्ष दिले. सन २०१७ मध्ये न्हावा खाडी येथे 'आदेश स्पोर्ट्स' शिवाजीनगर यांच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेतील १६ संघांना अद्ययावत सुविधांसह खेळासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले.

गव्हाण खाडी येथील रामशेठ ठाकूर यांच्या बंगल्याजवळ सिडकोची असलेली पडीक जागा ही तशीच अनेक वर्षांपासून ओसाड असल्यामुळे त्या जागेचा उपयोग सिडको काहीच करीत नव्हती. निदान या ठिकाणी मुलांना खेळण्यासाठी मैदान तयार करून या विभागातील खेळाडूंना सोयी उपलब्ध करून द्याव्यात, यासाठी रामशेठ ठाकूर यांनी मैदानाचे काम हाती घेतले. आधुनिक सुविधांनी परिपूर्ण एक चांगले मैदान स्वखर्चाने त्यांनी तयार केले. मैदानाला महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रोहित पवार यांनी भेट देऊन पाहणी केली, तेव्हा हे एक सर्वोत्कृष्ट मैदान असल्याची पोचपावती दिली. आज या मैदानावर महाराष्ट्रातील संघाबरोबरच परदेशातील खेळाडूही सराव करायला येत असल्याने या मैदानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेलमधील साहित्यिकांनी आपल्या साहित्यनिर्मितीची ७० पुस्तके पनवेलमधील लिमये वाचनालयाला भेट देण्याचे ठरविले. रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडत असतानाच त्यांनीसुद्धा वाचनालयासाठी भरीव मदत केली.

रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्वाच्या सीमा कोणत्या धर्मासाठी, जातीसाठी, कोणत्या पंथासाठी, कोणत्या क्षेत्रासाठी मर्यादित न राहता प्रत्येक क्षेत्राला, प्रत्येक समाजाला, प्रत्येक धर्माच्या लोकांना त्यांनी आपला मदतीचा हात देऊन उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

सन २०२१ मध्ये रायगड जिल्ह्यातील महाडमध्ये आसमानी संकटाने महाडची दैना उडवली. पुरामुळे व दरड कोसळल्याने जनजीवन उद्ध्वस्त झाले. अशा संकटसमयी रामशेठ ठाकूर गप्प बसणे अशक्यच. त्यांनी 'श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ', 'जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थे'चे चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त), रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ४५० अन्नधान्य किट, बेबी फूड, मेडिकल किट, कपडे इत्यादी साहित्य महाडला पाठविले. रोगराई पसरू नये म्हणून स्वच्छता करण्याकरिता ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा.लि. या आपल्या कंपनीच्या माध्यमातून जेसीबी, डंपर, पिण्याच्या पाण्याचे टँकर अशी यंत्रसामग्री पाठविण्यात आली.

सप्टेंबर २०२४ मध्ये श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि दै. लोकमत यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल परिसरातील विविध क्षेत्रांतील कर्तृत्वान महिलांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा एक प्रेरणादायी उपक्रम सुरू करण्यात आला. यामध्ये वैद्यकीय, पत्रकारिता, व्यवसाय, व्यवस्थापन, मनोरंजन, कला, क्रीडा, सांकृतिक, समाजसेवा अशा सगळ्याच क्षेत्रांतील महिलांना सन्मानित करून त्यांच्या कार्याचा

गौरव करण्याचे पवित्र काम केले जात आहे.

'हे सर्व ऐश्वर्य देवाने दिलेले आहे. मालक तो मालक आहे. आपण आपल्याजवळ आले म्हणून मालक समजायचे नाही. आपण फक्त हमाल आहोत. येताना काही घेऊन आलो नाही. जाताना काही घेऊन जायचे नाही. ज्याच्या त्याच्या नशिबात आहे. जे रंजले गांजले आहेत, गरीब गरजू आहेत, त्यांना देण्याची बुद्धी देवाने दिली म्हणून देतोय,' असे ते विनम्रपणे सांगायला विसरत नाहीत.

जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।।

रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासात त्यांनी रंजल्या-गांजल्यांसाठीच आपल्या आयुष्याचे क्षण दिले. म्हणूनच आज लोक त्यांना देवत्वाने पुजत आहेत. खऱ्या अर्थाने साधुत्व काय असते, ते त्यांच्या आयुष्याच्या वाटचालीतून दिसून येते.

आज अनेक लोक नेत्रहीन आहेत, त्यांना आपली गरज आहे. मृत्यूनंतर डोळे मातीत विलीन होतात. ते जर दान केले तर एका नेत्रहीन व्यक्तीला सुंदर जग पाहता येईल, असा विचार करून त्यांनी ७ सप्टेबर २०१७ रोजी नेत्रदान जनजागृती पंधरवड्यानिमित नेत्रदानाचा संकल्प करून आपल्या दानशूर आयुष्याला अधिक उंची प्राप्त करून दिली.

फोडिले भांडार धन्याचा तो माल । मी तव हमाल भारवाही ।।
बुडते हे जन देखवेना डोळां । म्हणोनी कळवळा येतो मज ।।

संत तुकोबारायांचा हा अभंग रामशेठ आजवर आचरणातून जगत आले व कृतार्थ झाले.

१६

न्हावा खाडी... रामबाग आणि रामशेठ

रामची पावले लहानाची मोठी झाली ती न्हावा खाडीतील चिखलमातीत माखूनच. घराच्या समोरच खाडी असल्याने भरतीचे पाणी आत येऊ नये म्हणून गावकीने बंधारा बांधून पाणी थोपविले होते. दगड-मातीचा बंधारा जेमतेम तग धरून असायचा. भांग आणि उधाणाला समुद्राच्या लाटांचे दणके सहन करताना बंधाऱ्याचे अवसान गळायचे. कधीकधी बंधारा पूर्ण उसवायाचा आणि पाणी मुसंडी मारून आत शिरायचे ते अगदी घराच्या दारापर्यंत. या समुद्राच्या पाण्यामुळेच न्हावा खाडीला विस्थापित व्हावे लागले होते. या समुद्राच्या पाण्यामुळेच न्हावा खाडीतील संपूर्ण शेतीचा चिखल झाला होता. रामने लहानपणी हा पाण्याचा लपंडाव 'याची देही याची डोळा' पाहिला होता. आयुष्य त्याला कोठे, कसे घेऊन जाणार आहे हे माहिती नसले, तरी आपल्या गावाला विस्थापित करणारा चिखल त्याच्या नजेरेत भरला होता. त्याने आपल्या व्यवसायाची सुरुवात न्हावा खाडीत बंधारा बांधूनच केली. कदाचित हा योगायोग असावा, सिडकोने रामशेठ ठाकूर यांना बंधारा बांधण्याचे पहिले काम दिले तेही त्यांच्या गावात... त्याअगोदर त्यांचे कुटुंब गव्हाण येथील शिवाजीनगरला राहायला आले होते. तोपर्यंत न्हावा खाडीची जमीन समुद्राच्या पाण्याखाली जाऊन शेती उद्ध्वस्त झाली होती. मात्र याच चिखल झालेल्या जमिनीत पुन्हा एकदा नंदनवन फुलवून एक 'मिरॅकल' घडविण्याचे स्वप्न रामच्या सुप्त मनाने लहानपणीच पाहिले असावं. ते स्वप्न 'रामबाग'च्या रूपाने सत्यात उतरले.

रामशेठ ठाकूर यांनी आपल्या आजवरच्या आयुष्यात जवळजवळ संपूर्ण जग पाहिले. पाहिलेल्या जगाला वाचले आणि वेचले. जे सुंदर आणि भव्यदिव्य दिसले त्याला दाद दिली. त्यांच्या याच सौंदर्यदृष्टीने त्यांचे जन्मस्थान असलेल्या न्हावा खाडी या एका छोट्याशा गावात, ज्याप्रमाणे चिखलातून कमळ फुलते, त्याप्रमाणे चिखलातून रामबाग फुलली. ते पर्यटनासाठी जेव्हा दुबईला गेले होते, तेव्हा त्यांनी दुबईतील 'मिरॅकल गार्डन'ला भेट दिली. त्या बागेचे सौंदर्य त्यांना इतके भावले, की या प्रकारची अशीच बाग आपल्या गावात तयार करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यांनी एकदा ठरवले, की ते पूर्ण होईपर्यंत ते स्वस्थ बसत नाहीत. हे त्यांनी निर्माण केलेल्या बागेच्या रूपाने पुन्हा एकदा दिसून आले. त्यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेली 'रामबाग' त्यांनी स्वखर्चाने तयार करून आपले स्वप्न पूर्ण केले. गुरुवार, दि. २२ डिसेंबर २०२२ रोजी त्यांच्या 'अमोघ' या नातवाच्या हस्ते रामबागेचे उद्घाटन करून 'रामबागे'चा भव्यदिव्य लोकार्पण



• न्हावा खाडी येथील रामबाग या उद्यानाचा लोकार्पण सोहळा २२ डिसेंबर २०२२ रोजी रामशेठ ठाकूर यांचे नातू चि. अमोघ प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते पार पडला





• **रामबाग येथील ट्विन हार्ट सेल्फी पॉईंटजवळ बागेत आलेल्या पर्यटकांसमवेत एक क्षण**

सोहळा झाला. रामबागेचा लोकार्पण सोहळा रामशेठ ठाकूर यांचे नातू चि. अमोघ प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आल्याची संगमरवरी पाटी लावण्यात आली. अमोघ यांच्या हस्ते या बागेचा लोकार्पण सोहळा करून रामशेठ यांनी आपल्या नातवाला सामाजिक कार्याचा संस्कारच अप्रत्यक्षपणे दिला होता. जगाकडे पाहण्याची सौंदर्यदृष्टी दिली. कार्यक्रमात बोलताना त्यावेळी ते अत्यंत भावूक होऊन म्हणाले, "मी लहान असताना येथील खाडीचा बंधारा फुटला होता, त्यामुळे न्हावा खाडी, गव्हाण, कोपर येथील १,२०० एकर जमीन समुद्राच्या पाण्याखाली गेली. त्या वेळी सरकारचे खारलँड नावाचे बोर्ड होते. त्यांनी बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम केले, पण ते फार काळ टिकले नाही. तत्कालीन सरकारने त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. त्याचा परिणाम येथील शेतजमीन खाऱ्या पाण्याखाली गेली. या ठिकाणी असलेल्या आमच्या म्हसेश्वर मंदिरात जातानाही चिखलातून वाट काढावी लागत होती. यांची मनाला खंत असायची. आपण या ठिकाणी जन्मलो, वाढलो, प्राथमिक शिक्षण घेतले, उद्योजक झालो, खासदार झालो, त्या गावाच्या लौकिकासाठी काहीतरी वेगळे केले पाहिजे, असे सतत वाटत होते. गावातील मुलांना खेळायला, फिरायला जागा नव्हती. गेल्या पाच-सहा वर्षांपासून 'रामबाग'चे स्वप्न डोक्यात होते. माझ्या गावाकरिता मी काही करू शकलो, तर माझ्या जीवनाचे सार्थक होईल, असे वाटत होते. ते काम झाले आहे. सुरुवातीला म्हसेश्वर मंदिर बांधले. नंतर त्याच्या भोवती कंपाऊंडचे काम केले. मंदिराकडे येण्यासाठी २५० मीटरचा रस्ता बांधून घेतला. गावकरी म्हणाले, 'उत्तरेकडील खाडीकडे असणाऱ्या समशानभूमीकडे जायला रस्ता नाही.' मुख्य रस्त्याला जोडून



• रामबागेत फुललेल्या फुलांचे सौंदर्य न्याहाळताना लोकनेते रामशेठ ठाकूर

स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता बांधून घेतला. मंदिराभोवती वृक्ष लागवड करून सुशोभीकरण करायला घेतले आणि तेथूनच रामबागेच्या निर्माणाला सुरुवात झाली. म्हसेश्वर मंदिर आणि रामबाग तयार झाली, याचा मला अत्यंत आनंद झाला आहे. न्हावा-शिवडी सी-लिंक झाल्यावर मुंबई आणि राज्यातील लोक हे उद्यान पाहायला येतील, याची मला खात्री आहे. दुबई, कॅनडा अशा अनेक देशांतील उद्याने आम्ही पाहिली, मात्र दुबईतील 'मिरॅकल गार्डन' नजरेत भरले आणि असेच मिरॅकल घडणारे उद्यान उभारण्याचा संकल्प केला. दुबईतील मिरॅकल गार्डन वाळवंटात उभारले गेले आहे आणि न्हावा खाडी येथील ही रामबाग चिखल व खाऱ्या पाण्याखाली गेलेल्या पडीक जागेत साकार झाली आहे. ईश्वराच्या कृपेमुळेच या जागेवर ही सुंदर बाग उभी करण्याची बुद्धी झाली आणि ही बाग तयार झाली. माझ्याकडे जे काही आहे, ते मी सर्व द्यायला तयार आहे. आयुष्याच्या सुरुवातीला काबाडकष्ट करून जीवन जगलो. देवाने भरपूर दिले, त्यामुळे मला पैशांची गरज नाही. येथ येणाऱ्या प्रत्येकाचा आनंद, हेच माझे समाधान आहे.

ही रामबाग कोणा एका व्यक्तीच्या नावावर नाही. पण ही जागा सिडकोच्या नावावर असल्याने तयार झालेली ही बाग सिडकोने ताब्यात घ्यावी आणि विकसित करावी. न्हावा ग्रामपंचायत व न्हावा खाडीच्या तिन्हीही पाड्यांनी एकमताने तसा ठराव करून सिडकोकडे पाठवावा. जर सिडको तयार होत नसेल, तर न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांनी सांगितले आहे, की ग्रामपंचायतीच्या ताब्यात द्या आम्ही बाग सांभाळतो किंवा एखाद्या सामाजिक संस्थेच्या ताब्यात देऊन त्यांना देखभाल दुरुस्ती व विकसित करायला



• **रामबागेत आलेल्या छोट्या मुलांसोबत लोकनेते रामशेठ ठाकूर**

सांगा.” रामशेठ यांना बागेच्या निर्मितीचा आनंद होता, मात्र अंहकार अजिबात नव्हता. त्यांनी उद्घाटनाच्या कार्यक्रमातच याबाबत सांगितले, की ‘या बागेची मालकी माझी नाही, तर येथील भूमिपुत्रांची आहे.’

या बागेला ‘रामबाग’ हे नाव म्हसेश्वर देऊळ कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर यांनी सुचविले. त्याला सर्वांनी एकमुखाने मान्यता दिली. या गावचे सुपुत्र रामशेठ ठाकूर दोन वेळा खासदार झाले, याचा आम्हाला अभिमान आहे. त्याचबरोबर रामशेठ यांच्या संकल्पनेतून आणि स्वखर्चातून रामबाग तयार झाली. राम हे पवित्र नाव आहे, म्हणून गावकऱ्यांनी बागेला ‘रामबाग’ नाव दिले. त्यामुळे बागेत ‘राम’ आहे. बाग ही ‘रामबाग’ आहे. त्यात रामशेठ मात्र एका निर्मात्याच्या भूमिकेत आहेत. ही बागसुद्धा त्यांच्या दातृत्वाचे फक्त देणे होते ते त्यांनी सगळ्यांच्या आनंदासाठी दिले. म्हणूनच ते म्हणाले, “माझ्या आयुष्यामध्ये सर्वात महत्त्वाचे काम शाळा-कॉलेजची निर्मिती, राज्यातील अनेक जिल्ह्यांतील शाळांना मदत करण्याची संधी मिळाली. त्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे काम जेथे आपला जन्म झाला, त्या मातृभूमीसाठी आपण काही काम करू शकलो, तो आनंद फार मोठा आहे.” तरीदेखील त्यांच्या दातृत्वाची ओळख म्हणून गावकऱ्यांनी रामबागेच्या प्रवेशद्वारावर ‘रामशेठ ठाकूर उद्यान’ या नावाची कमान उभी केली.

त्यांनी आपल्या जन्मभूमीसाठी काही देण्याबाबत हाताचे काहीच राखून ठेवले नाही. मंदिर बांधून झाले. मंदिराच्या चारही बाजूंनी कंपाऊंड बांधून झाले. ग्रामस्थांच्या आग्रहास्तव मंदिराकडे येण्याचा रस्ता झाला. मंदिराच्या बाजूला तलाव, सुंदर बाग, मुलांना खेळायला चिल्ड्रन पार्क, भव्य मैदान निर्माण झाले. सन २०१९ मध्ये उत्तरपाड्यात त्यांनी स्वखर्चाने शाळेसाठी सुंदर मारत बांधून दिली. मारुतीचे देऊळ पडायला आले होते, त्याचा जीर्णोद्धार केला. चुलतभाऊ कानाशेठ ठाकूर यांनी दुसरे एक मंदिर बांधले, त्याच्यासाठी हातभार लावला. न्हावा गावातील नागरिकांना पाण्याची समस्या भेडसावत असल्याने समस्येचे निराकरण लोकनेते रामशेठ ठाकूर हेच करू शकतात, हे न्हावावासीयांना माहीत असल्याने आपली व्यथा त्यांनी रामशेठ यांना सांगितली. रामशेठ यांनी सांगितले, ''जलकुंभ बांधण्यासाठी तुम्ही जागा बघा, जलकुंभ बांधण्यासाठी लागणारा सर्व खर्च मी देतो.'' जलकुंभ उभारण्यासाठी नंदकिशोर भोईर आणि नितीन भोईर यांनी जागा दिली. त्या ठिकाणी १ लाख १० हजार लिटरची क्षमता असलेला जलकुंभ बांधण्यात आला. त्यामुळे न्हावेकरांची पाण्याची समस्या दूर झाली. न्हावा गावासारखीच न्हावा खाडीतील उत्तर पाडा, मधला पाडा, मोठा पाडा (दक्षिण पाडा) यांना सुद्धा पाण्याची समस्या होती. रामशेठ यांनी या तिन्ही पाड्यांसाठी पाण्याची पाईपलाईन टाकून दिली. त्यांनी दिलेल्या देणगीतून गावातील 'वनिता महिला मंडळा'च्या कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात आले. व्यायामशाळेसाठी मदत झाली.

१२ एकर जागेतील ही 'रामबाग' आज आबालवृद्धांचे, लहान मुलांचे विरंगुळ्याचे ठिकाण झाले आहे. उद्यानातील निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या असंख्य विविध रचना येथे पाहायला मिळतात. तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसनव्यवस्था, पाळणे, चिल्ड्रन पार्क, डबल हार्ट आणि विविध आकाराचे स्टोन असे दोन सेल्फी पॉईंट, पाण्याचे कारंजे, अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक आहेत. कोळी-आगरी बांधव मासेमारीसाठी समुद्रात मचवे घेऊन जातात. रामशेठ यांच्या वडिलांचाही मचवा होता. वडिलांबरोबर मचव्यातून समुद्रात जाऊन लहानपणी रामने रेती काढली. त्या आठवणी त्यांच्या स्मृतिपटलावर कोरल्या गेल्या आहेत. मचवा नेमका कसा असतो, हे ज्यांनी मचवा कधीच पाहिला नाही त्यांना कळावे, म्हणून रामशेठ त्यांच्या रामबागेत मचव्याची प्रतिकृती लवकरच तयार करून घेणार आहेत. ही मचव्याची प्रतिकृती पुढे निश्चितच रामबागेची ओळख होईल. सायकांळी होणाऱ्या विद्युत रोषणाईने या उद्यानाचे रूप बदलते, पाण्याचे सुंदर कारंजे, त्यातून विद्युत रोषणाईने विविध रंगांनी रंग बदलणाऱ्या रंगछटांनी पाण्याचे उडणारे रंगीत तुषार अंगावर झेलताना मिळणारा अवर्णनीय आनंद अनुभवता येतो. आरोग्याची काळजी घेणाऱ्यांसाठी संपूर्ण बागेत 'वॉकिंग ट्रॅक' आहेत, जेणेकरून चालता चालता बागेचाही आनंद घेता येऊ शकेल. या सोबतीनेच येथे येणाऱ्या वाहनांसाठी सुसज्ज पार्किंग, सुरक्षा, अनेक प्रसाधनगृहे अशा दर्जेदार सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. उद्यानातून बाहेर पडताना आपण 'रामबाग'ला दिलेल्या भेटीबद्दल आभार मानणारे शब्द पुन्हा रामबागेत येण्याची ओढ लावतात. रामबागला भेट



● 'रामबागे'तील डान्सिंग फाऊंटन

देणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर बागेत आल्याचे समाधान आणि आनंद दिसतो. न्हावा खाडीत 'रामबाग'च्या रूपाने या परिसराला चांगली ओळख मिळाली. राज्याच्या विविध भागातील लोक या ठिकाणी आवर्जून येत आहेत. शैक्षणिक सहलीतून विद्यार्थी 'रामबाग'ला भेट देत आहेत. येथे प्रवेश विनामूल्य आहे, तरीही सुविधा दर्जेदार आहेत.

'रामबागे'च्या पहिल्या वर्धापनदिनाला माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील व प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार डॉ. संजीव नाईक उपस्थित होते. संजीव नाईक हे रामशेठ यांचे वाशीच्या शाळेतील विद्यार्थी, आपल्या ठाकूर सरांविषयी बोलताना ते म्हणाले, ''या भूमीचे सुपुत्र लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मनोभावे सेवेच्या माध्यमातून 'रामबाग'ची निर्मिती झाली आहे. नावात त्यांच्या 'राम' तसे कर्तृत्वात 'राम' आहे. त्यांनी ज्ञानदानाचे काम केले आहे. वाशीला ज्या शाळेत मी शिकलो, त्या शाळेत ते शिक्षक होते. आमचे गुरू म्हणून त्यांच्याकडून शिकण्याचे भाग्य आम्हाला मिळाले. मी त्यांचे काम आणि कर्तृत्व स्वतः बघितले आहे. दिल्लीत थेट खासदार म्हणून गेले. काम करण्याचे धाडस आणि हिंमत लागते. त्यांनी धाडस हिमतीने जसे आणि जेवढे कमावले तेवढेच आपल्या दातृत्वाने वाटले. त्यांच्या दातृत्वातून त्यांनी फुलविलेल्या 'रामबागे'बद्दल आम्ही सर्व त्यांचे

ऋणी आहोत. लोकांसाठी बनविलेली सुंदर 'रामबाग' अधिक फुलण्यासाठी लोकांनीही प्रयत्नशील राहिले पाहिजे. अटल सेतूमुळे मुंबई अगदी जवळ आली आहे, त्यामुळे असंख्य व्यक्तींना 'रामबागे'चा आनंद घेता येतो आहे.

माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील 'रामबागे'च्या पहिल्या वर्धापनदिनाला आवर्जून उपस्थित राहिले होते. 'रामबागे'ची आणि रामशेठ यांच्या कामाची भव्यता बघून ते म्हणाले, "लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जे काम केले आहे ते इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे. रामशेठ यांच्या मोठेपणातून न्हावा खाडीत 'रामबाग'च्या रूपाने कमळ फुलले आणि याचा उपयोग सगळ्यांना होत आहे. त्यांचे वडील मचव्यावर काम करायचे. माझा आणि त्यांचा परिचय होता. मुंबईला असताना त्यांच्याशी गप्पागोष्टी व्हायच्या. चांगला स्वभाव, चांगले व्यक्तिमत्त्व, त्याचबरोबर बोलण्यात कोणताही अपशब्द कधीच न वापरणारे होते. त्यांच्या पोटी रामशेठच्या रूपाने नररत्न जन्मले. या नररत्नाने फक्त या परिसरालाच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राला सुगंध दिला. रामशेठना मी प्रत्यक्ष जेव्हा बघितले, तेव्हा माणुसकीने ओतप्रोत भरलेले व्यक्तिमत्त्व अधोरेखित झाले. मुंबई दहा मिनिटांवर आली आहे, त्यामुळे येणाऱ्या काळात 'रामबाग'मुळे या विभागाचे नाव मोठे होणार आहे. परमेश्वररूपी माणूस जन्माला आला म्हणून या न्हावा खाडीचे नाव जगात पोहोचले.''

"एक राजा होता, त्याने एखाद्या वस्तूला हात लावला, की तिचे सोने व्हायचे, असे म्हणतात. मात्र आपण ते कोणीच बघितले नाही. पण एक खाजण होते. तिथे चिखल होता. त्या चिखलाच्या जमिनीला स्पर्श केल्यावर त्याची बाग होते, हे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी येथील चिखलाच्या जमिनीला स्पर्श करून 'रामबाग'च्या निर्मितीतून दाखविले आणि हे आपण सगळ्यांनीच बघितले. हे सर्व त्यांनी स्वत:साठी नाही, तर समाजासाठी केले आहे. मुंबईमध्ये सुद्धा असा सुंदर प्रकल्प नाही, तो रामशेठ ठाकूर यांनी येथे उभारला आहे. मी रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन करतो. त्यांनी पुढच्या पिढीला सुंदर वास्तू देऊन मोकळ्या हवेत आणण्याचे काम केले आहे. तुम्ही लोकांसाठी करत राहता. शरद पवारसाहेब म्हणतात, 'आम्हाला कोणाला जमत नाही ते रामशेठना कसे जमते?' '' असे पाटील म्हणाले.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे रामशेठ यांच्या दातृत्वाबद्दल नेहमी सगळ्यांना सांगतात. तेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. ते म्हणाले, "न्हावा खाडी हा परिसर खाडी किनारी आणि अत्यंत चिखलमय. या ठिकाणी सर्वत्र चिखल असेच चित्र होते. म्हसेश्वर मंदिर छोटे होते. या मंदिरात जातानाही चिखल तुडवत जावे लागायचे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी याकडे अत्यंत जिव्हाळ्याने पाहिले आणि या मंदिराचा आणि परिसराचा कायापालट करून स्वप्ननगरीत रूपांतर करण्याची खूणगाठ मनाशी बांधली. ती त्यांनी स्वखर्चाने प्रत्यक्षात उतरवली, भव्यदिव्य अशा 'रामबाग' उद्यानाच्या रूपाने. त्यानिमित्ताने पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे स्वप्न या ठिकाणी साकार झाल्याने त्यांनी रामशेठ यांचे ऋण सत्कार करून व्यक्त केले. खरेतर आपल्या गावच्या मातीची रामशेठ यांना प्रचंड ओढ आहे. त्या भूमीत राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सोयी-सुविधा

मिळायला हव्यात म्हणून ते सातत्याने काम करीत राहिले आहेत.”

न्हावा खाडी... रामबाग आणि रामशेठ या सगळ्यात राम व्यापलेला आहे. न्हावा खाडीच्या त्या छोट्याशा घरात दुडुदुडु धावलेली पावले आज राम नामाने मोठी झाली आहेत. या मातीचे स्वत्व इतके, की तिने ‘राम’ला आपल्या कुशीत घेऊन ‘रामशेठ’चे स्वत्व दिले. रामशेठसारखं दातृत्व तिच्या कुशीत जन्माला यावे, हे या मातीचेही भाग्य म्हणावे लागेल. रामशेठ यांनी न्हावा खाडीत फुलवलेली बाग लौकिकार्थाने फार मोठी आहेच. त्याहीपलीकडे त्यांनी अनेकांच्या जीवनात असंख्य बागा फुलविल्या. त्यांचा सुगंधही युगे युगे दरवळत राहील. अशा रामबागा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत शाळांच्या रूपाने, मंदिरांच्या रूपाने मदतीच्या रूपाने त्यांनी अनेक ठिकाणी फुलविलेल्या आहेत.





१७

पुरस्कारसमृद्ध रामशेठ



न्हावा खाडीच्या समुद्रकिनारी वसलेल्या एका छोट्या गावातून सुरू झालेला राम चांगू ठाकूर ते रामशेठ ठाकूरपर्यंतचा प्रवास सामान्यातून असामान्यत्वाकडे घेऊन जाणारा, यशाचे आभाळ कवेत घेतलेल्या रामशेठ ठाकूर यांनी आयुष्याच सोने केले. त्यांचे आयुष्य हे फक्त त्यांचे राहिले नाही, तर त्यांचे आयुष्य आता समाजातील अनेकांच्या आयुष्याशी जोडले गेले आहे. त्यांचा प्रवास हा अनेकांचे आयुष्य सोबत घेऊन जाणारा आणि उभे करणारा आहे. त्यांनी केलेल्या अद्वितीय कार्यासाठी त्यांना अनेक सामाजिक संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. काही पुरस्कारांनी व्यक्ती मोठी ठरते, तर काही व्यक्तींमुळे पुरस्कार मोठे होतात. गव्हाणच्या छत्रपती शिवाजी विद्यालयातून त्यांनी शिक्षणाला सुरुवात केली. 'रयत'शी बालपणात जोडलेले नाते आज अधिक घट्ट झाले. तो प्रवास आजपर्यंत संपला नाही.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उभी केलेली ही संस्था आज त्यांचे तीर्थक्षेत्र झाली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या प्राणभूत तत्त्वांचा श्रद्धेने स्वीकार करीत ती आचरणात आणली. त्यांच्या त्यागमय कार्याला महात्मा फुले, शाहू महाराजांच्या कार्याचा आणि समाजसुधारणेचा वारसा मिळाला. आपल्या आयुष्यात ग्रामीण शैक्षणिक कार्याच्या वटवृक्षाखाली हजारो पिढ्या सुशिक्षित होऊन पवित्र झाल्या. शिक्षण, राजकारण, अर्थकारण, समाजकारण तसेच प्रशासकीय क्षेत्रातून यशस्वी झालेले अनेक विद्यार्थी जगाच्या कानाकोपऱ्यांत जाऊन कर्मवीरांचा वारसा पुढे चालवीत आहेत. रामशेठ यांनी या सगळ्या क्षेत्रांत आपली छाप पाडली. आज यश म्हणजे नक्की काय, हे रामशेठ ठाकूर यांच्याकडे बघून सांगता येते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वारसा आज रामशेठ ठाकूर जोपासत असताना ज्या 'रयत'मध्ये त्यांना 'राम' सापडला, त्या रयत शिक्षण संस्थेला अधिक उंचीवर नेण्यासाठी ते रात्रंदिवस झगडत आहेत. ते राजकारणी म्हणून जरी यशस्वी झाले असले, तरी त्यांच्यातील शिक्षक आणि शिक्षणाविषयीची त्यांची तळमळ तसूभरही कमी झालेली नाही. 'रयत'च्या ज्या शाळांना रामशेठ यांचा स्पर्श

झाला आहे, ती प्रत्येक शाळा समृद्ध झाली. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल कमिटीचे सदस्य म्हणून आपल्या जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या बरोबरीने 'रयत'च्या शाळांच्या विकासासाठी ते स्वतःचा पैसा देत आहेत. त्यातून त्यांना कसलाही मोबदला नकोच, तर शैक्षणिक विकासाची उंची गाठून आपल्याप्रमाणेच अनेक पिढ्या उभ्या कराव्यात, हाच त्यांचा एकमेव उद्देश आहे. आई ज्याप्रमाणे आपल्या मुलाचे संगोपन करते, त्याच ममतेने रामशेठ 'रयत'च्या शाळांचे संगोपन करीत असल्याचे दिसून येते.

रयत शिक्षण संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात स्वतःचा असा एक वेगळा ठसा उमटविला. संस्थेने ग्रामीण भागातील बहुजन समाजातील विद्यार्थी घडविण्याचे कार्य गेली दहा दशके अविरत सुरू ठेवले आहे. संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वैचारिक व नैतिक अधिष्ठानातून, तसेच त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांच्या असीम त्यागातून वसतिगृहयुक्त शिक्षणाचा पाया घातला गेला. पुढे हा 'रयत'वृक्ष विस्तारला गेला. अण्णांनी ग्रामीण महाराष्ट्र घडविण्याचे स्वप्न पाहिले होते, ते साकार करण्यासाठी एक त्यागी व ध्येयवादी पिढी घडविण्याचे कार्यही स्वतःच्या हयातीतच पूर्ण केले. त्या कार्याचा गौरव महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, साने गुरुजी, आचार्य प्र. के. अत्रे, धनंजयराव गाडगीळ, नरहर कुरुंदकर अशा अनेक नेत्यांनी, विचारवंतांनी आपल्या लेखनातून केलेला आहे.

रयत माऊली पुरस्कार

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ मध्ये स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था असून, ती प्रामुख्याने महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांत आणि कर्नाटक राज्यामध्ये कार्यरत आहे. ही संस्था पूर्व प्राथमिक ते विद्यापीठ स्तरावर कोल्हापूर, सातारा, पुणे विभागात ७०० हून अधिक शाखांद्वारे शिक्षण देते. महाराष्ट्रातील प्रमुख १५ जिल्ह्यात या संस्थेचे कार्यक्षेत्र पसरले आहे. त्यात पश्चिम महाराष्ट्र : सातारा (मुख्य केंद्र), पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर. तसेच अहमदनगर, नाशिक, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), बीड या इतर जिल्ह्यांबरोबर महाराष्ट्राबाहेर असलेली संस्थेची एक प्रमुख शाखा कर्नाटक राज्यात कार्यरत आहे. संस्थेचे माजी अध्यक्ष व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी 'माणसे घडविणारी कार्यशाळा' अशा शब्दांत संस्थेचे महाराष्ट्रातील स्थान अधोरेखित केले होते. या संस्थेअंतर्गत ध्येयाने प्रेरित होऊन जीवन व्यतीत करणारे, धडपड करणारे जे कार्यकर्ते, संस्थासेवक आहेत, तसेच एकविसाव्या शतकाच्या गुणवत्तेच्या कसोट्या अवगत करणारी संस्थेची महाविद्यालये आहेत, त्यांच्या कार्याचे कौतुक व्हावे, त्याची पोचपावती मिळावी, हे कार्य पुढे सुरू राहण्यासाठी ऊर्जा मिळावी, प्रेरणा मिळावी यासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कुटुंबीयांनी सन २००१ पासून 'रयत माऊली पुरस्कार' देण्यास सुरुवात केली.

आपल्या पतीच्या कार्यात सावलीसारख्या उभ्या राहून स्वत:चे आयुष्य देणाऱ्या, वसतिगृहात राहणाऱ्या अठरा

पगड जातीच्या मुलांसाठी गुढीपाडव्याच्या दिवशी त्यांना खायला अन्न नाही म्हणून स्वत:चे मंगळसूत्र गहाण ठेवून त्यांना खायला देणाऱ्या माऊली कर्मवीर अण्णांच्या पत्नी लक्ष्मीबाई या 'रयत'च्या माऊली होत्या. रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई यांच्या नावाने 'रयत'च्या कार्यक्षेत्रांतर्गत देण्यात येणारा हा पुरस्कार सातारा येथील 'धनीनीची बाग' येथे वहिनींच्या स्मृतिदिनी देण्यात येतो. हा परिसर अण्णा-वहिनींच्या उमेदीच्या काळातील सहवासाने पुनित झालेला असल्याने त्यास एक वेगळे भावनिक महत्त्व आहे. वहिनींचा मृत्यू, त्यांचा सौभाग्य अलंकार व गुढीपाडवा यांचा अन्योन्य संबंध असल्याने त्यांचा स्मृतिदिन समारंभ पाडव्याच्या आदल्या दिवशी (पूर्वसंध्येला) आयोजित केला जातो. त्यामुळे मार्च-एप्रिल या महिन्यात येणाऱ्या गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रतिवर्षी दिला जातो. या पुरस्कारासाठी कोणत्याही व्यक्तीकडून, शाखेकडून अर्ज मागविला जात नाही. संस्थेत नि:स्पृहपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींची, शाखेची, नोंद समाज घेतच असतो. त्यातूनच त्यांचे कार्य ठळकपणे समोर येते, ते या पुरस्काराचे मानकरी ठरतात. असंख्य गुणवान कार्यकर्त्यांची, गुणवत्तेचा व 'रयत'चा वारसा चालविणाऱ्या विद्यालयांची, महाविद्यालयांची, हितचिंतकांची तसेच देणगीदारांची मांदियाळी या संस्थेला लाभली आहे. त्यांचा प्रातिनिधिक स्वरूपात गौरव या पुरस्काराच्या रूपाने करण्याचा मानस, तसेच संस्था व समाज ऋणाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा मनस्वी प्रयत्न आहे. हा पुरस्कार समारंभपूर्वक स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा, शाखेचा गौरव करण्यात येतो.



रामशेठ ठाकूर यांनी संस्थेच्या विविध पदांवर काम करीत असताना 'रयत'च्या फुंडे, दापोली, जासई, पळस्पे, वावंजे, रिटघर, पनवेल, कामोठे, नावडे, पडवळपाडा, डोळखांब, गव्हाण, वाशी या रायगड विभागातील शाखांबरोबरच दहिवडी, सातारा, रामानंदनगर, मलकापूर, कुंभोज, श्रीरामपूर, वावी, निढळ इत्यादी शैक्षणिक संकुलांच्या भौतिक व सर्वांगीण विकासासाठी बहुमोल मदत व आर्थिक सहकार्य केले आहे. त्यांच्या उत्तुंग कार्याचा

गौरव सोमवार, ३ एप्रिल २०११ रोजी 'रयत माऊली पुरस्कार' देऊन सन्मानपूर्वक करण्यात आला. रामशेठ यांनी आपल्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत हा पुरस्कार विनम्रपूर्वक स्वीकारला. रामशेठ ठाकूर या पुरस्काराबद्दल अत्यंत भावुक होऊन म्हणतात, "माझ्या जीवनातील हा सर्वोच्च पुरस्कार आहे, ज्याने माझे जीवन कृतार्थ झाले."

आतापर्यंतच्या त्यांच्या सामाजिक राजकीय, शैक्षणिक उत्कर्षाच्या प्रवासात अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले.

इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार



कर्मवीरांच्या त्यागी आयुष्याचा आदर्श घेऊन कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचा वसा घेऊन इस्माईलसाहेब मुल्ला यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात स्वत:ला झोकून देऊन आपले जीवन कृतार्थ केले. रयत शिक्षण संस्थेतर्फे त्यांच्या प्रेरणादायी समर्पित आयुष्याचे संस्कार सर्वत्र पोहोचावेत म्हणून त्यांच्या नावाने असेच कार्य करणाऱ्या व्यक्तीला 'इस्माईलसाहेब मोहम्मदसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. कर्तृत्व व दातृत्वाने मोठे असणारे, राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व देत सामाजिक जबाबदारी व सामाजिक बांधिलकी जपणारे, राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, सांकृतिक अशा सगळ्या क्षेत्रात उतुंग काम करणारे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना रयत शिक्षण संस्थेचा 'इस्माईलसाहेब मोहमदसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार' सोमवार, दिनांक १७ डिसेंबर २०१८ रोजी सातारा येथे सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे यांच्या हस्ते हजारो रयत सेवकांच्या साक्षीने प्रदान करण्यात आला. यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा येथे संस्थेचे माजी मानद सचिव इस्माईलसाहेब

मोहम्मदसाहेब मुल्ला यांच्या ४५ व्या पुण्यतिथी सोहळ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील, सरोजताई पाटील, व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, सचिव डॉ. भाऊसाहेब कराळे, कायदेविषयक सल्लागार ॲड. दिलावर मुल्ला, पॅट्रन सदस्य लक्ष्मणशेठ पाटील, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, जी. आर. पाटील, वाय. टी. देशमुख, महेंद्र घरत उपस्थित होते.

डॉ. राजेंद्र जगदाळे यांनी रामशेठ यांच्या कार्याचा गौरव अत्यंत सुंदर आणि मोजक्या शब्दांत केला. ते म्हणाले, "क्षेत्र कोणतेही असो, यश अपयश ही त्याची पायरी असते, त्यामुळे अपयशाला न डगमगता आणि यशाने हुरळून न जाता जो मार्गक्रमण करतो, तोच यशाची शिखरे पादाक्रांत करतो. त्या अनुषंगाने अत्यंत बिकट परिस्थितीत काबाडकष्ट करीत 'कमवा आणि शिका' या कर्मवीर अण्णांच्या शिकवणीतून लोकनेते रामशेठ ठाकूर घडले. कर्मवीर अण्णांच्या 'रयत'मध्ये त्यांना शिक्षणाचे बाळकडू मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक आणि वैचारिक पातळीला प्रचंड बळ मिळाले. कर्मवीर अण्णा, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील, लोकनेते दि. बा. पाटील, पिताश्री चांगू काना ठाकूर, मातोश्री भागूबाई ठाकूर, थोर समाजसुधारक जनार्दन भगत अशा व्यक्तिमत्त्वांचे मार्गदर्शन लोकनेते रामशेठ ठाकूर यांना लाभले. त्यामुळे माणूस आणि माणुसकी जपण्याचे काम त्यांच्याकडून कायम होत असून, ते एक खुली किताबप्रमाणे आयुष्य जगत आहेत. या जगात शोधतो त्यालाच सापडते, त्यांनी स्वतःला शोधले. स्वतःच्या क्षमतांना शोधले आणि त्यासाठी अविश्रांत मेहनत घेतली. नावलौकिक स्वकष्टाने मिळविला. एका सामान्य कुटुंबात जन्मलेला माणूस काय करू शकतो, हे आपले आदर्शवत उदाहरण त्यांनी सर्व जगासमोर ठेवले. निःस्वार्थीपणे समाजाची सेवा करून कला, क्रीडा, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रासह महत्त्वपूर्ण अशा शैक्षणिक क्षेत्रात आदर्श असणारे व आपल्या कार्याचा ठसा सर्वत्र उमटवून सर्व समाजाला प्रेरणा देणारे बहुजनांचे दाते, गरिबांचे कैवारी आणि सकलजनांचा आधार व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व रामशेठ ठाकूर यांचा सत्कार म्हणजे बहुजन समाजाचा सत्कार करण्याची भावना 'इस्माईलसाहेब मोहम्मदसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार' सोहळ्यात पाहायला मिळाली."

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील म्हणाले, की अण्णांच्या छायेखाली 'रयत'च्या प्रयोगशाळेत रामशेठ ठाकूर नावाचे दुर्मीळ रसायन निर्माण झाले आहे. रामशेठ ठाकूर यांच्यासारखे आदर्श व्यक्तिमत्त्व 'रयत'ला जोडले गेले आहे. रामशेठ ठाकूर यांनी न बोलता संस्थेला भरभरून दिले असून, रामशेठ हे कर्मवीर अण्णांचे पाईक होऊन त्यांच्या कार्याला मोठे करीत आहेत. संस्थेला मदत हवी असते, त्या वेळी रामशेठ ठाकूर जबाबदारी घेतात व ती यशस्वी करतात, त्यामुळे रामशेठ ठाकूर हे संस्थेची ताकद आहेत.

ॲड. दिलावर मुल्ला म्हणाले, "रामशेठ यांच्यासारख्या दातृत्वामुळे रयत शिक्षण संस्था वाढली. रामशेठ

ठाकूरसाहेब आणि मुल्लासाहेब यांनी गरिबीतून जीवन जगत शून्यातून विश्व निर्माण केले. एन. डी. पाटील यांच्या शब्दात सांगायचे, तर रामशेठ ठाकूर नि:स्वार्थी व निगर्वी अशी मूर्ती आहे. रामशेठ हे माणूस म्हणून मोठे आहेत. मोठ्या उंचीच्या या व्यक्तिमत्त्वाला दिलेल्या या पुरस्काराने पुरस्काराची उंची वाढली आहे. प्रत्येक गोष्ट चांगली झाली पाहिजे आणि त्याचा समाजाला उपयोग व्हावा हा त्यांचा हट्टच असतो.''

या पुरस्काराविषयी बोलताना रामशेठ ठाकूर म्हणाले, "माणुसकीच्या भावनेने झालेला हा सत्कार माझ्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. लक्ष्मीवहिनींच्या नावाने मला 'रयत माऊली' पुरस्कार मिळाला. त्याचप्रमाणे आज मिळालेला हा पुरस्कार मला प्रेरणा देणारा आहे. खासदारकीला निवडून आलेल्या आनंदापेक्षा या पुरस्काराचा आनंद मोठा आहे. जीवनात अनेक प्रसंग अनुभवले, कठीण दिवस काढले. आई-वडील संतपरंपरेतील आणि स्वच्छतेचे भक्त होते. मला समाधान आहे ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील, जनार्दन भगतसाहेब माझ्या गुरुस्थानी आहेत. पैसा महत्त्वाचा नाही, माणूस महत्त्वाचा आहे, ही शिकवण मला मिळाली आणि प्रेरणा ठरली. 'रयत' माझ्या अंगात रुजली आणि 'रयत'मुळेच मी घडलो."

रयत सेवक पुरस्कार

सत्यशोधक कर्मवीर भाऊराव पाटील हे शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे वारसदार होते. शिवराय, फुले, शाहू, आंबेडकरांशी त्यांचे सांस्कृतिक नाते होते. या महापुरुषांच्या विचारधारेला अनुसरून त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. ही शिक्षण संस्था आशिया खंडातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था आहे. या रयत शिक्षण संस्थेचा 'आदर्श रयत सेवक पुरस्कार' रयत शिक्षण संस्थेसाठी अहोरात्र झटणाऱ्या व 'रयत'साठी सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या रयत सेवकास हा पुरस्कार दिला जातो. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आजवर 'रयत'साठी केलेल्या उत्तुंग कार्याबद्दल 'रयत'चे माजी सचिव प्राचार्य आर. डी. गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला .

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शिक्षणाप्रति डोंगराएवढे कार्य आहे. शेतकरी बहुजन समाजाच्या झोपडीपासून खोपडीपर्यंत रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणाची गंगा नेली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे सत्यशोधक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचे वारसदार आहेत. शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्याशी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सांस्कृतिक नाते आहे. हे त्यांच्या प्रचंड सामाजिक कार्यामुळे मान्य करावेच लागेल. रयत सेवक संघ, साताराच्या गुणवंत रयत सेवक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन रायगड विभागाच्या वतीने रविवार, दि. २ डिसेंबर २०१८ रोजी कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये करण्यात आले होते. त्या वेळी बोलताना ते म्हणाले, ''कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या शिक्षण संस्थेचे नाव 'रयत' ठेवले. कारण छत्रपती शिवाजी महाराज आपल्या प्रजेला 'रयत' म्हणायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शिक्षण संस्थेचे नाव 'पीपल्स

एज्युकेशन सोसायटी' ठेवले, कारण पीपल्सचा अर्थ 'लोक, रयत' असा होतो. कर्मवीर भाऊराव पाटील म्हणायचे माझ्या दाढीचे जेवढे केस आहेत, तेवढी शेतकरी बहुजनांची मुले शिकली पाहिजेत. नुसती शिकली पाहिजेत असे नाही, तर ती प्रस्थापितांच्या छातीवर थयाथया नाचली पाहिजेत...! कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या एका कॉलेजला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव दिले होते. त्या वेळी एका जैन व्यापाऱ्याने भाऊराव पाटील यांना विचारले होते, की 'भाऊराव, मी तुम्हाला १ लाख रुपये देणगी देतो. तुम्ही कॉलेजला दिलेले शिवाजी महाराजांचे नाव बदलून माझ्या वडिलांचे नाव द्या.' यावर कर्मवीर भाऊराव पाटील उसळून म्हणाले होते, 'एक वेळ मी माझ्या जन्मदात्या बापाचे नाव बदलेन, मात्र कॉलेजला दिलेले छत्रपती शिवरायांचे नाव बदलणार नाही.' ''

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव प्राचार्य शिवाजीराव भोर, जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, रायगड विभाग सल्लागार मंडळाचे चेअरमन बाळाराम पाटील, रयत सेवक बँकेचे संचालक डॉ. बिरू राजगे, रयत सेवक संघ, साताराचे अध्यक्ष जयराम पाटील, सरचिटणीस बहुराव पेठकर, उपाध्यक्ष नूरा शेख उपस्थित होते.

रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कार

माणूस जन्माला येतो ते आपल्या पूर्वजन्माची संचित घेऊन, असे अध्यात्म सांगते. पूर्वजन्मात आपण कोण असतो कोणालाच माहिती नसते. हा जन्म आपण याची देही याची डोळा पाहतो, अनुभवतो पुढील जन्माचे संचिताचे कर्म ही या जन्माची फलश्रुती असते. जगात कित्येक माणसे जन्माला येतात आणि कित्येक जगाचा निरोप घेतात. पण कीर्तिरूपाने लक्षात राहणारे फार थोडे असतात. ज्यांना मानवता धर्म कळला, त्यांना कर्म कळलेले असते. ज्यांना कर्म कळले, त्यांना जगण्याचे मर्म कळलेले असते. स्वतः जगताना इतरांना जगण्याची दिशा देणारे समाजात आदर्श ठरतात. स्वातंत्र्यसेनानी रावसाहेब शिंदे हे असेच एक व्यक्तिमत्त्व. शिक्षण व सामाजिक क्षेत्रात नावलौकिक असलेले एक भारतीय स्वातंत्र्यसेनानी आणि रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष रावसाहेब शिंदे यांनी आपल्या कार्याने आपल्या जीवनाला अमरत्व दिले. विद्यार्थिदशेत शिक्षणानिमित्त संगमनेरला असताना रावसाहेबांनी तेथे 'शिंदे बोर्डिंग'ची स्थापना केली. गरीब मुलांना एकत्र करून सहभोजन, सहनिवास व सहशिक्षण असा एकात्म सहजीवनाचा पायंडा निर्माण केला. विद्यार्थ्यांची चळवळ चालवून विद्यार्थ्यांचे छोटे-मोठे प्रश्न सोडविले. पुढे रयत शिक्षण संस्थेत काम करताना याच कार्याचा वारसा घेतला. 'रयत'च्या माध्यमातून गरीब मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात मोलाचा वाटा त्यांनी उचलला. 'कमवा व शिका' ही कर्मवीरांची स्वावलंबी शिक्षणाची योजना विद्यार्थ्यांमध्ये रुजविली. 'रयत'साठी अहोरात्र झटणारा कार्यकर्ता व नेता म्हणून त्यांची ख्याती होती. अभ्यासूपणा, प्रश्न मुळापासून समजून घेण्याची हातोटी, श्रमिकांच्या श्रमाचे मोल जाणण्याची वृत्ती व उत्कृष्ट वक्तृत्वाद्वारे नेमकेपणाने प्रश्न मांडण्याचे कसब यांमुळे ॲड. शिंदे यांचे नाव महाराष्ट्रातच नव्हे, तर देश-विदेशात पोहोचले. कुसुमाग्रज प्रतिष्ठान, विनोबा भावे

प्रतिष्ठान, महाराष्ट्र साहित्य परिषद अशा अनेक संस्थांच्या उभारणीत रावसाहेब शिंदे यांचा हातभार लागला होता. त्यांच्या नावाने दिला जाणारा 'रावसाहेब शिंदे स्मृती पुरस्कार' त्यांच्या कार्याइतक्याच उंचीचे काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला दिला जातो. लोकनेते रामशेठ ठाकूर हे या पुरस्काराचे मानकरी ठरले. आजपर्यंत रामशेठ ठाकूर यांनी केलेले सामाजिक, राजकीय व शैक्षणिक कार्य कायम समाजाला प्रेरणादायी ठरणारे आहे. त्यांच्या कार्याचा गौरव स्वर्गीय रावसाहेब शिंदे यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त एस. एम. जोशी सभागृह, पुणे येथे दिनांक २५ जानेवारी २०१९ रोजी झालेल्या सोहळ्यात माजी केंद्रीय गृहमंत्री व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते २५,००० रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

बहुजन रत्न पुरस्कार

रायगड जिल्हा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने शुक्रवार, दिनांक १४ एप्रिल २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले, महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, यांचा संयुक्त जयंती सोहळा साजरा करण्यात आला. या सोहळ्यात रामशेठ ठाकूर यांच्या अविरत लोकसेवेला सलाम म्हणून त्यांना 'बहुजन रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

समाजभूषण पुरस्कार

रामशेठ ठाकूर हे नेहमीच आगरी-कोळी समाजाच्या उत्कर्षासाठी झटत आलेले नेते आहेत. आगरी-कोळी समाजाच्या अनेक समस्या त्यांनी मार्गी लावल्या. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून सिडकोचे संचालक, नवी मुंबई जिल्हा काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष यांनी आयोजित केलेल्या आगरी-कोळी महोत्सवात 'अखिल आगरी कोळी समाज प्रबोधन ट्रस्ट, नवी मुंबई' या संस्थेच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांना 'समाजभूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

भारतज्योती पुरस्कार

'इंडिया इंटरनॅशनल फ्रेंडशिप सोसायटी', नवी दिल्ली यांच्या वतीने देण्यात येणारा 'भारतज्योती' हा मानाचा पुरस्कार रामशेठ ठाकूर यांना आसाम आणि तमिळनाडूचे तत्कालीन राज्यपाल भीष्मनारायण सिंह यांच्या हस्ते नवी दिल्लीत प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरचा हा पुरस्कार सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग क्षेत्रातील गुणवंताला दिला जातो. याअगोदर मदर तेरेसा, माजी सरन्यायाधीश पी.एन.भगवती, डॉ. बी. के. गोयल, सुनील गावस्कर, सय्यद किरमाणी, दिलीपकुमार, देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, पार्श्वगायक एस.पी.बालसुब्रमण्यम, धनराज पिल्ले यांना प्राप्त झालेला आहे.

आरेकर पुरस्कार

'होळकर प्रतिष्ठान' कर्जत, रायगड या संस्थेच्या वतीने सामाजिक, राजकीय, कला, क्रीडा क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा गौरव म्हणून 'आरेकर पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येते. रामशेठ ठाकूर यांच्या उत्तुंग कार्याबद्दल हा मानाचा पुरस्कार रामशेठ ठाकूर यांना प्रदान करण्यात आला.



इंटरनॅशनल गोल्ड स्टार ॲवॉर्ड

'इंडो-थाई फ्रेंडशिप'अंतर्गत भारत आणि थायलंड यांच्यात मैत्री वाढविण्यासाठी बँकॉक येथे झालेल्या परिषदेत रामशेठ ठाकूर यांना 'इंटरनॅशनल गोल्ड स्टार' या पुरस्काराने थायलंडचे कामगारमंत्री पैटून केवथॉग यांच्या हस्ते दिनांक २८ मे २००८ रोजी बँकॉक येथे रामशेठ ठाकूर यांना प्रदान करण्यात आला. या वेळी उभय देशांत संबंध दृढ करण्यासाठी झालेल्या परिसंवादात रामशेठ यांचा सहभाग होता.

अप्पासाहेब पाटील पुरस्कार



पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे चिरंजीव अप्पासाहेब पाटील यांच्या नावाने देण्यात येणारा हा पुरस्कार श्रीरामपूर येथे झालेल्या सोहळ्यात मा. रामशेठ ठाकूर यांना प्रदान करण्यात आला.

समाजरत्न पुरस्कार

आर.के. एचआयव्ही अँड एड्स रीसर्च अँड केअर सेंटर चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबईच्या वतीने रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक कार्याबद्दल कोळसा व उद्योगमंत्री प्रकाश जयस्वाल यांच्या हस्ते माजी मंत्री दिलीप गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार रामशेठ यांच्या वतीने श्री. परेश ठाकूर यांनी स्वीकारला होता.

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्कार

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वैद्यकीय, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करणारे व समाजाला प्रेरणादायक असणारे व्यक्तिमत्त्व म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांना रविवार, ७ जानेवारी २०२४ रोजी खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते 'दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राजीव गांधी एक्सलन्स ॲवॉर्ड, नवी दिल्ली

इंडिया इंटरनॅशनल फ्रेंडशिप सोसायटी, नवी दिल्लीच्या वतीने देण्यात येणारा राजीव गांधी एक्सलन्स ॲवॉर्ड, हा मानाचा पुरस्कार १८ सप्टेंबर २००९ रोजी पांडेचेरीचे नायब राज्यपाल एच. एच. इक्बाल यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांना प्रदान करण्यात आला.










पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमीटी
इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी. विभाग)

समाज भूषण सन्मान पत्र

आदरणीय श्री. रामशेठ ठाकूर साहेब

(अध्यक्ष - महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमीटी ओ. बी. सी.)

समता, बंधुता, न्याय ही मुल्ये व्यिकारुन आपण न्यायाची लढाई लढत आहात. सामाजीक बांधीलकी स्वीकारुन समाजातील दुर्बल घटकांचे कल्याण आणि सर्वांगीण विकास या करीता झटत आहात. सामाजिक समता, जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेच्या वाढीसाठी सातत्याने काम करत आहात.

राजकीय क्षेत्रामध्ये काम करत असुन सुध्दा सामाजीक बांधीलकी जपत आहात. आपले शैक्षणीक व क्रीडा क्षेत्रामध्येही फार मोठे योगदान आहे. आपल्या या डोखनीय व सातत्यपुर्ण कामगीरीमुळे युवा पिढीला आपण आदर्श आहात म्हणुन आपणांस 'समाज भूषण' या पुरस्काराने गौरवण्यात आम्हाला अभिमान वाटत आहे. संस्कार, समता, शुध्द चारित्र्य, सेवा, दानशुरपणा या पंचसुत्राने मुल्यांकीत अश्या आपल्या समर्पीत कार्याचा गौरव म्हणुन आपणास हे मानपत्र सन्मान पुर्वक प्रदान करण्यात येत आहे.

आपले नम्र

श्री. हनुमंत माळी,
अध्यक्ष : पि. चिं. काँग्रेस कमीटी
(ओ. बी. सी. विभाग)

सौ. अलकाताई घोगरे
अध्यक्षा : पि. चिं. महिला काँग्रेस कमीटी
(ओ. बी. सी. विभाग)

दिनांक ३ मार्च २००९
स्थळ :


महाराष्ट्र वैभव पुरस्कार

सन्मान पत्र

मा.लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब !

(अध्यक्ष ओबीसी सेल, महाराष्ट्र काँग्रेस कमिटी)


पुरस्कार

लोकनेता रामशेठ ठाकूर

मानपत्र


सन्मानपत्र

मूलन विद्यालय व ॲड. राक्काशेठ विंदे कनिष्ठ महाविद्यालय

१८

विश्वभ्रमंतीचे सुवर्णक्षण






FORGET






HONG KONG
Disneyland Resort




DUBAI
U.A.E.




SCHATZ

